# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक - ५९

## सभावृत्तांत

दिनांक - २०.०५.२०१६ वेळ - दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे मे-२०१६ ची मासिक मा.महापालिका सभा शुक्रवार दि.२०.०५.२०१६ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
३. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
४. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
५. मा.भालेकर अरुणा दिलीप
६. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
७. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
८. मा.थोरात वनिता एकनाथ
९. मा.सायकर अजय शंकरराव
१०. मा.जाधव साधना रामदास
११. मा.जाधव राहुल गुलाब
१२. मा.आल्हाट मंदा उत्तम
१३. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१४. मा.काळजे नितीन प्रताप
१५. मा.पात्रे राम संभाजी
१६. मा.बाबर शारदा प्रकाश
१७. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१८. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१९. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२०. मा.पवार संगीता शाम
२१. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२२. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२३. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२४. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२५. मा.भारती फरांदे

२६. मा.आर.एस.कुमार

२७. मा.जावेद रमजान शेख

२८. मा.चारुशीला प्रभाकर कुटे

२९. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

३०. मा.पांढरकर निलेश शंकरराव

३१. मा.राजू मिसाळ

३२. मा.नंदा विकास ताकवणे

३३. मा.नेटके सुमन राजेंद्र

३४. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३५. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३६. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३७. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३८. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३९. मा.लोंढे गणेश नारायण

४०. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

४१. मा.ॲड.संदीप गुलाब चिंचवडे

४२. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४३. मा.अपर्णा निलेश डोके

४४. मा.अनंत सुभाष को-हाळे

४५. मा.जयश्री वसंत गावडे

४६. मा.श्रीमती टेकवडे सुजाता अविनाश

४७. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४८. मा.शेख अस्लम शैकत

४९. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५०. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

५१. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५२. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५३. मा.सुपे आशा रविंद्र

५४. मा.मोहिनीताई विलास लांडे

५५. मा.अजित दामोदर गव्हाणे

५६. मा.गोफणे अनुराधा देविदास

५७. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

५८. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

५९. मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६०. मा.लोंढे शुभांगी संतोष

६१. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

६२. मा.सावळे सिमा रविंद्र

६३. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

६४. मा.पालांडे सुजाता सुनिल

६५. मा.बहल योगेश मंगलसेन

६६. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

६७. मा.कदम सदगुरु महादेव

६८. मा.गिता सुशील मंचरकर

६९. मा.कैलास महादेव कदम

७०. मा.छाया जगन्नाथ साबळे

७१. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

७२. मा.वाघेरे सुनिता राजेश

७३. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

७४. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७५. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

७६. मा.काळे विमल रमेश

७७. मा.पाडाळे निता विलास

७८. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

७९. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

८०. मा.विमलताई सुरेश जगताप

८१. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

८२. मा.बारणे निलेश हिरामण

८३. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८४. मा.अप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे

८५. मा.बारणे माया संतोष

८६. मा.ओव्हाळ शेखर अशोक

८७. मा.यमुनाताई रमणनाना पवार

८८. मा.कलाटे स्वाती मयुर

८९. मा.नांदगुडे विलास एकनाथ

९०. मा.चौंधे आरती सुरेश

९१. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९२. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

९३. मा.बोकड रामदास गेणभाऊ

९४. मा.जवळकर वैशाली राहुल

९५. मा.जगताप राजेंद्र गणपत

९६. मा.शितोळे शैलजा बाबुराव

९७. मा.जगताप नवनाथ दत्तु

९८. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

९९. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

१००. मा.जम सोनाली पोपट

१०१. मा.प्रशांत शितोळे

१०२. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

१०३. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

१०४. मा.गायकवाड संध्या सुरदास

१०५. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

१०६. मा.शेंडगे आशा सुखदेव

१०७. मा.मोटे किरण बाळासाहेब

१०८. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

१०९. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

११०. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

१११. मा.पाटील सुजित वसंत

११२. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

११३. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.दिनेश वाघमारे-आयुक्त, मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना, मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.पाटील, मा.चव्हाण, मा.तुपे-सह शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.गायकवाड, मा.माने, मा.खांडकेकर, मा.दंडवते, मा.कडूसकर, मा.माछरे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.आष्टीकर-सहा.आयुक्त, मा.पवार-कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उदयान अधिक्षक, मा.कारेकर-प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.दुधेकर, मा.निकम, मा.इंगळे, मा.तांबे, मा.पठाण, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.पिरजादे, मा.बरशेट्टी, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.कांबळे, मा.औंभासे, मा.गट्टूवार, मा.शेख, मा.गायकवाड, मा.भोसले, मा.सोनवणे-कार्यकारी अभियंता, मा.बोदाडे-प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

१) पवना धरणातील गाळ काढणेचे काम करणे व धरण क्षेत्रात मृदसंधारणाची कामे करणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल - ९९ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.गोरक्ष लोखंडे -** मा.महापौर साहेब, प्रल्हाद छाब्रिया-फिनोलेक्सचे संस्थापक,नरेंद्रसिंग सोखी (गुरुजी)- स्वातंत्र्यसैनिक, संत निरंकारी हरविंदरसींग महाराज, मालन दत्तात्रय म्हेत्रे, पंढरीनाथ

कोंडीबा मोरे,पोपट बनसोडे यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.तानाजी खाडे-**मा.महापौर साहेब,सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर-**श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.अपर्णा डोके-**आजची सभा आज दि.२०.०५.२०१६ रोजी दुपारी २.२० पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडते.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन देते.

**मा.महापौर-**सन्मा.सदस्यांचे सूचनेप्रमाणे आजची सभा आज दि.२०/५/२०१६ रोजी दुपारी २.२० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक - ५९**

**सभावृत्तांत**

**(दिनांक २०.०५.२०१६ (दु.२.००) ची तहकूब सभा)**

दिनांक - २०.०५.२०१६ वेळ - दुपारी २.२० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२०.०५.२०१६ (दु.२.००) ची तहकूब मा.महापालिका सभा शुक्रवार, दि.२०.०५.२०१६ रोजी दुपारी २.२० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
३. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
४. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
५. मा.भालेकर अरुणा दिलीप
६. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
७. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
८. मा.थोरात वनिता एकनाथ
९. मा.जाधव साधना रामदास
१०. मा.जाधव राहुल गुलाब
११. मा.आल्हाट मंदा उत्तम
१२. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१३. मा.काळजे नितीन प्रताप
१४. मा.पात्रे राम संभाजी
१५. मा.बाबर शारदा प्रकाश
१६. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१७. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१८. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

१९. मा.पवार संगीता शाम

२०. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२१. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२२. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२३. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२४. मा.भारती फरांदे

२५. मा.आर.एस.कुमार

२६. मा.जावेद रमजान शेख

२७. मा.चारुशीला प्रभाकर कुटे

२८. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

२९. मा.पांढरकर निलेश शंकरराव

३०. मा.राजू मिसाळ

३१. मा.नंदा विकास ताकवणे

३२. मा.नेटके सुमन राजेंद्र

३३. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३४. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३५. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३६. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३७. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३८. मा.लोंढे गणेश नारायण

३९. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

४०. मा.ॲड.संदीप गुलाब चिंचवडे

४१. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४२. मा.अपर्णा निलेश डोके

४३. मा.अनंत सुभाष को-हाळे

४४. मा.जयश्री वसंत गावडे

४५. मा.श्रीमती टेकवडे सुजाता अविनाश

४६. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४७. मा.शेख अस्लम शैकत

४८. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

४९. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

५०. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५१. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५२. मा.सुपे आशा रविंद्र

५३. मा.मोहिनीताई विलास लांडे

५४. मा.अजित दामोदर गव्हाणे

५५. मा.गोफणे अनुराधा देविदास

५६. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

५७. मा.महेशदादा किसन लांडगे

५८. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

५९. मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६०. मा.लोंढे शुभांगी संतोष

६१. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

६२. मा.सावळे सिमा रविंद्र

६३. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

६४. मा.पालांडे सुजाता सुनिल

६५. मा.बहल योगेश मंगलसेन

६६. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

६७. मा.कदम सदगुरु महादेव

६८. मा.गिता सुशील मंचरकर

६९. मा.कैलास महादेव कदम

७०. मा.छाया जगन्नाथ साबळे

७१. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

७२. मा.वाघेरे सुनिता राजेश

७३. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

७४. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७५. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

७६. मा.काळे विमल रमेश

७७. मा.पाडाळे निता विलास

७८. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

७९. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

८०. मा.विमलताई सुरेश जगताप

८१. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

८२. मा.बारणे निलेश हिरामण

८३. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८४. मा.अप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे

८५. मा.बारणे माया संतोष

८६. मा.ओव्हाळ शेखर अशोक

८७. मा.यमुनाताई रमणनाना पवार

८८. मा.कलाटे स्वाती मयुर

८९. मा.नांदगुडे विलास एकनाथ

९०. मा.चौंधे आरती सुरेश

९१. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९२. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

९३. मा.बोकड रामदास गेणभाऊ

९४. मा.जवळकर वैशाली राहुल

९५. मा.जगताप राजेंद्र गणपत

९६. मा.शितोळे शैलजा बाबुराव

९७. मा.जगताप नवनाथ दत्तु

९८. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

९९. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

१००. मा.जम सोनाली पोपट

१०१. मा.प्रशांत शितोळे

१०२. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

१०३. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

१०४. मा.गायकवाड संध्या सुरदास

१०५. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

१०६. मा.शेंडगे आशा सुखदेव

१०७. मा.मोटे किरण बाळासाहेब

१०८. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

१०९. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

११०. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

१११. मा.पाटील सुजित वसंत

११२. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.दिनेश वाघमारे-आयुक्त, मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना, मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.पाटील, मा.चव्हाण, मा.तुपे-सह शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.गायकवाड, मा.माने, मा.खांडकेकर, मा.दंडवते, मा.कडूसकर, मा.माछरे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.आष्टीकर-सहा.आयुक्त, मा.पवार-कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उदयान अधिक्षक, मा.कारेकर-प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.दुधेकर, मा.निकम, मा.इंगळे, मा.तांबे, मा.पठाण, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.पिरजादे, मा.बरशेट्टी, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.कांबळे, मा.ओंभासे, मा.गद्दूवार, मा.शेख, मा.गायकवाड, मा.भोसले, मा.सोनवणे-कार्यकारी अभियंता, मा.बोदाडे-प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

**मा.महापौर-**उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका,मा.आयुक्त,अधिकारी वर्ग,पत्रकार,नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

(पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आयुक्तपदी श्रीदिनेश वाघमारे यांनी पदभार स्विकारला असल्याने त्यांचा व विद्यानगर प्रभागातून निवडून आलेले नवनिर्वाचित सदस्य श्री.राम पात्रे यांचा सत्कार मा.महापौर, मा.पदाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आला.)

(मा.आयुक्त श्री.दिनेश वाघमारे यांनी त्यांच्या कार्यकालाचा परिचय दिला.)

(दि.३१/५/२०१६ रोजी सेवानिवृत्त होणारे श्री.एम.टी.कांबळे-प्र.शहर अभियंता, श्री.फुंदे-सहा.आयुक्त, श्री.दिलीप सोनवणे-कार्य.अभियंता यांचा मा.महापौर, व पदाधिकारी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.)

**मा.योगेश बहल** - मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह, सर्व अधिकारी वर्ग, आत्ता याठिकाणी आपले नवे आयुक्त साहेब यांनी आपली ओळख करुन दिली आहे. किमान त्यांचे स्वागत तरी व्हावे अशी अपेक्षा आहे. प्रथमतः मा.आयुक्त साहेब आपण याठिकाणी आपली ओळख सांगितली आहे. मी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व नगरसेवकांच्यावतीने याठिकाणी आपले मनापासून स्वागत करतो. मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने, सर्वांच्या वतीने आपले मनापासून स्वागत करतो. वास्तविक पाहता, आपण आपली ओळख करुन दिली आहे. आपण उच्चविद्याविभूषित आहात. डायरेक्ट आयएएस अधिकारी आहात, याचा आम्हाला मनस्वी आनंद आहे. या महापालिकेत आपल्याला काम करायला खूप स्कोप आहे. येथे तुम्ही नवीन-नवीन प्रकल्प राबवू शकता. तुमचा अनुभव निश्चितच या शहराला उपयुक्त पडेल असा आम्हाला विश्वास आहे. येत्या सहा/सात महिन्यांनी सार्वजनिक निवडणूक आहेत. तुमच्याकडे कालावधी कमी आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, या कालावधीत आपण जास्तीत-जास्त कामे कशी करता येतील. शहरात नवीन प्रोजेक्ट कसे आणता येतील. तुमचा अनुभव आहे. तुम्ही आत्ता सांगितले. आपल्याकडे देखील निश्चितच अतिशय चांगले अधिकारी आहेत. तुम्हाला सभागृहाकडून निश्चितच चांगले सहकार्य मिळणार आहे हे सहकार्य मिळत असताना तुमच्यासमोर विविध छोटी-छोटी आव्हाने सुद्धा आहेत. तुम्ही सांगितले, तुम्हाला अनेक पुरस्कार मिळाले आहेत. तसेच या महापालिकेला सुद्धा अनेक पुरस्कार मिळाले आहेत. याची तुम्ही माहिती घेतली असेलच. हे शहर औद्योगिक शहर म्हणून ओळखले जाते. इथे इन्फ्रास्ट्रक्चरच्या दृष्टिकोणातून या शहरात चांगली डेव्हलपमेंट केली आहे. जेएनएनयूआरएमच्या माध्यमातून केंद्र शासन व राज्य शासनाकडून आपल्याला भरपूर पैसा मिळाला आणि त्या पैशाच्या मदतीने शहराचा कायापालट करायचा प्रयत्न या महापालिकेने केला आहे. या वेळी पिंपरी चिंचवड महापालिकेचा समावेश स्मार्ट सिटीमध्ये झाला नाही. जरी महापालिकेची आर्थिक परिस्थिती खूप चांगली नसली तरी फार वाईट सुद्धा नाही. आपण चांगले प्रोजेक्ट राबवू शकतो. चांगली कामे करु शकतो, असे मी याठिकाणी सांगू इच्छितो. भविष्यात कामे करत असताना, जे काही सहकार्य आमच्याकडून लागणार आहे. बाकी सबकमिट्या असतील, पदाधिकारी असतील, सर्वजण मिळून तुम्हाला सहकार्य करु. आमची एवढीच विनंती असणार आहे, कामाचा उरक करायचा प्रयत्न करा. आपल्या आधीचे आयुक्त श्री.राजीवजी जाधव यांनी आपल्याकडे सहा प्रभागांत आपण जे बजेट देतो, किंवा त्या बजेटच्या अनुषंगाने रु.६०/६५ कोटी देत होतो. या वर्षी शंभर ते सव्वाशे कोटी दिले आहेत. कामाचा उरक होणार नाही, इतके मुबलक बजेट आहे. परंतू हे करत असताना मा.आयुक्त साहेब, ज्यावेळी टेंडर निघतात, अलिकडील ट्रेंड आहे. श्री.राजीव जाधव यांनी लोकांना सूज्ञ केले होते की, माझ्या काळात महापालिकेने अमुक-अमुक इतकी बचत केली आहे. आपल्याला माझी विनंती आहे की, बचत करत असताना कामाची क्वालिटी, कामाचा दर्जा हा असलाच पाहिजे. तो दर्जा

टिकवण्याच्या अनुषंगाने आपण स्वतः इंजिनिअर आहात. आपण सांगितले आहे, कामाचा दर्जा अतिशय चांगला असला पाहिजे. त्यात कुठेही कॉंप्रोमाईज होता कामा नये. डेव्हलपमेंट होत असताना शहरावर बेकायदेशीर बांधकामांची टांगती तलवार आहे. एका बाजूला कोर्टाचे आदेशाप्रमाणे ती कारवाई. अजेंडावर कारवाईचा विषय आहे. माझी विनंती आहे की, आम्ही बांधकाम पाडा असे म्हणणार नाही. परंतू अनधिकृत बांधकामे, टप-या होऊ देऊ नका अशा पद्धतीचे आवाहन सुरुवातीला करतो. नवीन बांधकामे निश्चित होऊ नयेत. एकदा जास्त बांधकामे झाल्यानंतर ते पाडले तर त्याचे कुटूंब उद्धवस्त होणे हे कोणालाही पटत नाही. कोणत्याही पक्षाचा असू देत. पक्षाचा प्रश्न नाही. परंतू सुरुवातीला ज्यावेळी कॉलम भरतात त्याचवेळी ते पाडले गेले,त्याचवेळी ऍक्शन झालीतर त्या माणसाचे नुकसान होत नाही. हे सांगावे लागेल की, अनेक वेळा वर्तमानपत्रामध्ये फोटो येऊन सुद्धा, अनेक वेळा नगरसेवकांनी सांगून सुद्धा प्रशासन त्या पद्धतीने कारवाई करत नाही. या सभागृहाने व प्रत्येकाने अतिक्रमणे पाडण्यासाठी लागणारे साहित्य असेल, मॅनपॉवर असेल, असे विषय आम्ही लोकांनी फेटाळले होते, दप्तरी दाखल केले होते. परंतू मॅनपॉवर पुन्हा भरायला लावली, मशिनरी घ्यायला लावल्या. तरीसुद्धा आज सर्रास बेकायदेशीर बांधकामे सुरु आहेत. हे दूर्दैवाने, खेदाने इथे नमूद करावे लागते. यावर आपला अंकुश असणे गरजेचे आहे. आपण निश्चित या गोष्टीत लक्ष द्याल. सहकार्य द्याल अशी अपेक्षा व्यक्त करतो. पुन्हा एकदा आपले मनापासून स्वागत करतो. त्याचबरोबर श्री.एम.टी.कांबळे यांनी शहरात अतिशय चांगल्या पद्धतीने काम केले आहे. आम्ही त्यांना न्याय देऊ शकलो नाही, हे खेदाने नमूद करायला लागते. मी सुरुवातीपासून म्हणतो, त्यांना कोणतीही जबाबदारी दिलीतरी ती त्यांनी यशस्वीपणे जबाबदारी पेलवली आहे. पाणीपुरवठा विभाग असू द्या, एनक्रोचमेंट विभाग असू द्या, स्थापत्य असू द्यात, बिल्डींग परमिशन असू द्यात, त्यांनी विविध विभागांत अतिशय चांगले काम केले आहे. त्यांना सुद्धा मी मनापासून शुभेच्छा देतो. धन्यवाद.

**मा.महापौर** - मा.प्रशांत शितोळे.

**मा.सुलभाताई ऊबाळे** - मा.महापौर साहेब, आम्हाला सुद्धा बोलायचे आहे. मी सगळ्यात आधी हात वर केला आहे. तुम्ही आमच्या प्रश्नाचे उत्तर द्यायचे टाळताय. तुम्हाला आम्ही काय विचारणार आहोत, हे तुम्हाला अजून माहित नाही.

**मा.प्रशांत शितोळे**-मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सभागृह, सर्व अधिकारी वर्ग, नवीन आयुक्त साहेबांनी नुकतीच महापालिकेची सुत्रे हाती घेतली आहेत. आपण नवीन आयुक्तांचे स्वागत इथे करु यात. नवीन आयुक्तांचे स्वागत आम्ही आमच्या परीने करणार.

**मा.सुलभाताई ऊबाळे**-मा.महापौर साहेब, इथे भाषण अजिबात नाही पाहिजे. तुमच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या कार्यालयात जाऊन स्वागत करा. मी सगळ्यात आधी हात वर केला होता.

**मा.महापौर** - कोणाला बोलायला द्यायचे याचा महापौरांना अधिकार आहे. महापौरांचा अधिकार कोणीही घेऊ नये.

**मा.सुलभाताई ऊबाळे** - मा.महापौर साहेब, महापौरांनी पक्षपातीपणा करु नये. मी हात वर केला होता. आम्हाला सुद्धा बोलायचा अधिकार आहे. आम्हाला सुद्धा आयुक्त साहेबांचे स्वागत करायचे आहे. दुष्काळग्रस्तांना एक महिन्याचे मानधन द्या, अशी आमची मागणी आहे.

**मा.प्रशांत शितोळे** - तुमची मागणी रास्त असेलतर शंभर टक्के विचार केला जाईल. पक्षपातीपणाचा काय संबंध आहे. नवीन आयुक्त आले आहेत. नवीन आयुक्तांच्या स्वागतात दोन/चार शब्द बोलावेत.

**मा.महापौर**-मा.प्रशांत शितोळे दोन मिनिटांत बोला. सगळ्यांना बोलायला संधी मिळणार आहे.

**मा.प्रशांत शितोळे**-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आपले स्वागत चांगल्या पद्धतीने झाले आहे. आम्हाला आमची भूमिका मांडता यावी यासाठीच हा प्रयत्न आहे. असा प्रकार येत्या सहा महिन्यांत होतच राहणार. आता वाजायला लागले आहे. या महापालिकेत गेले दहा/पंधरा वर्षे राष्ट्रवादी काँग्रेस-काँग्रेसची सत्ता असताना अनेक विकास कामे झालेली आहेत. भाजप असेल, शिवसेना असेल, या सगळ्यांमध्ये ज्याच्या-त्याच्या परीने सगळ्यांचा शहराच्या विकासात वाटा आहे. सगळ्यांचे विचार सामील करुन घेऊन या शहराचा विकास झाला आहे आणि आपल्याला येत्या सहा महिन्यांत काम करावे लागणार आहे. तुम्ही आयुक्त म्हणून पदभार स्विकारल्यानंतर शहराची आणखी प्रगती व्हावी. केवळ पक्षातीलच नाहीतर शहरातील २० लाख नागरीकांना न्याय दिला जावा. आपण उच्चविद्याविभूषित आहात. गेली २२ वर्षे तुम्ही आयएएस कॅटेगरीतले अधिकारी आहात. त्यामुळे त्या अनुभवाचा जास्तीत जास्त फायदा व्हावा. आपल्या शहराला केंद्र शासनाचा स्वच्छतेचा पुरस्कार मिळाला आहे. परंतू शहरात अनेक ठिकाणी विरोधाभास जाणवतो. तो सुधारणे अपेक्षित आहे. सर्वसामान्य नागरीकांची कामे चांगल्या प्रकारे व्हावीत, एवढीच माफक अपेक्षा आम्ही आमच्याकडून व्यक्त करतो. आपले स्वागत करतो. ज्यांनी-ज्यांनी टोप्या घातल्या आहेत, त्यांची सुद्धा कामे व्हावीत अशी अपेक्षा व्यक्त करतो.

**मा.सुलभाताई ऊबाळे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य, याठिकाणी खरेतर आम्ही उभे राहिल्यामुळे आमचे स्वागत करायची यांनी एक चांगली सुरुवात केली आहे. त्याला मी सुद्धा अनुमोदन देते ज्याप्रकारे राजीवजी जाधव साहेब यांची बदली झाली आहे. ३ वर्षांचे टेन्युअर पूर्ण न करता त्यांची बदली झाली आहे. तुम्हाला इथे आणण्यामागे शासनाचा काहीतरी हेतू किंवा उद्देश आहे हे सांगण्यासाठी फार मोठे राजकारण पहावे लागते असे नाही. महापालिकेचे जे काही कामकाज चालले होते, त्याबाबतीत शासनाकडे ब-याच तक्रारी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे गेल्या आहेत. याठिकाणी चाललेला भ्रष्टाचार तो थांबवावा, नागरीकांच्या पैशांची चाललेली होळी ती थांबवावी, अशा प्रकारच्या तक्रारी मा.मुख्यमंत्री

साहेबांकडे गेल्या आहेत. म्हणून आयुक्त साहेबांची बदली झाली आहे, असे सर्व नागरीकांचे म्हणणे आहे. आणि आपल्याला इथे पाचारण केले आहे. आपण आत्ताच सांगितले, आपली भूमी नागपूर याठिकाणी आपण शिक्षण घेतले आहे. आपले शिक्षण बघून सगळयांच्या आशा उंचावल्या आहेत की, आपल्या शिक्षणाचा फायदा निश्चितपणे महापालिकेला होईल. खरेतर तुमच्या तारेवरची कसरत आहे. आम्ही बघतोय. या लोकांबरोबर काम करायचे, परत शासन दरबारी जाऊन त्याची उत्तरे द्यायची. जसे मा.प्रशांत शितोळे म्हणाले, आता निवडणूक आहेत. हो आहेतच, ते कोणी सांगायची गरज नाही. २०१७ ला निवडणूका आहेतच. बाहेरच्या कार्यकर्त्यांचे महापालिकेच्या विरोधात काम चालले आहे, ते होणारच, ही त्यांची मानसिकता आपण फोडली पाहिजे. महत्वाचे म्हणजे आपल्या हातून निरपेक्षपणे काम व्हावे अशी सगळ्या नगरसेवकांची इच्छा असणार आहे. मा.राजीव जाधव इथे असताना त्यांची कला होती. त्यांनी कोणत्याही नगरसेवकाला त्यांच्या विरोधात बोलू दिले नाही. सगळ्यांची भांडणे ते वेगवेगळ्या रुममध्ये जाऊन मिटवायचे. त्यांनी प्रत्येकाला खुष ठेवायचे काम केले होते. कामाच्या स्वरुपातून असेल, कशा स्वरुपातून असेल ती त्यांची कला होती, कसब होते. टर्निंग पॉईंटला म्हणजे जेव्हा निवडणूका आहेत, त्या वेळेला त्यांची बदली झाली आहे. आमचे म्हणणे आहे, हे जे दौरे आहेत. आता पुढील महिन्यात एक फॉरेन दौरा आहे. त्यांच्या जर्मनी-बर्लिन दौ-याबद्दल मी माहिती काढली होती. परत केरळला दौ-यावर जाणार आहेत. महाराष्ट्रात आज काय परिस्थिती आहे. अशा परिस्थितीत मा.शरदचंद्रजी पवार साहेब म्हणाले की,मला रात्रीची झोप येत नाहीत. अंधार आहे तरी झोप येत नाही अशी परिस्थिती आहे. आमचे जे सर्व पदाधिकारी आहेत. आम्ही आदरणीय पवार साहेब म्हणालो आहोत. ते जे काही म्हणाले ते मी इथे सांगतोय. तेव्हा त्यांनी सांगितले, महाराष्ट्रात अशी परिस्थिती आहे. आपणसुद्धा ती नैतिकता पाळली पाहीजे. आज आमच्या माध्यमातून एक महिन्याचे मानधन दुष्काळग्रस्तांना दिले आहे सभागृहात सगळ्या नगरसेवकांनी त्यांचे एक महिन्याचे मानधन द्यावे सभागृहातील सदस्य म्हणून माझा स्वतःचा हा हक्क आहे. तुम्ही काय करायचे ते तुम्ही ठरवा तुम्हाला नाहीतरी काही नाहीच आहे. लोकांच्या पैशांतून तुम्ही दौ-यावर जाता. मा.महापौर साहेब, आमचा आरोप आहे. याठिकाणी जो गवगवा केला होता. त्याचा पिंपरी चिंचवडमधील नागरीकांना काय फायदा होणार आहे. त्याचा तुम्ही खुलासा केला पाहिजे आज शहरातला नागरीक तुमच्या वॉर्डमध्ये, माझ्या वॉर्डमध्ये पाण्यासाठी बोंब मारताहेत. जे कोणी दौ-यावर जातील, पळून जातील त्यांच्याशी आम्हाला कर्तव्य नाही. आपण एवढा पैसा खर्च करु शकत नाही का. दौ-याला गेलेले सगळे करोडपती आहेत. ते स्वतःच्या पैशाने दौ-याला का जात नाहीत. मा.महापौर साहेब, पुढील सगळे दौरे रद्द केले असे सांगा. आज काय आहे, आम्हाला दुजाभाव दिला आहे. मी सुद्धा पत्र दिले आहे. आम्ही साहेबांचे नाव घेतो, ते आदरयुक्त घेतो. आज त्यांना काळजी आहे, मग हे तुमचे काम नाही. तुम्हाला हे शोभले नाही. मी तुम्हाला विनंती करतो, तुम्ही याचा उलटा

अर्थ कशाला घेताय. आम्ही विरोधी पक्षाचे काम करतोय. त्याच्यावरसुद्धा तुमची गदा. आयुक्त साहेब नवीन आले आहेत. पहिल्याच दिवशी त्यांच्यासमोर आम्हाला हा विषय काढायचा नव्हता. परंतू काही पर्याय नाही. पुढील दौ-याचे नियोजन जोरात चालले आहे. त्याआधी हे सांगणे गरजेचे आहे. दौ-याला निश्चितपणे जा. स्वतःच्या खर्चाने जा. चांगले प्रशिक्षण काय ते करा. परंतू तुम्हाला सगळे नागरीक प्रश्न विचारत आहेत त्यांच्या माध्यमातून मी हे प्रश्न तुम्हाला विचारतेय. मा.महापौर साहेब, माझी आपल्याला विनंती आहे की, जे दौरे केले आहेत, तारखेसहीत जे दौरे केले आहेत, त्यातून काय फायदा झाला ते सांगा. मी महापौरांना विचारले आहे. महापौरांनी सांगायचे बाकी कोणी सांगायचे नाही. महापौर, तुम्ही सांगा, जनतेच्या पैशांतून अशा प्रकारचे दौरे करणे इथून पुढे भविष्यात योग्य आहे का इथे शहराचे तपमान चाळीस बेचाळीस डिग्री सेल्सियस असताना तुम्ही मस्त थंड हवेच्या ठिकाणी दौरा केलात. या दौ-याचा आम्ही शिवसेनेच्या वतीने निषेध करतो आणि तुम्ही खुलासा करावा अशी विनंती करतो.

**मा.महापौर**- त्याठिकाणी थंड हवा आहे. तिथे थंड हवा का आहे, तिथला निसर्ग कसा आहे, माणसे कशी आहेत. हे मला विचारायचे होते. तोही आपल्या देशातलाच एक भाग आहे. हे आपल्याकडे होऊ शकते का. तिथे एकिकडे हिरवळ असते आणि एकिकडे आपल्याकडे दुष्काळ असतो. हेही मला बघायचे होते. असे का हे पाहण्यासाठी आम्ही सिक्कीम दौ-यावर गेलो होतो. बाकी सदस्य सुद्धा होते, ते पण तुम्हाला सांगतील.

**मा.सुलभाताई ऊबाळे** - मा.महापौर साहेब, तुम्ही सांगा, आम्हाला तुमच्यावर विश्वास आहे.

**मा.महापौर-**एवढंतरी तुम्ही मला खरे ठरवले आहे, त्याबद्दल मी तुमची आभारी आहे. तिथे पाणी कसे आहे. आपल्या राज्यात कसे पाणी आहे. ज्याठिकाणी दुष्काळी परिस्थिती आहे, तिथे बांध बांधण्यात यावेत, झाडे लावण्यात यावीत. यासाठी आम्ही सगळे मिळून प्रयत्न करु यात. बाकीचे पण दौरा करतात. त्याठिकाणी काहीतरी शिकायला मिळते. त्याचा उपयोग महाराष्ट्रात कसा होईल. पिंपरी चिंचवडला कसा होईल हा उद्देश आहे पिंपरी चिंचवडला दुष्काळाचा प्रश्न आहे का. तुम्ही मराठवाड्याचा विषय काढलात म्हणून म्हणते त्याचा फायदा राज्याला, पिंपरी चिंचवड शहराला होऊ शकतो. मा.अजितदादांनी आम्हांला सांगितले होते, प्रत्येकाचे मानधन दुष्काळग्रस्तांना द्या. असे आम्ही डिक्लेअर केले होते. आमच्या पक्षानुसार आम्ही एक नाही, तीन महिन्यांचे मानधन डिक्लेअर करायचे असे म्हणतोय. आणि तुम्ही त्याला सहकार्य करावे, अशी आमची विनंती आहे.

**मा.मंगलाताई कदम**-मा.महापौर साहेब,आपण खुलासा केला आहे. मा.आर.एस.कुमार यांना बोलायला द्या.

**मा.आर.एस.कुमार-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,एवढे सुशिक्षित व अनुभवी आयुक्त आपल्याकडे आले आहेत. आम्ही तुमचा आदर करतो व तुमचे स्वागत करतो. माझी सर्वांना विनंती आहे की, एक सुशिक्षित व अनुभवी आयुक्त आपल्याला मिळाले आहेत. त्यांना कॉन्शस माईंडने काम करु द्या. ही पहिली विनंती आहे. दुसरे म्हणजे जे काही सांगायचे आहे ते मा.योगेश बहल साहेबांनी आत्ता सांगितले आहे. मी परत रिपीट करत नाही. मा.एम.टी.कांबळे हे एक चांगले अधिकारी महापालिका सेवेतून निवृत्त होणार आहेत याचे वाईट वाटतेय ते जे.ई. असल्यापासून डेप्युटी इंजिनिअर असताना, कार्य.अभियंता होईपर्यंतचे त्यांचे काम मी बघितले आहे. ते पॉझिटिव्ह थिंकींग असणारे अधिकारी आहेत. जे.ई. असताना पाणीपुरवठा विभागात रात्रीचे दोन/तीन वाजेपर्यंत काम करत होते. ज्यावेळी हे शहर डेव्हलप होत होते, त्यावेळी त्यांनी काम केले आहे. त्यांच्या रिटायरमेंटमुळे महापालिकेतला एक चांगला अधिकारी निघून जातो आहे. मी आयुक्त साहेबांचे स्वागत करत असताना एक सांगू इच्छितो की, शिलाई मशीनच्या ऑर्डरचा विषय स्थायी समितीमध्ये पास झाला. त्यानंतर मी, मा.नारायण बहिरवाडे, मा.तानाजी शिंदे आम्ही ऑबजेक्शन घेतले होते नंतर प्रशासनाने, अनेक लोकांनी ऑबजेक्शन घेतले. त्या पार्टीला ऑर्डर का दिली,नाही दिली त्याबद्दल बोलत नाही. स्टँडींगला ठराव झाल्यानंतर लोकांचे ऑबजेक्शन बघून प्रशासनाने पुटअप केले की, टेंडर रिकॉल करण्यात यावे. मी का ऑबजेक्शन घेतले, १) त्याचा डिलर नाही, २) रिपेअर करायला डिस्ट्रीब्युटर नाही. रिपेअरींग करता येत नाही म्हणून मी ऑबजेक्शन घेतले होते. रिकॉल करा म्हणून, जॉईंट कमिशनर, एचओडी यांनी सगळ्यांनी सही केली आहे. ती फाईल कमिशनर यांच्याकडे गेली होती. कमिशनर यांनी चर्चा करा म्हणून लिहिले होते. ३१ एप्रिलला कमिशनर यांची ट्रान्सफर झाली. कमिशनर यांना फोन करुन मी सांगितले, साहेब, मी कमिशनरांच्या बंगल्यावर आहे. तुम्ही फाईलवर सही करु नका. याआधी असा अनेक वेळा अनुभव आला आहे. कमिशनर रिटायर्ड झाले की, ४/८ दिवसांत बंगल्यात बसून सही घेतात. म्हणून मी मा.राजीव जाधव यांना सांगितले. ते स्वतः म्हणाले मी फाईलवर सही केलेली नाही आणि करणार नाही. तीन सभासदांनी फाईल घेतली. त्या फाईलमध्ये चर्चा करा असे होते. पाठीमागचे पान बघितले व सर्वांचा फोटो घेतला. त्यात दोन/चार पाने होती. त्यावेळी फाईलमध्ये काही नव्हते. नंतर आम्हाला समजले, त्या फाईलमध्ये कमिशनरने सही केली आहे. आम्ही फाईल मागवून घेतली. सही केली का ते बघितले. कमिशनर यांची सही नव्हती. जॉईंट कमिशनर यांनी दि.२६ ही डेट टाकून कमिशनर यांनी अशी-अशी चर्चा झाली, असा-असा निर्णय झाला म्हणून वर्कऑर्डर द्यायला हरकत नाही असे लिहीले होते. ज्यावेळी फाईल चर्चा करण्यासाठी कमिशनर यांच्याकडे गेली. त्यानंतर जॉईंट कमिशनर यांना सही करायचा काय अधिकार आहे. कमिशनर यांनी काय चर्चा करणार, वर्कऑर्डर द्यायची का नाही, हे सही करुन सांगायला पाहिजे. कमिशनर यांनी तोंडी सांगितले होते, असे चालणार नाही. ही सही बॅकडेटेड झाली आहे. मी

कोर्टापुढे शपथ घेऊन सांगणार आहे. दि.२८ तारखेला मी फाईल बघितली आहे. व जॉईंट कमिशनर यांनी वर्कऑर्डर द्यायला काही हरकत नाही असे म्हटले आहे. कमिशनर यांनी चर्चा करा असे म्हटले आहे. मग कमिशनर यांच्याशी चर्चा झाली असेलतर त्यांची सही कुठे आहे. कमिशनर साहेब, तुम्ही फाईल मागीतली. तुम्ही फाईल परत पाठवली. परत देऊन टाकली. या मॅटरमध्ये पिंपरी चिंचवडमध्ये ऍडमिनिस्ट्रेशन कसे चालते, याचे हे एक उदाहरण आहे. बॅकडेटेड सही करतात. वर्कऑर्डर द्या किंवा नका देऊ. एक जॉईंट कमिशनर लेवलचा माणूस सह्या करतो. चर्चा केल्यानंतर परत प्रस्ताव कमिशनर यांच्याकडे यायला नको का. सहीसाठी फाईल ठेवायला नको का. प्रस्ताव ठेवून कमिशनर यांची सही घेऊन त्यानंतर वर्कऑर्डरसाठी पत्र द्यायला पाहिजे होते. This is a fojary. त्याला माफी नाही. मा.आयुक्त साहेब, माझी विनंती आहे, तुम्ही चौकशी करा. संबंधित अधिका-यांवर कारवाई व्हायला पाहिजे. कारवाई झाली नाहीतर माझ्याकडे copies of the status आहेत. मी मुख्यमंत्र्यांकडे जाणार आहे. जाणार म्हणजे जाणार. मी याआधी सभागृहात दोन विषयांचा विरोध केला होता. सरकारने हे ठराव विखंडीत केले आहेत. साडेसात कोटींचे टेंडर आहे. त्यात इतकी मोठी चूक आहे. बॅक डेटेड सही केली आहे. कारवाई व्हायला पाहिजे.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सदस्य, मी सर्वप्रथम नवनिर्वाचित नगरसेवक श्री.राम पात्रे व मा.आयुक्त साहेब यांची पहिली सभा असल्याने त्यांचे इथे स्वागत करते. व श्री.एम.टी.कांबळे, प्र.शहर अभियंता यांना सेण्डऑफ. मघाशी त्यांना पुष्पगुच्छ देताना मी सांगितले होते की, आजची या सभागृहातली त्यांची ही शेवटची सभा आहे. परंतू अजून ११ दिवस आहे. म्हणून त्यांचे इथे सत्कार केले आहेत. मा.आयुक्त साहेब, आपण नवी मुंबई इथे यापेक्षा अवघड ठिकाणी काम केले आहे असे मला वाटते. त्यामुळे तुम्हाला काहीतरी नवीन आहे अशातला भाग नाही. काही लोकांच्या तोंडातून कधीकधी पूर्वीचे आयुक्त व आत्ताचे आयुक्त अशी तुलना ही होतच राहत असते. मा.राजीवजी जाधव साहेब हे अडीच वर्षे इथे होते. तुमची सुद्धा इथे बदली दीड वर्षांत झाली आहे. ज्या ७३ बदल्या झाल्या, त्यात तुमची बदली झाली. मग मी असे म्हणणार नाही की, तुमची बदली दीड वर्षांत कशी झाली. सहा महिने राहीले होते मग त्यांची अडीच वर्षांतच बदल का झाली. महाराष्ट्र शासनाने जो निर्णय घेतला आहे तो आम्हाला मान्य आहे. तुमची दीड वर्षांतच बदली का झाली, मा.राजीवजी जाधव अडीच वर्षांतच का गेले असे म्हणण्यापेक्षा सगळ्या सहका-यांच्या वतीने मी तुमचे स्वागत करते. तुम्ही पिंपरी चिंचवड शहरात आल्यापासून खूप सगळ्या पद्धतीने अभ्यास करताय. आम्ही तुम्हाला कधीही डिस्टर्ब केले नाही. तुमच्या मिटींगा चालू आहेत. मी माझ्या सहका-यांकडून किंवा माझ्याकडून नेहमी हेच सांगत असते की, साहेब, माहित घेत आहेत. ते विभागांची माहिती घेत आहेत. त्यांना ८/१५ दिवस अभ्यास करु द्या. ते जेवढी माहिती घेतील तेवढे या शहराच्या दृष्टिकोणातून फायदेशीर ठरेल. नवी मुंबई इथे आपण

स्वच्छतेबाबतीत चांगला पुढाकार घेतला होता. तुम्हाला चांगल्या पद्धतीचे पुरस्कार मिळाले आहेत. तुम्ही तुमचा बायोडाटा सांगितला आहे. आजपर्यंत पिंपरी चिंचवडमध्ये आलेले सगळे आयुक्त किंवा सभागृह यांनी कुणीही कधीही पक्षपाती भूमिका घेतलेली नाही. आम्ही घेतली नाही याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. राष्ट्रवादी काँग्रेस-काँग्रेस सत्तेस असताना सभागृहाने कधीही कोणताही निर्णय घेतलातरी तो पुढे जातोच. परंतू पक्षाने कधीही अशी भूमिका घेतलेली नाही. हे सार्थ अभिमानाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची पक्षनेता म्हणून मला सांगावेसे वाटते. अशाच पद्धतीने डिसेंबरपर्यंत सहा महिने असलेतरी आपल्याला खूप चांगल्या पद्धतीने काम करायचे आहे. हे शहर वाढतेय. इथे खूप चांगल्या पद्धतीचे निर्णय घेऊन खूप काम करावे लागणार आहे. तुमची फॅमिली मुंबईला आहे. तुम्ही आत्ताच सांगीतले. मला वाटत नाही, ताई त्यांचा जॉब सोडून, मुलांचे शिक्षण सोडून इथे येतील. म्हणजे मा.राजीवजी जाधव यांच्यासारखीच तुमची कसरत होणार आहे. त्यांचीही फॅमिली तिकडे होती. तुमचीही फॅमिली तिकडे आहे. त्यामुळे तुम्हाला थोडेसे इकडेतिकडे करुन पिंपरी चिंचवडचे काम करावे लागणार आहे. या दृष्टीकोणातून पिंपरी चिंचवड शहरामध्ये तुम्ही व आम्ही जास्तीत जास्त चांगल्या पद्धतीने काम करावे लागणार आहे. प्रशासन व नगरसेवक ही एकाच रथाची दोन चाके आहेत. ती व्यवस्थितरित्या चालली तरच कामकाज चांगले होते. अन्यथा कामकाज चांगले होत नाही हे काही नवीन नाही. मी सभागृहाच्या वतीने तुम्हाला हार्दीक शुभेच्छा देते काम करत असताना ब-याच गोष्टी होत असतात. तुम्ही नवी मुंबईत काम करुन आला आहात, त्यामुळे काही सांगायची आवश्यकता नाही. त्यामुळे इथे काम करणे तुम्हाला फार काय अवघड आहे असे मला वाटत नाही. तुम्हाला सभागृहाच्या वतीने हार्दीक शुभेच्छा देते मा.महापौर साहेब, तुम्हाला विनंती करते की, विषय क्रमांक १ घेण्यात यावा.

**मा.बाबासाहेब धुमाळ** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, ख-या अर्थाने आम्ही ऐकत होतो. आत्तापर्यंत जेवढे आयुक्त आले, त्यांनी आपापल्या परीने व आमच्या सहका-याने कामे केली आहेत. याठिकाणी आयुक्तांनी सांगताना ज्या डिग्र्या वाचल्या, आम्हाला त्याबद्दल अभिमान आहे. ते स्वतः इंजिनिअर आहेत. त्यांना काम करत असताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागणार आहे. आम्ही हे सुद्धा मान्य करतो. आम्ही ज्यावेळी पहिली बैठक घेतली होती. त्यावेळीच मी त्यांना सांगितले होते, साहेब, आमच्या पक्षातर्फे कसलाही विरोध करणार नाही. आम्ही प्रत्येक वेळी तुमच्या पाठिशी उभे राहणार आहोत असे आम्ही सांगितले आहे. आत्ता पवारसाहेबांबद्दल सांगितले. पठाणताई मी तुम्हाला सांगतो, सगळ्यात जास्त पवार साहेब आम्हाला आदरणीय आहेत. मी पवार साहेबांना सगळयात जास्त जवळून पाहिले आहे. मी त्यांचा सगळ्यात जास्त आदर करतो. कारण ही महापालिका पवार साहेबांमुळे व बाळासाहेबांमुळे आहे. मी याठिकाणी आयुक्त साहेबांना हे सांगू इच्छितो की, आपण कुठलाही पक्षपात न करता कामकाज करावे. सगळ्यांना काम करायला संधी द्यावी हिच अपेक्षा. कांबळे

साहेब येत्या ३१ तारखेला रिटायर्ड होत आहेत. त्यांच्याकडे कितीही वेळा जा त्यांचा हसराच चेहरा असायचा. अशी माणसे आपल्या महानगरपालिकेत कमी आहेत. त्यांनी आत्तापर्यंत जी कामे केली आहेत. मा.मंगलाताई सुद्धा त्यांच्याबद्दल बोलल्या की, अशी माणसे होणे गरजेचे आहे. माणसाला माणसासारखे वागवले, कामे केलीतर माणसाचे नाव निघते. मी कांबळे साहेबांना त्यांच्या निवृत्तीनंतरच्या आयुष्यासाठी शुभेच्छा देतो. तसेच मी आयुक्त साहेबांना देखील शुभेच्छा देतो. जयहिंद, जयमहाराष्ट्र!

**मा.सिमा सावळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, पिंपरी चिंचवडचे आयुक्त, आमचे गाववाले. मी सुद्धा नागपूरचीच आहे. मा.आयुक्त साहेब, तुमचे या शहरात खूप-खूप स्वागत. त्याचबरोबर आपण अत्यंत उच्चविद्याविभूषित आहात. चांगले काम कराल. नागपूरवाले जास्त डेअरींगबाज असतात. मा.दिलीप बंड साहेब सुद्धा विदर्भातलेच होते. या शहराने त्यांच्याकडे डॅशिंग अधिकारी म्हणून पाहिले आहे. या शहरातील ७० टक्के विकास हा मा.दिलीप बंड साहेबांच्या काळात झाला आहेत. त्यामुळे तुमच्याकडे पाहताना ती नजर, ती ऊंची, ती अपेक्षा, तशीच ठेवणार आहोत. आपण कोणाच्याही दबावाला भीक घालणार नाही आहात. मुळात रक्तच तसे असणार नाही. आरे म्हटले की कारे होणार. मुळात तुमच्याकडून हीच अपेक्षा असेल की,आपण चुकीच्या कामाला अजिबात पाठिंबा देऊ नये. मा.आर.एस.कुमार यांनी उल्लेख केला, त्यासंदर्भात मी व माझ्या सहकारी भगिनी मा.आशाताई शेंडगे यांनी आंदोलन केले. त्यानंतर आम्ही मा.दिलीप गावडे साहेबांना घेराव घातला. मशीनचे नाव आहे, स्वाईनटेक्स-२२६८. याची नेटवर्कींग किंमत आहे रु.३०७२/-,रु.३०७६/- व आपण घेतोय रु.४,७७७/-रुपयाला. आम्ही त्याचा पाठपुरावा केला. मा.मुख्यमंत्र्यांकडे तक्रारी केल्या. जवळपास एका मशीन पाठीमागे रु.१६५०/- रुपयांचा फरक दिसून आला. आपण साडे तेरा हजार मशीन्स घेणार आहोत. तत्कालिन आयुक्त मा.राजीव जाधव साहेब यांनी त्याला स्थिगिती दिली आहे. त्यांनी परत सही कशी केली हे मला याविषयात खरेतर बघावे लागेल. मा.आयुक्त साहेब, तुम्हाला हात जोडून विनंती आहे की, जसे इथे महापौरांच्या दौ-याबद्दल बोलले गेले की, हा नागरीकांचा पैसा आहे. त्याचप्रमाणे शिवणयंत्रात सुद्धा याच करदात्या नागरीकांचा पैसा आहे. त्यामुळे बाजारभावात जी किंमत असेल त्याचप्रमाणे तुम्ही महिलांच्या नावावर बँकेत पैसे जमा करावेत म्हणजे प्रश्नच मिटेल. तसे न झाल्यास या प्रक्रियेस आपण पूर्णपणे स्थगिती द्यावी अशी विनंती आहे. आपण याचा पाठपुरावा केला आहेतर आपण हे पूर्ण करावे मा.महापौर साहेब, आपण दौ-यावर गेलात. निश्चितपणे महाराष्ट्रातील दुष्काळाची आपण काळजी घेतली पाहिजे. परंतू गेले या १० वर्षांच्या काळात अनेक महापौर, सदस्य दौ-यावर गेले. दहा-दहा दिवस जाऊन दौ-यावरुन आले. तुमच्या दौ-याला विरोध का आहेतर इथे दुष्काळ आहे म्हणून विरोध होतो आहे. तुम्ही हा विरोध थोडासा समजून घ्यावा. परंतू मी तुमची भगिनी,सहकारी म्हणून निश्चित सांगेन की, जसा विरोध या महापौरांना केला. तसा याआधी ज्या सगळ्या

महापौरांनी दौरे केले आहेत, त्यांचे विषय पण काढा आणि त्यांना सुद्धा विरोध झाला पाहिजे. पाणीपुरवठ्याची जी भूमिगत योजना आणली आहे. त्यात १० दिवस सदस्य ईस्त्रायलला होते. ईस्त्रायलला जाऊन आल्यानंतर त्यांनी सांगितले मी गेलोच नव्हतो. शेवटपर्यंत मा.राजीव जाधव यांनी सांगितलेच नाही. जशी तुमची माहिती पाहिजे. मा.महापौर साहेब, जसे जे-जे सदस्य दौ-यावर जातात, त्यांचीसुद्धा माहिती सभागृहापुढे ठेवावी मा.आयुक्त साहेब, खरेतर आपण नवीन आला आहात. आपण आल्याबरोबर मा.एम.टी.कांबळे साहेब रिटायर्ड होत आहेत. ते आमचे गुरु आहेत. सहकारी आहेत. त्यांच्याकडून शिकण्यासारखे खूप आहे. गेलो की बसा. आलेल्या नगरसेवकाला किंमत द्यायची. काम नाही केलेतरी चालेल. नाही म्हणायची ताकद त्या माणसात आहे. अनेक नगरसेवकांकडून त्यांच्यावर दबावतंत्र वापरले गेले होते. परंतू जे काम होत नाही त्याला नाही म्हणायची, अगदी गोडीगुलाबीने सांगायची ताकद मा.एम.टी.कांबळे यांच्यामध्ये आहे. परमेश्वर त्यांची ही ताकद तशीच ठेवो. ते चांगले काम करतात. आमच्याकडे कार्यकारी अभियंता म्हणून काम बघत आहेत, ते मा.सोनवणे साहेब सुद्धा रिटायर्ड होत आहेत. ते सुद्धा चांगले अधिकारी आहेत. गेले अनेक वर्षे काम करणारी माणसे आता रिटायर्ड होणार आहेत. आमच्या प्रभागाचे प्रभाग अधिकारी मा.फुंदे साहेब, हे सुद्धा रिटायर्ड होणार आहेत. आमच्या क प्रभागाला एक चांगले सहाय्यक आयुक्त द्यावेत. आमच्या क प्रभाग स्थापत्याकरिता एक कार्यकारी अभियंता पाहिजे आहे, याकडे सुद्धा आपण लक्ष द्यावे. मी कांबळे साहेबांना त्यांच्या पुढील आयुष्यासाठी मनापासून शुभेच्छा देते आम्ही त्यांना नेहमी म्हणतो की, तुमची जागा आता तिकडे नाही. तुम्ही आता आमच्या बाजुने यायचे. तुम्ही आम्हाला थोडं शिकवा,तुमच्या ट्युशनची आम्हाला खूप गरज आहे आम्हाला शिकवा, स्थापत्यमध्ये नक्की काय-काय चाललेलं असत. आम्हाला कळतच नाही, रस्त्यात खडी किती टाकायची, डांबरीकरण कसे करायचे. म्हणजे आम्हाला प्रश्नाचे उत्तर शोधता येते. त्यांच्यासारखा गुरु आमच्याकडे आलेतर निश्चितच चांगले कामे करु शकतो. मी कांबळे साहेबांना, सोनवणे साहेबांना व फुंदे साहेबांना मनापासून सुयश चिंतिते त्यांचे रिटायरमेंट नंतरचे आयुष्य चांगले जावे, हिच गौतम बुद्धाच्या चरणी प्रार्थना करते. आणि थांबते. जयहिंद, जयमहाराष्ट्र!

**मा.चंद्रकांता सोनकांबळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, मा.आयुक्त साहेबांचा सत्कार थोड्या वेळापूर्वी केला आहे. मी सुद्धा रिपब्लिकन पक्षाच्या वतीने मा.आयुक्त यांचे स्वागत करते. मला वाटते,पिंपरी चिंचवड शहरातील एकूण परिस्थिती आणि सभागृहातील परिस्थिती सगळ्या नगरसेवकांनी आपल्यासमोर मांडली आहे. एक/दोन विषयांवरुन ही परिस्थिती लक्षात येईल. इथे होकार,नकार व ऐकून घेण्याची भूमिका कायम इथे सभागृहात तुम्हाला ठेवावी लागणार आहे क्षणात गोंधळ, क्षणात शांतता अशा पद्धतीने वातावरण या सभागृहात असणार आहे. हे ऐकून घेण्याची शक्ती तुम्हाला मिळो, अशी मी

याठिकाणी तुम्हाला शुभेच्छा देते आहे आपण अतिशय चांगले काम केले आहे. या आधी सुद्धा केले आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेलासुद्धा स्वच्छतेसाठी पुरस्कार मिळाला आहे ही महापालिका स्मार्ट सिटीत सहभागी होता होता राहीली आहे. ही महापालिका पुढील काळात या योजनेत जाईल अशी अपेक्षा व्यक्त करते. आपल्या सोबतच याठिकाणी आधी ३ अधिका-यांचा सत्कार झाला आहे. मा.एम.टी.कांबळे, शहर अभियंता यांनी अत्यंत उत्कृष्ट काम या शहरासाठी केले आहे. खरेतर ज्यावेळी मोठमोठ्या पदावर नियुक्ती होते, त्यावेळी त्या अधिका-यांकडे फार बारीक नजरेने पाहिले जाते. की कामे कशी केली जातात. कुठल्या कामात काही फ्रॉड होईल का. अधिकारी कुठे सापडेल का असे सुद्धा पाहिले जाते परंतू या शहरात काम करत असताना एक निष्कलंक अधिकारी म्हणून मा.एम.टी.कांबळे यांनी अत्यंत उत्कृष्ट काम केले आहे. खरेतर डोक्यावर बर्फ व तोंडात साखर असणारा एक अधिकारी म्हणून त्यांनी काम केले आहे. त्यांना चार वर्षे सिटी इंजिनिअर म्हणून काम करायची संधी मिळाली. मा.योगेश बहल यांनी सांगितले, त्यांना डायरेक्ट पद देता आले नाही. तरीसुद्धा त्यांनी प्रभारी म्हणून खूप आनंदाने पद स्विकारले व उत्कृष्ट काम करुन दाखवले आहे. ब-याच वेळा असे होते की, अधिकारी खूप चांगले काम करत असतात. तरीसुद्धा लोकप्रतिनिधी म्हणून वॉर्डातील नागरीकांच्या तक्रारी असतात. वॉर्डातली कामे व्यवस्थित होत नाहीत. मग तो जो काही राग असेल तो आम्ही अधिका-यांवर काढत असतो. आम्ही नागरीकांचे बोलणे ऐकत असतो. ब-याच वेळा अधिकारी चूकत नसताना देखील नगरसेवकांचे निमुटपणे ऐकून घेत असतात आपण काही वेळा चांगल्या शब्दांत बोलतो. काहीवेळा म्हणी वापरून अधिका-यांना बोलत असतो. तरीसुद्धा आपले अधिकारी निमुटपणे सहन करत असतात. खरेतर त्यांना सुद्दा दाद दिली पाहीजे. अशा पद्धतीने कांबळे साहेबांनी इथे काम केले आहे. त्यांना सामाजिक कार्य सुद्धा खूप मोठ्या प्रमाणात शहरात केले आहे. त्यांचे अभिनंदन करते. मा.फुंदे साहेब रिटायर्ड होणार आहेत. त्यांनीसुद्धा आपल्या कारकीर्दीत चांगल्या पद्धतीने काम केले आहे. सोनवणे साहेबांनी उत्कृष्ट काम केले आहे. अधिकारी फार मोठ्या पदावर नसला तरी सुद्धा तो आपल्या पदावर प्रामाणिकपणे काम करणे व पदावरील पूर्ण अधिकार वापरून काम करणे, असे काम सोनवणे साहेबांनी, फुंदे साहेबांनी केले आहे. त्यांचे सुद्धा याठिकाणी अभिनंदन करते. पुन्हा एकदा या अधिका-यांना व आपल्याला सुद्धा शुभेच्छा व्यक्त करते.

----------

**<u>नियुक्त्या</u>**

**मा.नगरसचिव -** विषय क्रमांक-१) मा.जगदीश शेट्टी यांची निवड रद्द झाल्याने मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सदस्यत्वाची एक जागा रिकामी झाली असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ आणि पिंपरी चिंचवड शहराच्या

महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ.चे संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र. ६९ मध्ये निर्देश केलेप्रमाणे सदर रिकाम्या जागेवर नियुक्ती करणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीचे गटनेते मामंगलाताई अशोक कदम यांनी सदस्याचे नाव बंद लखोटयामध्ये स्वाक्षरीनीशी मा.महापौर यांजकडे द्यावे. (बंद लखोटा देणेत आला.) त्यानंतर -

मा.महापौर यांनी बंद लखोटा सर्वासमक्ष उघडला आणि त्यामध्ये असणारे नांव श्री.आण्णा बोदाडे, प्रशासन अधिकारी, जनसंपर्क विभाग यांनी सभागृहात वाचून दाखविले ते पुढीलप्रमाणे-

१) मा.तानाजी विठ्ठल खाडे - पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी

ठराव क्रमांक - ८५८ विषय क्रमांक - १
दिनांक - २०/५/२०१६ विभाग - मा.नगरसचिव

मा.जगदीश शेट्टी यांची निवड रद्द झाल्याने मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सदस्यत्वाची एक जागा रिकामी झाली असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ आणि पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ.चे संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र. ६९ मध्ये निर्देश केलेप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाद्वारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवुन आणि सदर रिकाम्या जागेवर सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.तानाजी विठ्ठल खाडे या पालिका सदस्यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माक्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करण्यात आली असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

**महापौर**
**पिंपरी चिंचवड महानगसालिका**

------

(नियुक्त मा.क्रिडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती सदस्य यांचा पुष्पगुच्छ देवून सन्मान करणेत आला.)

**मा.नगरसचिव -** मा.सुरेश म्हेत्रे यांना विचारावयाचे प्रश्न.

**मा.सुरेश म्हेत्रे-**सन्मा.महापौर,सन्मा.नवनिर्वाचित सदस्य, सन्मा.आयुक्त,आपले पुनःश्च एकदा अपक्ष गटाकडून स्वागत करतो. सन्मा.सभागृह, पत्रकार बंधू-भगीनी, याठिकाणी विषय क्रमांक ९ चा आकृतीबंधाचा विषय आज विषयपत्रिकेवर आहे. या अनुषंगाने सभागृहापुढे काही माहिती असावी म्हणून प्रशासनाला काही प्रश्न विचारले होते. यात मुख्यतः प्रकल्पग्रस्त बाधीत आहेत. यांच्यासाठी जे प्रश्न विचारले होते आणि त्याला प्रशासनाने उत्तर दिले आहे. यातला पहिला प्रश्न आहे, प्रकल्पग्रस्त बाधितांसाठी शासनाचे नियमाप्रमाणे महापालिकेमध्ये नोकरीसाठी विविध पदांसाठी एकंदरीत किती टक्के पदसंख्यांचे आरक्षण आहे? याचे उत्तर दिले आहे, ५ टक्के. क व ड वर्गातील ५ टक्के समांतर आरक्षणाची प्रोव्हिजन आहे. दुसरा प्रश्न आहे, सदर आरक्षित पदसंख्या सर्व महाराष्ट्र राज्यामधील प्रकल्पग्रस्त बाधितांसाठी आहे का फक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामधील पिंपरी चिंचवड महानगरपालिका, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण व संरक्षण क्षेत्राने बाधित प्रकल्पग्रस्तधारकांसाठीच आहे का? यावर प्रशासनाने सांगितले आहे की, ही आरक्षित पदसंख्या सर्व महाराष्ट्र राज्यामधील प्रकल्पग्रस्त बाधितांसाठी आहे. फक्त पिंपरी चिंचवडसाठी नाही. तिसरा व महत्वाचा प्रश्न होता की, सन १९८२ पासून ते आजपर्यंत प्रकल्प बाधितांचे आरक्षणानुसार महापालिकेमध्ये विविध पदांवर नोकरी दिलेल्या प्रकल्पबाधितांचे नाव,मुळपत्ता,बाधित प्रकल्पाचे नाव व पदनामानुसारची यादी व महापालिकेच्या क वर्गानुसार जो आकृतीबंध होता त्यामधील आजपर्यंत भरलेली पदांची पदनामानुसार संख्या व रिक्त असलेल्या पदांची पदनामानुसार संख्या किती? पदे रिक्त राहण्याची कारणे? - या विषयात प्रशासनाने माहिती दिली आहे. ११६ जणांची यादी मला दिली आहे,जे प्रकल्पबाधित होते त्यांना महापालिकेत नोकरी दिली आहे. मला विशेष हे सांगायचे आहे की, बहुतांशी नगरसेवक याठिकाणी भूमिपुत्र आहेत. तरीसुद्धा या पिंपरी चिंचवडमधील एकशे सोळांपैकी फक्त चार व्यक्तींना नोकरी मिळालेली आहे. त्यातील एक सुकाळे सिमा अनिल-लिपीक, मुळगाव-पिंपळेगुरव,ता.हवेली,जि.पुणे, यांचे कासारवाडी पुल प्रकल्प यात क्षेत्र बाधित झाले आहे. दुसरे आहेत, काटे रमेश रामचंद्र हे वॉर्डबॉय आहेत. त्यांचे मूळगाव दापोडी,ता.हवेली,जि.पुणे असे असून दापोडी-पिंपळेगुरव नदीवरील पुल प्रकल्प यात त्यांची जमीन बाधित झाली आहे. तिसरे आहेत, लांडगे तानाजी निवृत्ती हे मजूर आहेत. भोसरी इथे राहणारे असून त्यांची भुयारी गटर योजना व जलशुद्धीकरण केंद्र यात क्षेत्र बाधित झाले आहे. आणि चौथे कर्मचारी आहेत, लांडे सिद्धेश्वर मारुती, मजूर, भोसरी इथे राहणारे असून त्यांची जमिन मैलाशुद्धीकरण केंद्र कासारवाडी यात बाधित झाली आहे. विशेष सांगायचे म्हणजे ११६ जणांपैकी पिंपरी चिंचवडमधील फक्त चारच जणांना नोकऱ्या मिळतात. महापालिकेच्या आकृतीबंधानुसार क वर्गाची एकंदरीत पदसंख्या ४२३५ पदे भरलेली आहेत. प्रकल्पग्रस्तांसाठी ५ टक्के आरक्षण आहे,

त्यापैकी फक्त चारच कर्मचारी पिंपरी चिंचवडमधील आहेत हे योग्य वाटत नाही शहराचा जास्तीत जास्त विकास झाला आहे. त्यात या भूमीपुत्रांच्या जमिनी गेल्या आहेत त्यांना नोकरी मिळणे गरजेचे आहे. विशेष सांगायचे म्हणजे, टिडीआर मिळतो, एफएसआय मिळतो किंवा रोख पैसे भरपूर मिळतात मग नोकरीचा काय विषय आहे. यात पवना प्रकल्पग्रस्त, चासकमान प्रकल्पग्रस्त, उजनी प्रकल्पग्रस्त आहेत. त्यांना पण भरपाई मिळते. आपल्यालाही भरपाई मिळते. परंतू पूर्वी टिडीआर, एफएसआय मिळत नव्हता. आता नागरीक व शेतकरी जागरुक झाले आहेत. त्याअनुषंगाने त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली होते आहे परंतू सर्वांचीच अशी चांगली परिस्थिती होणार नाही. त्यामुळे त्यांना या नोकरीचा लाभ महापालिका क्षेत्रात मिळाला तरी त्याचा त्यांना निश्चित फायदा होईल. म्हणून मी हा विषय याठिकाणी आणला आहे.

दुसरा विषय असा आहे की, प्रशासनाने उत्तर दिले आहे, अजून ४५ रिक्त पदे भरलेली नाहीत. त्याची वेगवेगळी कारणे दिली आहेत, न्यायालयीन, जाहिरात रद्द झाली. मी त्याच्या खोलात जात नाही. ज्यावेळी महापालिकेतील इतर पदे भरली जातील, त्यावेळी जे प्रकल्पग्रस्त बाधीत आहेत त्यांना देखील शंभर टक्के महापालिकेत नोकरी मिळणे गरजेचे आहे. मी या विषयाच्या वेळी उपसूचना देणार नाही. परंतू जागा भरताना शंभर टक्के अशा जागा प्राधान्याने भरल्या पाहीजेत, अशी माझी अपेक्षा आहे. ५ टक्के आरक्षण संपूर्ण महाराष्ट्र राज्याकरीता आहे. त्याला धक्का न लावता २० टक्के अतिरिक्त आरक्षण आपल्या पिंपरी चिंचवड शहरात आहे त्यांच्या जागा एमआयडीसीत असेल, प्राधिकरणात असेल, म्हाडा प्रकल्पात असेल, किंवा केंद्र सरकार, राज्य सरकारच्या विकास योजनेत असेल. अशा व्यक्तींना वेगळे आरक्षण मिळावे म्हणून सभागृहाने या गोष्टीचा विचार व्हावा म्हणून मी ही प्रश्नोत्तरे केली आहेत. तसेच प्रशासनाला विचारलेली माहिती आज सकाळी मिळाली. त्यामुळे यावर जास्त अभ्यास करता आला नाही. अशी माहिती लवकरात लवकर दोन दिवस अगोदर दिलीतर यावर काहीतरी बोलता येईल. यात बदल करत असालतर पहावे अशी मा.महापौर यांना विनंती करतो. मला महापौरांनी प्रश्न मांडण्यासाठी संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो. धन्यवाद.

**मा.सुलभाताई उबाळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, याठिकाणी अपक्षांचे गटनेते आदरणीय सुरेश म्हेत्रे यांनी वेगळ्याच विषयाकडे सभागृहाचे लक्ष वेधल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देते. त्या निमित्ताने प्रकल्पग्रस्तांची यादी, जे महापालिकेत कामाला लागले आहेत ती समजली. पिंपरी चिंचवड मधील फक्त तीन/चार जण जे आहेत ते नात्यागोत्यातलेच आहेत, हे तुम्हाला नावावरुनच कळेल. ही गोष्ट खरी आहे की, आपल्याकडे टीडीआर,एफएसआय या सोयी असल्यामुळे नोकरभरतीमध्ये प्राधान्य दिले जात नाही. मा.महापौर साहेब,सगळ्यांत महत्वाचा पवना धरणाच्या प्रकल्पग्रस्तांचा विषय आहे. या विषयाची आपल्या सगळ्यांनाच झळ लागली आहे. गोळीबार झाला. पवना धरणात ज्या शेतक-

यांच्या जमिनी गेल्या, जे प्रकल्पग्रस्त आहेत, त्यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत अनेक वेळा नोकरी लागण्यासाठी अर्ज केला होता. मला यांची नावे नोकरीसाठी कोणत्याही यादीत कधी दिसली नाहीत. सकाळीच खासदार मा.श्रीरंग बारणे आयुक्तांना भेटले. त्यांनी सांगितले, त्यांनी सीएसआरच्या माध्यमातून गाळ काढण्यासाठी प्रयत्न केला. त्यावेळी सुद्धा शेतकऱ्यांनी त्यांना गाळ काढायला बंदी केली. त्यावेळी त्यांचे म्हणणे होते, प्रकल्पग्रस्तांना आधी नोकरी दिली पाहिजे. आपल्याला पिण्याचे पाणी पाहिजे. तिथे जो काही प्रकार घडला. तिथे तीन जणांचा जीव गेला. या तीन जणांच्या नातेवाईकांना नोकरी देऊ असे सांगून त्यांचा राग कमी करायचा प्रयत्न केला. आपण नोकरीतली ५ टक्के जागा प्रकल्पग्रस्तांना देतोय. माझे म्हणणे आहे की, या ५ टक्के जागेत पवना धरणातील बाधितांना बसवा. त्यासाठी विशेष परवानगी लागेल. कारण हे रिझर्वेशन महाराष्ट्रासाठी आहे. एकाच भागातील ५ टक्के भरुन घेता येणार नाहीत. परंतू आपण ठराव करुन पवना धरणातील प्रकल्पग्रस्तांना ५ टक्के जागेत बसवता आले आणि विशेष बाब म्हणून शासनाकडे हा प्रस्ताव पाठवलातर निश्चितपणे हा प्रस्ताव मंजूर करायची आपली जबाबदारी तिनही आमदारांवर राहील. शहरातील बंद पाईप योजनेचा मोठा विषय आहे. तो प्रश्न सुटण्यासाठी मदत होईल, अशा प्रकारचा ठराव करता आलातर आपण शासनाकडे ठराव पाठवून या ५ टक्यांमध्ये पवना प्रकल्पग्रस्तांना सामावून घेण्यात यावे.

**मा.नगरसचिव** - मा.राजेंद्र जगताप यांना विचारावयाचे प्रश्न.

**मा.राजेंद्र जगताप** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, आज आयुक्तपदी विराजमान झालेले आयुक्त मा.दिनेश वाघमारे यांचे मी स्वागत करतो. मा.फुंदे साहेब, मा.कांबळे साहेब, मा.सोनवणे साहेब हे रिटायर्ड होणार आहेत. यांनासुद्धा भावी आयुष्य सुखसमृद्धीचे, भरभराटीचे जावो अशी शुभेच्छा देतो. मी आकाशचिन्ह व परवाना विभागाबद्दल जे प्रश्न विचारले होते, त्यांची उत्तरे मला लेट मिळाली आहेत. मला मुदत मिळावी. पुढील महासभेपर्यंत हे प्रश्न विचारायची मला परवानगी मिळावी, एवढीच मी विनंती करतो.

(सन्मा.सदस्य सभागृहात उपस्थित असताना प्रश्न न विचारल्यामुळे सदर प्रश्न वगळण्यात आले.)

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब,विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८५९ विषय क्रमांक - २
दिनांक- २०.५.२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भूजि/२/कावि/४५/२०१५ दि.६/२/२०१६
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१५१९६ दि.१७/२/२०१६
३) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१६१५२ दि.६/५/२०१६

भूमि आणि जिंदगी विभागाकडील निविदा नोटीस क्र.१/२०१२-१३ से.न.२८ संत ज्ञानेश्वर महाराज व्यापारी संकुल आकुर्डी यामधील गाळा क्र.१७ अन्वये चे २५ वर्षाच्या लिजने वितरणाकामी गाळयाकरीता मनपा दर र.रु.४,९३,५८४/- असा आहे व मनपा दराचे तुलनेने सर्वात जास्त दराची निविदा श्री.नितेश रमेश साहु यांची ररु. १६,४०,०००/- (अक्षरी र.रु. सोळा लाख चाळीस हजार फक्त) ही शासन व मनपा करा व्यतिरिक्त या दराने प्राप्त झालेली आहे. प्रस्तुतकामी श्री. नितेश रमेश साहु यांची ररु.१६,४०,०००/- या दराने आलेली निविदा मनपा दरापेक्षा व इतर निविदा धारकांचे तुलनेने सर्वात जास्त दराची असलेने २५ वर्ष लिज कालावधीने स्विकृत करणेस व करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.अपर्णा डोके** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर ठराव मतास टाकणेत आला असता -
अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ३
दिनांक- २०.५.२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.सविता साळुंके, मा.हिरानंद आसवाणी यांचा प्रस्ताव -
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१६०२२ दि.१२/४/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्र४४ येथे सुमारे १ एकर क्षेत्रफळाच्या जागेत हेमू कलाणी उद्यान आहे. सदर उद्यानात शहीद हेमू कलाणी यांचा अर्धपुतळा बसविणेबाबत पुतळा समिती, नागरिक, नगरसदस्य, स्थानिक विविध मंडळाचे कार्यकर्ते, पदाधिकारी यांची मागणी आहे. पिंपरी कॅम्पमधील पुतळा समितीने हा पुतळा तयार करुन मनपाकडे हस्तांतरीत केलेला आहे. सदरचा अर्धपुतळा शहीद हेमू कलाणी उद्यानामध्ये सुशोभिकरण करुन बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.नंदा ताकवणे** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.नारायण बहिरवाडे** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - जगद्ज्योती महात्मा बसवेश्वरांनी १२ व्या शतकात जगातील पहिली लोकशाही रुजवून स्त्री-पुरुषांना समान हक्क व आधिकार प्राप्त करुन दिले. जाती भेद व अस्पृशता नष्ट केली. सर्वाना समान अधिकार मिळवून दिले. श्रमाला प्रतिष्ठा मिळवून दिली. अशा थोर जगद्ज्योती महात्मा बसवेश्वरांचा पुतळा शहरात बसविण्यात यावा अशी मागणी अनेक वर्षापासून नागरीकांकडून होत आहे. सदर पुतळयासाठी सन २०१६-१७ या वर्षाच्या अर्थसंकल्पात आर्थिक तरतूद देखील उपलब्ध आहे. तरी जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर यांचा पुर्णाकृती अश्वारुढ पुतळा, निगडी प्राधिकरण, भक्ती शक्ती डेपो जवळील ४५ मीटर बी.आर.टी.एस.रोड व स्पाईन रोड जंक्शनच्या कडेला असलेल्या मोकळया जागेत बसवण्यास मान्यता देणेत यावी आणि प्रभाग क्र. ३९ संत तुकाराम नगर मध्ये सेंट ऍन्थोनी उदयान आहे सदर उद्यानामध्ये सेंट ऍन्थोनी यांचा अर्ध पुतळा/पुर्णाकृती पुतळा बसविण्याची स्थानिक नागरिकाची मागणी आहे तरी सदर ठिकाणी सेंट ऍन्थोनी यांचा अर्ध पुतळा/पुर्णाकृती पुतळा बसविणेस मान्यता देणेत यावी.

**मा.आर.एस.कुमार** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरूस्त ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ८६० | विषय क्रमांक - ३
दिनांक- २०.५.२०१६ | विभाग - मा.आयुक्त

संदर्भः-१) मा.सविता साळुंके, मा.हिरानंद आसवाणी यांचा प्रस्ताव -
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१६०२२ दि.१२/४/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्र४४ येथे सुमारे १ एकर क्षेत्रफळाच्या जागेत हेमू कलाणी उद्यान आहे. सदर उद्यानात शहीद हेमू कलाणी यांचा अर्धपुतळा बसविणेबाबत पुतळा समिती, नागरिक, नगरसदस्य, स्थानिक विविध मंडळाचे कार्यकर्ते, पदाधिकारी यांची मागणी आहे. पिंपरी कॅम्पमधील पुतळा समितीने हा पुतळा तयार करुन मनपाकडे हस्तांतरीत केलेला आहे. सदरचा अर्धपुतळा शहीद हेमू कलाणी उद्यानामध्ये सुशोभिकरण करुन बसविणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच जगद्ज्योती महात्मा बसवेश्वरांनी १२ व्या शतकात जगातील पहिली लोकशाही रुजवून स्त्री-पुरुषांना समान हक्क व आधिकार प्राप्त करुन दिले. जाती भेद व अस्पृशता नष्ट केली. सर्वाना समान अधिकार मिळवून दिले. श्रमाला प्रतिष्ठा मिळवून दिली. अशा थोर जगद्ज्योती महात्मा बसवेश्वरांचा पुतळा शहरात बसविण्यात यावा अशी मागणी अनेक वर्षापासून नागरीकांकडून होत आहे सदर पुतळयासाठी सन २०१६-१७ या वर्षाच्या अर्थसंकल्पात आर्थिक तरतूद देखील उपलब्ध आहे.

तरी जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर यांचा पुर्णाकृती अश्वारुढ पुतळा, निगडी प्राधिकरण, भक्ती शक्ती डेपो जवळील ४५ मीटर बी.आर.टी.एस. रोड व स्पाईन रोड जंक्शनच्या कडेला असलेल्या मोकळया जागेत बसवण्यास मान्यता देणेत येत आहे. आणि प्रभाग क्र. ३९ संत तुकाराम नगर मध्ये सेंट ऍन्थोनी उदयान आहे सदर उद्यानामध्ये सेंट ऍन्थोनी यांचा अर्ध पुतळा/पुर्णाकृती पुतळा बसविण्याची स्थानिक नागरिकाची मागणी आहे तरी सदर ठिकाणी सेंट ऍन्थोनी यांचा अर्ध पुतळा/पुर्णाकृती पुतळा बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -८६१ विषय क्रमांक - ४
दिनांक- २०.५.२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भूजि/२/कावि/६२/२०१६ दि.२६/०२/२०१६
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१६०७४ दि.२६/४/२०१६

मुकाई चौक रावेत स.नं. ७७ ते ७९ brts बस टर्मिनल मधील व्यापारी गाळा क्र.१ ते ६ मिळकत लिजने ३० वर्ष कालावधीसाठी वितरणाकामी इच्छुक नागरीकाकडून ई -निविदा नोटीस क्र.५/२०१५-१६ अन्वये निविदा मागविणेत आल्या होत्या त्याचा तपशील खालीलप्रमाणे.
१) कामाचे नाव - मुकाई चौक रावेत स.न.७७ ते ७९ brts बस टर्मिनल मधील व्यापारी गाळा क्र.१ ते ७ .२) मनपा दर र.रू. गाळा क्र.१,२,६ व ७ प्रत्येकी. ४,५४,७९६/- गाळा क्र.३ र.रु.४,२३,६४१/- गाळा क्र.४ र.रु. ४,८१,२६१/- गाळा क्र.५ र.रु. ७,३५,१९१/- गाळा क्र.७ र.रु.४,५४,७९६/-.३) ई-निविदा क्र.निविदा नोटीस क्र.५/२०१५-१६. ४) गाळा क्षेत्र — गाळा क्र. क्र.१,२,६व ७ प्रत्येकी ६७.८८ चौ.फु. गाळा क्र.३चे ६३.२३ चौ.फु., गाळा क्र.४ चे ७१.८३ चौ.फु., गाळा क्र.५चे १०९.७३ चौ.फु.५) बयाणा रक्कम रुपये— गाळा क्र. क्र.१,२,६ व ७ प्रत्येकी र.रु.४,५४८/- गाळा क्र.३ चे र.रु. ४,२३६/- गाळा क्र.४ चे र.रु.४,८१३/- गाळा क्र.५ चे र.रु.७,३५२/- ६) लिज कालावधी - ३० वर्ष, ७) ई-निविदा प्रसिध्द दि. ०८/१२/२०१५ ते दि.०७/०१/२०१६. ८) ई-निविदा प्रसिध्दी—दै.केसरी, दै.बंधूप्रेम, दै.दायित्व, सा.पुष्पप्रकाश, सा.आशाकिरण वार्ता. १०)निविदा उघडल्याचा दि. पाकीट क्र.१ दि. १५/०१/२०१६, पाकीट क्र.२ दि. ०६/०२/२०१६. ११) पात्र प्राप्त निविदा संख्या- गाळा क्र.१-.४, गाळा क्र.२-.४, गाळा क्र.३-.३, गाळा क्र.४-४. गाळा क्र.५-.३ गाळा क्र.६-.४ एकुण ६ गाळे निविदा प्राप्त. प्रस्तुत कामासाठी वरील प्रमाणे निविदा प्राप्त असुन निविदा धारकानी दरपत्रक सादर केले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र | गाळा क्र.व क्षेत्र | निविदाधारक नाव | मनपाचा दर | प्राप्त दर | कालावधी | |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | १<br>६७.८८चौ.फु. | १)मल्हार एन्टरप्रायजेस<br>२)व्यकटेश्वरा स्वयं रोजगार सेवा सहकारी संस्था मर्या.<br>३)एकवीरा महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या.<br>४)नवमहाराट्र बेरोजगार संघ | ४,५४,७९६/- | ४,६०,२५०/-<br>४,५४,८११/-<br>४,५४,९१२/-<br>४,५५,२९८/- | ३० वर्ष | |
| २) | २<br>६७.८८<br>चौ.फु. | १)मल्हार एन्टरप्रायजेस<br>२)व्यकटेश्वरा स्वयं रोजगार सेवा सहकारी संस्था मर्या.<br>३)एकवीरा महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या.<br>४)नवमहाराट्र बेरोजगार संघ | ४,५४,७९६/- | ४,६०,२५४/-<br>४,५४,८८८/-<br>४,५४,९९९/-<br>४,५५,३२५/- | ३० वर्ष | |
| ३) | ३<br>६३.२३<br>चौ.फु. | १)व्यकटेश्वरा स्वयं रोजगार सेवा सहकारी संस्था मर्या.<br>२)एकवीरा महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या.<br>३)नवमहाराट्र बेरोजगार संघ | ४,२३,६४१/- | ४,२३,७५०/-<br>४,२३,७९९/-<br>४,२४,१३०/- | ३० वर्ष | |
| ४) | ४<br>७१.८३<br>चौ.फु. | १)मल्हार एन्टरप्रायजेस<br>२)व्यकटेश्वरा स्वयं रोजगार सेवा सहकारी संस्था मर्या.<br>३)एकवीरा महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या.<br>४)नवमहाराट्र बेरोजगार संघ | ४,८१,२६१/- | ४,८६,७१५/-<br>४,८२,१११/-<br>४,८२,५६६/-<br>४,८२,५५५/- | ३० वर्ष | |
| ५) | ५<br>१०९.७३<br>चौ.फु. | १)व्यकटेश्वरा स्वयं रोजगार सेवा सहकारी संस्था मर्या.<br>३)एकवीरा महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या.<br>४)नवमहाराट्र बेरोजगार संघ | ७,३५,१९१/- | ७,३५,३३३/-<br>७,३५,९९९/-<br>७,३५,५५५/- | ३० वर्ष | |
| ६) | ६<br>६७.८८<br>चौ.फु. | १)मल्हार एन्टरप्रायजेस<br>२)व्यंकटेश्वरा स्वयं रोजगार सेवा सहकारी संस्था मर्या.<br>३) एकवीरा महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या.<br>४) नवमहाराष्ट्र बेरोजगार संघ | ४,५४,७९६/- | ४,६०,२४५/-<br>४,५४,८८८/-<br>४,५५,१११/-<br>४,५४,९९०/- | ३० वर्ष | |

वरील प्रमाणे सदर गाळयाकरीता मनपा दर व मनपा दराचे तुलनेने सर्वात जास्त व प्राप्त दर आहेत. यामधील सर्वोच्च दर हा १) गाळा क्र.१ मल्हार एन्टरप्रायजेस यांचा रक्कम रुपये

४,६०,२५०/- २) गाळा क्र.२ मल्हार एन्टरप्रायजेस यांचा रक्कम रुपये ४,६०,२५४/- ३) गाळा क्र.३ नवमहाराट्र बेरोजगार संघ यांचा रक्कम रुपये ४,२४,१३०/- ४) गाळा क्र.४ मल्हार एन्टरप्रायजेस यांचा रक्कम रुपये ४,८६,७१५/- ५) गाळा क्र.५ एकवीरा महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या. यांचा रक्कम रुपये ७,३५,९९९/- ६) गाळा क्र.६ मल्हार एन्टरप्रायजेस यांचा रक्कम रुपये ४,६०,२४५/- आहे. यांची रक्कम ही शासन व मनपा करा व्यतिरिक्त या दराने प्राप्त झालेली आहे. प्रस्तुतकामी १) गाळा क्र.१ मल्हार एन्टरप्रायजेस यांचा रक्कम रुपये ४,६०,२५०/- २) गाळा क्र.२ मल्हार एन्टरप्रायजेस यांचा रक्कम रुपये ४,६०,२५४/- ३) गाळा क्र.३ नवमहाराट्र बेरोजगार संघ यांचा रक्कम रुपये ४,२४,१३०/- ४)गाळा क्र.४ मल्हार एन्टरप्रायजेस यांचा रक्कम रुपये ४,८६,७१५/- ५) गाळा क्र.५ एकवीरा महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या. यांचा रक्कम रुपये ७,३५,९९९/- ६) गाळा क्र.६ मल्हार एन्टरप्रायजेस यांचा रक्कम रुपये ४,६०,२४५/- आहे. या दराने आलेली निविदा मनपा दरापेक्षा व इतर निविदाधारकांचे तुलनेने सर्वात जास्त दराची असलेने ३० वर्ष लिज कालावधीने स्विकृत करणेस व करारनामा करुन लिजने देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.अपर्णा डोके** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८६२ विषय क्रमांक - ५

दिनांक- २०.५.२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१७/९३३/२०१६ दि.२०/०४/२०१६

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१६०९३ दि.२६/४/२०१६

शासन निर्णयानुसार महापालिकेतील वर्ग १ व वर्ग २ च्या अधिका-यांना मोटरकार खरेदीसाठी वेतन बँड मधील मासिक वेतनाच्या ८ पट एवढी रक्कम किंवा र.रू.१,८०,०००/- किंवा नवीन मोटरकारची प्रत्यक्ष किंमत यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढे अग्रीम दिले जाते. त्याचे मुद्दलाची वसुली समान १०० हप्ते व त्यानंतर व्याज वसुली समान ६० मासिक हप्त्यामध्ये करण्यात येते. मा.स्थायी समिती ठराव क्र.११७७ दि.१८/०९/२०१२ व मा.महापालिका सभा ठराव क्र.-१३८ दि.२६/११/२०१२ अन्वये मोटारकार खरेदीचे अग्रिम

मंजुरीकामी खालीलप्रमाणे मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र शासन, वित्त विभागाकडील दिनांक १७ फेब्रुवारी २०१२ चे शासन निर्णयानुसार नवीन मोटरकार खरेदीसाठी ज्या अधिका-यांचे सुधारित वेतन बँड मधील मासिक वेतन रू.१९,५३०/- (ग्रेड वेतन वगळून) किंवा अधिक आहे अशा राजपत्रित अधिकारी यांना अग्रीमाची रक्कम त्यांचे वेतन बॅड मधील मासिक वेतनाच्या १७ पट किंवा ३,५०,०००/- किंवा नवीन मोटरकारची प्रत्यक्ष किंमत यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढे अग्रीम देय राहील. तसेच प्रथमत: मुद्दलाची वसुली १०० समान मासिक हप्त्यात तसेच व्याज वसुली पुढे समान ६० मासिक हप्त्यात करावी. जुनी मोटरकार खरेदी करण्यासाठी अग्रीमाची रक्कम अधिका-याच्या वेतन बॅड मधील मासिक वेतनाच्या ८ पट एवढी रक्कम किंवा रु.१,७५,०००/- किंवा जुन्या मोटर कारची प्रत्यक्ष किंमत यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढा अग्रिम अनुज्ञेय राहील. त्याची वसूली प्रथमत: ५० समान मासिक हप्त्यात व व्याज वसुली पुढे समान ३० मासिक हप्त्यात करावी. खरेदी करावयाची जुनी मोटरकार ५ वर्षापेक्षा जुनी नसावी. तसेच नवीन व जुनी मोटारकार खरेदी करणेसाठी सेवाभरती नियमानुसार करण्यात आलेल्या नियुक्तीनंतर कमीत कमी ५ वर्ष सलगसेवा झालेल्या अधिका-यांना शासकीय सेवेच्या कालवधीत एकदाच अग्रीम अनुज्ञेय राहील. उपरोक्त मा.स्थायी समिती ठराव व मा.महापालिका ठरावामध्ये नमुद असलेल्या **राजपत्रित अधिकारी** ऐवजी **मनपा मधील वर्ग १ व २ चे अधिकारी** यांना मोटारकार खरेदी अग्रिम मंजुरीबाबतची दुरुस्ती करुन सदर अग्रिमबाबतच्या इतर अटी व शर्ती पूर्वीप्रमाणेच कायम राहतील अशी दुरुस्ती होणे आवश्यक असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.अपर्णा डोके** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८६३ | विषय क्रमांक - ६
दिनांक- २०.५.२०१६ | विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.कर/मुख्य/५/कावि/१६६/२०१६ दि.२७/०४/२०१६
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१६१५९ दि.१०/५/२०१६

करआकारणी व करसंकलन विभागामार्फत शहरातील मिळकतींवर मालमत्ताकराची आकारणी करणेत य़ेते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 8 नियम 7 अन्वये करयोग्य मुल्य निर्धारण केले नंतर नियम 39 अन्वये मिळकतकराचे बिल देणेत येते. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक जनेयो-2007/प्र.क्र.52/गृनिधो-2 दिनांक 25/06/2007 रोजीचे निर्णयानुसार जेएनएनयुआरएम योजनेअंतर्गत कमी उत्पन्न घटकांसाठी घरकुल योजना प्रकल्प राबविणेत येत आहे. सदर प्रकल्पातील इमारतीमध्ये महापालिका क्षेत्रातील कमी उत्पन्न घटकातील प्राप्त लाभार्थींना मिळकतींचे वाटप करणेत आले असून कर संकलन विभागामार्फत सदर मिळकतींची कर आकारणी करुन मिळकतकराची बिले देणेत आली आहेत. तथापि भारतीय जनवादी युवा संघटना, पिंपरी चिंचवड परिवर्तन पार्टी, श्री साईसेवा प्रतिष्ठान, क्रांतीवीर बिरसा मुंडा आदिवासी सामाजिक संघटना, डेमोक्रॅटिक यूथ फेडरेशन ऑफ इंडिया इत्यादी संघटना तसेच पदाधिकारी यांनी कमी उत्पन्न घटकांचे घरकुल योजनेतील मिळकतींना मिळकत करामध्ये माफी अथवा मिळकत कराची मागणी कमी करणेबाबत विनंती केली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 129-1-अ मध्ये विशेष विकास प्रकल्पांच्या इमारतींच्या आणि जमिनींच्या बाबतीत राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी निश्चित करील अशा कमी केलेल्या दराने मालमत्ता कर आकारणेची तरतूद आहे. त्या अनुषंगाने मा.स्थायी समिती व मा.महापालिका सभेचा ठराव करुन त्यास शासनाची मान्यता घेणे आवश्यक असल्याने महानगरपालिका हद्दीतील जेएनएनयुआरएम अंतर्गत विकसित केलेल्या कमी उत्पन्न घटकांसाठी घरकुल योजना प्रकल्पातील रहात्या निवासी घरास सवलतीचे दराने मालमत्ता कर रकमेची आकारणी करणे योग्य राहील याकामी खालीलप्रमाणे प्रस्ताव मंजूरीकामी सादर करणेत येत आहे. प्रस्ताव मुंबई महानगरपालिका धर्तीवर महानगरपालिका हद्दीतील जेएनएनयुआरएम अंतर्गत विकसित केलेल्या कमी उत्पन्न घटकांसाठी घरकुल योजना प्रकल्पातील रहात्यानिवासी मिळकतीस राज्य शासनाचे मान्यतेने खालीलप्रमाणे सवलतीचे दराने मालमत्ता कर आकारणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कालावधी | मालमत्ता कराचा कमी केलेला दर |
|---|---|---|
| 1 | पहिल्या वर्षापासून दहाव्या वर्षापर्यंत | विशिष्ट वर्षात वसूल करण्यात आलेल्या मालमत्ता कराच्या दराच्या 20% |
| 2 | अकराव्या वर्षापासून पंधराव्या वर्षापर्यंत | विशिष्ट वर्षात वसूल करण्यात आलेल्या मालमत्ता कराच्या दराच्या 50% |
| 3 | सोळाव्या वर्षापासून विसाव्या वर्षापर्यंत | विशिष्ट वर्षात वसूल करण्यात आलेल्या मालमत्ता कराच्या दराच्या 80% |

**मा.श्रद्धा लांडे-**मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, या विषयाची माहिती देण्यात यावी.

**मा.गायकवाड (सहा.आयुक्त, करसंकलन)** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, हा जो विषय महापालिकेच्या मुख्य सभेसमोर आणला आहे, त्यात जेएनएनयूआरएम अंतर्गत कमी उत्पन्न गटाची योजना महापालिकेच्या हद्दीत राबवली आहे. त्या योजनेत जे काही मिळकत करधारक आहेत, त्यांना मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर मिळकत करात सवलत देण्यासंदर्भात आपण शासनाकडे प्रस्ताव सादर करायचा आहे. त्यात सवलतीचे जे मुद्दे आहेत, त्यात पहिल्या १० वर्षांसाठी ८० टक्के सवलत, त्यानंतर पुढील ५ वर्षांसाठी ५० टक्के सवलत आणि त्यानंतर ५ वर्षांसाठी २० टक्के सवलत अशी एकूण २० वर्षांसाठी सवलत आपण प्रस्तावित केली आहे. महापालिका अधिनियमाच्या कलम १२९(१) आणि जे विशेष प्रकल्प आहेत, त्यांना मिळकत करात सवलत देण्याची तरतूद महापालिका अधिनियमात आहे. आणि त्या अधिनियमाचा आधार घेऊन आपण शासनाकडे प्रस्ताव सादर करीत आहोत.

**मा.मंगलाताई कदम**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, हा विषय योग्यच आहे. फक्त यापूर्वी असा प्रस्ताव पाठवला होता का. त्याचा पाठपुरावा झाला का नाही. आपण नुसता प्रस्ताव करुन पाठवून चालणार नाही. यांना न्याय सुद्धा मिळाला पाहिजे. कुठल्या संघटना असतील, पक्ष असतील कमीत-कमी यांची नावे न घेता विषय आला पाहिजे याची दक्षता घेतली पाहिजे. त्याचे उगाचच भांडवल केले जाते. बोलले जाते. मागे सुद्धा असाच एक विषय आला होता. सभागृहाची विषय करायची मनाची तयारी असेलतरी कोणी काहीजरी नाव टाकलेतरी हा विषय आत्ता करायचा आहे. परंतू परवा मा.शुभांगी बो-हाडे म्हणत होत्या. यापूर्वीही आपण असे प्रस्ताव पाठवले आहेत. मग त्यांचे पुढे काय झाले, त्यांचा पाठपुरावा झाला किंवा नाही याचा खुलासा करावा.

**मा.गायकवाड (सहा.आयुक्त, करसंकलन)** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, हा विषय कमी उत्पन्न गटांसाठी करतोय. यापूर्वी एसआरएअंतर्गत

जेएनएनयूआरएममधून झोपडपट्टी पुनर्वसन केले होते. त्यासाठी हा प्रस्ताव सादर केला होता. शासनाकडून ब-याच वेळा क्वेरी प्राप्त झाल्या. शेवटची क्वेरी प्राप्त झाली त्याच्या एक महिन्यापूर्वी उत्तर दिले आहे. मी स्वतः जाऊन त्याचा पाठपुरावा केला आहे. दोन्ही विषयांचे एकत्रिकरण झालेतर हे मंजूर होईल अशी अपेक्षा आहे.

**मा.गोरक्षनाथ लोखंडे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, तुम्ही वारंवार एसआरएचा उल्लेख केलात. या शहरात आत्तापर्यंत एकही एसआरएची योजना कार्यान्वित झालेली नाही. तुम्ही जेएनएनयूआरएमच्या नावाखाली एसआरएचे नाव घेऊन जी नियमावली तयार केली आहे, ती तुम्ही चुकीची केली आहे. त्यामुळे एसआरएचे नाव घेऊन तुम्ही ज्या चुकीच्या गोष्टी करताय, त्या आता बंद करा. त्याचा नीट अभ्यास करा. काही लोकांना बरोबर घ्या. एसआरए काय, जेएनएनयूआरएम काय, झोपडपट्टी पुनर्वसन योजना काय याची नियमावली बनवा.

**मा.प्रशांत शितोळे-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,जी माहिती गायकवाड साहेबांनी आत्ता दिली, ती अल्पउत्पन्न गटांसाठी. इडब्ल्यूएससाठी एसआरएमार्फत शासनाकडे जे प्रस्ताव सादर केले. परंतू तुम्हाला आत्ता पक्षनेत्यांनी विचारले होते. शासनाकडे जे प्रस्ताव सादर केले होते. केवळ कुठल्या योजनेबाबतीतची माहिती नव्हती. काही नवीन असे किती प्रस्ताव शासनाकडे दाखल केले आहेत. उदा. आपण काही वर्षांपूर्वी ज्या महिलेच्या नावावर प्रॉपर्टी असेलतर तिला काही प्रमाणात मिळकत करात सवलत दिली जाईल. त्यानंतर संरक्षण खात्यातील नागरीकांना, डिफेन्समधील लोकांना काही सवलती दिल्या जातील, अशा प्रकारचे किती प्रलंबित प्रस्ताव शासनाकडे आहेत. आणि शासनाकडे तुम्ही दाखल केलेल्या प्रस्तावांची आजची परिस्थिती काय आहे. ही माहिती तुम्ही आम्हाला सांगा. जे विचारले ते तुम्ही दिलेले नाही. केवळ इडब्ल्यूएसच नव्हेतर शहरातील ज्या काही मिळकती आहेत,शासनाकडे प्रलंबित आहेत. त्याची माहिती द्या. जेणेकरुन आयुक्त साहेबांना शासनाकडे त्याचा पाठपुरावा करता येऊ शकेल.

**मा.सुलभाताई ऊबाळे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, हा विषय घरकुलचा आहे. जो पिंपरी चिंचवड महापालिकेचे सगळ्यात मोठे स्वप्नातील घरकूल ड्रिम प्रोजेक्ट आहे. मा.महापौर साहेब, आपल्याला माहितच असेल की, यासंदर्भात उच्च न्यायालयाची जी केस होती, ती केस आत्ता निकाली निघालेली आहे. आपल्या सर्व ६७०० लोकांना घराचा ताबा देता येणार नाही. त्याबद्दल मा.राजन पाटील असतील, त्यांचे सर्व सहकारी असतील, सर्व नागरीक असतील, सर्व सन्माननीय सभागृह असेल, त्यांचे मनापासून हार्दीक अभिनंदन करते. आपल्या मार्गात जो काटा होता, जी अडचण होती, ती निघून गेली आहे. आपण जो पैसा खर्च केला आहे. महापालिकेच्या तिजोरीतून पैसा गेला आहे. या केस संदर्भात

आपल्याला कदाचित माहिती नसेल, २००८ साली ही घरांची योजना निघाली होती. त्यानंतर याच्यावर २.५ एफएसआय संदर्भात काही लोक कोर्टात गेले होते. त्यामुळे त्या नागरीकांची तशीही खूप होरपळ झाली होती. तीन चार वर्षांनंतर त्यांना या घरांच्यासंदर्भात तारण मिळायला सुरुवात झाली. त्यांना टॅक्समध्ये सवलत मिळावी,हि त्यांची मागणी पहिल्या दिवसापासून आहे. आर्थिकदृष्ट्या दूर्बल घटकांना दीड लाखात घर देतो असे म्हणून आपण हे अर्ज मागवले होते. जवळजवळ १५,००० लोकांना म्हणजे निम्या लोकांना घरे देऊ शकलो. घरकुलचे नागरीक झोपडपट्टीतले असतील, प्रकल्पग्रस्त असतील, या सगळ्या लोकांनी जीवाचा आकांत करुन, आटापिटा करुन पंधरा हजार रुपये खर्च करुन ही कागदपत्रे गोळा केली. या लोकांचे ड्रॉमध्ये नाव लागले. या लोकांना मोर्चे काढावे लागले, आंदोलन करावे लागले. लोकाना दोन दोन लाखांचे कर्ज काढावे लागले. त्यांनी ही जी टॅक्स माफी मागीतली आहे किंवा जी सवलत मागीतली आहे. ती त्यांना देणे आपले कर्तव्य आहे. कारण स्वप्नातले घर, स्वप्नातले घर म्हणून दीड लाखावरून पावणे चार लाखांना घर द्यावे लागले अशी परिस्थिती आज आपल्यावर आली आहे. प्रकल्प वेळेत पूर्ण न झाल्यामुळे सर्व बाजारभाव वाढले यासंदर्भात आपण महापालिका म्हणून सगळी कामगिरी करतोय. परंतू यात वेळ घालवू नये. हे मी स्पष्टपणे सांगते की, गेल्या वेळेला झोपडपट्टीत शौचालये द्यावीत म्हणून मी मागणी केली होती. त्यात शौचालये देण्यासाठी मा.महापालिका सभेच्या विषयपत्रात संबंधित अधिकारी मा.कुदळे यांनी माझे पत्र असल्यामुळे त्या विषयात माझे नाव टाकले. मला सुद्धा माहित नाही की माझे नाव टाकले आहे. त्यावरून एवढा आकांडतांडव झाला की, नाव का टाकले. मी सभागृह सदस्य असताना, मी मागणी केली असतानासुद्धा त्यावेळी माझे नाव टाकले म्हणून तो विषय तहकूब ठेवला. एवढेच नाहीतर श्री.पुजारी यांना ऑन रेकॉर्ड पाचशे रुपये दंड झाला म्हणजे अशाप्रकारचा दुटप्पीपणी. एकिकडे म्हणायचे, आम्ही भेदभाव करत नाही, आम्ही पक्षपातीपणा करत नाही. आणि एकिकडे त्या निष्पाप अधिका-यावर कारवाई केली गेली. आणी आता या संघटनेचे नाव आले आहे तर आम्ही याला विरोध करणार नाही. आज शहराच्या बाहेरून संघटना काम करणारच आहेत. घरकुलची लोकं पूर्ण शहरातली लोकं आहेत, कुणा एका नगरसेवकाच्या अखत्यारीतली लोकं नाहीत. कुणा एका पक्षाची लोकं नाहीत. अशावेळी काम करण्यासाठी सगळे नगरसेवक, माझ्या वॉर्डातले लोकं मला बोलणार, त्यांच्या वॉर्डातले लोकं त्यांना बोलणार. अशात या संघटना शिरल्यातर मा.राजीव जाधव यांनी ठेवलेला हा प्रस्ताव आहे. तर यात विलंब करु नये. आधीच त्या लोकांना खूप त्रास झाला आहे. सगळ्या परीक्षा पास करुन हे विद्यार्थी आले आहेत. त्यामुळे जरी कुणाचे नाव असले, गाव असले तरी महापालिकेच्या सभागृहाने मंजूर केलेला हा विषय आहे त्यामुळे तो विषय आपण त्वरित मंजूर करावा व मिळकत करात सूट मिळणार आहे त्यासाठी योग्य ती कारवाई करावी.

**मा.तानाजी खाडे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,सभागृहात जो विषय आला आहे. त्या विषयाबाबतीत आपण जी माहिती मागवली होती. खरोखरच आपण माहिती घेतली. गायकवाड साहेब पाठिमागे बसलेले आहेत. जेएनएनयूआरएममार्फत जो काही पुनर्वसन प्रोजेक्ट राबवला गेला, त्या प्रोजेक्टमधील नागरीकांना जो कर लावला होता तो काढणार होतो. जो कर सामान्य नागरीकांना आहे, तोच जेएनएनयूआरमधील लोकांना आहे. त्यात एसआरए अशी बाकी नावे टाकल्यामुळे, मुंबई इथे सुद्धा हिच परिस्थिती आहे. २० टक्के, ४० टक्के अशी सवलत दिली आहे. पुणे इथे आहे. मग पिंपरी चिंचवडमध्येच का नाही कारण त्यात काहीतरी गमला असेल. मी गायकवाड साहेबांचे अभिनंदन करतो. सेवाकरासंदर्भात जो विषय होता. ज्या फाईली शासनाकडे पाठविल्या होत्या त्या कुठे आहेत याची माहिती नव्हती. ती गायकवाड साहेबांनी शोधून काढली. ते त्याचा पाठपुरावा करत आहोत. माझी आपल्याला विनंती आहे की, गायकवाड साहेबांनी सेवाकरासंदर्भात जी काही फाईल पुढे पाठवली. त्यात आपण जातीने लक्ष घालून मार्ग काढण्यासाठी मी विनंती करतो. काही विषय बोलले गेले. काही जणांचे विषयपत्रिकेत नाव येते आणि विषयाचे विषयांतर होते. आपला कारभार असा आहे. पक्षपात कधी केला जात नाही. सर्व पक्षांकडे समान पाहिले जाते. नाव आल्यानंतर थोडेफार विषयांतर होते. सन्मा.अधिका-यांकडून थोड्याफार चूका होतात. सन्मा.अधिका-यांना यांना एक विनंती आहे, कोणाचेही नाव न टाकता विषय यावेत. माझी पक्षनेत्यांना विनंती आहे की, पुजारी हे चांगले अधिकारी आहेत. त्यांना पाचशे रुपये दंड केला असेलतर तो त्यांना माफ करण्यात यावे. मी सर्व अधिका-यांना विनंती करतो, इथून पुढे कोणत्याही पक्षाचे नाव न टाकता विषयपत्रिकेवर विषय आणावा एवढीच विनंती करतो.

**मा.अजित गव्हाणे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, आत्ता याठिकाणी हा जो करात सवलत देण्यासंदर्भातील विषय प्रशासनाने मांडला आहे. त्यात पक्षनेत्यांनी. मा.प्रशांत शितोळे यांनी अधिक मागितले होते. पूर्वी शासनाकडे जो प्रस्ताव पाठवला होता यासंदर्भात नेमके काय झाले. यात बरेचसे विषय प्रलंबित आहेत. आमची नेमकी हिच मागणी आहे. जे प्रलंबित विषय आहेत, ते सगळे मंजूर व्हावेत. कारण शहरातील गरीब नागरीक आहेत त्यांना करात सवलत देण्यात यावी. आपला कर खूप जास्त आहे. तो या लोकांना आज परवडत नाही. हे करत असताना, या लोकांना सवलत देत असताना जेएनएनयूआरएममधून जे काही फंड आले आहेत निश्चितपणे जेएनएनयूआरएमच्या गाईडलाईन्स यासंदर्भात आल्या असतील टॅक्स कशा पद्धतीने लावला पाहिजे. इतर महापालिका यासंदर्भात काय भूमिका घेतात. अशा लोकांना काय सवलत दिली जाते, याचाही अभ्यास करुन शहरात सर्वांना न्याय देण्याचे काम आपल्याला करावे लागणार आहे. नुसताच जी.बी.मध्ये ठराव करून घेऊ नका. तो शासनाकडून मंजूर करुन आणा. हे करत असताना मला प्रशासनापुढे, आयुक्तांपुढे या निमित्ताने दुसरी बाजू मांडायची आहे दुस-या बाजूला शहरात

इतर उत्पन्न स्त्रोत विशेषतः जकात बंद झाली. एलबीटीतून उत्पन्न जेवढे अपेक्षित आहे, भविष्यातील जेवढा खर्च अपेक्षित आहे. तो मर्ज करण्यासाठी जास्त कर लावला आहे. जेणेकरुन महापालिका व्यवस्थित चालावी, महापालिकेचे बजेट व्यवस्थित चालावे. या दृष्टीने प्रशासनाकडून काही गोष्टी केल्या जातात. यात निश्चितपणे काही त्रुटी राहतात. विशेषतः काही गोष्टींत सभागृहाला अंधारात ठेवण्यात येतात. परस्पर काही विभागांत वेगवेगळ्या प्रकारचा टॅक्स लावतात. जो माणूस प्रामाणिकपणे कर भरतो, त्याच्यावर कुठेतरी अन्याय होत असतो. सभागृहाला हे माहित नसते. मागील मिटींगमध्ये आधीचे आयुक्त असताना गायकवाड साहेब मी एका विषयावर बोललो होतो. आपण टेरेसेसला टॅक्स लावत नव्हतो. पार्किंगला टॅक्स लावत नव्हतो. आत्ता तुम्ही त्याला सुरुवात केली आहे. ज्या इमारतींत पार्किंग असते, ते कुणाच्या एकट्याच्या मालकीचे नसते. त्याचा प्रोफेशनल टॅक्स त्या फ्लॅटधारकावर लावलावर त्याच्यावर अन्याय होईल. पार्किंग एरिया त्याच्या मालकीचा कधीच नसतो. आमची सुद्धा हिच मागणी होती की, आपण टॅक्स लावत असताना पार्किंगचा टॅक्स वैयक्तिक त्या माणसाच्या नावाने लावू नये. पार्किंगचा मुद्दा अजूनही पेंडींग आहे. दुसरा महत्वाचा आहे, जी टॅक्स लावायची पद्धत आहे. ती पूर्वी अनेक वर्षांपासून चालू आहे तीच आहे जे करयोग्य मूल्य आहे. पूर्वीचे झोनिंग आहेत, त्याचप्रमाणे टॅक्स लावला जातो. आज परिस्थिती बदलली आहे. आपण पिंपरी चिंचवड शहराचा विचार केलातर वेगवेगळ्या एरियातील घरांची किंमत वेगवेगळी आहे. तिथले रेडीरेकनरचे रेट वेगळे आहेत. मुळात मार्केट व्हॅल्यूशी त्याच्याबरोबर कम्पेअर करुन त्या पद्धतीने आपल्याला आकारणी करता येत नाही. तुम्ही जर मोशी इथे रहात असाल आणि तुम्हाला वाकड या एरियाप्रमाणे तिथे टॅक्स लावलातर त्या व्यक्तीवर अन्याय होईल. वाकड इथल्या जागेची किंमत, तिथल्या घराची किंमत आणि मोशी इथल्या जागेची किंमत, तिथल्या घराची किंमत यात मोठी तफावत आहे. त्यानंतर आपण नेमके काय केले याची माहिती नवीन आयुक्तांना सुद्धा दिली पाहिजे. पक्षाच्या सर्व नेत्यांची, सर्व पक्षप्रमुखांची यासंदर्भात बैठक घ्यावी. अनेक लोकांवर अन्याय होतो आहे. हा अन्याय दूर करायचे काम येत्या काळात आम्हाला प्रशासनाकडून अपेक्षित आहे. आणि तसे व्हावे अशी अपेक्षा मी व्यक्त करतो. हा विषय जो आपण मंजूर करणार आहात, या विषयाबरोबर इतर विषयांचा विचार करुन भविष्यात ते शासनाकडे मंजूर करावे. आत्ताच मा.तानाजी खाडे यांनी, मा.सुलभाताई उबाळे यांनी जो विषय मांडला होता. पुजारी यांच्यावर पाचशे रुपये दंड आकारला आहे. या सूचनेला मी अनुमोदन देतो. तो दंड माफ करावा, अशी मी विनंती करतो.

**मा.दत्ता साने** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, जेएनएनयूआरएमच्या माध्यमातून टॅक्समध्ये सवलत देण्यासंदर्भात जो विषय आला आहे. मी आयुक्त साहेबांना विनंती करतो की, आपल्याकडे पूर्वी एक निवेदन आले होते. एक्स-सर्वीसमन आहेत. त्यांच्यासंदर्भात आपल्यासमोर टॅक्सचा विषय आहे. आयुक्त साहेबांना सुद्धा पत्र गेलेले

आहे. त्यासंदर्भात चौकशी करायची आहे. त्यासंदर्भात चौकशी करावी. त्या लोकांना शास्ती कर भरल्याशिवाय त्यांचे जे करयोग्य मूल्य आहे, आपण त्यात त्यांना सवलत देत नाही. माझी आपल्याला विनंती आहे की, शहरात एक्ससर्वीसमन आहेत. त्यांना करात सवलत दिली आहे. महिलांच्या नावावर प्रॉपर्टी असेलतर किंवा अन्य व्यक्तीच्या नावाने असेल, जसा हा प्रस्ताव आणला होता. तसा प्रस्ताव सभागृहाकडून मंजूर केलेला प्रस्ताव शासनाकडे पाठवलेला आहे या विषयाला अनुसरून मूळ प्रश्न असा आहे की, हा प्रस्ताव तयार करुन पाठवला होता. ते शासनाकडून मंजूर करुन आले आहेत का नाही, का ते पेंडींग आहेत. मा.अजित गव्हाणे यांनी सांगितल्याप्रमाणे आम्ही ग्रामिण भागातले आहोत. शहराच्या व आमच्या भागाचा विचार केलातर आमच्या भागात जो टॅक्स लावला आहे. याबाबत अनेक वेळा वाद झाले आहेत. सभागृहात झाले आहेत इथून पुढे जाऊन हेच सांगायचे आहे की, आमच्या भागात बैल-गाईंचे गोठे आहेत. कांद्याच्या वखारी आहेत. कोणाचे कार पार्किंग असेलतर अशा मिळकती सुद्धा टॅक्समध्ये धरल्या गेल्या आहेत. शेतक-याचे एखादे गोदाम असेल, कांद्याची वखार असेल, गोठा असेल, पत्राशेड असेल तर, त्यालाही टॅक्स लावला असेलतर त्या शेतक-याला त्या प्रॉपर्टीमधून काय उत्पन्न मिळणार आहे म्हणून तुम्ही टॅक्स लावताय या विषयात पिंपरी चिंचवड शहरात नवनिर्वाचित आयुक्त म्हणून त्यांची ही पहिलीच मिटींग आहे आमचे सभागृह कसे आहे हे आम्हाला वेगळे सांगायचे नाही. मी आपले पहिल्या मिटींगला मनापासून स्वागत करतो. शहरातील जे प्रलंबित,जुने प्रश्न आहेत. बंड साहेबांच्या काळापासून या शहराचा विकास हा एकदम चांगल्या पद्धतीने झाला आहे. तुमच्यावर ऐनवेळेला जबाबदारी टाकली आहे. येणा-या सत्रात महापालिकेच्या निवडणूका लागणार आहेत. सर्व नगरसेवकांमध्ये संभ्रम आहे. सुरुवातच वेगळ्या पद्धतीने झाली. आपण भेदभाव करणार का. आम्हाला भीती वाटते का. विरोधकांना काही त्रास देतात का. असा प्रकार या सभागृहात कधीही कुठल्याही आयुक्तांकडून घडलेला नाही. यानिमित्ताने मी मनःपूर्वक, तळमळीने विनंती करतो की, ग्रामिण भागावर अन्याय होतो आहे. यानिमित्ताने आपण या अन्यायाकडे लक्ष द्यावे. माझी गायकवाड साहेबांना विनंती आहे की, माझ्या भागातले जे निवेदन तुमच्याकडे आले होते. एक्ससर्वीसमनकडून शास्तीकर न भरता टॅक्स घेताय. ज्या दिवशी शास्तीकराचा निर्णय लागेल, तोपर्यंत या लोकांना सवलत द्यायला काही हरकत नाही. याचे सुद्धा कुठेतरी उत्तर द्यावे. मा.एम.टी.कांबळे उद्या ३० तारखेला रिटायर्ड होत आहेत. खूप चांगले अधिकारी मिळाले होते. त्यांनी खूप चांगल्या पद्धतीने काम केले आहे. मी मा.एम.टी.कांबळे साहेबांचे मनापासून आभार मानतो. कोणीही कितीही ॲग्रेसीव्ह होऊन नगरसेवक त्यांच्याकडे गेलातरी ते अतिशय प्रेमाने वागतात. त्यांनी नगरसेवकांची चांगली कामे महापालिकेत केली आहेत. त्यांच्या माध्यमातून शहरात खूप विकास कामे झाली आहेत. पुढील सभेच्या वेळी ते सभागृहात नसतील त्यांचे पुढील आयुष्य सुखाचे,आरोग्यदायी जावो अशी शुभेच्छा देतो. आम्हाला या प्रश्नाचे उत्तर पाहिजे. ग्रामिण

भागातले जे दोन/तीन प्रश्न मांडले आहेत,त्यांचे सुद्धा उत्तर द्यावे अशी माझी आयुक्त साहेबांना विनंती आहे.

**मा.आर.एस.कुमार**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, घरकुलला टॅक्समध्ये सवलत देण्याबाबतचा हा विषय आहे. प्राधिकरणाने लोअर इन्कम असलेल्यांसाठी घरे बांधून दिली आहेत. सर्वे क्र.१७ मध्ये १८०० घरे आहेत. ही सर्व ८,५०० घरे प्राधिकरणाने वाटप केली आहेत. त्यांचा एरिया काय आहे. शंभर,दीडशे,दोनशे स्क्वे. फूट. यांना कन्सेशन देतात. मग या लोकांना पण कन्सेशन दिले पाहिजे. त्यांचा घराचा एरिया बघितला तर २७५ स्क्वे.फूट. त्यामुळे या प्रकल्पाला टॅक्समध्ये कन्सेशन देताना सात ते आठ हजार घरे बांधून दिली. याचा सुद्धा आपण विचार करावा.

**मा.आशा शेंडगे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, आत्ता याठिकाणी आलेला हा विषय सभागृहात अत्यंत महत्वाचा व अत्यंत जिव्हाळ्याचा आहे. आज याठिकाणी महासभेला नवीन आयुक्त म्हणून तुम्ही जबाबदारी स्विकारली आहे. तुमची शैक्षणिक अर्हता मी ऐकली, तुमचा कामाचा अनुभव पाहिला. निश्चितच तुम्ही तुमच्या कामाच्या अनुभवाचा उपयोग करुन घ्याल. आत्ताच मी इथे ऐकले की इथे पक्षपात होत नाही, हे करत नाही, ते करत नाही. असे असलेतरी ज्या काही गोष्टी घडतात, त्या वेळोवेळी तुमच्यासमोर येतीलच. तुम्ही चांगले काम कराल अशी तुमच्याकडून अपेक्षा बाळगतो. शहराचा विकास करताना तुम्हाला जी काही मदत लागेल, ती आम्ही करुच. त्याचबरोबर सिटी इंजिनिअर सन्मा.एम.टी.कांबळे, यांच्याबद्दल प्रत्येक सदस्याकडून ऐकले असेलच. त्यांच्याबद्दल अत्यंत चांगले उदगार निघतात. त्यांनी कोणाला मदत केली किंवा नाही केली हा विषय अजिबात नाही. एखादा सदस्य जेव्हा समोर येतो, तेव्हा अधिकारी त्या सदस्याशी कसे वागतात, बोलतात यावर बरेच काही आधारीत असते. काम झाले असेल असे नाही, पण सन्माननीयांना चांगली वागणूक मिळाली तर आजचे काम उद्यावर झालेतरी नगरसेवक समजून घेतात हे याठिकाणी निश्चितपणे दिसते. यांच्या बाकी अधिका-यांनी तसे वागायचा प्रयत्न करावा अशी अपेक्षा आहे. मा.एम.टी.कांबळे साहेब, मा.फुंदे साहेब, मा.सोनवणे साहेब यांना रिटायरमेंटनंतरचा कालावधी सुखाचा, आरोग्यदायी व समाधानाचा जावा अशी अपेक्षा याठिकाणी व्यक्त करते. मला हे चांगले आठवते, घरकुल मागायला कोणताही नागरीक तुमच्याकडे आला नव्हता. महापालिकेला वाटले, नागरीकांना घरे द्यावीत. आर्थिकदृष्ट्या दूर्बल असलेल्या लोकांना घरे द्यावीत ही चांगली संकल्पना होती. याचे निश्चितपणे कौतुक केले पाहिजे. परंतू रु.१.६५ लाखात घर देऊ असे कुठेतरी खोटे अमिष दाखवून लोकांकडून पावणे चार लाख लुटले मला त्या खोलात जायचे नाही. ३.७९ लाखा पर्यंत घराची किंमत गेली. परंतू घर मागायला कोणी नागरीक तुमच्याकडे आला नव्हता. तिथे नागरीकांची लूट झाली. कोणत्या रेटने घर दिले ते पाहिले तर लक्षात येईल. उशीरा का होईना तुम्हाला वाटले, या नागरीकांना घरात सवलत

द्यावी. आज रेडी रेकनरच्या दराने टॅक्स भरतोय. त्यापेक्षा जो काही रेट होईल त्यात तुम्ही निश्चितपणे सवलत द्यावीत. मी तुम्हाला विनंती करते की, त्यांच्याबरोबर आयुक्त साहेब यापूर्वी अनेकदा सभागृहात स्टँडींग असेल, अनेक वेळा विषय झाला आहे. पिंपरी चिंचवड मधील सर्व मराठी माध्यमाच्या शाळांचा कर तुम्ही माफ करावा. मराठी माध्यमाच्या शाळांची संख्या अत्यंत कमी संख्येने आहे. ज्या शाळांमध्ये आपल्या शहरातील मराठी भाषिक विद्यार्थी शिकत असतात. कर्नाटक इथे कर्नाटकी भाषिक शाळांना कर भरावा लागत नाही. असा विषय इथे अनेक वेळा होऊन सुद्धा तो काही कारणास्तव  राहीला. त्याचा इथे उल्लेख करु. यात त्यांचा समावेश करुन घ्यावा अशी विनंती करते.

**मा.दत्तात्रय साने** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, माझ्या प्रश्नाचे उत्तर द्या. शासनाकडे किती प्रस्ताव गेले आहेत ते सांगा.

**मा.गायकवाड (सहा.आयुक्त, करसंकलन)** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, आपण शासनाकडे जे प्रस्ताव सादर केले आहेत, त्यात झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत जेएनएनयूआरएमचा एकच प्रस्ताव शासनाकडे सादर केला. त्यानंतर हा एक प्रस्ताव आहे. शासनाकडे दोनच प्रस्ताव सादर केलेले प्रलंबित आहेत. आदरणीय सदस्यांनी हा मुद्दा उपस्थित केला. स्वातंत्र्यसैनिकांना देखील आपण टॅक्समध्ये ५० टक्के सवलत द्यावी. मी सदस्यांना एक विनंती करु इच्छितो की, जे पत्र माझ्याकडे प्राप्त झाले आहे, त्या पत्राची शहानिशा करुन आयुक्तांच्या मान्यतेने बदल करता येणे शक्य आहे का याचा विचारपूर्वक निर्णय घेतला जाईल. यामुळे दुसऱ्या कशावर परिणाम होईल का नाही याची पडताळणी करुन निर्णय घेतला जाईल.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- ७

दिनांक - २०.५.२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आप/२/कावि/१५५/२०१६, दि.०९/०२/२०१६

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.६१ दि.१.०४.२०१६

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.८४६ दि.२०/४/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये जाहिरात फलक उभारुन जाहिराती केल्या जातात त्यावर महानगरपालिकेमार्फत जाहिरात कर, परवाना फी व जाहिरात फलक म.न.पा जागेत असल्यास जागाभाडे आकारणी करणेत येऊन परवाना दिला जातो. वरीलपैकी परवाना फीची आकारणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३८६ नुसार करण्यात येत आहे. कलम ३८६ नुसार आकारण्यात येणारे परवाना फीचे दर निश्चित करताना मा. विधी समितीमार्फत मा. महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. मागील वर्षाचे दर निश्चित करण्यासाठी या विभागाने दिनांक ८/०१/२०१४ रोजी महापालिका सभेकडे विधी समिती मार्फत प्रस्ताव सादर केला होता. मा. विधी समिती सभेने प्रस्तावासोबतचे परिशिष्टा प्रमाणे दरवाढ करणेस मान्यता दिली होती. मात्र दरम्यानच्या काळात विधानसभा सार्वत्रिक निवडणूक आचारसंहिता कालावधीमुळे मा. महापालिका सभेने ठराव क्रमांक ५१३ दिनांक ५/७/२०१४ अन्वये सदरचा विषय दप्तरी दाखल करणेत आलेला आहे. त्यामुळे परवाना फीचे दर सन. २०१३-२०१४ प्रमाणेच सन २०१४-१५ साठी कायम ठेवण्यात आले आहेत. चालु वर्षी परवाना फीचे दरात १५% वाढ केलेली असल्याने म.न.पा. उत्पन्न वाढीच्या दृष्टीने सन.२०१६-२०१७ साठी ठराविक चौक वगळता अन्य सर्वसाधारण ठिकाणी परवाना फीचे वाढ करावी असे मत आहे. याबाबत पुणे म.न.पा. कडून प्रतिवर्षी र. रू. २२२/- प्रति चौ. फूट याप्रमाणे फी आकारण्यात येते. याचा मासिक दर रू. १८.५० इतका येत असून त्या तुलनेत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जाहिरात कर व परवाना फी याचा प्रति चौ. फूट प्रति महा एकत्रित दर र. रू. ७.८० इतका आहे. तो पुणे म.न.पा. पेक्षा खूपच कमी आहे. सबब परवाना फीचे दरात सन २०१५-१६ पेक्षा ठराविक चौक वगळता अन्यत्र वाढ करावी असे मत आहे. मात्र आकारणी मधिल क्लिष्टता कमी करून हिशोबात सोपेपणा येण्याचे हेतुने त्यामधिल टप्पे कमी करून सोबतच्या परिशिष्ट 'अ' मध्ये दर्शविलेप्रमाणे दराचे टप्पे निश्चित करून नजिकच्या पुढच्या रक्कमेत पुर्णांकीत करुन वाढ करण्यात यावी अशी शिफारस आहे. उत्पन्न वाढीच्या दृष्टिने महानगरपालिकेने शहरातील जास्त वर्दळीच्या महत्वाच्या एकूण. १० चौकामध्ये जाहिरातीचे हक्क निविदेद्वारे १/४/२०१२ ते. ३१/३/२०१४ या काळात जाहिरात संस्थेस दिलेले होते. त्यामध्ये प्रती चौरस फुट

प्रती महा र. रू. २४ ते र. रू. ३० जाहिरात कर व परवाना फी चे एकत्रित दर प्राप्त झालेले होते. हि बाब विचारात घेता सदर निविदा चौकामध्ये अन्य क्षेत्रापेक्षा जाहिरातदाराकडून प्राधान्यक्रमाने व वाढीव दराने मागणी आहे, हे दिसून येते. तसेच या चौकाशिवाय त्याच क्षेत्रातल्या अन्य महत्वाचे चौकाचा समावेश त्यामध्ये करता येईल. एकूण १२ शिफारस केलेल्या चौकांची यादी सोबतच्या परिशिष्ट 'ब' मध्ये दर्शविली आहे. सदर चौकात जाहिरात प्रसिध्दीसाठी प्राप्त दरामुळे जाहिरातीचा सदर चौकातील जाहिरात प्रसिध्दीसाठीचे बाजारभाव प्राप्त झालेले आहेत. वरील बाब विचारात घेता व म.न.पा.चे आर्थिक हित विचारात घेऊन निविदेमध्ये प्राप्त झालेल्या दरामधील सर्वात जास्त दर ज्या चौकात प्राप्त झाले आहेत त्या दरानुसार अन्य सर्व प्रस्तावित चौकात दरांची आकारणी करता येईल असे वाटते. तथापी सदरचे दर हे ४ वर्षापूर्वी प्राप्त झाले आहेत. ही बाब विचारात घेऊन वरील चौकात प्राप्त झालेल्या अधिकत्तम र.रू.२८/- प्रति महा दरानुसार परवाना फी सर्व चौकात आकारणी करावी अशी शिफारस आहे. त्यासाठी वरील सर्व चौकाचे क्षेत्र घोषित करुन (झोनिंग) सदर चौकामध्ये प्रसिध्द होणा-या जाहिरातींना वरील प्रमाणे परवाना फी चे दर लागू करणेत येतील. चौकातील जाहिरात क्षेत्र म्हणजे चौकाचे सिमारेषेपासून सर्व दिशांनी ५० मिटर अंतराचे आत चौकामधून दृष्टीपथास येणारे (चौक सन्मुख) सर्व प्रकारचे जाहिरात फलक (खुल्या जागेवरील, इमारतीवरील, इमारतीचे गच्चीवरील, इत्यादी) या सर्वांना हे दर लागू करण्याची शिफारस आहे. उपरोक्त बाबी विचारात घेऊन महानगरपालिकेचे उत्पन्नातील समतोल राखणेचे हेतूने जाहिरातीचे दरात परिशिष्ठ 'अ 'प्रमाणे सर्व साधारण क्षेत्रासाठी परवाना फीचे दर प्रस्तावीत केले आहेत.तसेच विशिष्ट चौकांची यादी परिशिष्ट 'ब 'मध्ये नमूद केलेप्रमाणे परवाना फीचे दर मा.आयुक्त यांनी प्रस्तावित केले असले तरी सर्व ठिकाणच्या जाहिरात फलकासाठीचे परवाना फी चे सन २०१५-१६ साठी निश्चित केलेले दर हे सन २०१६-१७ साठी कायम करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.अपर्णा डोके -** मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपल्या शहरामध्ये जाहीरातीच्या फलकाचे स्वरुप, काही ठिकाणी बकाल स्वरुपाचे दिसते तर काही ठिकाणी ब-यापैकी दिसतं. त्यासाठी महापालिकेचे चांगले धोरण असावे. आम्हांलाही कसंतरी वाटत की १ कोटी रुपयाचे अनधिकृत फलक काढण्याची जाहीरात आणि त्यासाठी आपल्याला खर्च करावा लागेल. उदयाच्या काळात ती वेळ आपल्या महापालिकेवर येऊ नये. नवी मुंबई, पिंपरी चिंचवड महापालिका या दोघांचाही ग्रोथींग स्पिड चांगला आहे पण अशाप्रकारचे अनधिकृत गोष्टी शहरातील बकालपणा हा कमी रहावा, कंट्रोल राहावा त्यासाठी तुम्हांला चांगले धोरण करणे सुध्दा तेवढच आवश्यक आहे. याबाबतीत धोरण करावे म्हणून उपसूचना देणार आहे त्याला मान्यता दयावी.

मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- मा.आयुक्त यांनी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरिता आकाशचिन्ह परवाना फी चे दराबाबतचा विषय सादर केलेला आहे. जाहिरात फलक लावणेसाठी महानगरपालिकेने म.न.पा. जागा निश्चित करुन त्या ठिकाणी शहर विद्रुपीकरण होणार नाही तसेच शासनाचे धोरणाप्रमाणे सदर ठिकाणी निविदने जाहिरातीस परवानगी देवून म.न.पा. उत्पन्न वाढीसाठी पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीप (पी.पी.पी.) धोरणानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी. शहर विद्रुपीकरण होणार नाही तसेच शहराचे सौंदर्य अबाधीत रहावे या करिता सर्व जाहिरात फलक नियंत्रणासाठी धोरण तयार करुन त्यास मान्यता देणेत यावी.

**मा.अजित गव्हाणे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.अनंत को-हाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. प्रथमत: आयुक्त साहेब, मी आपले मनापासून अभिनंदन करतो. पिंपरी चिंचवड शहर हे अतीशय सुंदर शहर म्हणून ब-याचवेळा गौरविलेले आहे. सर्व अनधिकृत फ्लेक्स संदर्भात सांगतो आपण मोठमोठे होडींग्ज बघतोच परंतु छोटे छोटे १०X१० चे फ्लेक्स आता निवडणूका जवळ आलेल्या आहेत ब-याचसे कार्यकर्ते असतात, ब-याच जणांचे वाढदिवस असतात, इतर कार्यक्रम असतात त्याठिकाणी १०X१० चे फ्लेक्स चौकाचौकामध्ये लागलेले आहेत त्यामुळे शहरामध्ये खुप विद्रूपीकरण येतं. कारवाई करताना वेळोवेळी याविषयी जेव्हा प्रशासनाला माहीती दिली जाते की चुकीचे फ्लेक्स लावलेले आहेत किंवा ज्यामुळे शहराला बाधा तयार होते आणि ते अनधिकृत आहे परंतु त्यावर कारवाई केली जात नाही. आज तुम्ही सुध्दा फिरतात, प्रचंड फ्लेक्स तुम्हांला दिसतील. याच्यावर तोडगा काढावा जेणेकरुन महापालिकेला त्यातून उत्पन्न मिळेल. असेही अनधिकृत लावतात त्यापेक्षा त्यांना अधिकृत परवानगी दयावी त्यामुळे उत्पन्न मिळेल. पाच ते सहा दिवसासाठी त्यांना परवानगी मिळेल. पण ती परवानगी आपल्याकडून दिली जात नाही त्यासाठी काहीतरी विचार करुन आपण धोरण आखणे गरजेच आहे. नुसत कागदावर धोरण आखुन उपयोग होणार नाही. आपण भरपूर धोरण आखली आहेत अनधिकृत फ्लेक्स असतील किंवा जाहीरातीच्या संदर्भात ती कार्यान्वित होत नाहीत. आताच प्रशांत शितोळे यांनी मांडलेली उपसूचना अतीशय चांगली उपसूचना आहे परंतु त्यामध्ये हा पण विचार केला पाहीजे की अनधिकृत होवू नये त्यांना परवानगी मिळावी. तसेच प्रत्येक गोष्टीला काहीतरी लिमीट ठेवून त्याची कर आकारणी करावी जेणेकरुन वाढदिवसाचे फ्लेक्स तो तसाही अनधिकृत लावणार आहे त्यास पाच-सात दिवसाची परवानगी देवून १०X१० च्या फ्लेक्सचे किती पैसे आपण घेवू शकतो असा विचार धोरणामध्ये करावा आणि जर आपण तसे धोरण आखु शकत नसेलतर नियम सगळयांना सारखा असावा. कारवाई होत नाही. मोठमोठया नेत्यांचे फ्लेक्स असले आमच्या सारख्या नगरसेवकांचे असलेतर कारवाई करत नाहीत. असुदया नां कुणाचेही, तुम्हांला जर करवाई करायची असेलतर सर्वांना समान कारवाई करावी, मग सत्ताधारी असतील, नगरसेवक असतील, कार्यकर्ते असतील याचा विचार न करता शहराचा विचार व्हावा. मागे

सुध्दा मी एक उपसुचना दिली होती की प्रत्येक प्रभागातील आम्ही सुध्दा कार्यक्रम घेतो ते कार्यक्रम सर्व नागरीकापर्यंत पाहचावेत म्हणून फ्लेक्स लावलेले असतात. प्रत्येक प्रभागामध्ये आपण असे पाच ते सहा स्पॉट तयार करावेत  की १०x१० चे तेथे फ्लेक्स लावता येतील जेणेकरुन महानगरपालिकेला उत्पन्न होईल आणि आमच्या कार्यक्रमाचे आम्हांला नियोजन करता येईल. तरी निश्चितपणे आम्ही सांगीतलेल्या धोरणाचा विचार करावा आणि हे धोरण कागदावर न राहता अंमलात येईल अशी अपेक्षा करतो आणि थांबतो.

**मा.रामदास बोकड -**  मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. अनधिकृत फ्लेक्स संदर्भात आमचे सहकारी प्रशांतजी शितोळे यांनी उपसूचना दिलेली आहे आणि सविस्तर अशी माहीती त्यांनी याठिकाणी मांडलेली आहे. आता आनंत को-हाळे साहेबांनी देखील चांगला मुद्दा ठेवलेला आहे मी देखील त्याच संदर्भात बोलणार आहे. मला असे सांगावयाचे आहे की, रोडला जे मोठे फ्लेक्स लागलेले असतात त्याना परवानगी किती घेता येते आणि किती अनधिकृत लावतात याचा प्रशासनानाकडे डायरेक्ट आकडा असेल परंतु जे छोटे फ्लेक्स लावणारे आहेत मग ते वाढदिवसाचे असू दया किंवा इतर कोणत्या कार्यक्रमाचे असू दयात याच्यासाठी प्रशासनाची नियमावली काय आहे. प्रशासनाने त्याच्यासाठी काय धोरण ठरविलेले आहे  हे प्रशासनाने जाहीर करावे. या प्रकरणी आपण पाठपुरावा केलातर आपल्याला परवानगी मिळू शकते. आपले सहा प्रभाग आहेत. फ्लेक्सला परवानगी घ्यायची असेलतर त्या माणसाला प्रभागामध्ये जावे लागते पुन्हा प्रभागातून त्याला मेन बिल्डींगला यावे लागत नंतर परवानगी येते तोपर्यंत त्याचा कार्यक्रम झालेला असतो. हे करत असताना सभागृहाच्या निदर्शनास आणून दयायचे आहे की मी जर किंवा एखादया नागरीकांनी नगरसेवकांच्या वतीने मागणी केली फ्लेक्स लावून देण्याची तर मला नाईलाजास्तव चार ठिकाणी फिरावे लागते. पंधरा ते वीस दिवस त्यात जातात. त्याच्यासाठी शॉर्ट नियोजन करावे. त्यांचा कार्यक्रम आठ दिवसाचा असेलतर चार दिवस आगोदर परवानगी मिळालीतर ते सुध्दा व्यवस्थित आपल्या नियमांचे पालन करतील.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. जाहीराती संदर्भातील राजेंद्र जगताप यांनी प्रश्नोत्तरे विचारलेले होते. त्याबद्दल निदर्शनास आणुन दयायचे आहे की प्रश्नोत्तरे विचारलेले होते त्याचे उत्तर सुध्दा खुप अनावधनाने दिलेले आहेत. आकाश चिन्ह परवानगी विभागाला शहरामध्ये किती फ्लेक्स, किती होर्डींग्ज लावलेले  आहेत हे सुध्दा माहित नाही. याकडे लक्ष दिले पाहीजे. शहराची एलबीटी ही बंद होत चाललेली आहे, जे महत्वाचे विषय आहेत जेथून आपल्याला उत्पन्नाचे स्त्रोत आहेत त्या ठिकाणी लक्ष घातले पाहीजे त्याठिकाणी लक्ष घातले जात नाही. च-होलीत एक उदाहरण देतो. एक स्ट्रक्चर बांधलेले आहे माझ्या मते ६० ते ७० टक्के स्ट्रक्चरला परवानगीच नाही, अनधिकृत स्ट्रक्चर बांधलेले आहेत. स्ट्रक्चर बांधताना ते स्ट्रक्चर खाली ढासळले गेले त्याच्या खाली एक गाडी आणि बरेचसे

लोकांचे नुकसान झालेले आहे. यापुर्वी चिखलीगावातल एक स्ट्रक्चर खाली पडल त्याच्यामुळे मोठे नुकसान झाले. असे जे स्ट्रक्चर बांधताना बिल्डींग परमीशन देतो ते देताना त्याचे सर्व ऑडीट करतो किंवा ते मटेरीअल काय वापरतात हे पाहत असतो. शहरात समजा १०X१० स्ट्रक्चरचे परमीशन दिलेले असेलतर १०X१० चेच आहे का ५०X१०० चे तो बांधतो हे सुध्दा आपले अधिकारी तेथे जावून पाहत नाहीत याच्या पेक्षा दुर्भाग्याची दुसरी गोष्ट नाही. अनेकवेळा आम्ही या विषयावर बोललो आहेत. शहरामध्ये स्ट्रक्चर किती आहेत त्याचे कन्स्ट्रक्शन कसे केलेले आहे, त्याच्यापासून मानसीक हानी होणार आहे का, ते सेफ ऐरीयामध्ये लावलेले आहे का. ज्यावेळेस आपले अधिकारी परमीशन देत असतात त्यावेळेस याची शाहनिशा केल्याशिवाय हे परमीशन दिल जात का. आमच्या भागात देहू पासून आळंदी पर्यंत जेवढे फ्लेक्स लावलेले आहेत त्यांना परमीशन दिले का नाही हे मला माहित नाही पण ते विचीत्र असे लावलेले आहेत. वार आहे वावदान आहे, येणा-या पावसाळयामध्ये ते कधीही ढासळू शकतात. अशा ठिकाणी एका पोलवरती जर स्ट्रक्चर लावलेल असेलतर ती भयानक घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मोशीच्या कृषि उत्पन्न बाजार समितीच्या समोर मोशीवरुन नाशीक हायवेला जातो त्या रोडला जवळपास ३००X१०० चा एकच सिंगल फ्लेक्स आहे. पुर्व-पश्चिम त्याची दिशा आहे. असं पुर्व-पश्चिम लावलेल एवढ मोठ स्ट्रक्चर शहरामध्ये जवळपास ३०० फुटा पेक्षा जास्त ते असेल असं मला वाटत. जर समजा वार-वावदान आलेतर व चुकून काही घटना घडलीतर शंभर टक्के एखादा नागरीक दगावणार आहे, वित्त हानी होणार आहे. हे सगळ सांभाळण्यासाठी आपल्याला याठिकाणी जातीने लक्ष देणे गरजेचं आहे. १० चे परमीशन घेतले आणि १०० लावलेले आहेत असे उदाहरण तुम्हांला मी दाखवतो. कोणाचे जरी असलेतरी त्याला हे परमीशन घेतल्या शिवाय किंवा परमीशन घेतले का नाही याची खात्री करणे गरजेच आहे. आताच मला वाटतं को-हाळे साहेब बोलले की शहरामध्ये विद्रूपीकरण खुप चाललेले आहे, चौकाचौकामध्ये फ्लेक्स आहेत. आपले अधिकारी त्या ठिकाणी फ्लेक्स काढायला जातात त्यावेळेस त्याठिकाणी काय मागणी करतात, तुझा फ्लेक्स काढतो, जर काढायचा नसेलतर अमुक अमुक दे अशी मागणी करणारे अधिकारी आहेत, पैशाची मागणी करतात. चौकामध्ये फ्लेक्स लागलेले आहेत ते काढा म्हणलेतर ते फ्लेक्स आठ आठ दिवस त्याठिकाणीच राहीले जातात. म्हणून आनंत को-हाळे यांनी सांगीतलेले बरोबर आहे. १०X१०, १५X१५ चे फ्लेक्स लावण्यासाठी तरी त्यांना परमीशन दयाव. कुठल्याही चौकामध्ये फ्लेक्स लावायचे असतीलतर त्यांच्याकडून काही पैसे घेतलेतर ते लीगल असेल त्याला जर तो लिगल नंबर दिलातर आणि एवढया एवढया दिवसापर्यंत तुला हे परमीशन दिलेले आहे अस परमीशन त्या फ्लेक्सवर लावलेतर हे जे फ्लेक्स काढणारे लोक आहेत त्यांना नक्कीच तो फ्लेक्स अनधिकृत का अधिकृत आहेत हे पाहायला मिळेल. या संदर्भात ज्यांना तुम्ही जाहीरात परवाने दिलेले आहेत त्यांचे स्ट्रक्चरल ऑडीट करावे. होर्डीग्जचे ऑडीट करायला सांगाव. यामध्ये खरंच

कोणाच काय काळबेरं आहे हे कळणार आहे. त्या विषयाचे ऑडीट करुन पुढच्या महीन्यामध्ये माहिती मिळालीतर बरे होईल, धन्यवाद.

**मा.धनंजय आल्हाट -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरेतर हा विषय आकाश चिन्ह व परवाना विभागाचा आहे. मागच्या वर्तमानपत्रामध्ये पाहीलेतर सर्वात जास्त वर्तमानपत्रामध्ये काय असेलतर शहराचे विद्रूपीकरण आणि बकालीकरण होते. जास्तीत जास्त रखाने या विषयानेच भरलेले आहेत. तुमच स्वागत करतो कारण मागच्या सन्मा.आयुक्तांना आम्ही वारंवार स्थायी समितीमध्ये सर्व सदस्य सांगत असतोत की याच्यामध्ये सुसूत्रता निर्माण करावी. उत्पन्न सुध्दा वाढले पाहीजेत. दोन्ही बाजूने समतोल साधावा. परंतु तत्कालीन आयुक्ताकडून काही घडलेले नाही. आपल्याकडून अपेक्षा आहे. तुमचे आडनाव हे वाघमारे आहे त्यामुळे तुम्ही कदाचित शुर आहात. कारण तुमच्या नावात शुरता आहे. त्याच्यामुळे तुम्ही हे करत असताना कोणालाही घाबरणार नाहीत अशी अपेक्षा आहे. काही दिवसासाठी याच्यावरती जर विचार केला नाहीतर पिंपरी चिंचवड शहर हे फ्लेक्सचे शहर असे नाव पडल्या शिवाय राहणार नाही कारण या क्षेत्रामध्ये एकप्रकारचा कोणाचातरी वरदहस्त आहे. श्री.कडूस्कर साहेब चांगले अभ्यासू आहेत परंतु त्यांनी सुध्दा या विषयावरती नांगी टाकलेली आहे असं वाटत. ते सुध्दा काही करु शकत नाहीत. कारण कुठेतरी पाणी मुरतय. कारण हे जे लोक बोलतात ते पोटतीडकीने बोलतात, नियमाने बोलतात, उच्च न्यायालयाचे आदेश आहेत असे असताना सुध्दा या सगळया गोष्टीला केराची टोपली आतापर्यंत दाखवलेली आहे. तुम्ही फक्त शहरातील फ्लेक्स बघण्यासाठी एकदा शहरामध्ये फिरा. शहराच सौंदर्य याच्यावरती अवलंबून आहे. ब-याचशी मंडळी पिंपरी चिंचवड शहर कसं आहे सुंदर आहे हे कोणामुळे आहे आमच्यामुळे आहे असे सांगतात. तरी हे सुध्दा बघावे की हे कोणामुळे आहे. आपल्या लक्षात येईल. कोणाचीतरी यामध्ये मक्तेदारी आहे. ही मक्तेदारी तोडण्यासाठी तुम्हांला काहीतरी कठोर निर्णय घ्यावे लागतील. मोशीमध्ये नदीपार करुन प्रवेश केलातर तुम्हांला सगळे फ्लेक्स दिसतील आणि असं समजायचे की आता पिंपरी चिंचवड शहर आलेले आहे हे असे का घडते आहे. उच्च न्यायालयाने यावरती समित्या नेमलेल्या आहेत. प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयात नियंत्रण समिती नेमली त्याचा तुम्ही आढावा घ्यावा. आजतागायत खेदाने आणि अतीशय तीव्र स्वरुपात भावना व्यक्त कराव्या असा हा विषय आहे. एकाही क्षेत्रीय कार्यालयाची एकही मिटींग आजतागायत झालेली नाही. त्याचा सभावृत्तांत नाही त्याठिकाणचा निर्णय नाही कोणीही याच्यावर निर्देश दिलेले नाहीत हे अतीशय खेदाने सांगावेसे वाटते. जाणुनबुजून त्याठिकाणी डोळेझाक केली जाते. हे सगळे डोळयाला दिसतंय परंतु त्याच्यावर कारवाई करायची नाही अशी मानसीकता प्रत्येक अधिका-यामध्ये, नेत्यामध्ये तयार झालेली आहे, आता याठिकाणी आपण प्रस्तावीत दर मांडलेले आहेत. पुण्यामध्ये १८/- रु.स्क्वे.फु. अशा पध्दतीने घेतात जाहीरातकर आणि परवाना फि घेतात हे आपण मान्य करतो. आज आपण काय दर ठेवलेला आहे, १०/-

रु. ठेवलेला आहे. म्हणजे अजूनही आपण त्यांचे किती दिवस हित साधणार आहोत. एका बाजूला आपण म्हणतो की उत्पन्न वाढवायचे आहे. आपण जी उपसूचना केलेली आहे त्याच मी स्वागत करतो त्याच्यामुळे ब-याचशा अंशी सुधारणा होणार आहे. पण तात्पुरत्या स्वरुपामध्ये आपण जो काही प्रती महीना १०/- रु. ठेवलेला आहे. तो १८/- रुपये करावा उत्पन्न वाढेल त्याचा सखोल अभ्यास करावा. आता ७० टक्के प्रकरण ही बोगस आहेत. जे काही परवाने काढलेले आहेत ते परवानेच बोगस आहेत. फक्त फाईल फॉर्मलीटीज म्हणून तयार केलेली आहे. जागा एकाची, सहया एकाच्या आहेत. कुठल्याही प्रकारचा नकाशा नाही. नगररचनाचा नकाशा नाही. ७० टक्के बोगस प्रकरण आजही त्याठिकाणी आहेत. आज त्याठिकाणी आकडा दाखवलेला आहे की ३ हजार फ्लेक्सवरती आपण कारवाई केलेली आहे. याचा अर्थ काय होतो की ३ हजार अनधिकृत फ्लेक्स या शहरामध्ये होते. हे कोणामुळे झालेले आहे. आम्ही कारवाई केली असे म्हणतो पण फक्त होर्डीग्ज काढले जाते आणि दुस-या दिवशी परत ते चिटकवले जाते म्हणून ते स्ट्रक्चरवरती उभा आहे ते खरंतर आपण काढले पाहीजे. गेल्या वर्षभरामध्ये याच्यावर काहीही कारवाई झालेली नाही. अनधिकृत जे काही बांधकाम आहेत, आता दत्ता साने यांनी सांगीतल की स्ट्रकचरल ऑडीट नसताना कुठल्यातरी इंजिनीअरला बोलवायचे आणि त्यांच्याकडून पेपर घ्यायचा आणि तो जोडायचा. अक्षरश: त्या ईमारती हालत होत्या, सुदैव आपल की त्याठिकाणी त्या पडल्या नाहीत, रस्त्यावरुन येणा-या जाणा-या वाहनावरती त्या पडल्या नाहीत. दोन तीन दिवसापुर्वी सगळे फ्लेक्स नागरीकांच्या अंगावर पडले एवढे उंच फ्लेक्स आहेत, सगळे फ्लेक्स त्याठिकाणी पडले आणि रस्त्यावरती आले. काही नागरीकांच्या अंगावरती पडले एवढया उंचीचीचे ते फ्लेक्स. वादळ याठिकाणी झाल ते सर्व फ्लेक्स लोकांच्या इमारतीवरती पडले. मी स्वत: भोसरीमध्ये, मोशीमध्ये पाहील. अशा ईमारतीमध्ये आपण परवानगी दिलेली आहे. नियम काय सांगाते, जमिनीपासून ४० फुट असा नियम सांगतो. याठिकाणी किती ८० फुट, १०० फुट काय चालल या शहरामध्ये. याकडे लक्ष देण्याची गरज आहे. या शहरात सगळे काम हे नियमबाहय सुरु आहे. यामुळे हे सर्व आपण थांबवाव नाहीतर याचे स्पेशल ऑडीट करा. आजपर्यंत जे घडल आहे त्यांचे तुम्ही ऑडीट करा, सभागृहामध्ये अहवाल सादर करा आणि हे दर आपण वाढवा. याठिकाणी उपसूचनेप्रमाणे काही मांडल, जागा आपण ताब्यात घ्याव्यात, एक एक फुटावर खेटून त्याठिकाणी बोर्ड आहेत. आपल्या शहराचे एवढे चांगले सौंदर्य आहे त्याला आपण स्वत:हून वाईट बनवतो. एक महिन्यात याचा निकाल दयावा, पारदर्शकता निर्माण करावी, याच संपुर्ण ऑडीट करावे आणि जे जे दोषी असतीलतर त्यांच्यावर कारवाई करावी एवढीच या निमीत्ताने मी मागणी करतो आणि जे दर आहेत ते अतीशय कमी ठेवलेले आहेत ते वाढवावेत १०/- रु. चा दर आहे तो १८/- रु. करावा अशी विनंती करतो.

**मा.बाबासाहेब धुमाळ -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. ख-या अर्थाने या विषयाची अनेकवेळा चार वर्षात चर्चा झालेली आहे. प्रत्येकजण आपआपल्या परीने सगळ गा-हाण सांगत असतो. फलक लावले जातात, का लावले जातात का नाही याचे व अनधिकृत फ्लेक्स लावले जातात याचे आत्मपरिक्षण करण्याची गरज आहे. प्रत्येकाचा वाढदिवस असतो. स्वत:चे वाढदिवस आपल्या घरच्यांचे वाढदिवस, नातवांचे वाढदिवस. घरच्या कुठल्या जनावरांचा वाढदिवस असलातरी तो साजरी करताना त्याला बंधन घातल जातं आणि फ्लेक्स लावायला जबदरस्ती केली जाते. मा.आयुक्त साहेब, फ्लेक्स अनधिकृत, बेकायदेशिर असतील, कायदेशीर असतील तरी त्याला त्याचा धंदा करणं गरजेचे आहे. आजपर्यंत सगळया शहरात, वॉर्डमध्ये आपण जाऊन येतात प्रत्येक ठिकाणी जाहीरात महत्वाची आहे. ज्याठिकाणी पिकते त्याठिकाणी विकले जात नाही. जाहीरातीमध्ये प्रसिध्दी मिळते. बिल्डर्स लोकांचे पहा, मंदीची लाट आहे, त्यांचे फ्लॅटस विकले जात नाहीत. तरी त्यांचे फ्लॅटस विकण्यासाठी बिल्डर्स लोक जाहीरात करतात, मंदी असलीतरी ते विकते. सोर्स ऑफ इन्कम महापालिकेला मिळण्यासाठी दुसर काहीतरी शोधायला पाहीजे. जे घर आहेत त्याची आयुष्यमर्यादा वीस वर्षे दिलेली आहे ते वीस वर्षानंतर पुढे काय करणार. वीस वर्षापर्यंत सवलत दिली पुढे काय. त्याला कायम असं काहीतरी दयायला पाहीजे. याठिकाणी इंडस्ट्रीअल ऐरीयातील औदयोगीक नगरीमध्ये टॅक्स लावला जातो त्यामध्ये १० टक्के, ५ टक्के अशी वाढ होते. त्या कपंनीन परत काही बांधकाम केलेल आहे का, त्यात काही वाढ केली आहे का हे कोण बघतं. आज मोठमोठया शाळा कॉलेजेस आहेत. या कॉलेजसमध्ये एक डिग्री घेणा-यानी एक कोटी दिलेले आहेत, मी दिलेले आहेत. त्यांचे इन्कम काय असते. त्यांचे बांधकाम कास असतं, एक एक हॉस्पिटल कसे आहेत. गायकवाड साहेब आपण एक स्कॉड नेमावा व शाळेची, हॉस्पिटलची आणि इन्डस्ट्रीअलची चौकशी करावी. बांधकाम कधी केले, त्याचा पहीला टॅक्स किती होता, दहा वर्षापुर्वीचा टॅक्स किती आणि आताचा टॅक्स किती आहे. तरी सुध्दा काही जण कोर्टात गेले. तीन ते साडेतीन कोटीच्या टॅक्ससाठी एका मेडीकल कॉलेजवाले कोर्टात गेलेले आहेत. आज तीन वर्षे झालेले आहे. पण आमच्या सारख्यानी टॅक्स भरला नाही की लगेच जप्ती येते. कोटयावधी रुपये त्या कॉलेजमध्ये मिळवतात. महापालिकेचे रस्ते, लाईट, पाणी वापरतात, आणि टॅक्ससाठी केर्टात जातात. ३०० कोटी टॅक्सचा कमीत कमी आपला ६०० ते १२०० कोटी टॅक्स होवु शकतो. हे करावे अशी मी विनंती करतो. महापालिकेला मोठं सोर्स ऑफ इन्क्म करायच असेलतर पहील शाळा, मेडीकल कॉलेज, इन्डस्ट्रीअल ऐरीया, हॉस्पिटल यांचे सर्वेक्षण करुन त्यांच परत रिसायकलींग करुन त्यांना टॅक्स लावावा, धन्यवाद, जयहिंन्द जय महाराष्ट्र.

**मा.जावेद शेख -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज फ्लेक्सवर बरीचशी चर्चा झालेली आहे. सगळयांनी आपआपली मते मांडलेली आहे. मला सांगायचे आहे की अनधिकृतवर कारवाई करताना अधिकृत मधील अनधिकृत जेवढे फ्लेक्सवाले आहेत ते

पहीले तुम्ही शोधून काढा. ते परमीशन काढतात दहा फ्लेक्सची आणि ॲडव्होटाईज करतात ते पन्नास पन्नास फ्लेक्सची. त्याचप्रमाणे इलेक्ट्रीकचे जे खांब असतात ते किऑस्क याच्यासाठी वापरले जातात. माझा एक मित्र बांधकाम व्यावसायीक आहे त्यांनी जाधववाडीच्या स्पाईन रोडला किऑस्क लावले. त्यांना माहीतीच नाही कुठल्या एजन्सीकडे आहे त्यांनी २० ते २५ खांबावर किऑस्क लावले तर अतिक्रमणचे लोकानी काढण्यास सुरुवात केली ते म्हणाले हे अमुक अमुक एका एजन्सीचे हे खांब आहेत त्यांच्याकडून तुम्ही हे भाडयाने घ्या असे म्हणाले. पाच ते सहा महीने त्या एजन्सीने भाड सुध्दा त्याच्याकडन खाल्लं आणि ईथं मी पाहीलतर त्याची परवानगीच नाही. तुमचे काही अधिकारी वर्ग, तुमचे अतिक्रमणचे लोक आणि एजन्सीवाले मिळून एक मोठा धंदा करतात. हा अधिकृत मधला अनधिकृत आहे. हे मी तुमच्या निदर्शनास आणून देतो त्याच्यावर तुम्ही योग्य ती कारवाई करावी. तुम्ही शहरभर फिरावे, किती खांबावर किऑस्क लागलेले आहेत ते दिसेल. त्याची परवानगी कोणाकडे आहे का. त्याची माहीती घ्यावी, त्याचे पैसे कोण जमा करतं. मग तेथील आपले अतिक्रमणचे अधिकारी त्याच्यावर का कारवाई करत नाहीत. त्यावर चांगले लक्ष घालावे अशी विनंती करतो.

**मा.निलेश बारणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पिंपरी चिंचवडमध्ये सर्वात डेव्हलप होणारा ऐरीया हा चिंचवड, वाकड, पिंपळेसौदागर, पिंपळेगुरव, रहाटणी, रावेत आहे. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, नियमानुसार जमिन लेव्हलपेक्षा ४० फुटावर कुठलेही होडींग्ज लावले जात नाही. पुण्यामध्ये ४० फुटाच्या वर मागच्या तीन वर्षापुर्वी सगळे होर्डींग्ज खाली उतरवले गेले आणि ४० फुटाच्या वर कुठेही नाहीत. आज तुम्ही जर पुणे महानगरपालिकेमध्ये गेलेतर त्यांचे बीम हे ७० फुटाच्या वर आहेत व होर्डींग्ज हे सगळे ४० फुटाच्या वर लावलेले आहेत. आपल्याकडे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत कारवाई का केली जात नाही. ठरावीक जणांचे याच्यामध्ये काम करायचे लागेसंबंध आहेत. आताच जावेद शेख यांनी किऑस्क संदर्भात सांगीतल. मी किऑस्क संदर्भात सांगतो की फक्त निगडी ते दापोडी याच टेंडर बीव्हीजीला भेटलेले आहे. पिंपळेगुरव, रहाटणी, वाकड, रावेत येथे प्रत्येकाचे हितसंबंध आहेत. प्रत्येकाला एका किऑस्कला लावायला १५००/- रुपये आकारले जाते. याच्यामध्ये कोणाचे हितसंबंध आहेत. आपली एलबीटी बंद झालेली आहे त्यामुळे आपले उत्पन्न कमी आहे, आपले यात उत्पन्न का नाही वाढवू शकत, उत्पन्न वाढवू शकतं. याच्यावर कोणीही कारवाई करायला मागत नाही. आज सहा.आयुक्त कडूस्कर साहेब आहेत त्यांच्यावर काय प्रेशर आहे हे सगळयांना माहित आहे. मागच्यावेळेस मी रावेतला चाललो होतो त्यावेळेस यांच्याकडे जमदाळे म्हणून काम करतात त्यांना मी फोन केला. एकीकडे तुम्ही ब्ल्यू लाईनला काम करु दिली जात नाही. ब्ल्यू लाईनमध्ये पाण्यामध्ये होर्डींग्ज लावलेले आहेत. आजही ब्ल्यू लाईनमध्ये रावेतच्या हँगीक ब्रीजला सगळे होर्डींग्ज पाण्यामध्ये उभे राहीलेले आहेत. याच्यावर का कारवाई केली

जात नाही. याच्यावर असलेले अधिकारी हे कायमस्वरुपी पाच ते दहा वर्षे आणि एका जागी खुर्चीवर चिटकून बसलेले आहेत. यांच्या पहील्या बदल्या करा आणि नॉन करप्ट अधिकारी पहीले बसवावे, नक्की फायदा झाल्या शिवाय राहणार नाही, धन्यवाद.

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पिंपरी चिंचवड शहरातील सगळयात जास्त अंदाधूंदी आणि करप्शन असलेले हे डिपार्टमेंट आहे, डिपार्टमेंट म्हणजे अधिकारी करत नाहीत पण सावळा गोधंळ जो आहे तो सर्वात जास्त या विभागामध्ये सुरु आहे. एकीकडे आपण दराबाबत पुणे महापालिकेची तुलना करतो. पुणे महापालिका १८.५० पैसे इतका दर घेत असून त्या तुलनेत पिंपरी चिचवड मध्ये ७.८० पैसे इतका दर आहे आणि त्यामुळे मोठी तफावत आहे. ते एकीकडे सांगून आपल्या सगळयांच्याच डोळयामध्ये धुळफेक होते. आपल्या महापालिकेमध्ये नुसताच परवाना कर नसुन त्याला अनेक कर ॲड केलेले आहेत. ७.८० पै. त्यांचा मुळ स्क्वे.फुटाचा दर असलातरी त्याला परवाना कर ॲड केल्यानंतर ती रक्कम जास्त होते. नगरसेवकांना सुध्दा वाटायला लागल की काही तरी याच्यामध्ये अधिकारी भ्रष्टाचार करतात किंवा काय परंतु ख-या अर्थाने आता दत्ता साने यांनी सांगीतले की जे काही खालचे कर्मचारी आहेत, योगेश कडूस्कर साहेबांच्या बाबतीत आम्हांला काही म्हणायचे नाही. खालचे जे कर्मचारी आहेत त्यांना कुठल्या भाषेत दम दिला जातो ते तुम्ही ऐकू पण शकणार नाहीत, तुम्ही खाली काम करणा-या कर्मचा-याना खाजगीमध्ये बोलवा. बीचा-यांची आई-माई सगळ काढतात, त्यांना गुंडाकरवी दम देतात. अशाप्रकारचे काम कर्मचा-यांच्या बाबतीत होते. एकटे कर्मचारी भ्रष्टाचार करतात का. या होर्डींग्जमध्ये कितीतरी ठिकाणी सन्मा. नगरसेवकच पार्टनर आहेत आणि जिथ कुंपणानेच ठरवलय शेत खायचतर मग वाचविणार कोण. मा.महापौर साहेब, यात तुम्हांला माहिती आहे एक बेताल बादशाहा आहे. त्यांनी टेंडर भरुन निवीदा पध्दतीने काम सुरु केलेले आहे. जेंव्हा एखादा व्यक्ति निवीदा भरुन एखाद काम मिळवितो, त्याचे रितसर पैसे भरतो आणि त्याच फर्मवर दुस-या व्यक्तिनी काहीही पैसे न भरता फक्त दमदाटीवरती त्याच्याच शेजारी होर्डींग्ज लावायच, त्यांनी नियमान आपल्याला पैसे भरायचे आणि दुस-यानी दादागिरीवरती तो होर्डींग्ज चालवायचा हा कुठला न्याय आहे. मग जो माणुस निवीदा भरुन काम मिळवतो त्याच्यावरती हा अन्याय होत नाही का. मग त्यानी काय करायच, शेवटी तु पण गप्प बस आणि मी पण गप्प बसतो अशाप्रकारे हा सगळा व्यावसाय सुसाट धावलेला आहे. ४० कंपन्या या होर्डींग्जमध्ये काम करतात. त्या सगळयांनी असं ठरवलेल आहे की जे माग अनधिकृत बांधकाम असेल त्याच पेव फुटलेल होतं हे एक पैसे कमावण्याच साधन आहे असं कार्यकर्त्यांना पण वाटल, नगरसेवकांनी तर रस्ते वाटून घेतलेले आहेत. तुम्ही फिरा म्हणजे तुम्हांला कळेल. १ कोटीच्या निवीदा मागविलेल्या आहेत. अनधिकृत कामाचे निराकरण करण्यासाठी आपण १ कोटी रुपये खर्च करतो आणि ते किती सक्सेस होणार हे माहीती नाही. कारण योगेश कडूस्कर सारखा एक नवीन अधिकारी यांनी

करण्याचा प्रयत्न केल्यानंतर आताच धनंजय आल्हाट यांनी सांगीतल की त्यांना गप्प बसाव लागलं. पण असे का होते याचा अर्थ प्रशासनाचा आपल्या कारभारावर वचक नाही. मा.आयुक्त साहेब, शुभांगी ॲडव्हेटाईज म्हणून कंपनी आहे. त्यांच्याकडे फक्त २५ टक्के परवाने आहेत बाकी ७५ टक्के अनधिकृत फ्लेक्स आहेत. शुभम ॲडव्हेटाईजींग म्हणून आहे त्यांचे पण २५ टक्के परवाने आहेत ७५ टक्के अनधिकृत आहेत, आशा पब्लिसिटी म्हणून आहे सर्व जाहीरात फलक जे तुम्ही परवानगी दिली त्याच्या दुप्पट आकाराचे आहेत. एलईडी होर्डीग्ज काही चौकामध्ये लागलेले आहेत, त्याचे कलर एवढे डार्क असतात की समोरुन वाहन चाललेले असतात त्याचे डोळयावर रिफ्लेक्शन होवून ॲक्सीडेंट होण्याचा संभव असतो. प्रायव्हेट जागेमध्ये त्याची एनओसी आहे का, खरंतर ती जागा महापालिकेचीही असु शकते. भाड घेतो तीसराच म्हणजे काय चाललं आहे. एवढे पैसे आपल्या जीवावरती कोणीतरी कमवतो नां. आणि हा काळा पैसा पुन्हा निवडणूकीत आणून किंवा दुसऱ्या व्यावसायात आणुन पुन्हा यांची मग्रूरी आणि मुजोरी चालू झालेली आहे. जसे टँकरची लॉबी आहे तशी होर्डीग्जची एक लॉबी तयार झालेली आहे. कॅप्सन ॲडव्हेटाईजींग म्हणून आहे त्याचा सुध्दा कागद मी तुम्हांला देते त्यांचे सुध्दा सर्व जाहीरात फलक परवानगी पेक्षा मोठे आहेत. परिचय ॲडव्हेटाईजींगची पण तीच परिस्थिती आहे. निलेश ॲडव्हेटाईजींगची पण तीच परिस्थिती आहे. मोरया ॲडव्हेटाईजींग मध्ये सुध्दा १५ टक्के परवाने आहेत ८५ टक्के अनधिकृत आहेत. कृष्णा आऊट डोअर ॲडव्हेटाईजींग मध्ये २५ टक्के परवाने आहेत आणि ७५ टक्के अनधिकृत फ्लेक्स आहेत. रस्त्यांने आपल्या लाईटचे पोल तुम्हांला दिसतील त्या लाईटच्या पोलवरती दोन्ही बाजूने छोटे छोटे होर्डीग्ज लावलेले आहेत. म्हणजे परवानग्या किती आहेत आणि लावतो किती, पैसे किती कमवतोय. आज अशी परिस्थिती आहे की रिचेस लोकांची यादी जर काढलीतर बीग इंडीया यांचा पहीलाच नंबर लागेल. म्हणजे अर्थात ते इन्कम टॅक्स भरतात, महानगरपालिकेला फि भरतात. म्हणजे मार्केटींग हे पैसे कमावण्याचे मोठ साधन झालेले आहे. अधिकृत स्वरुपामध्ये जे लोक धंदा करतात त्यांना आडवायच, त्यांना ब्लॅकमेलींग करायचे आणि आपले सगळे धंदे लपवायचे अशाप्रकारे काम या शहरामध्ये सुरु आहे त्यामुळे बघायच एकाकड आणि काम दुसरीकड करायचं अशाप्रकार अन्यायकारक काम होवु नये. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, ई-प्रभाग क्षेत्रीय कार्यालय जे आहे, तुम्ही बघाव आळंदी रोड असेल, दिघी रोड असेल किंवा देहू-आळंदी रोड असेल त्या रस्त्याला शेतामध्ये फ्लेक्स लागलेले आहेत. तुम्ही एकतर ठरवावे की महानगरपालिकेच्या आवारात परवानगी दयायची किंवा प्रायव्हेटमध्ये परवानगी दयायची. बिल्डींगवर मोठमोठे फ्लेक्स लावलेले आहेत. नागरीकांची काही सुरक्षा आहे का नाही. मोबाईल टॉवरला बिल्डींगवरती परवानग्या दिल्या आहेत, ते सुध्दा अनधिकृत आहेत. प्रायव्हेट जागेमध्ये हे जे होर्डीग्ज लागलेले आहेत त्याला काहीतरी बंधन असायला पाहीजे. तुम्ही व्यावसाय करतातर त्या व्यावसायामध्ये बाकीच्या नियमाचे सुध्दा पालन झाल पाहीजे. किवळे

ते पिंपळेनिलख या मुंबई-पुणे-बेंगलोर हायवेववरती १०० टक्के अनधिकृत फलक आहेत. ते तुम्ही चेक करा. आता आपण जाहीरात फलक जागा निश्चितीसाठी दहा चौक फायनल केलेले होते. त्या दहा चौकाचा आपण २८/- रु. स्क्वे.फु. दर काढलेला होता. तुम्ही सांगावे की, मी कोण दहा चौकाचा रेट ठरविणार. आज रेडिरेकनर आहे या शहरामध्ये. आता दत्ता साने यांनी सांगीतल की ग्रामीण भागामध्ये सुध्दा शहरी भागाचा मालमत्ता कर लावलेला आहे ते अत्यंत चुकीच आहे. आपल्याकडे झोनींग आहे. त्याचप्रमाणे होर्डीग्जच्या बाबतीत सुध्दा दहा चौक आहेत त्यामध्ये भक्ति-शक्ती, वाकड, नाशिक फाटा, डांगे चौक, साई चौक, पिंपरी चौक, केएसबी चौक, कस्पटे वस्ती चौक, भूमकर चौक आणि थरमॅक्स चौक ठरवलेत. मग शहरामध्ये बाकीच्या ठिकाणी व्यावसायाच्या जागा नाहीत का. बास्केट ब्रीज, डांगे चौक, शिवार गार्डन चौक, इंद्रायणीनगर चौक, मॅग्झिन, औंध याठिकाणी व्यावसाय नाहीत का. एकीकडे कोणाच्यातरी नावन टेंडर काढायचं. म्हणजे एकीकडे त्याच्याकडून पैसेही घ्यायचे आणि दुसरीकडे दुसऱ्याला देवून अन्याय करायचा. तो दुसरा माणूस पैसे भरत नाही. मग आपण अधिकृत व्यावसायीकावर अन्याय करतो. मा.महापौर साहेब, महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिकेत जाहीरात फलकावरती केवळ एकच टॅक्स लावला जातो पण आपल्याकडे दोन कर आहेत. तुम्हांला लाँगटर्म उत्पन्न जर पाहीजे असेलतर आणि स्टेबल उत्पन्न जर पाहीजे असेलतर तुम्हांला तुमच्या नियमामध्ये सुसूत्रता आणली पाहीजे. एकतर जागा भाडयाने घ्यायला पाहीजे आपण नुसतेच दौरे करतो इकड तीकड फॅरेनला फिरुन येतो. त्याठिकाणी असले फ्लेक्स असतात का. दिल्ली, मुंबईला तरी अशाप्रकारचे फ्लेक्स आहेत का. आपण आपल्या शहराचे विद्रूपीकरण का करुन घेतो. त्याला आपली लोक जबाबदार नाहीत का. मा.महापौर साहेब, आज याठिकाणी मी यादी देते तुम्हांला. त्या सगळया चौकामधले रेट वाढले पाहीजेत. कारण जर उत्पन्नाच साधन म्हणुन आपण याच्याकड बघतो तर निश्चितपणे एकाला एक न्याय आणि दुसऱ्याला दुसरा न्याय आपण देवू नये. एलईडीचे जे परवाने दिलेले आहेत ते सगळे परवाने तपासून बघावेत. कुठल्या जागेत एलईडी दिले पाहीजेत किंवा दिले नाहीतर आपल काही बिघडणार नाही किंवा त्याच काही डायमिनेशन किंवा कलरच काय प्रकारे कॉन्ट्रॅस्ट असेल ते सुध्दा तपासून बघीतले पाहीजे. काही चौकामध्ये ७० ते ८० फ्लेक्स आहेत. कुठल्या प्रकारची ही परमीशन आहे. काही ठिकाणी टर्न जे असतात त्याठिकाणी फ्लेक्स डोळयासमोर आलेले आहेत. स्ट्रक्चर ऑडीट हा मुद्दा टेक्निकली आहे परंतु आपण पहीली कारवाई त्या अनधिकृत होर्डीग्जवर करा. आता आनंत को-हाळे यांनी विषय मांडला की १०X१० चे ते होर्डीग्ज नाहीत ते फ्लेक्स असतात. त्याच्यावर सुध्दा कारवाई करत असताना सन्मा.नगरसेवकांच्या फ्लेक्सवरती कारवाई केली जात नाही. कार्यकर्त्यांनी कोणी फ्लेक्स लावलेतर त्याच्यावर कारवाई होते त्याच्यामुळे समाजामध्ये असंतोषाच वातावरण होतं. मी सांगीतल समजा की माझ्या विरोधामधले फ्लेक्स काढ असा त्याचा अर्थ होतो. त्यामुळे

भविष्यामध्ये भांडण वाढणार आहेत. एकतर हे सरसगट बंदी करा. मा. अजीतदादानी सांगीतले की शहरामध्ये असे बकाल फ्लेक्स लागले नाही पाहीजे. शहरात जे खड्डे खांदलेले आहे त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करा, असे सांगीतलेले आहे, तुम्ही ते फौजदारी गुन्हे दाखल केले का. दादांनी सांगून सुध्दा या गोष्टी होत नसतीलतर आम्ही बोलून काय उपयोग कोर्टाचे आदेश आहेत, नवी मुंबईमध्ये सर्व पक्षानी ॲफेडेव्हीट दिलेल आहे. शेवटी जबाबदारी पक्षानी घेतलेली आहे. न्यायालयाचा तो अवमान आहेच, शिवाय उत्पन्न बुडतय. तुम्ही नवी मुंबईमध्ये काम केलेल आहे. नगरसेवक एवढे स्ट्राँग तुम्ही बघीतलेले आहेत. तुम्ही तुमचा स्वत:चा एक वेगळा ठसा निर्माण करा. सगळयांना शिस्त लावावी. तुमचा एकदा स्वभाव कळला की बाकीच्यानां सुध्दा काम करणं सोप जाईल. कारण सहा महीने राहीलेले आहेत, तुम्हांला आम्हांला समजेपर्यंत निवडणूका लागतील त्यामुळे तुमच्याकडून अपेक्षा एवढीच आहे हे जे काही चुकीच चाललेल आहे त्याच्यामध्ये तुम्ही लक्ष घालावे. जस श्रीनिवास पाटील साहेबा पासून प्रत्येकाची काहीतरी कलाकृती आहेच त्यामुळे तुमच्या बाबतीत सुध्दा आम्हांला अपेक्षा आहे की तुम्ही सुध्दा चांगल काम कराल आणि खास करुन फ्लेक्सच्या विषयावरती आपण जातीने लक्ष घालावे आणि त्याच्यावरती कारवाई करावी, धन्यवाद.

**मा.अजित गव्हाणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याठिकाणी हा परवान्याच्या संदर्भातील विषय आहे. याठिकाणी सर्वांनीच आपआपले मत व्यक्त केले. या विषयामध्ये खुप मोठे चालेंज तुमच्यापुढे आगामी काळात आहे, यात दिसताना उत्पन्न कमी जरी दिसत असलतरी याच्यामध्ये अनेक अडचणी आहेत, मुख्यत: अडचण तुमचं जे प्रशासन आहे याच्यामध्ये सुसूत्रता आणण्याची गरज आहे. अनेक लोकांनी आपल्या भाषणामध्ये उल्लेख केला त्यांना काम करताना अनेक अडचणी येतात, त्यांच्यावरती दबाव येतो त्यामुळे त्यांना काम करता येत नाही, किंवा काही अधिका-यांच्या बाबतीत भ्रष्टाचाराचे आरोप सुध्दा याठिकाणी झालेले आहेत. त्यात काही प्रमाणात निश्चितपणे तथ्य आहे. आपल्याला आपल उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टिकोनातून विचार करत असताना पिंपरी चिंचवड शहराचा जर एकत्रीत विचार केलातर आपले शहर ज्या पध्दतीने वाढते आहे त्यामुळे या फ्लेक्स, होर्डींग्जला महत्व आलेले आहे. आजच जग जे आहे ते मार्केटींगच जग आहे आणि होर्डींग्ज हे असं माध्यम आहे की त्याच्यातून सगळयाच व्यावसायीकाना निश्चितपणे मोठया प्रमाणात फायदा होत असतो. या शहरातील जे होर्डींग्ज आहेत त्याचे दराशी काही लोकांनी पुण्याची तुलना केली, आयुक्त साहेब पुण्याप्रमाणे आपली तुलना होवूच शकत नाही. पुण्यातील प्रॉपर्टीची किमंत आणि पिंपरी चिंचवड शहरातील प्रॉपर्टीची किंमत याच्यामध्ये तफावत आहे. त्याच्यामुळे पुण्याप्रमाणे आपण निश्चितपणे दर लावू शकत नाहीत परंतु जे होर्डींग्ज आहेत ते १०० टक्के अधिकृत असले पाहीजेत. अशाप्रकारची भूमिका आणि मागणी सर्वांचीच आहे. येथे बसलेल्या सर्वपक्षीय लोकांची हीच मागणी आहे की सगळे होर्डींग्ज अधिकृत असावेत. अनेक

लोकांनी सांगीतले की कमी साईजची मंजूरी घेतली जाते आणि जास्त लावले जातात किंवा किऑक्सच्या बाबतीत सुध्दा सांगीतल गेल, याच्यामध्ये प्रशासन कुठेतरी कमी पडते. तुम्हांला कोणाचा फोन आलातरी भीण्याच कारण नाही. कडूस्कर साहेब तुम्ही चांगले अधिकारी आहात तुम्हांला जर अशी अडचण आलीतर आयुक्त साहेबांच्या कानावर घातले पाहीजे आणि जे काही योग्य आहे, नियमात आहे तेच काम तुम्ही केल पाहीजे. नियमाच्या पलीकडे जावुन काम केल नाही पाहीजे. मुळात याच्यामध्ये नियम असे पाहीजे की ज्यावेळेस नवीन माणूस त्या व्यावसायात येत असतो त्याला अतीशय सुटसूटीतपणे परवानगी दिली गेली पाहीजे. होर्डींग्जच्या बाबतीतच नाहीतर बिल्डींग परमीशन असेल किंवा इतर गोष्टी ज्या आपल्याकडे परवानगीच्या आहेत त्या सगळयामध्ये कुठतरी सुटसुटीतपणा आला पहीजे जेणेकरुन सर्वसामान्य माणसाना सुध्दा ते सहजपणे करता आलं पाहीजे आणि म्हणून होर्डींग्जच्या परवानग्या देत असताना नियमावली सुटसूटीत ठेवावी. सगळयाच्याच बोलण्यातून हा मुद्दा आला आहे की आपल शहर होर्डींग्जमुळे बकाल होतय, तरी याच्यामध्ये महापालिकेने धोरण निश्चित केले पाहीजे. वेगवेगळया ठिकाणी जसे आपल्या डीपी प्लॅन मध्ये रिझर्व्हेशन असतात त्या पध्दतीने जर आपल्याला होर्डींग्जचे रिझर्व्हेशन शहरात करता आलीतर आणि ठरावीक ठिकाणी होर्डींग्ज लावण्याची परवानगी घेवून आणि ते अधिकार आयुक्त साहेब आणि प्रशासनाकडे असले पाहीजेत. आज काय होतय ज्यांच्या जागा आहेत त्यांना वाटतय की आमच्या जागेमध्ये आम्हांला जर होर्डींग्जला परवानगी दिलीतर त्यांना त्याच उत्पन्न मिळेल अनेक तरुण या व्यावसायामध्ये आलेले आहेत. आताच सुलभाताईनी मोठया कंपनीचा उल्लेख केला अनेक वर्षे ही कंपनी याठिकाणी काम करते, नव्याने अनेक लोक या व्यावसायामध्ये पडतात. कुठेतरी रोजगारांच्या संधी यामध्ये लोकांना दिसतात म्हणून याच्यामध्ये लोक उतरतात. आपण नियम सुटसूटीत करुन १०० टक्के अधिकृत होर्डींग्ज कसे करायचे हे बघावे. मगाशी प्रशांत शितोळे यांनी चांगली उपसूचना दिली अशा ठिकाणी उपसूचनेप्रमाणे जेवढे जास्तीत जास्त लोकांना महापालिकेचे होर्डाग्ज लावता येईल तेवढे लावले पाहीजे. जिथे खाजगी ठिकाणी परवानगी दयायची त्याठिकाणी सुध्दा, मगाशी दत्ता साने आणि धनंजय आल्हाट यांनी उल्लेख केला स्ट्रक्चरल स्टॅबिलीटीचा विषय आहे, अनेक ठिकाणी होर्डींग्ज लावले जातात परंतु त्या इमारतीचे स्ट्रक्चर असतं ते कमकुवत असते आणि त्याच्यामुळे जिवीत हानी होण्याची शक्यता असते त्याचा सुध्दा बारकाईने विचार केला पाहीजे. नुसता कागदाला कागद जोडला म्हणजे झाल असं नाही तर तुम्ही त्याला परवानगी वेळेस ते व्यवस्थीत तपासा. एखादया आरसीसी डिझाईनरने किंवा एखादया तज्ञांनी तुम्हांला सर्टिफिकेट दिलेल असेलतर ते बरोबर आहे का चुकीच आहे ते आपल्या एखादया इंजिनीअरकडून तपासण्याची गरज आहे. आकाशचिन्ह मध्ये किती लोक काम करतात, कधी पासून काम करतात, कोणाच काम चांगल आहे आणि कोणाच काम वाईट आहे किती लोकांची गरज आहे त्याची आयुक्त साहेबांना

माहीती दिलीतर तुम्हांला तुमच्या पध्दतीने चांगले काम करता येईल आणि महापालिकेला अधिक उत्पन्न देण्याच्या संदर्भात आपल्याला निश्चितपणे फायदा होईल. पुर्वी दर ७.५० होता तो १०/- होणार आहे नक्कीच हे दर वाढलेतर आपल्या महापालिकेचे त्यामुळे उत्पन्न वाढेल. आपल्याला अधिकच उत्पन्न मिळाल पाहीजे परंतु ते मिळत नाही म्हणून टप्याटप्याने प्लॅनिंग करुन या परवाना विभागाकडून जास्त उत्पन्न या महापालिकेला कसे मिळेल यासाठी प्रयत्न आपण करावेत.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा विषय आणि या विषया संदर्भातील गांभीर्य गेल्या तास दिड तास झाले चर्चा चाललेली आहे यामधुन हे लक्षात आलेले असेल. मी याठिकाणी कडूस्कर साहेबांना धन्यवाद देतो त्यांनी किमान दर वाढवावेत, चांगल्या पध्दतीने वाढवावेत, पुर्वी ५ रु. ८ रु. १० रु. असा दर होता, छोटयाला वेगळा, मोठयाला वेगळा असा दर होता, हे केले. याच्यामध्ये महापालिकेचे नुकसानही होत होतं. परंतु त्यामध्ये महापालिकेचे उत्पन्न वाढाव हा हेतू डोळयासमोर ठेवून त्यांनी हा विषय योग्य रीत्या आणलेला आहे त्याला मान्यता दयायची आहे. परंतु हे सर्व करत असताना आपल्या लक्षात आले असेल की किऑक्स असेल, होर्डींग्ज असेल, बॅनर असेल किंवा आता टॉवर्स उभे केले जातात. टॉवरची परवानगी सुध्दा आपल्या महापालिकेकडे घेतली जात नाही. जुन्या कमकुवत, २५ वर्षे पुर्वीच्या आशा कमकुवत बिल्डींगवर २५ ते ६० फुट उंचीचे टॉवर उभे केले जातात. त्याची परवानगी सुध्दा महापालिकेकडून घेतली जात नाही. आपण नवी मुंबई सारख्या ठिकाणी, नागपुरसारख्या ठिकाणी काम केलेल आहे. आता सर्वांनीच याठिकाणी उल्लेख केलेला आहे की इलेक्ट्रॉनिक्स बोर्ड असतील, किऑक्स असतील म्हणजे महापालिकेचे उत्पन्न वाढावे ही सर्वांचीच धारणा आहे. आयुक्त साहेब आपल्याला कोर्टाने जे निदेश दिले होते त्याच्याप्रमाणे अनधिकृत बांधकाम विभागासाठी स्टाफ भरती केलेला आहे. पोलीसांचे मानधन सुध्दा आपण देतो. मग हे सर्व काही असताना कारवाई का होत नाही हाच मोठा प्रश्न आहे. कडूस्कर साहेबांकडे किंवा त्यांच्या डिपार्टमेंटचे काम काय आहे आकारणी करणे, परवानगी देणे, परंतु फिजीकली जे ईलीगल आहेत त्याला रिमुव्ह करण्याच काम हे आपल्या अतिक्रमण डिपार्टमेंटच आहे आणि म्हणून ते वॉर्ड ऑफिसर कडे ते डिपार्टमेंट असाव त्यांनी इन्फॉम केल्यानंतर ताबडतोब रिमुव्ह व्हायला पाहीजे. अशा पध्दतीने काम करता आल, येथून मागे सुध्दा आम्ही अनेकवेळा अशी मागणी केलेली आहे, मगाशी भाषणामध्ये सुध्दा मी तुम्हांला हेच सांगीतल याठिकाणी बसलेले सर्व नगरसेवकांची मानसीकता हीच आहे की या शहरामध्ये आजून हातगाडया वाढतात, अजून बेकायदेशीर बांधकाम होवू नये, अनधिकृत फ्लेक्स वाढू नये यासाठी जे बांधकाम सुरु होत असेल किंवा त्याबाबत एखादया नगरसेवकांनी कल्पना दिलीतर किंवा सारथीमध्ये तक्रार आलीतर तुम्ही ताबडतोब जावुन ते लगेच काढल पाहीजे ते होर्डींग्ज काढले गेल पाहीजेत. त्याठिकाणी अनधिकृत होणार बांधकाम थांबविल पाहीजेत.

अशाप्रकारची यंत्रणा आपण राबविलीतरच तुम्हांला या सर्व गोष्टीवर कंट्रोल करता येईल. काही लोकांनी त्यांच्या स्वत:च्या मालकीच्या बारा-बारा, पंधरा-पंधरा हातगाडया केलेल्या आहेत आणि ते लोकांना ५००/- रु, १००० रु. रोजाने देतात आणि आपण कोणत्याच प्रकारची कारवाई करु शकत नाहीत. आपण एक रुपया सुध्दा त्यांच्याकडून घेत नाहीत पुर्वीच्या नियमाप्रमाणे आपण त्यांच्याकडून कोणताच परवाना घेत नाहीत, आपण त्यांना कोणताच पास दिलेला नाही, कार्ड दिलेले नाही. परंतु दिवसेंदिवस चांगले चांगले प्रशस्त रस्ते आहेत अशा रस्त्यावर हातगाडयानी सगळे रस्ते बकाल झालेले आहेत आणि एका एका महाशयाकडे चाळीस-चाळीस, पन्नास-पन्नास हातगाडया आहेत. या शहरात करण्यासारखे खुप आहे. तुम्हांस हे डिपार्टमेंट पॉवरफुल करावे लागेल तुमच्याकडे सर्व यंत्रणा आहे, अधिकारी आहेत. त्यामध्ये तुम्ही रेव्हेन्यू डिपार्टमेंटचा अधिकारी बॉस म्हणून नेमलातर त्यांच्यावर तुमच सुध्दा कंट्रोल राहील. नाहीतर प्रेशर आलेतर तुम्ही थांबता. सेंटर स्कॉड असाव. मागच्यावेळेस जाधव साहेबांना विनंती केल्यानंतर त्यांनी नवीन संकल्पना काढली. त्यांनी बिल्डींग परमीशनमध्ये काही ज्यू. इंजिनीअर वाढविले, काही डेप्युटी इंजिनीअर वाढविले बिल्डींग परमीशन बरोबर त्यांनाही अनधिकृत बांधकामाबाबतच कामकाज दिलेल आहे. मग त्यांनी बांधकाम परवानगी बघायची का अनधिकृत बांधकामाच बघायचे. त्यांना २० हजार स्क्वे.फुटा पर्यंतचे अधिकार देवून टाकले. ते काम दिवसभर करुन हे काम करु शकत नाहीत. त्यानां सांगीतल, आपण सहा महीन्यासाठी असा प्रयोग करुन बघु. परंतु ते लोक काम करु शकत नाहीत. जे लोक बिल्डींग परमीशन मध्ये आहेत ते लोक अनधिकृत बांधकामाचे अजीबात काम करत नाहीत त्यांच्याकडून काम होतही नाही. त्यामुळे अनधिकृत बांधकाम हे डिपार्टमेंट तुम्ही सक्षम करा. तुम्ही नागपूर मध्ये काम केलेले आहे. नवी मुंबईमध्ये काम केलेले आहे. त्याठिकाणी बीओटी असेल किंवा पीपीपी मॉडेल असेल या मॉडेल वरुन आपण काम केल, ऑपरेट केलतर निश्चितच आपल्या महापालिकेच उत्पन्न वाढवू शकेल आणि येथे कोणाची काही गय करण्याची गरज नाही. आम्ही जरी सत्ताधारी असलोतरी आम्ही कधी म्हणले नाही की अशी कारवाई करु नका, उलट आम्ही कारवाई करण्याची तुमच्याकडे मागणी करतो. शहरामध्ये बेकायदेशिर बांधकाम होवू देवू नका, हातगाडया ज्या वाढत चाललेल्या आहेत त्या थांबवा, अनधिकृत होर्डींग्ज असतील, किऑस्क असतील, बोर्ड असतील ते ताबडतोब काढा, अशा पध्दतीने काम केलेतर निश्चितच आपल आर्थिक उत्पन्न वाढेल आणि शहराला सौंदर्य येणार आहे. स्ट्रीट लाईटवर कुठे कुठे किऑस्क लावले गेले पाहीजे हे आपण ठरवावे. या शहरामध्ये दहा चौकापेक्षा अधिक चौक अनेक ठिकाण असे आहेत की त्याठिकाणी आपल्याला उत्पन्न मिळू शकते. त्या दहा चौकाप्रमाणे अजून २५ चौक असतील, ५० चौक असतील तुम्ही करा परंतु त्याला मर्यादा ठेवा. किऑस्कमध्ये पण आपण पीपीपी मॉडेल करु शकतो किंवा बीओटी मॉडेल करु शकतो. डिजीटल साईजचे किऑस्क त्याच फ्रेमवर्क चांगले असेल, सर्व किऑस्क सारखे असेल, या केसमध्ये महापालिकेनी खर्च

केलातरी हरकत नाही. किंवा एखादा पीपीपीमध्ये खर्च करत असेल आणि तो उभा करत असेलतर आणि तो पाच वर्षासाठी टेंडर घेत असेलतर किंवा बीओटीवर असेल त्यांनी जर स्वत:चे पैसे खर्च करुन उभारल आणि पाच वर्षात होणा-या उत्पन्नामधुन काही उत्पन्न महापालिकेला दिल आणि नंतर ती प्रॉपर्टी महापालिकेला ट्रान्सफर केलीतर त्यातूनही आपल्याला पैसे मिळू शकतात. अशा पध्दतीने काम करण्यास आपल्याला स्कोप आहे. आयुक्त साहेब, तुम्ही माहीती घ्यावी आणि किती ऑथोराईज होर्डींग्ज आहेत, किती ऑथोराईज किऑक्स आहेत हे पुढच्या आठवडयामध्ये तुम्ही सर्वे करुन ताबडतोब हे काढून दाखवा म्हणजे या जी.बी.ला आम्ही तुम्हांला जे अवाहन केल ते स्विकारल्या सारख होईल अनधिकृत बांधकाम सुध्दा ताबडतोब थांबवावे त्याबाबत आपण प्रयत्न करावेत अशी विनंती करतो.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सगळयांच्या जिव्हाळयाचा विषय आहे. काही लोकांनी जे म्हणणे मांडलेले आहे ते बरोबर आहे. काही लोक म्हणाले कोणाचे लागेबांदे आहेत. मी तुम्हांला सगळयांच्या साक्षीने सांगते कोणाचे लांगेबांदे असलेतरी तुम्ही कारवाई करा. अनधिकृत स्ट्रक्चर ज्यांनी उभे केलेले आहेत जिथे फ्लेक्स लागलेले आहेत, परवागी एवढयाचीच घेतली, फ्लेक्स केवढा लावला याबाबत कडूस्कर यांच्याशी चर्चा केली त्यादिवशी त्यांनी असं सांगीतल आम्ही म्हणल की पेपरला बातमी आली स्टॅण्डींगमध्ये एक कोटी रुपयाचा विषय आहे. त्यांनी असं सांगीतल हे जर स्ट्रक्चर काढायचे असेलतर ते तसं काढू शकत नाहीत. त्याच्यासाठी त्यांना क्रेन लागणार आहे आणि त्यांनी जो लागणारा स्टाफ आहे तो दिला पाहीजे. आपल्याकडे अतिक्रमण डिपार्टमेंट आहे हे डिपार्टमेंट सुध्दा त्यांच्या ताब्यात दिले पाहीजे आणि १५ दिवस शहरामध्ये पहील हातामध्ये हेच घ्या. कचरामुक्त होण्यासाठी जर आपल्याला काही करायचे असेलतर पहील्यांदा आपल्याला या गोष्टीतून सुरुवात केली पाहीजेत. वाढलेल्या प्रचंड प्रमाणावर टप-या, हातगाडया वाढलेल्या आहेत तसेच आता उन्हाळयात कलींगडचे स्टॉल आहेत, फ्रुटचे स्टॉल आहेत, आता आंब्याचे स्टॉल, अनधिकृत मासे, मटण या सगळयांचे स्टॉल आहेत. मासे, मटण कुठेही कापल जातं, कुठेही विकल जातं. त्या कोंबडयांचे पीसं तर लोकांच्या घरामध्ये जातात सगळीकडे अशी परिस्थिती आहे मग त्यांना बंधन घातले का. संध्याकाळी व्हिजीट करा माशावाले तिथेच घाण त्या ठिकाणीच टाकणार आणि निघून जाणार. भेळवाले, भाजीवाले तसेच करतात त्यांना माहीती आहे सकाळी आरोग्य विभागाचे लोक येवून साफ करणार. हॉटेलवेस्ट घेण्यासाठी १०० टक्के त्यांच्याकडे गाडया जातात दया परंतु त्या गाडीना त्यांना दयायला नको म्हणून ते जवळ असलेल्या कचराकुंडीवर टाकतात. त्या कचराकुंडीमध्ये सगळी रात्रीअपरात्री कुत्री तेथे गोळा होतात आणि अक्षरश: रस्त्यावरुन, पिंपरी चिंचवड ही कामगार नगरी आहे आणि कामगार ज्यावेळेला सेकण्ड शिफ्ट करुन घरी येतात त्यावेळेला अक्षरश: त्यांची वाईट परिस्थिती असते. आपण अहवाल मागवावा आपल्याकडे या वर्षामध्ये किती कुत्री चावले. लहान कुत्री सुध्दा

रस्त्यावरच आहेत. हे कशामुळे होत की हे जे वेस्टेज आहे, त्यात चिकन टाकणार, हॉटेल वेस्ट टाकणार याच्यामुळे पण शहर बकाल होतय. आपण स्वच्छतेचा पुरस्कार घेतलेला आहे, स्मार्ट सिटीची पुरस्कार घेतले परंतु आपण हे जर पथ्य पाळलेतर नक्कीच आपण परत आहे त्या स्थितीमध्ये चांगल्या पध्दतीने जाऊ. त्याचबरोबर आपले मोठमोठे पुल आहेत ज्यावेळेला आपण कासारवाडी पुलावरुन येताना संध्याकाळची लाईटींग सुंदर दिसते. भोसरीमध्ये तुम्ही जा इतका चांगला पुल केलेला आहे त्याला सगळे पेपर चिटकवलेले आहेत. त्या जाहीराती लावलेल्या आहेत त्याच्यावर सगळयाचे नंबर आहेत, केबलवाल्यांचे नंबर आहेत, घरगुती डब्बेवाल्यांचे नंबर आहेत. इतके सुंदर महापालिकेनी बसस्टॉप केलेलेले आहेत त्याच्यावरही तसेच लावलेले आहे. एमएसईबीचा बॉक्स आदल्या दिवशी लावलातर दुस-या दिवशी तो लालचा पांढरा दिसतो. तो माणुस एखादा पेपर लावत नाहीतर तो एकच पेपर लावून त्याला तो माणुस ड्रेस करतो. त्याच्यावर आपण काहीही कारवाई करत नाहीत. अजीबात त्याला दंड करत नाहीत. आम्ही विचारलतर ते म्हणाले खालचे लोक दंड करत नाहीत, मग यांनी जर असं उत्तर दिलतर आम्ही काय उत्तर दयायचं. शहरामध्ये करदाते नागरीक सुध्दा विचारतात किती घाण दिसते ते. महापालिकेच्या बाकडयाला सुध्दा ते पेपर लावलेले असतात. जे अनधिकृत लावतात त्या माणसावर फौजदारी गुन्हे दाखल झाले पाहीजे. आताच सांगीतल की खुप ठिकाणी एवढे मोठमोठे फ्लेक्स लावलेले आहेत. त्यांच स्ट्रक्चर उभ केलं आहे, परवाच्या दिवशी झालेल्या वादळामध्ये जिवीत हानी झालेली नाही. परंतु आयुक्त साहेब, सगळया कडून लेखी लिहून घ्या परमेश्वर चरणी प्रार्थना आहे जिवीत हानी होवू नये परंतु जिवीत हानी झाल्यानंतर महापालिकेचे बोर्ड आहे का, कोणाचा बोर्ड आहे त्याच्यातून जिवीत हानी झाली मग परत सगळयाप्रकारचे त्याच्यामध्ये अवघड, अवघड प्रश्न निर्माण होतात ते होवु नयेत. आता यावेळेला झाले नाही हे आपल नशिब समजायचं. कोणाच्याही घरामध्ये याची दुर्घटना होवू नये. कोणाच्याही गाडीवर पडू नये. आता जो विषय आलेला आहे तो फक्त १२ होर्डीग्जसाठीचा विषय आहे. जे प्रामाणिकपणे पैसे भरतात त्या प्रामाणिक लोकांसाठी आहे. जे अनधिकृत आहेत त्याला आपण जो रेट ठरविणार त्याच्या दुप्पट रेट लावला पाहीजे. दुप्पट रेटप्रमाणे त्यांच्याकडून पैसे वसुल करुन दंड वसुल केला पाहीजे. सभागृहामध्ये सांगावे कोणाचे लागेबांदे आहेत ते. मी पण बोलले, दत्ता साने पण बोलले, अजीत गव्हाणे बोलले, योगेश बहल बोलले, सुलभाताई बोलल्या. कोणाचे लागेबांदे आहेत त्यांनी हात वर करावेत. आम्ही सांगतो त्याच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करा. कोणाचे लागेबांदे आहेत ते सांगावे. आम्ही सांगतो तुम्ही फौजदारी गुन्हे दाखल करावेत म्हणजे कोणाचे लागेबांदे आहेत हे समजेल. मगाशी एक प्रस्ताव होता मागच्या जीबीला मी सांगीतलेले होते की १०० टक्के चार वॉर्डामध्ये प्रत्येक ठिकाणी बोर्ड दिले पाहीजेत. तीथ बोर्ड दिल्यानंतर कोणाचा बिझनसे असेल, नगरसेवकांच असेल, राजकीय कोणत्याही पक्षाच असेल तिथ त्यांनी फ्लेक्स लावण्यासाठी परमीशन घ्यायला पाहीजे. परंतु हे

होत नाही. तो सुध्दा आपला कर बुडतो तरी तो सुध्दा कर आपल्याला मिळाला पाहीजे. प्रत्येक चौक, कॉर्नर सगळ ठरविले गेल पाहीजे. पीपीपी तत्वावर प्रस्ताव दिलेला आहे आम्ही त्याला सुध्दा मान्यता दिली आहे. काल आम्ही बराच वेळ कडूस्कर साहेबांबरोबर चर्चा करत होतो, त्याला सुध्दा आम्ही मान्यता दिलेली आहे की शहरामध्ये या गोष्टीतून सुध्दा रेव्हेन्यू मिळाला पाहीजे. मी बाबासाहेब धुमाळ यांचे मनापासून कौतूक करेल. एकमेव व्यक्ति अशी आहे की ते म्हणाले हो लावतात आणि त्या फ्लेक्सवाल्याला आम्ही सांगीतल आणि ते लावतात, म्हणजे हे सगळेच करतात. परंतु खर बोलणारा माणुस एकमेव येथे मिळाला. त्यांनी खर सांगीतल एवढे रेट वाढवू नका. जे अनधिकृत करतात त्यांना तुम्ही काही बोलत नाहीत. जो अधिकृत काम करणारा माणूस आहे त्यांना मात्र तुम्ही वाट्टेल ते करतात. आता सुलभाताईनी यादी वाचून दाखवली. परमीशन २५ टक्केची आहे आणि ७५ टक्के लावतात. संस्थाचालकांचे नाव वाचून दाखवले आहे त्यांच्यावर पहीली कारवाई केली पाहीजे. त्यांच्यावर कारवाई करा नाहीतर जे प्रामाणीकपणे काम करतात त्यांच्यावर अन्याय होईल. एलईडी लाईट चौका चौकामध्ये लावली आहे, किती उंचावर लावली हे बघावे. एलईडी बोर्डसाठीचे रेट यामध्ये आलेले नाहीत ते सुध्दा पुढच्यावेळेला आले पाहीजेत ऍक्सीडेंट होण्याची संख्या जास्तीत जास्त वाढलेली आहे. हा विषय फार मोठा आहे आणि एकमेकाचा गुंता झालेला विषय आहे त्यामुळे यासाठी तुम्हांला अधिका-यांना घेवून बसावे लागेल. नुसते घेवून बसून चालणार नाहीतर तुमची यंत्रणा खुप मोठया प्रमाणामध्ये राबवली गेली पाहिजे. पहीला धडाका ठेवावा की हे वाईट काम करणा-या लोकांवर पहीली कारवाई तुम्ही करा. मा.श्रीकर परदेशी यांनी सांगीतले होते की कोणीही काहीही केलेल चालणार नाही. एक टपरी सुध्दा नाही बसू दिली त्यांनी. हा विषय उपसूचनेसह मंजूर करावा.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- ८६४ — विषय क्रमांक- ७

दिनांक - २०.५.२०१६ — विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आप/२/कावि/१५५/२०१६, दि.०९/०२/२०१६

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.६१ दि.१.०४.२०१६

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.८४६ दि.२०/४/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकाकार्यक्षेत्रामध्ये जाहिरात फलक उभारुन जाहिराती केल्या जातात त्यावर महानगरपालिकेमार्फत जाहिरात कर, परवाना फी व जाहिरात फलक म.न.पा जागेत असल्यास जागाभाडे आकारणी करणेत येऊन परवाना दिला जातो. वरीलपैकी परवाना

फीची आकारणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३८६ नुसार करण्यात येत आहे. कलम ३८६ नुसार आकारण्यात येणारे परवाना फीचे दर निश्चित करताना मा. विधी समितीमार्फत मा. महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. मागील वर्षाचे दर निश्चित करण्यासाठी या विभागाने दिनांक ८/०१/२०१४ रोजी महापालिका सभेकडे विधी समिती मार्फत प्रस्ताव सादर केला होता. मा. विधी समिती सभेने प्रस्तावासोबतचे परिशिष्टा प्रमाणे दरवाढ करणेस मान्यता दिली होती. मात्र दरम्यानच्या काळात विधानसभा सार्वत्रिक निवडणूक आचारसंहिता कालावधीमुळे मा. महापालिका सभेने ठराव क्रमांक ५१३ दिनांक ५/७/२०१४ अन्वये सदरचा विषय दप्तरी दाखल करणेत आलेला आहे. त्यामुळे परवाना फीचे दर सन. २०१३-२०१४ प्रमाणेच सन २०१४-१५ साठी कायम ठेवण्यात आले आहेत. चालु वर्षी परवाना फीचे दरात १५% वाढ केलेली असल्याने म.न.पा. उत्पन्न वाढीच्या दृष्टीने सन.२०१६-२०१७ साठी ठराविक चौक वगळता अन्य सर्वसाधारण ठिकाणी परवाना फीचे वाढ करावी असे मत आहे. याबाबत पुणे म.न.पा. कडून प्रतिवर्षी र. रू. २२२/- प्रति चौ. फूट याप्रमाणे फी आकारण्यात येते. याचा मासिक दर रू. १८.५० इतका येत असून त्या तुलनेत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जाहिरात कर व परवाना फी याचा प्रति चौ. फूट प्रति महा एकत्रित दर र. रू. ७.८० इतका आहे. तो पुणे म.न.पा. पेक्षा खूपच कमी आहे. सबब परवाना फीचे दरात सन २०१५-१६ पेक्षा ठराविक चौक वगळता अन्यत्र वाढ करावी असे मत आहे. मात्र आकारणी मधिल क्लिष्टता कमी करून हिशोबात सोपेपणा येण्याचे हेतुने त्यामधिल टप्पे कमी करून सोबतच्या परिशिष्ट ‘अ’ मध्ये दर्शविलेप्रमाणे दराचे टप्पे निश्चित करून नजिकच्या पुढच्या रक्कमेत पुर्णांकीत करुन वाढ करण्यात यावी अशी शिफारस आहे. उत्पन्न वाढीच्या दृष्टिने महानगरपालिकेने शहरातील जास्त वर्दळीच्या महत्वाच्या एकूण. १० चौकामध्ये जाहिरातीचे हक्क निविदेद्वारे १/४/२०१२ ते. ३१/३/२०१४ या काळात जाहिरात संस्थेस दिलेले होते. त्यामध्ये प्रती चौरस फुट प्रती महा र. रू. २४ ते र. रू. ३० जाहिरात कर व परवाना फी चे एकत्रित दर प्राप्त झालेले होते. हि बाब विचारात घेता सदर निविदा चौकामध्ये अन्य क्षेत्रापेक्षा जाहिरातदाराकडून प्राधान्यक्रमाने व वाढीव दराने मागणी आहे, हे दिसून येते. तसेच या चौकाशिवाय त्याच क्षेत्रातल्या अन्य महत्वाचे चौकाचा समावेश त्यामध्ये करता येईल. एकूण १२ शिफारस केलेल्या चौकांची यादी सोबतच्या परिशिष्ट ‘ब’ मध्ये दर्शविली आहे. सदर चौकात जाहिरात प्रसिध्दीसाठी प्राप्त दरामुळे जाहिरातीचा सदर चौकातील जाहिरात प्रसिध्दीसाठीचे बाजारभाव प्राप्त झालेले आहेत. वरील बाब विचारात घेता व म.न.पा.चे आर्थिक हित विचारात घेऊन निविदेमध्ये प्राप्त झालेल्या दरामधील सर्वात जास्त दर ज्या चौकात प्राप्त झाले आहेत त्या दरानुसार अन्य सर्व प्रस्तावित चौकात दरांची आकारणी करता येईल असे वाटते. तथापी सदरचे दर हे ४ वर्षापूर्वी प्राप्त झाले आहेत. ही बाब विचारात घेऊन वरील चौकात प्राप्त झालेल्या अधिकत्तम र.रू.२८/- प्रति महा दरानुसार परवाना फी सर्व चौकात आकारणी करावी अशी

शिफारस आहे. त्यासाठी वरील सर्व चौकाचे क्षेत्र घोषित करुन (झोनिंग) सदर चौकामध्ये प्रसिध्द होणा-या जाहिरातींना वरील प्रमाणे परवाना फी चे दर लागू करणेत येतील. चौकातील जाहिरात क्षेत्र म्हणजे चौकाचे सिमारेषेपासून सर्व दिशांनी ५० मिटर अंतराचे आत चौकामधून दृष्टीपथास येणारे (चौक सन्मुख) सर्व प्रकारचे जाहिरात फलक (खुल्या जागेवरील, इमारतीवरील, इमारतीचे गच्चीवरील, इत्यादी) या सर्वांना हे दर लागू करण्याची शिफारस आहे. उपरोक्त बाबी विचारात घेऊन महानगरपालिकेचे उत्पन्नातील समतोल राखणेचे हेतूने जाहिरातीचे दरात परिशिष्ठ 'अ' प्रमाणे सर्व साधारण क्षेत्रासाठी परवाना फीचे दर प्रस्तावीत केले आहेत. तसेच विशिष्ट चौकांची यादी परिशिष्ट 'ब' मध्ये नमूद केलेप्रमाणे परवाना फीचे दर मा.आयुक्त यांनी प्रस्तावित केले असले तरी सर्व ठिकाणच्या जाहिरात फलकासाठीचे परवाना फी चे सन २०१५-१६ साठी निश्चित केलेले दर हे सन २०१६-१७ साठी कायम करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मा.आयुक्त यांनी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरिता आकाशचिन्ह परवाना फी चे दराबाबतचा विषय सादर केलेला आहे. जाहिरात फलक लावणेसाठी महानगरपालिकेने म.न.पा. जागा निश्चित करुन त्या ठिकाणी शहर विद्रुपीकरण होणार नाही तसेच शासनाचे धोरणाप्रमाणे सदर ठिकाणी निविदेने जाहिरातीस परवानगी देवून म.न.पा. उत्पन्न वाढीसाठी पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीप (पी.पी.पी.) धोरणानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी. शहर विद्रुपीकरण होणार नाही तसेच शहराचे सौंदर्य अबाधीत रहावे या करिता सर्व जाहिरात फलक नियंत्रणासाठी धोरण तयार करुन त्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- ८

दिनांक - २०.५.२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आप/२/कावि/१५३/२०१६, दि.०९/०२/२०१६

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.६२ दि.१.०४.२०१६

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.८४७ दि.२०/४/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आकाशचिन्ह व परवाना विभागामार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३१३, ३७६ व उपविधीनुसार उदयोगधंदा, व्यवसाय, साठा परवाने देण्यात येतात.

सद्यस्थितीत याविभागामार्फत देण्यात आलेल्या एकूण परवान्यांची संख्या दि. ३०/११/२०१४ अखेर ६१३९ एवढी आहे व सन २०१५-२०१६ मधील माहे नोव्हेंबर २०१५ अखेर मिळालेले एकूण उत्पन्न र.रु. १५,८४,४५६/- (अक्षरी र.रु.पंधरा लाख चौ-याऐंशी हजार चारशे छपन्न फक्त) एवढे आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३८६ चे तरतुदीस आधीन राहून प्रति वर्षी परवाना फीचे दर निश्चित करण्यात येतात त्यानुसार सन २०१६-१७ साठीही ते निश्चित करणे आवश्यक आहे.

सन २०१३-२०१४ चे उदयोगधंदा, व्यवसाय, साठा परवाना फी निश्चित करताना सन २०१२-२०१३ चे दरात १०% वाढ केलेली आहे. ही बाब विचारात घेता सन २०१४-२०१५ साठी कोणतीही फी वाढ न करता सन २०१३-२०१४ चे दर कायम ठेवण्यात आले आहेत. सन २०१५-२०१६ चे उदयोगधंदा, व्यवसाय, साठा परवाना फी निश्चित करताना सन २०१४-२०१५ चे दरात १०% वाढ केलेली आहे. महाराष्ट्र शासनाने परिपत्रक क्रमांक पीसीसी-३०१५/प्र.क्र.७५(१)/नवि-२२ दिनांक २४/४/२०१५ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३१३ मध्ये महानगरपालिकेच्या अधिकारितेतील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाव्दारे अधिसूचित केलेल्या क्षेत्रामध्ये कारखाने, कर्मशाळा किंवा कामाच्या जागेच्या बाबतीत अशा परवानगीची आवश्यकता असणार नाही अशी सुधारणा केलेली आहे. त्यामुळे एम.आय.डी.सी. क्षेत्रातील उद्योगांना यापुढे म.न.पा. परवाने देता येणार नाहीत. तसेच म.न.पा.चे उत्पन्नाचे प्रमुख साधन एल.बी.टी. हे शासनाने रद्द केलेने म.न.पा. उत्पन्न वाढविण्यासाठी सन २०१६-१७ साठी प्रचलित सन २०१५-१६ दरामध्ये २०%दरवाढ उपरोक्त व्यवसाय व साठा परवान्यासाठी करणेत यावी. तसेच उद्योगधंदा परवान्यासाठी प्रपत्र अ प्रमाणे परवाना फी असे सूचविण्यात येत आहे. त्यानुसार सन २०१६-१७ साठी प्रस्तावित दर दर्शविणारे, उद्योगधंदा परवाना फी साठी प्रपत्र - अ, व्यवसाय परवाना फी साठी प्रपत्र - ब व साठा परवाना फी साठी प्रपत्र - क सोबत सादर केलेप्रमाणे मा.आयुक्त यांनी प्रस्तावित केले असले तरी उद्योगधंदा परवाना, व्यवसाय परवाना व साठा परवाना फी चे सन २०१५-१६ साठी निश्चित केलेले दर हे सन २०१६-१७ साठी कायम करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.अपर्णा डोके -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.नारायण बहिरवाडे-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आकाशचिन्ह व परवाना विभागामार्फत उदयोगधंदा, व्यवसाय, साठा परवाने असे तीन प्रकारचे परवाने देण्यात येतात. त्याच्या फी वाढीचा विषय मा.महापालिका सभेसमोर

आला आहे. उद्योगधंद्यांची परवान्यांची संख्या या शहरात किती आहे याची माहिती घेतली असता अक्षरशः डोके चक्रावून जाते. आता किती उद्योगधंद्यांचे परवाने घेतले आहेत, त्याची संख्या बघीतली तर फक्त ६७०५ इतकी आहे. हे औद्योगिक शहर आहे. इथे जवळजवळ ६५०० पेक्षा जास्त कारखाने आहेत. हजारो लोकं वेगवेगळ्या पद्धतीचा व्यवसाय करतात आणि याठिकाणी परवान्याची संख्या फक्त ६७०५ इतकीच सांगितलेली आहे. शासनाने मध्यंतरी एक अध्यादेश काढला होता की, एमआयडीसीमध्ये असणारे उद्योगधंदे यांना महापालिका परवान्याची आवश्यकता नाही. म्हणून ते १५०० परवाने कमी झाले आहेत आणि त्यांची संख्या फक्त ५१२५ एवढीच राहीली आहे. याठिकाणी कडूसकर साहेबांनी हा खुलासा करावा की, एवढ्या मोठ्या शहरात, एवढ्या मोठ्या प्रमाणात औद्योगिकरण झालेले आहे. लहान-मोठे असे जवळजवळ सहा हजारापेक्षा जास्त कारखाने आहेत. हजारो व्यावसायिक या शहरात व्यवसाय करतात. एवढ्याच लोकांना आपण परवाना कसा काय दिला किंवा हा दिलेला परवाना योग्य आहे का नाही याचादेखील खुलासा आपल्याला याठिकाणी करावा लागणार आहे. शहरात व्यवसायिक परवाना धारक फक्त ४९९ आहेत असे आपण याठिकाणी म्हटलेले आहे. पिंपरी असेल, चिंचवडगाव असेल, आकुर्डी असेल, भोसरी असेल, निगडी असेल या संपूर्ण परिसरात स्वतःची अशी वेगळी बाजारपेठ आहे. सगळेजण त्याठिकाणी व्यवसाय करतात. आपल्या विभागाकडून फक्त ४९९ जणांनी व्यवसाय परवाना घेतला आहे. याठिकाणी मला असे म्हणायचे आहे, हा जो आकडा सांगितला आहे, हा बरोबर आहे का. काल तुमच्याशी चर्चा केल्यानंतर तुम्ही आम्हाला सांगितले की, फक्त माल उत्पादन करणा-यांनाच आपण व्यवसाय परवाना देतो. पण जे लोक उत्पादन केलेला माल बाजारात विकतात ते आपल्याकडून परवाना घेत नाहीत. मग असा काही नियम आहे का, याचा देखील याठिकाणी खुलासा आपण केला पाहिजे. वास्तविक पाहता, या शहरात कारखान्यांपेक्षा, उद्योगधंद्यापेक्षा दुकानांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. मोठे-मोठे मॉल या शहरात आहेत आणि हा बनवलेला माल हे लोक विकत असतात. व्यवसाय करत असतात. अशा लोकांनी परवाने घ्यायला पाहिजेत का नाही. जो सामान बनवतो तो व्यवसाय परवाना घेतो. जो सामानाची विक्री करतो तो व्यवसाय परवाना घेत नाही. जो कपडे बनवतो तो व्यवसाय परवाना घेतो. परंतू जो कपड्याची विक्री करतो तो व्यवसाय परवाना घेत नाही. त्यांच्याकडून व्यवसाय परवाना का घेतला जात नाही. याचादेखील आपण खुलासा करावा. अधिक माहिती घेतली असता आपण व्यवसाय परवाना फी कशाप्रकारची आकारतो हे ही आपल्याला सांगितले तर आपण कर्मचा-यांच्यावरती म्हणजे कर्मचारी आधारभूत धरुन आपण परवाना फी आकारतो. कर्मचारी संख्या १ ते ९ असेल तर आपण त्यांच्याकडून रु.४९९/- आकारतो. कर्मचारी १० ते २० असतील तर रु.११९८/- परवाना फी आकारतो. ५०० च्या पुढे कर्मचारी असतील तर रु.२७,९७१/- परवाना फी आकारतो. कर्मचा-यांच्या संख्येनुसार आपण परवाना फी आकारत असालतर मोठमोठ्या मॉलमध्ये शेकडो

कामगार काम करतात. बजाज ऑटो किंवा टेल्को यांच्याकडून परवाना फी घ्यायची असेलतर आपण त्यांच्याकडून फक्त रु.२७,९७१/-रुपयेच आकारणार का. त्याचादेखील खुलासा याठिकाणी केला पाहिजे. या आकारणीमुळे महापालिकेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते आहे यात मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्यामुळे कर्मचारी संख्येनुसार परवाना फी न आकारता ती स्क्वे.फूटानुसार आकारली गेली पाहिजे. यात १ ते १०० स्क्वे.फूटाचे दुकान असेलतर त्याच्याकडून हजार रुपये घेतले पाहिजेत. १०० ते २०० स्क्वे.फूटाचे दुकान असेल त्याच्याकडून २,००० रुपये घेतले पाहिजेत. २०० ते ५०० स्क्वे. फूटाचे दुकान असेलतर त्याच्याकडून ५,००० रुपये परवाना फी घेतली पाहिजे. जेवढे दुकान मोठे, तेवढे त्याचे क्षेत्रफळ मोठे त्याप्रमाणे परवाना फी आकारणी केलीतर निश्चितपणे महापालिकेचे उत्पन्न वाढल्याशिवाय राहणार नाही. आपण वर्षाअखेर फक्त पंधरा लाख रुपये मिळवले आहेत. पंधरा लाख रुपये व्यवसाय आणि उद्योगधंदा परवान्यातून मिळवणे म्हणजे ही खेदाची बाब आहे आपल्याला जास्तीत जास्त मिळवायचे असतील तर आपण स्क्वे.फूटाप्रमाणे आपण जर आकारणी केलीतर आपले उत्पन्न वाढू शकेल. ही आकारणी करणे फार सोप्पे आहे. कारण प्रत्येकजण याठिकाणी टॅक्स भरतो. घराची पावती त्याच्याकडे असते. घराच्या पावतीत त्याचे स्क्वे.फूट किती आहेत याचा उल्लेख त्याठिकाणी असतो. त्याप्रमाणे त्याला करआकारणी करणे सोप्पे जाईल. यात व्यवसाय करणारे, सेवा देणारे अनेक लोक आहेत. जो माणूस किंवा संस्था किंवा कंपनी व्यवसाय करते, त्यांनी कंपल्सरी महापालिकेचा व्यवसाय परवाना घेतला पाहिजे. व्यवसाय परवाना घेत असताना परवाना फी जी असेल ती देखील या लोकांनी भरली पाहिजे. शहरात अनेक डॉक्टर आहेत ते व्यवसाय करतात, अनेक वकील आहेत ते व्यवसाय करतात. सीए आहेत ते देखील व्यवसाय करतात. जो माणूस व्यवसाय करतो त्या प्रत्येक व्यक्तीने महापालिकेची व्यवसाय परवाना फी भरली पाहिजे, असे मत मला याठिकाणी मांडायचे आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, मी परवाना संख्येसंदर्भात जे काही विचारले, तुम्ही संख्येबाबत खुलासा करावा.

**मा.सुरेश म्हेत्रे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागामार्फत उदयोगधंदा, व्यवसाय व साठा परवाना फी बाबतचा विषय मा.महापालिका सभेसमोर आला आहे. महाराष्ट्र शासनाने दि.२४/०४/२०१५ रोजी दिलेल्या आदेशान्वये, एमआयडीसी क्षेत्रातील कारखान्यांना उद्योगधंदा परवाना घ्यावा लागणार नाही. साठा फी मध्ये २ टक्के वाढ तुम्ही मान्य केली आहे. आता मला या साठा फी वर बोलायचे आहे. उद्योगधंदे चार प्रकारचे असतात. टाटा कंपनी असू द्या, बजाज कंपनी असो, छोटे व मोठे उद्योग असू द्यात. परंतू स्क्रॅप डेपोजवळील कुणाकुणाचे स्क्रॅप मग ते प्लॅस्टीक असो किंवा लोखंड असो नाल्यामध्ये बाहेर अगदी ओसंडून वाहत असते. स्क्रॅपवाल्यांचा पार्ट ना पार्ट विकला जातो. त्याचा जो साठा असतो, तो सेल होतो. परंतू उद्योगधंद्यांचा जो साठा असतो, जे रॉ मटेरीयल असते, त्याच्यापासून मॅन्युफॅक्चरींग

प्रोसेसमधून जावे लागते. त्यानंतर जो तयार माल येतो, तो विकला जातो. कच्च्या मालावर त्या किरकोळ विक्रेत्याला किंवा कारखानदाराला काहीही मिळत नाही. याची कृपया नोंद घ्यावी. पण स्क्रॅपवाल्याला त्याच्याकडील साठ्यातून उत्पन्न व नफा मिळतो. परंतू आपल्याकडे त्यांच्याकडून साठा परवाना घेतला जात नाही. मी या विषयावर अनेकदा बोललो आहे, आपल्याकडे याचा डाटा आहे का. यांच्यापासून आपल्याला फार मोठे उत्पन्न मिळेल. आज खरेतर कारखान्याची परिस्थिती पाहिली तर बाजारात मंदी आहे. आपण साठे परवान्याच्या नियमावलीत निश्चितपणे बदल केला पाहिजे. वाढ तर करुच नये. वेगवेगळ्या प्रकारच्या इंडस्ट्रीज आहेत. माझे म्हणणे आहे की, फक्त एमआयडीसीतच नाहीतर जिथे-जिथे इंडस्ट्रीयल झोन डिक्लेअर केले आहेत, अशा ठिकाणीसुद्धा साठे परवाने नाही पाहीजेत. आपल्या महापालिकेतसुद्धा अनेक ठिकाणी इंडस्ट्रीयल बेल्ट आहेत. आपण अशा ठिकाणी सुद्धा परवाने मागू नका. कामगार संख्येनुसार परवाना फी घेण्याचा जो नियम आहे, त्या नियमांत बदल करा. दुसरा एक मुद्दा मांडला आहे की, कमर्शियल शॉपस्. दुकानदाराचे २००/३०० स्क्वे.फूटाचे शॉप असते, कामगार संख्या कमी असते. पण मिळणारा प्रॉफीट जास्त असतो. इंडस्ट्रीवाल्यांची ५,००० ते १०,००० स्क्वे.फूट जागा असते. त्यामानाने आपले मिठाईवाले, त्यांचे दोनशे स्क्वे. फूट जागेत दुकान असते. प्रत्यक्ष परिस्थिती पहा. तिथे काय कमाई आहे किंवा नाही याचा सर्वे करा. उद्योग परवान्यात, साठा परवान्यात कसे बसवायचे ते तुम्ही ठरवा. काही शॉपवाले आपला माल फूटपाथवर ठेवतात. सकाळ पेपरमध्ये रोज मालिका चालू आहे. फूटपाथ सोडून रस्त्यावर सुद्धा, बॉम्बेडाईंगच्या बाहेर सुद्धा, आज हिच परिस्थिती आहे. सकाळ पेपरमध्ये आले होते. प्रत्यक्ष जाऊन पहा. रस्ते रुंद केले आहेत. म्हणून अशा ठिकाणी परवानगी दिलीच नाही पाहिजे. त्यावर शेड असेलतर ती सुद्धा काढली पाहिजे. फूटपाथवरील पत्रे/शीट इतक्या कमी उंचीला असतात, ते कापायची सुद्धा भीती असते. माझ्या वॉर्डमध्ये चला,सकाळ पेपरमधील चित्र पहा. तुम्हाला निश्चितच जाणवेल की, ही परिस्थिती चुकीची आहे. आपण इंडस्ट्रीच्याबाबतीत जरुर हा विचार करावा. कमर्शियल सेक्टर बाबतीत विचार करा. स्कॉडबाबतीत निश्चित विचार करा. मला तुम्हाला एवढेच सांगायचे आहे. धन्यवाद!

**मा.कडूसकर** (सहा.आयुक्त, आकाशचिन्ह व परवाना) - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, प्रथम सन्मा.सदस्यांनी विचारले आहे की, स्क्वेअर फूटने दर करावेत. प्रशासनाकडून जे दर पाठवले होते. आम्ही ज्यावेळी प्रस्ताव तयार करतो होतो, तेव्हा आम्हाला कुठेतरी जाणवत होते. त्यावेळी आम्ही संपूर्ण महापालिकांची माहिती मागवली होती की, कलम २१३ व २७६ अन्वये तुमच्याकडे कशी आकारणी केली जाते. त्याप्रमाणे माहिती मागवली आहे. कुठेतरी हे चुकतेय असे आम्हाला वाटत होते. १ ते ९ कर्मचारी या निकषावर व्हेरीफाय केले जाऊ शकत नाही. ज्यावेळी आम्ही आकारणी करतो, त्यावेळी आम्ही टॅक्स पावती कंपल्सरी घेतो. त्या जागेचे स्क्वे.फूट किती याचाही विचार व्हावा. म्हणून प्रस्ताव तयार करताना स्क्वे.

फूटाप्रमाणेच केले होते. त्याप्रमाणे प्रस्ताव ठेवला होता. त्यानंतर व्यावसायिकांची संख्या इतकी कमी का. कलम ३१३, ३७६ प्रमाणे परवानगी देतो. मनपा अधिनियम प्रकरण १८ मध्ये जेवढे व्यवसाय दिले आहेत, तेवढ्यांनाच परवानगी देता येते. प्रकरण १७,१८ मध्ये जेवढे उद्योग दिले आहेत. त्यांच्याशीच रिलेटेड उद्योग आहेत. त्यांची यादी तयार केली आहे. बाकी उद्योगांना व्यवसाय परवाना लावायचे ठरवले तरी त्यात लिगल कॉम्प्लिकेशन्स तयार होऊ शकतात. ज्या उद्योगांचा उल्लेख प्रकरण १८ मध्ये नाही, त्यांना यात घेतलेले नाही.

**मा.सुलभाताई ऊबाळे**-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सदस्य, कोणकोणत्या उद्योगांचा समावेश प्रकरण १८ मध्ये केला आहे त्यांची नावे सांगावीत.

**मा.कडूसकर**(सहा.आयुक्त, आकाशचिन्ह व परवाना)-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, कोणकोणत्या उद्योगांचा समावेश प्रकरण १८ मध्ये केला आहे त्यांची नावे वाचून दाखवतो. यामध्ये बेकरी व बेकरीचे पदार्थ तयार करणे, धातूंचे ओतकाम करणे, मसाल्याचे पदार्थ तयार करणे व त्याचे पॅकींग करणे, निळीत किंवा अन्य रंगात कापड किंवा सूत रंगवणे, विद्युत विलेपन, मिठाई तयार करणे, मिठाईचे दुकान चालवणे, ओली किंवा वाळलेली कातडी कमवणे,चामडी कमवणे, दाबणे किंवा आवेष्टित करणे, जनावरांच्या आतड्यापासून तयार करणे, वायुमिश्रित पेये बनवणे व त्याचे पॅकिंग करणे (कोल्डड्रींक्स), टाईल्स सिमेंटपासून तयार करणे, कापसाच्या गाद्या, लोड, कुशन तयार करणे, दगडी कोळसा व कोळश्याच्या वस्तू विक्रीस तयार ठेवणे, डांबरापासून वस्तू तयार करणे, डायनामाईटपासून वस्तू तयार करणे, चरबी, शोभेची दारू व त्यापासून फटाके तयार करणे, बर्फ व त्यापासून आइसकँडी तयार करणे, घरगुती वापराव्यतिरिक्त दूग्धजन्य पदार्थ व त्यापासून आइसकँडी तयार करणे, चुना तयार करणे व प्लॅस्टर ऑफ पॅरीसपासून वस्तू तयार करणे काडेच्या पेट्या तयार करणे, कागदापासून वस्तू तयार करण्याचा व्यवसाय, रबर व रबरी वस्तूंचा व्यवसाय, बिडी,सिगारेट, तपकीर तयार करणे, साबण तयार करणे, साखर, खडीसाखर तयार करणे, टार, वनस्पती तेल तयार करणे. बांबू,हाडे,काथ्या,कोळसा,दगडी कोळसा,कोक,चरबी,जळाऊ लाकूड,शोभेची दारू,मासळी सुकी, गोणपाट, ताग, पोती, वाळलेले खोड, चिंध्या, चामडी, इमारती लाकूड,प्लायवूड, लोकर या वस्तूंना आपण व्यवसाय परवाना किंवा साठा परवाना लावतो. हे प्रकरण १८ मध्ये ऍक्टमध्ये दिलेले आहे.

**मा.नारायण बहिरवाडे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सदस्य, विक्री करणा-या व्यावसायिकाला काय करावे लागले. मालाचे उत्पादन करत नाहीत परंतू मालाची विक्री करतात. अशा लोकांना व्यवस्थित परवानगी देत नाहीत. त्यांना सुद्धा यात समाविष्ट करुन घेण्यासाठी किंवा त्यांनी सुद्धा व्यवस्थित परवानगी घ्यावी यासाठी काय करावे लागेल. स्क्रॅपचा व्यवसाय करणारे, सगळे व्यवसाय करणारे यांच्यासाठी काय करणार आहात ते सांगा.

**मा.कडूसकर**(सहा.आयुक्त,आकाशचिन्ह व परवाना)-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, त्यासंदर्भात कुठे लिगल प्रोव्हिजन असेलतर त्यासंदर्भात विचार करुन प्रस्ताव कायदा विभागामार्फत तयार करायचा प्रयत्न करु. मागे ज्या दूर्घटना झाल्या, त्यामुळे स्क्रॅप व्यवस्थेबाबतीत विचार झाला. त्यानंतर सन्माननीय आयुक्त साहेब, राजीव जाधव यांनी सर्वे करायला सांगीतला होता. तिथे टीम तयार केल्या होत्या. परंतू तिथे आपल्याला जाणवले की, तिथे मोठमोठे गोडाऊन्स तयार केले होते. या गोडाऊनची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. आत्तापर्यंत आपले जे कर्मचारी काम करत होते. त्यांच्याकडून सगळे व्यवस्थित प्रयत्न चालले होते. परंतू तिथे लोक माहिती द्यायला टाळाटाळ करतात. सर्वे पूर्ण होत नाही. तिथे व्यावसायिकांची संख्या देखील खूप जास्त आहे. तो प्रॉब्लेमेटीक एरिया आहे. तिथे एक कर्मचारी तिथे जाऊ शकत नाही म्हणून आपण टिम तयार केली होती. लॉ ॲण्ड ऑर्डरचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. म्हणून तिथे विविध प्रकारे सर्वेचे काम चालू आहे.

**मा.सुरेश म्हेत्रे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,आपल्या मिळकत कर विभागाकडून त्यांची यादी मागवा. तिथे कोणाच्यातरी नावाने मिळकत असणार आहे.

**मा.कडूसकर**(सहा.आयुक्त, आकाशचिन्ह व परवाना)-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, जेवढ्या कमर्शियल प्रॉपर्टीज् आहेत त्यांची माहिती मिळकत कर विभागाकडून मागवली आहे. संपूर्ण शहरासाठी आमच्या विभागाकडे फक्त तीन कर्मचारी या कामासाठी आहेत. कामात कुठेतरी सुसुत्रता आणण्यासाठी एफडीए यांच्याकडून माहिती मागवली आहे आपला करसंकलन विभाग आहे. यांच्याकडून स्क्रूटीनी करुन जेवढे उद्योग समाविष्ट करता येतात, त्याप्रमाणे प्रयत्न करतोच आहोत. आमचे सध्या असलेले कर्मचारी सर्वेसाठी गेले आहेत. उपलब्ध असलेल्या कर्मचा-यांकडून हे काम करुन घेतोय. कर्मचारी संख्या कमी आहे. सर्व कर्मचा-यांना ऑफीसचे काम सांभाळून, सर्वेचे काम सांभाळून हे काम करावे लागते आहे.

**मा.सुरेश म्हेत्रे**-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, तुमच्याकडे जेवढ्या मिळकतींच्या नोंदी आहेत, तेवढ्यांना सरसकट लावून टाका.

**मा.कडूसकर**(सहा.आयुक्त, आकाशचिन्ह व परवाना)-एक कंपाऊंड तीन मीटरचा असतो.

**मा.सुरेश म्हेत्रे**- एक कंपाऊंड किती मीटरचा असतो, तो कितीही मीटरचा असू द्या. तीन/चार मीटरचा असू द्यात. सर्वेनुसार नंतर काम करुन घ्या.

**मा.कडूसकर**(सहा.आयुक्त, आकाशचिन्ह व परवाना)-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, हे स्क्रॅप वेंडर्स आहेत. त्यांच्याकडून आपण यात एमपीसीबी यांचा परवाना कंपल्सरी घेतो. कारण त्या स्क्रॅपमध्ये आतमध्ये काहीही असते. धोकादायक वस्तू असेलतर त्यासाठी एमपीसीबीचा परवाना व फाईल असणे गरजेचे आहे.

**मा.सुरेश म्हेत्रे**- तुमच्या माहितीसाठी म्हणून सांगतो, ते कुठलेही परवाने काढत नाहीत. बेकायदेशीरपणे काम चालू आहे. त्यांना कुठे बँक लोन सुद्धा काढायचे नसते. त्यांना कोणतेही

लिगल पेपर लागत नाहीत. प्लॅस्टीकचे केमिकलचे बॅलर इंद्रायणी नदीत, नाल्यात ओतले जातात. कुदळवाडीतच आगीचे प्रकार सगळ्यात जास्त होतात. साठा परवाना घेत नाहीत. या भानगडींमुळे तिथे वारंवार आग लागते. अनेक दुकाने त्या आगीत जळतात. भीती वाटते म्हणून आपले कर्मचारी तिथे जात नाहीत, असे म्हणून चालणार नाही.

**मा.कडूसकर**(सहा.आयुक्त, आकाशचिन्ह व परवाना)- आमचा सर्वे सुद्धा चालू आहे. माझ्या माहितीप्रमाणे जवळपास १२०० लोक आयडेंटीफाय केले आहेत. या लोकांनी परवाना घेतला आहे का नाही याची संपूर्ण माहिती अद्ययावत करायचे काम चालू आहे हा सर्वे कम्प्लिट करायला अजून १५/२० दिवस लागतील. तो सर्वे कम्प्लिट झालातर जेवढे लोक आहेत, त्यांना नोटीस पाठवून संबंधितांची फाईल तयार करुन घेणे शक्य होईल.

**मा.सुरेश म्हेत्रे**-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, या इंडस्ट्रीयल भागामध्ये चोरीचे प्रमाण खूप आहे. देहू-आळंदी हा रस्ता चांगला मोठा आहे. तिथे सुद्धा स्क्रॅपचे प्रमाण वाढत चालले आहे. प्लॅस्टीक किंवा इतर कचरा रात्री जाळून टाकतात. कॉपर काढण्यासाठी प्लॅस्टीकच्या वायरी जाळून टाकतात. त्यातून धूर निर्माण होतो. केमिकलचा इतका वास येत असतो. मोशी, जाधववाडी, कुदळवाडी परिसरात राहणारे नागरीक त्रासले आहेत. जेवढा कायदेशीर परवाना घेता येईल तेवढा घ्यावा. नाहीतर केवळ कुदळवाडी भागासाठी स्वतंत्र अग्निशामक विभागाचे केंद्र उभे करावे लागेल. आपला पैसा जातोच आहे. तुमची अडचण काय आहे ही वस्तुस्थिती सभागृहापुढे मांडा

**मा.अमिना पानसरे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा.सुजाता टेकवडे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक -८६५ | विषय क्रमांक - ८ |
| दिनांक- २०.५.२०१६ | विभाग - मा.आयुक्त |

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आप/२/कावि/१५३/२०१६, दि.०९/०२/२०१६

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.६२ दि.१.०४.२०१६

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.८४७ दि.२०/४/२०१६

विषय क्रमांक ८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- ९

दिनांक - २०.५.२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/७/कावि/६१/२०१६,
दि.१२/०२/२०१६
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.६३ दि.१.०४.२०१६
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.८४८ दि.२०/४/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपलिकेने मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 चे कलम 454 सह 457 (3) मधील तरतुदी नुसार महानगरपालिकेस नेमणुकीचे अधिकार असलेल्या जागांसाठी आवश्यक असेलेली शैक्षणीक पात्रतेबाबतचे “पिंपरी चिंचवडमहानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2010” नियम तयार केलेले होते. त्यांस मा.महापालिका सभा ठराव क्रमांक 1113 दिनांक 18/03/2011 अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर नियमांचा मसुदां पत्र क्रमांक प्रशा/1अ/कावि/533/2011 दिनांक 02/05/2011 च्या नोटीसान्वये प्रसिध्दी करुन हरकती मागविण्यात आल्या होत्या. त्या नुसार एकुण 162 हरकती व सुचना प्राप्त झाल्या आहेत. सदर हरकती बाबत विचार होउन सदरचे नियम अंतिम मंजुरीसाठी दिनांक 17/10/2013 अन्वये मा. विधी समितीकडे सादर करण्यात आले होते. तथापी शासन निर्णय क्रमांक : एमसीओ 2014/प्र.क्र.153/नवि 14 दि. 01 सप्टेंबर 2014 अन्वये महानगरपालिकांचे सुधारीत वर्गीकरण करण्यात आले असुन त्यानुसार “पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा समावेश “ब” वर्गात झाल्याने त्या प्रमाणे आकृतीबंधासह सेवा प्रवेश नियम “ब” वर्ग पुणे महानगरपालिकेच्या मंजूर सेवा प्रवेश नियमाच्या नमुन्यामध्ये तयार करुन सादर करण्याच्या सुचना मा. शासनाकडुन सुचना दिलेल्या आहे. त्यामुळे पत्र क्रमांक प्रशा/7/कावि/621/2014 दि. 01/09/2014 अन्वये सदरील प्रस्ताव दुरुस्तीकामी मा.विधी समिती कडुन मागे घेण्यात आला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2010 हे अधिकारी/कर्मचारी यांच्या श्रेणी/गट निहाय तयार करण्यात आले होते. तथापि पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2016 हे प्राप्त हरकती वरील अभिप्रायासह विभागाच्या आकृतीबंधाचा समावेश करुन तयार करण्यात आलेले आहेत. सदरचे नियम परिशिष्ट 1 ते 3, प्रत्येक विभागाची पदनिहाय मंजुर पदांची माहिती व प्रस्तावित आकृतीबंध

यासह सादर करण्यात आले आहेत. “पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2010” आता पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2016 मधील परिशिष्ट 1 ते 3 (सेवा भरती करतांना अनुसरावयाची कार्यपध्दती अधिकारी व कर्मचा-यांच्या पदांसाठी शैक्षणीक व इतर अर्हता, अधिकारी व कर्मचारी यांसाठी विभागीय परिक्षा नियम), विभागनिहाय प्रस्तावित आकृतीबंध यांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५४ सह ४५७ (३) अन्वये मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे प्रस्तावित आकृतीबंधातील “प्रपत्र अ ग्रेड पे” यामध्ये खाली नमुद केलेप्रमाणे ग्रेड पे चा समावेश करुन त्यास एकत्रितपणे मान्यता देणेत येत आहे.

**प्रपत्र “अ”**

**नवीन निर्माण करावयाची पदे/ग्रेड पे**

**गट “अ”**

| अ.क्र. | पदनाम | नवीन आवश्यक पद संख्या | वेतनश्रेणी | ग्रेड पे |
|---|---|---|---|---|
| १ | अतिरिक्त आयुक्त | ----- | १५६००-३९१०० | ७९०० |
| २ | शहर अभियंता | ----- | १५६००-३९१०० | ७९०० |
| ३ | सह आयुक्त | ----- | १५६००-३९१०० | ७६०० |
| ४ | मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी | ---- | १५६००-३९१०० | ७६०० |
| ५ | मुख्य अग्निशमन अधिकारी | ----- | १५६००-३९१०० | ७६०० |
| ६ | विकास अभियंता, दुरसंचार | --- | १५६००-३९१०० | ७६०० |
| ७ | नगरसचिव | ----- | १५६००-३९१०० | ६९०० |
| ८ | चिफ केमिस्ट | ----- | १५६००-३९१०० | ६६०० |
| ९ | मुख्य पशुसंवर्धन अधिकारी | ---- | १५६००-३९१०० | ६६०० |
| १० | मुख्य सुरक्षा अधिकारी | ------ | १५६००-३९१०० | ६६०० |
| ११ | माहिती व तंत्रज्ञान अधिकारी | ----- | १५६००-३९१०० | ६६०० |
| १२ | उपमुख्य अग्निशमन अधिकारी | ----- | १५६००-३९१०० | ६६०० |
| १३ | मुख्य समाज विकास अधिकारी | ---- | १५६००-३९१०० | ६६०० |

**प्रपत्र “अ”**

**नवीन निर्माण करावयाची पदे**

**गट “ब”**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | कॉम्प्युटर प्रोग्रामर | ----- | १५६००-३९१०० | ५४०० |
| २ | क्रिडा अधिकारी | ------ | ९३००-३४८०० | ५४०० |
| ३ | मुख्य गाळणी निरिक्षक | ----- | ९३००-३४८०० | ५४०० |
| ४ | विभागीय अग्निशमन अधिकारी (डिव्हीजनल फायर ऑफीसर) | ----- | ९३००-३४८०० | ४८०० |
| ५ | वरिष्ठ दुरसंचार अधिकारी | ---- | ९३००-३४८०० | ४८०० |
| ६ | क्रीडा पर्यवेक्षक | ----- | ९३००-३४८०० | ४६०० |
| ७ | सहाय्यक विभागीय अग्निशमन अधिकारी(असिस्टंट डिव्हीजनल फायर ऑफीसर) | ----- | ९३००-३४८०० | ४६०० |
| ८ | कनिष्ठ दुरसंचार अधिकारी (दुरध्वनी) | ---- | ९३००-३४८०० | ४६०० |

**प्रपत्र "अ"**

**ग्रेड पे व नवीन निर्माण करावयाची पदे**

**गट "क"**

| अ.क्र. | पदनाम | नवीन आवश्यक पद संख्या | वेतनश्रेणी | ग्रेड पे |
|---|---|---|---|---|
| १ | अग्निशमन केंद्र अधिकारी (स्टेशन ड्युटी ऑफीसर) | ----- | ९३००-३४८०० | ४४०० |
| २ | दुरध्वनी पर्यवेक्षक | ----- | ९३००-३४८०० | ४४०० |
| ३ | सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी (असिस्टंट स्टेशन ड्युटी ऑफीसर) | ----- | ९३००-३४८०० | ४१०० |
| ४ | चालक तथा यंत्र चालक / ड्रायव्हर ऑपरेटर (फायर इंजिन ड्रायव्हर) | ----- | ५२००-२०२०० | ३१०० |
| ५ | लिडिंग फाय़रमन | ----- | ५२००-२०२०० | २८०० |
| ६ | फायरमन | ---- | ५२००-२०२०० | २४०० |

वरील प्रमाणे नवीन वेतनश्रेणी व मंजूर पदांचे सुधारित वेतनश्रेणीस मान्यता देणेत येत आहे. तसेच मा.महापालिका सभेच्या मान्यतेनुसार मुळ प्रस्तावात आवश्यक ते बदल करुन प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मान्यता देण्यात येत आहे तसेच -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे प्रस्तावित (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१६ अंतर्गत खालील प्रमाणे नवीन पदनिर्मिती, संवर्ग, पदनाम/पदांची संख्या/वेतनश्रेणी, नेमणूकीची पध्दत व टक्केवारी, नेमणूकीकरीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती तयार करण्यात यावी.

| अ.क्र. | संवर्ग | पदनाम / पदांची संख्या / वेतनश्रेणी | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती |
|---|---|---|---|---|
| १ | प्रशासकीय सेवा गट-अ | विशेष अधिकारी पद-१ १५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० | पदोन्नतीने १००% | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाकडील कोणत्याही शाखेची पदवी<br>२) पत्रकारिता व जनसंज्ञापन (Journalism & Mass Communication) या विषयातील पदवी/पदवीका परिक्षा उर्तीर्ण<br>३) महानगरपालिका आस्थापनेवरील माहिती व जनसंपर्क अधिकारी या संवर्गातील ३ वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| २ | तांत्रिक सेवा गट - अ | कार्यकारी अभियंता (दूरसंचार) पद-१ १५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० | पदोन्नती १००% | महानगरपालिका अस्थापनेवरील उपअभियंता (दूरसंचार) पदावरील पदवीधारक असल्यास किमान 3 वर्षाचा अनुभव आणि पदविकाधारक असल्यास किमान 5 वर्षाचा अनुभव असणा-या अधिका-यांमधून सेवाज्येष्ठतेचा विचार करून (सदर पदामध्ये वायरलेस इनचार्ज पदाचे समायोजन करून रिक्त झाल्यानंतरच्या पदासाठी) |
| ३ | तांत्रिक सेवा गट - ब | वरिष्ठ दूरसंचार अधिकारी पद-१ ९३००-३४८०० ग्रेड पे ४८०० | पदोन्नती १००% | १) कनिष्ठ दूरसंचार अधिकारी या पदावर किमान ५ वर्षाचा अनुभव. |
| ४ | तांत्रिक सेवा गट - क | कनिष्ठ दूरसंचार अधिकारी (दूरध्वनी) पद-१ ९३००-३४८०० ग्रेड पे ४६०० | पदोन्नती १००% | १) दुरध्वनी पर्यवेक्षक या पदावर किमान ३ वर्षाचा अनुभव. |
| ५ | तांत्रिक सेवा गट - ब | मुख्यगाळणी निरीक्षक पद - १ | पदोन्नती १००% | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाकडील शास्त्र शाखेचा रसायनशास्त्र विषय घेऊन उत्तीर्ण झालेला पदवीधर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ९३००-३४८०० ग्रेड पे ५४०० | | २) पाणी पुरवठा केंद्रातील मशिन व उपकरणे हाताळण्याचा किमान एक वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य |
| ६ | प्रशासकीय सेवा गट-ब | कुस्ती कोच<br>पद-१<br>९३००-३४८०० ग्रेड पे ४६०० | पदोन्नती १००% | १) बी.ए.,बी.एड. (फिजिकल), एन.आय.एस. (कुस्ती खेळ)<br>२) महापालिका आस्थापनेवरील ७ वर्षाचा अनुभव आवश्यक<br>३) महापालिकेच्या अर्हताधारक कर्मचा-यांच्या एकत्रित सेवाज्येष्ठतेच्या अधिन |
| ७ | वैद्यकीय सेवा गट-ब | सहाय्यक आरोग्य अधिकारी (दंत) पद-१<br>९३००-३४८०० ग्रेड पे ५४०० | पदोन्नती १००% | मान्यता प्राप्त विद्यापीठाकडील B.D.S. पदवी, मान्यता प्राप्त विद्यापीठाकडील MDS हि पदव्युत्तर पदवी व ३ वर्षे कामकाजाचा अनुभव व इंडियन डेंटल कौंन्सिल कडील रजिस्टेशन आवश्यक असावे. |
| ८ | तांत्रिक सेवा गट-ब | उपप्राचार्य (आयटीआय)<br>पद- १<br>१५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची यांत्रिकी/विद्युत अभियांत्रिकी शाखेची पदवी अथवा ए.एम.आय.ई अ व ब परिक्षा उत्तीर्ण<br>२) उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील तांत्रिक शिक्षण संस्थेमधील किमान गटनिदेशक पदावरील अद्यापनाचा अथवा शासकीय/निमशासकीय उद्योगातील अथवा संस्थेकडील पर्यवेक्षकीय पदाचा ३ वर्षाचा अनुभव आवश्यक |
| | | | पदोन्नतीने १००% | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची यांत्रिकी/विद्युत अभियांत्रिकी शाखेची पदवी अथवा ए.एम.आय.ई अ व ब परिक्षा उत्तीर्ण<br>२) महानगरपालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत गटनिदेशक पदावरील ३ वर्षाचा अनुभव |
| ९ | तांत्रिक सेवा गट-ब | सेवा नियोजन अधिकारी ( प्लेंसमेंट ऑफीसर)<br>पद- १<br>१५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची यांत्रिकी/विद्युत अभियांत्रिकी शाखेची पदवी अथवा ए.एम.आय.ई अ व ब परिक्षा उत्तीर्ण.<br>२) उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील तांत्रिक शिक्षण संस्थेमधील किमान गटनिदेशक पदावरील अद्यापनाचा अथवा शासकीय/निमशासकीय उद्योगातील अथवा संस्थेकडील पर्यवेक्षकीय पदाचा ३ वर्षाचा अनुभव आवश्यक |
| | | | पदोन्नती १००% | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची यांत्रिकी/विद्युत अभियांत्रिकी शाखेची पदवी अथवा ए.एम.आय.ई. अ व ब परिक्षा उत्तीर्ण. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | २) महानगरपालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत गटनिदेशक पदावरील ३ वर्षाचा अनुभव |
| १० | तांत्रिक सेवा गट-अ | आर्ट ऑफीसर<br>पद- १<br>१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० | पदोन्नती १००% | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाची फाईन आर्ट विषयातील पदवी,<br>२) आर्टिस्ट या पदावरील 3 वर्षाचा अनुभव असणा-या सेवाज्येष्ठ कर्मचा-यांमधून, संगणक चालविण्याचा अनुभव |
| ११ | तांत्रिक सेवा गट-ब | आर्टीस्ट्र<br>ग्रेड-१<br>९३००-३४८०० ग्रेड पे ५४०० | पदोन्नती १००% | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाची फाईन आर्ट विषयातील पदवी,<br>२) आर्टिस्ट कम फोटोग्राफर या पदावरील ५ वर्षाचा अनुभव असणा-या सेवाज्येष्ठ कर्मचा-यांमधून, संगणक चालविण्याचा अनुभव |
| १२ | तांत्रिक सेवा गट-अ | विकास अभियंता<br>(दुरसंचार)<br>१५६००-३९१०० ग्रेड पे ७६०० | पदोन्नती १००% | १) सांविधिक विद्यापीठाची इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन शाखेची पदवी/पदविका उत्तीर्ण.<br>२) शासन मान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील १२ वी शास्त्र नंतरचा २ वर्षाचा पदविका शासन तंत्रशिक्षण मंडळाकडील डब्ल्यू.एम.सी.ओ. पदविका समकक्ष कोर्स उत्तीर्ण<br>३) वायरलेस इनचार्ज पदावरील महानगरपालिका सेवेतील ५ वर्षाचा कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव. |

वरील प्रमाणे नवीन पदनिर्मिती, संवर्ग, पदनाम/पदांची संख्या/वेतनश्रेणी, नेमणूकीची पध्दत व टक्केवारी, नेमणूकीकरीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दतीस मान्यता देणेत येत आहे. तसेच मा.महापालिकेच्या मान्यतेनुसार मुळ प्रस्तावात आवश्यक ते बदल करुन प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मान्यता देण्यात येत आहे तसेच -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे प्रस्तावित (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१६ अंतर्गत खालील पदांची निर्मिती व पदांच्या संख्येत वाढ करण्यास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | विभाग | पदनाम | प्रस्तावित पदांची संख्या | वाढ | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्थापत्य मुख्यालय | सह शहर अभियंता (स्थापत्य) | ० | १ | १ |
| २ | माहिती व तंत्रज्ञान विभाग | कॉम्प्युटर ऑपरेटर | २ | ४ | ६ |
| ३ | स्थापत्य मुख्यालय (BRTS प्रकल्प) | कार्यकारी अभियंता | १ | ३ | ४ |
| | | उपअभियंता | ३ | ६ | ९ |
| | | कनिष्ठ अभियंता | ६ | ६ | १२ |
| ४ | सुरक्षा विभाग | उपलेखापाल | १ | १ | २ |
| ५ | मध्यवर्ती भांडार विभाग | भांडार नियंत्रक | ० | १ | १ |
| ६ | वैद्यकीय (YCMH सह) | सहाय्यक आरोग्य अधिकारी (दंत) | ० | १ | १ |
| | | मायक्रोबॉयोलॉजिस्ट | १ | १ | २ |
| | | असिस्टंट मेट्रन | ५ | २ | ७ |
| | | लेखाधिकारी | १ | १ | २ |
| | | बायोमेडीकल इंजिनिअर | १ | १ | २ |
| | | ब्लड बँक टेक्नीशिअन | ७ | २ | ९ |
| | | एक्स रे टेक्नीशिअन | २४ | ६ | ३० |
| | | ए.एन.एम. | ९५ | ५ | १०० |
| | | कॉम्प्युटर ऑपरेटर | ४ | १ | ५ |
| ७ | आय.टी.आय. मोरवाडी | उपप्राचार्य | ० | १ | १ |
| | | प्लेसमेंट अधिकारी | ० | १ | १ |
| ८ | यांत्रिकी विभाग | उपअभियंता यांत्रिकी | २ | १ | ३ |
| ९ | अग्निशमन विभाग | प्रमुख अग्निशमन विमोचक | ३६ | ४ | ४० |
| | | चालक तथा यंत्र चालक | ४८ | २ | ५० |
| | | अग्निशमन विमोचक / फायरमन रेस्क्युअर | २०० | ८० | २८० |
| | | मुख्य लिपिक | १ | १ | २ |
| | | सहाय्यक भांडारपाल | ० | १ | १ |
| | | वाहन चालक | ५ | १ | ६ |
| | | कॉम्प्युटर ऑपरेटर | २ | १ | ३ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १० | विद्युत मुख्यालय (दुरसंचार सह) | सह शहर अभियंता, विद्युत | १ | १ | २ |
| | | विकास अभियंता (वि/यां) | ० | १ | १ |
| | | कार्यकारी अभियंता, दुरसंचार | ० | १ | १ |
| | | उपअभियंता, दुरसंचार | १ | १ | २ |
| | | वरिष्ठ दुरसंचार अधिकारी | ० | १ | १ |
| | | कनिष्ठ अभियंता, दुरसंचार | १ | ७ | ८ |
| | | कनिष्ठ दुरसंचार अधिकारी | १ | १ | २ |
| | | कनिष्ठ दुरसंचार अधिकारी, दुरध्वनी | ० | १ | १ |
| ११ | क्रिडा विभाग | क्रिडा पर्यवेक्षक | ७ | ५ | १२ |
| | | कुस्ती कोच | ० | १ | १ |
| १२ | नगरसचिव विभाग-विधी समिती कार्यालय | कॉम्प्युटर ऑपरेटर | ० | १ | १ |
| १३ | माहिती व जनसंपर्क विभाग | विशेष अधिकारी | ० | १ | १ |
| | | आर्ट ऑफीसर | ० | १ | १ |
| | | आर्टीस्ट | ० | १ | १ |
| १४ | पाणी पुरवठा विभाग, सेक्टर-२३ | मुख्य गाळणी निरीक्षक | ० | १ | १ |
| १५ | औद्योगिक प्रशिक्षण संस्था | उपप्राचार्य | ० | १ | १ |
| | | सेवा नियोजन अधिकारी (प्लेंसमेंट ऑफीसर) | ० | १ | १ |

वरील प्रमाणे नवीन पदनिर्मिती, मंजुर पदांच्या संख्येत वाढ करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मा.महापालिकेच्या मान्यतेनुसार मुळ प्रस्तावात आवश्यक ते बदल करुन प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मान्यता देण्यात येत आहे तसेच -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे प्रस्तावित (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१६ परिशिष्ट-२ मध्ये संबंधित पदाचे अनुक्रमांकापुढे नमुद मुळ अर्हतेऐवजी खाली नमुद केल्याप्रमाणे सुधारित अर्हता व दुरूस्ती नमुद करुन सुधारित अर्हतेसह मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती |
|---|---|---|---|---|
| २ | प्रशासकीय सेवा गट- अ | अतिरिक्त आयुक्त १५६००-३९१०० ग्रेड पे ७९०० | पदोन्नती | १) बदल नाही<br>२) बदल नाही<br>३) मागील ५ वर्षातील अभिलेखापैकी किमान ४ गोपनीय अहवाल अत्युत्कृष्ठ दर्जाचे असणे आवश्यक. या पात्रतेनुसार ५अधिका-यांच्या नावाचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात यावा. शासन स्तरावरील निवड समिती प्रस्तावाची छाननी करून नियुक्त करावायाच्या अधिका-याची शिफारस करेल. पदोन्नतीने उमेदवार उपलब्ध न झाल्यास हे पद भारतीय प्रशासन सेवेतील अधिका-यांमधून प्रतिनियुक्तीने भरण्यात येईल. |
| | | | प्रतिनियुक्ती | उर्वरित १ पद भारतीय प्रशासन सेवेतील अधिका-यांमधून प्रतिनियुक्तीने भरण्यात येईल. उपलब्ध न झाल्यास राज्यशासन सेवेतील ७ वर्षाचा अनुभव असणा-या उपजिल्हाधिकारी/अप्पर जिल्हाधिकारी किंवा मुख्याधिकारी अ-निवडश्रेणी संवर्गातील अधिका-यांमधून भरणे. |
| ३ | प्रशासकीय सेवा गट- अ | उप आयुक्त १५६००-३९१०० ग्रेड पे ६९०० | पदोन्नतीने ७५ %<br>प्रतिनियुक्ती २५ % | बदल नाही |
| ४ | प्रशासकीय सेवा गट- अ | सहाय्यक आयुक्त | पदोन्नती ७५ % | बदल नाही |
| | | | प्रतिनियुक्ती २५ % | बदल नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | प्रशासकीय सेवा गट- ब | प्रशासन अधिकारी | नामनिर्देशन ० % | वगळणे |
| | | | पदोन्नती १०० % | बदल नाही |
| ८ | प्रशासकीय सेवा गट– क | मुख्य लिपिक/कॉम्प्युटर ऑपरेटर<br>स्वीय सहाय्यक मा.महापौर/स्वीय सहाय्यक मा.उपमहापौर/स्वीय सहाय्यक मा.अध्यक्ष स्थायी समिती/स्वीय सहाय्यक मा.सभागृह नेता / स्वीय सहाय्यक मा.विरोधी पक्षनेता/स्वीय सहाय्यक-मा.सभापती विधी समिती /<br>व्यवस्थापक प्रेक्षागृह | पदोन्नती १००% | १) महानगरपालिका आस्थापनेवरील लिपिक संवर्गातील कामकाजाचा ३ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>२) महानगरपालिका आस्थापनेवरील कॉम्प्युटर ऑपरेटर या पदासाठी विहीत केलेली अर्हता धारण करणे आवश्यक.<br>व्यवस्थापक प्रेक्षागृह- नाट्यशास्त्र पदविका व व्यवस्थापन मॅनेजमेंट कोर्स आवश्यक |
| १० | प्रशासकीय सेवा | लघुलेखक (उच्चस्तर) | पदोन्नती १०० % | १) इयत्ता १२ वी उत्तीर्ण<br>२) बदल नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | गट- ब | | | ३) बदल नाही |
| १७ | तांत्रिक सेवा गट-अ | शहर अभियंता १५६००-३९१००-७९०० | पदोन्नतीने १००% | १) बदल नाही<br>२) वगळणे<br>३) बदल नाही |
| २० | तांत्रिक सेवा गट-ब | उपअभियंता | नामनिर्देशन ० % | वगळणे |
| | | | पदोन्नती १००% | १) बदल नाही<br>२) बदल नाही |
| २१ | तांत्रिक सेवा गट-क | कनिष्ठ अभियंता | नामनिर्देशन ७५% | १) बदल नाही |
| | | | पदोन्नती २५% | १) महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील प्लंबर, सर्व्हेअर व स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदावरील पदवीधारक असल्यास ३ वर्षे व पदविकाधारक असल्यास ५ वर्षे अनुभव असणे आवश्यक, आय.टी.आय असल्यास ७ वर्षे अनुभव आवश्यक तसेच कनिष्ठ अभियंता नामनिर्देशन पदाची शैक्षणिक अर्हता धारण करीत असलेले मनपातील वर्ग-३ मधील ७ वर्षे सेवा पुर्ण झालेले कर्मचारी<br>२) वगळणे |
| २२ | तांत्रिक सेवा गट-क | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | नामनिर्देशन ७५% | १) बदल नाही |
| | | | पदोन्नती २५ % | १) नामनिर्देशनातील विहित केलेली अर्हता धारक करणा-या महानगरपालिकेतील आस्थापनेवरील कर्मचारी |
| २७ | तांत्रिक सेवा गट-क | गाळणी ऑपरेटर | नामनिर्देशन १०० % | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील रसायनशास्त्र शाखेची पदवी. |
| ३४ | शहर विकास सेवा | सहा. नगररचनाकार | नामनिर्देशन ५० % | १) बदल नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | गट- क | | | |
| | | | पदोन्नतीने ५० % | १) नामनिर्देशनाची अर्हता धारण करणा-या महापालिका कर्मचा-यांच्या एकत्रित सेवा ज्येष्ठतेने<br>२) पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास नामनिर्देशनाने भरणेत यावी. |
| ३८ | तांत्रिक सेवा गट-अ | मुख्य वास्तुशास्त्रज्ञ / कार्यकारी अभियंता (संरचना अभियांत्रिकी) | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील वास्तुशास्त्र शाखेची अर्बन डिझाईन विषयातील एम.आर्च. ही पदव्युत्तर पदवी किंवा संरचना अभियांत्रिकी (Structural Engineering) शाखेची पदव्युत्तर पदवी.<br>२) सदर कामाकाजाचा ५ वर्षाचा अनुभव आवश्यक |
| | | | पदोन्नतीने १००% | १) वगळणे<br>२) महानगरपालिका आस्थापनेवरील उप अभियंता (Structural Engineering) किंवा वास्तुशास्त्रज्ञ संवर्गातील, वास्तुशास्त्र शाखेची अर्बन डिझाईन विषयातील एम. आर्च ही पदव्युत्तर पदवी किंवा संरचना अभियांत्रिकी (Structural Engineering) शाखेची पदव्युत्तर पदवी धारण करणा-या अभियंत्या मधून.<br>३) वास्तुशास्त्रज्ञ/उपअभियंता पदाचा ३ वर्षाचा अनुभव आवश्यक |
| ३९ | तांत्रिक सेवा गट-ब | वास्तुशास्त्रज्ञ / उपअभियंता (संरचना अभियांत्रिकी) | नामनिर्देशन २५% | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील वास्तुशास्त्रज्ञ शाखेची अर्बन डिझाईन विषयातील बी. आर्च. ही पदवी किंवा संरचना अभियांत्रिकी (Structural Engineering) शाखेची पदव्युत्तर पदवी. |
| | | | पदोन्नती ७५% | १) महानगरपालिका आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता संवर्गातील संरचना अभियांत्रिकी (Structural Engineering) शाखेची पदव्युत्तर पदवी धारण करणा-या अभियंत्यामधून.<br>२) महानगरपालिका आस्थापनेवरील ३ वर्षाचा अनुभव आवश्यक |
| ४२ | तांत्रिक सेवा गट-ब | उपअभियंता (यांत्रिकी) | नामनिर्देशन ० % | वगळणे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | पदोन्नतीने १००% | बदल नाही |
| ५९ | तांत्रिक सेवा गट-ब | उपअभियंता विद्युत | नामनिर्देशन ० % | वगळणे |
| | | | पदोन्नतीने १००% | बदल नाही |
| ६० | तांत्रिक सेवा गट-क | कनिष्ठ अभियंता (विद्युत) | नामनिर्देशन ५०% | बदल नाही |
| | | | पदोन्नती ५०% | १) बदल नाही |
| ६७ | तांत्रिक सेवा गट-ब | उपअभियंता (दुरसंचार) | पदोन्न्ती १००% | महानगरपालिका आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन पदवी/पदवीका आवश्यक) या पदावरील किमान ३ वर्षाचा अनुभव असणा-या अभियंत्यांच्या सेवाज्येष्ठतेचा विचार करून. |
| ६९ | तांत्रिक सेवा गट-क | कनिष्ठ अभियंता (दुरसंचार) | नामनिर्देशन ५०% | १) महानगरपालिका आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन) पदवी/पदवीका आवश्यक<br>२) शासकीय निमशासकीय स्थानिक स्वराज्य संस्थेकडील वायरलेस ऑपरेटर अथवा त्यापेक्षा वरिष्ठ पदावरील किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक |
| | | | पदोन्नती ५०% | १) बदल नाही<br>२) नामनिर्देशनाची अर्हता धारण करणा-या वायरलेस ऑपरेटर किंवा मनपा आस्थापनेवरील इतर पदावरील किमान ३ वर्षाचा अनुभव असणा-या कर्मचा-यांमधून पदोन्नतीने (नामनिर्देशनाची अर्हता धारण करणा-या वायरलेस ऑपरेटर पदाचे समायोजन करून रिक्त झालेल्या पदासाठी) |
| ७२ | तांत्रिक सेवा गट-ब | माहिती व तंत्रज्ञान अधिकारी | नामनिर्देशन ०% | १) वगळणे |
| | | | पदोन्नती १००% | बदल नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७४ | तांत्रिक सेवा गट-क | कॉम्प्युटर ऑपरेटर | नामनिर्देशन ७५% | १) बदल नाही |
| | | | पदोन्नती २५% | १) पदोन्नतीसाठी नामनिर्देशन प्रमाणे नेमणूकी करीता अर्हता आवश्यक<br>२) महानगरपालिका आस्थापनेवरील अर्हताधारण करणा-या गट-क व गट-ड मधील कर्मचा-यांच्या एकत्रित सेवाज्येष्ठतेमधून |
| ७५ | लेखा सेवा गट-अ | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | पदोन्नती १००% | १) महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी या संवर्गातील किमान ३ वर्षाचा अनुभव |
| ७७ | लेखा सेवा गट- ब | लेखाधिकारी | नामनिर्देशन २५% पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास | बदल नाही |
| ८७ | प्रशासकीय सेवा गट- क | सहाय्यक माहिती व जनसंपर्क अधिकारी/सहाय्यक राज शिष्टाचार अधिकारी (प्रोटोकॉल ऑफिसर) | नामनिर्देशन २५%<br>पदोन्नती ७५% | १ ते ५ बदल नाही<br>१) नामनिर्देशनाची अर्हता धारण करणा-या महानगरपालिका आस्थापनेवरील गट-क मधील एकत्रित सेवाज्येष्ठतेने |
| ९० | प्रशासकीय सेवा गट- क | सहाय्यक ग्रंथपाल | नामनिर्देशन ५०%<br>पदोन्नती ५०% | १ ते २ बदल नाही<br>ग्रंथपाल शासनाकडील पदवी / पदवीका ही अर्हता धारन करणा-या मनपा आस्थापनेवरील गट क व ड मधील कर्मचा-यांच्या एकत्रित सेवाज्येष्ठता मधून |
| १०९ | प्रशासकीय सेवा गट- अ | मुख्य कामगार कल्याण अधिकारी | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १ ते २ बदल नाही |
| | | | पदोन्नती १०० % | बदल नाही |
| ११० | प्रशासकीय सेवा गट- ब | कामगार कल्याण अधिकारी | नामनिर्देशन | १ ते २ बदल नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११९ | सुरक्षा सेवा गट-अ | मुख्य सुरक्षा अधिकारी (<u>पुरुष</u>) पद – १ वेतनश्रेणी १५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० | (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास ) नामनिर्देशन | १) बदल नाही<br>२) बदल नाही<br>३) बदल नाही<br>४) <u>वगळणे</u> |
| | | | पदोन्नती १००% | १) बदल नाही<br>२) बदल नाही |
| १२० | सुरक्षा सेवा गट - ब | सुरक्षा अधिकारी (<u>पुरुष</u>) | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १) बदल नाही<br>२) बदल नाही<br>३) बदल नाही<br>४) <u>वगळणे</u> |
| | | | पदोन्नती १००% | १) बदल नाही<br>२) बदल नाही<br>३) <u>लष्कर, निमलष्करी दलातील सेवानिवृत्त सुभेदार/नायब सुभेदार किंवा या पदाशी समकक्ष इतर पदे अथवा पोलीस दलातील पोलीस निरिक्षक या पदावरिल किमान ३ वर्षाची अनुभव असणे आवश्यक</u> |
| १२१ | सुरक्षा सेवा गट-ब | सहाय्यक सुरक्षा अधिकारी (<u>पुरुष/महिला</u>) | पदोन्नती १००% | १) बदल नाही<br>२) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील कोणत्याही शाखेची पदवी |
| १२२ | सुरक्षा सेवा गट-क | सुरक्षा निरिक्षक (पदनाम बदल) | पदोन्नती १००% | १) पिंपरी चिंचवड मनपा आस्थापनेवरिल सुरक्षा रक्षक/<u>रखवालदार</u> पदावरील किमान ३ वर्षाचा अनुभव. |
| १२३ | सुरक्षा सेवा गट-ड | सुरक्षा रक्षक | नामनिर्देशन १००% | १) माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण (एस.एस.सी) व सुरक्षा रक्षक पदावर ३ वर्षाचा अनुभव<br>२) बदल नाही<br>३) बदल नाही<br>४) बदल नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३३ | उद्यान सेवा गट- ड | माळी | नामनिर्देशन ५०%<br>पदोन्नती ५०% | १ ते २ बदल नाही |
| १३७ | वैद्यकीय सेवा गट- अ | वैद्यकीय अधिक्षक | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १) बदल नाही<br>२) मान्यता प्राप्त विद्यापीठाकडील क्लिनिकल विषयातील मान्यता प्राप्त विद्यापीठाकडील एम.डी. / एम.एस. / एम.डी.एस. पदवी<br>३) बदल नाही<br>४) बदल नाही. |
| | | | पदोन्नती १०० % | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस/बी.डी.एस पदवी<br>२) मान्यता प्राप्त विद्यापीठाकडील एम.डी. / एम.एस.पदवी / एम.डी.एस. पदवी किंवा एम.सी.आय. / एम.एम.सी. कडील तत्सम अर्हता<br>३) बदल नाही<br>४) बदल नाही. |
| | | | प्रतिनियुक्ती (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १) बदल नाही |
| १३८ | वैद्यकीय सेवा गट- अ | वैद्यकीय उपअधिक्षक | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील एम.बी.बी.एस/बी.डी.एस पदवी<br>२) मान्यता प्राप्त विद्यापीठाकडील एम.डी./ एम.एस.पदवी / एम.डी.एस. पदवी<br>३) बदल नाही<br>४) बदल नाही. |
| १५२ | वैद्यकीय सेवा गट- अ | ज्येष्ठ दंतशल्य चिकीत्सक ऐवजीसंचालक, दंत विभाग असा पदनाम बदल | पदोन्नती १००% | बदल नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७३ | वैद्यकीय सेवा गट- ब | दंतशल्य चिकित्सक | नामनिर्देशन १०० % | १) बदल नाही<br>२) <u>वगळणे</u><br>३) बदल नाही<br>४) बदल नाही |
| १८४ | निमवैद्यकीय सेवा गट- क | स्टाफ नर्स | <u>नामनिर्देशन ८०%</u><br><u>पदोन्नती २०%</u> | १) बदल नाही<br>२) बदल नाही<br>३) <u>स्टाफ नर्स पदाची शैक्षणिक अर्हता असलेल्या ए.एन.एम मधून ७ वर्षाचा अनुभव आवश्यक</u> |
| २७६ | पशुवैद्यकीय सेवा गट- ड | सहाय्यक ॲनिमल किपर | <u>नामनिर्देशन ५०%</u><br><u>पदोन्नती ५०%</u> | १) बदल नाही<br>२) <u>५ वर्षाचा अनुभव आवश्यक</u> |
| २९७ | अग्निशमन सेवा गट-अ | मुख्य अग्निशमन अधिकारी | नामनिर्देशन / प्रतिनियुक्ती (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १) बदल नाही<br>२) बदल नाही<br>३) बदल नाही<br>४) बदल नाही<br>अ) बदल नाही<br>ब) बदल नाही<br>क) अनुभव-कोणत्याही महानगरपालिका किंवा १५ ते २० अग्निशमन केंद्रे असलेल्या महानगरपालिका किंवा विशेष नियोजन प्राधिकरणामध्ये मुख्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | अग्निशमन अधिकारी (वर्ग-१) किमान वेतनश्रेणी १५६००-३९१००, ग्रेड वेतन र.रू. ५४००) या पदावर ३ वर्षे सेवा केलेला तसेच वरील शैक्षणिक व शारीरीकदृष्ट्य सक्षम असावा. किंवा विभागीय अग्निशमन अधिकारी (वर्ग-२) या पदावर किमान ५ वर्षे सेवा पुर्ण किमान वेतनश्रेणी ररू. ९३००-३४८०० ग्रेड वेतन र.रू.५०००/-) या पदावर किमान ५ वर्षे सेवा केलेला तसेच वरील शैक्षणिक पात्रता पुर्ण करणारा उमेदवार असावा. किंवा संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याकडून वेळोवेळी विहीत करण्यात येणारे सेवा प्रवेश नियम लागू होतील. |
| २७८ | क्रीडा सेवा गट-ब | क्रिडा अधिकारी | नामनिर्देशन ०% | १) वगळणे |
| | | | पदोन्नती १००% | १) बदल नाही |
| २८० | क्रिडा सेवा गट-क | शारिरिक शिक्षण संघटक (पदनाम बदल) | बदल नाही | बदल नाही |
| २९५ | सार्वजनिक आरोग्य सेवा गट-क | मलेरिया इन्स्पेक्टर | नामनिर्देशन ७५%<br><br>पदोन्नतीने २५ % | बदल नाही<br><br>बदल नाही |

वरील प्रमाणे दुरूस्तीस मान्यता देणेत येत आहे. तसेच मा.महापालिकेच्या मान्यतेनुसार मूळ प्रस्तावात आवश्यक ते बदल करुन प्रस्ताव मा.शासनाकडे पाठविण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांची वर्गीकरण) नियम २०१६ मधील परिशिष्ट १ ते ३ विभाग निहाय प्रस्तावित आकृतीबंध यांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 454 सह 457 (3) अन्वये मा. विधी व मा.महापालिका सभेची मान्यता मिळणेकरीता विषयपत्र सादर करणेत आलेले आहे. प्रस्तावित करणेत आलेल्या आकृतीबंधा नुसार महानगरपालिकेच्या आस्थापनेवर नव्याने वाढ होणा-या पदांच्या अनुषंगाने सन २०१५-१६ चे सुधारित अंदाजपत्रकानुसार एकूण उत्पन्नाशी आस्थापना खर्चाची टक्केवारी विचारात घेता सध्या टक्केवारी २३.७३% इतकी आहे. प्रस्तावित केलेली नविन पदनिर्मिती, मंजुर पदसंखेत वाढ यामुळे आस्थापना खर्चात साधारण ३.३५% इतकी वाढ होऊन आस्थापना खर्च २७.०८% इतका होणार असल्याने या वाढीव खर्चास मान्यता देणेत येत आहे.

**मा.अपर्णा डोके -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.नंदा ताकवणे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील विविध विकास कामांसाठी आरक्षित केलेल्या शेतक-यांच्या जमिनी तसेच रस्ता रूंदिकरणाव्दारे बाधित होणा-या ज्या भूखंडधारकांचे ५०० चौ.मीटर पासूनचे पुढील क्षेत्र पिंपरीचिंचवड महानगरपालिकेकरिता, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण करिता, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) करिता, संरक्षण (Defence) क्षेत्राकरिता व म्हाडाचे गृहप्रकल्पाकरिता अथवा केंद्र शासन व राज्य शासनाचे विविध प्रकल्पासाठी ताब्यात घेण्यात आलेले आहे. अशा सर्व पिंपरी-चिंचवड मधील प्रकल्पधारक बाधितांचे वारसदारांना नव्या आकृतीबंधाद्वारे १) नोकरीमध्ये सरळ सेवा पध्दतीने नोकर भरती करतांना महाराष्ट्र शासनाचे नियमानुसार असलेले राखीव आरक्षणाव्यतिरिक्त ज्यादा २० टक्के अतिरिक्त आरक्षण कोटा मिळाला. २) सदर वारसदारांसाठी लेखी परिक्षेद्वारे गुणवत्तेनुसार केलेली निवड यादी (Merit List)

इतर उमेदवारांपासून वेगळी करण्यात यावी. ३) इतर आवश्यक पदे भरती करताना या प्रकल्पग्रस्त बाधितांचे वारसदारांची नोकर भरती प्राधान्याने पुर्णतः राखीव कोट्यानुसार करण्यात यावी ४) गुणवत्तेनुसार त्यांची महापालिकेच्या सेवेमध्ये जातीनिहाय असलेल्या राखीव कोट्याचे संख्येसहित भरती करण्यात यावी. महानगरपालिकेच्या प्रशासन विभागामार्फत सेवा नियम व आकृतीबंधासाठीच्या प्रस्तावामधील अ.क्र. १७ तांत्रिक सेवा गट अ - शहर अभियंता पदासाठी जी वेतनश्रेणी सुचविलेली आहे. त्यास मा.विधी समितीने शिफारस केली आहे. त्यात बदल करून सदरची वेतनश्रेणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (P.W.D) मुख्य अभियंत्यासारखी म्हणजेच Rs. 37400-67000 Grade Pay (PB 4) - 8700 अशी असावी.

महानगरपालिकेच्या प्रशासन विभागामार्फत सेवा नियम व आकृतीबंधासाठीच्या प्रस्तावामधील अ.क्र. १८ तांत्रिक सेवा, गट अ - सह शहर अभियंता पदासाठी क्रमांक एकमध्ये पदोन्नतीने २ पदांकरीता नेमणूक करणेकामीचा प्रस्ताव सादर केला होता. मा. विधी समितीने यामध्ये वाढ करून सह शहर अभियंता पदोन्नतीने ३ पदांकरीता असा बदल करून मा.महापालिका सभेकडे शिफारस केली आहे. पालिकेचा ब दर्जा व होणारा विकास लक्षात घेऊन या उपसुचनेद्वारे उपरोक्त सह शहर अभियंता पदांच्या संख्येत वाढ करून पदोन्नतीने ४ पदांकरिता नेमणूका करणेत याव्यात.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | तांत्रिक सेवा गट-अ | आर्ट ऑफिसर<br>पद-१<br>१५६००-३९१००<br>ग्रेड पे-६६०० | पदोन्नती १००% | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाच्या फाईन आर्ट किंवा जी.डी.आर्ट-अॅप्लाईड आर्ट (कमर्शिअल आर्ट) पदवी/पदविका उत्तीर्ण.<br>२) आर्टिस्ट कम फोटोग्राफर या पदावरील १० वर्षाचा अनुभव असणा-या सेवाज्येष्ठ कर्मचा-यांमधून संगणक चालविण्याचा अनुभव तसेच फोटोग्राफी, डिझाईन व प्रिटिंग क्षेत्राचा अनुभव. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २. | तांत्रिक सेवा गट-अ | आर्टिस्ट ग्रेड १<br><br>पद-१<br><br>१५६००-३९१००<br><br>ग्रेड पे-५४०० | पदोन्नती<br>१००% | १)मान्यता प्राप्त विद्यापीठाच्या फाईन आर्ट किंवा जी.डी.आर्ट-अॅप्लाईड आर्ट (कमर्शिअल आर्ट) पदवी/पदविका उत्तीर्ण.<br><br>२)आर्टिस्ट कम फोटोग्राफर या पदावरील ०८ वर्षाचा अनुभव असणा-या सेवाज्येष्ठ कर्मचा-यामधून संगणक चालविण्याचा अनुभव तसेच फोटोग्राफी डिझाईन व प्रिटींग क्षेत्राचा अनुभव. |

मुख्य क्रीडा अधिकारी यांची वेतनश्रेणी रक्कम रूपये १५६०० - ३९१०० ग्रेड पे ६६००/- करणेस मान्यता देणेत यावी.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आकृतीबंधात अक्र.११ प्रशासकीय सेवा गट-क लघुलेखक (निम्नस्तर) पदे नामनिर्देशनाने १००% असे दर्शविण्यात आलेले आहे. याठिकाणी दुरूस्ती करून **नामनिर्देशनाने ७५% व पदोन्नतीने २५%** अशी तसेच नेमणूकी करीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती यामध्ये महानगरपालिका अस्थापनेवरील वर्ग ३ व ४ मधील ३ वर्षे सेवा पुर्ण झालेले कर्मचा-यांमधुन अशी दुरूस्ती करण्यास मान्यता देणेत यावी.

'सुतार' हे पद व्यपगत होत असल्याने सध्या स्थापत्य विभागात स्थापत्य विषयक देखभालीची कामे करीत असलेले कर्मचारी हे स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदाची शैक्षणिक व तांत्रिक अर्हता धारण करीत असलेने तसेच त्यांचा स्थापत्य विषयक कामाचा प्रत्यक्ष अनुभव लक्षात घेता त्यांना स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रेड पे २८०० यामध्ये सुतार या पदाऐवजी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदामध्ये समायोजन वर्ग करणेस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | संवर्ग | पदनाम/संख्या/वेतनश्रेणी | नेमणूकीची पध्दत | नेमणूकीकरिता अर्हता व नेमणूकीची पध्दत |
|---|---|---|---|---|
| १ | तांत्रीक सेवा | विकास अभियंता | पदोन्नतीने-१००% | १) सांविधिक विद्यापीठाची इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन शाखेची पदवी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | गट-अ | (दूरसंचार) -१ पद १५६००-३९१०० ग्रेड पे ७६०० | | किंवा पदविका उत्तीर्ण.<br>२) कार्यकारी अभियंता अथवा (दूरसंचार) वायरलेस इनचार्ज या पदावरील ५ वर्षाचा अनुभव आवश्यक |

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील सीसीटिव्ही यंत्रणा, मेटल डिटेक्टर यंत्रणा, फायबर ऑप्टीक यंत्रणा, वायरलेस यंत्रणा, दूरध्वनी यंत्रणा, स्मार्ट डिस्प्ले/होर्डींग यंत्रणा, मोबाईल यंत्रणा इत्यादी कामकाजाकरिता स्वतंत्र इलेक्ट्रॉनिक व टेलिकम्युनिकेशन अभियांत्रिकी शाखा निर्माण करून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे प्रस्तावित (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१६ अंतर्गत वरिलप्रमाणे नवीन पदनिर्मिती, संवर्ग, पदनाम, पदांची संख्या, नेमणूकीची पध्दत व टक्केवारी, नेमणूकीकरीता अर्हता व नेमणूकीची पध्दती तयार करणेत यावी. मा.महापालिका सभेने मान्यता दिल्याप्रमाणे सदरचा बदल मूळ प्रस्तावात करुन सदर प्रस्ताव शासनाकडे मान्यतेकामी पठविणेत यावा.

प्रपत्र अ-नवीन निर्माण करावयाची पदे गट ब मध्ये खालील पदाचा समावेश करणेत यावा.

| पदनाम | नवीन आवश्यक पदसंख्या | वेतन श्रेणी | ग्रेड पे |
|---|---|---|---|
| माहिती व जनसंपर्क अधिकारी | ......... | ९३००-३४८०० | ५४०० |

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने सेवाप्रवेश नियम तयार करण्यात आले असून यामध्ये सार्वजनिक वाचनालय विभागातील ग्रंथपाल कम लिपिक पदाचे समायोजन करून सहाय्यक ग्रंथपाल पद नव्याने निर्माण करण्याबाबत प्रस्तावित करण्यात आले आहे. तथापि ग्रंथपाल कम लिपिक पदावर एकुण १५ कर्मचारी

कार्यरत असून त्यांना सहाय्यक ग्रंथपाल किंवा लिपिक या संवर्गात समाविष्ट करावे व लिपिक संवर्गात समाविष्ट करताना मनपा सेवेतील नेमणूक दिनांकापासून सेवाज्येष्ठता धरण्यात यावी, संबंधित कर्मचा-यांचे संमतीपत्र घेवून त्याप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देणेत यावी.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे प्रस्तावित (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१६ अंतर्गत खालीलप्रमाणे नविन पदनिर्मिती, संवर्ग, पदनाम / पदांची संख्या /वेतनश्रेणी, नेमणूकीची पध्दती व टक्केवारी, नेमणूकीकरीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती तयार करण्यात यावी.

| अ.क्र. | संवर्ग | पदनाम/पदांची संख्या/वेतनश्रेणी | नेमणूकीची पध्दती व टक्केवारी | नेमणूकीकरीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|---|
| ०८ | तांत्रिक सेवा<br>गट-ब | उपप्राचार्य<br>(आट.टी.आय) पद-०१<br>१५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० | पदोन्नतीने १००% | १) शासनमान्य विद्यापीठाची यांत्रिकी/विद्युत शाखेची पदवी अथवा पदविका उत्तीर्ण.<br>२) मनपाच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत गटनिदेशक पदावरील ०३ वर्षाचा अनुभव/१२ वर्षे अद्यापनाचा अनुभव व सेवाज्येष्ठते नुसार |
| ०९ | तांत्रिक सेवा<br>गट-अ | सेवायोजन अधिकारी (प्लेसमेंट ऑफिसर)<br>पद-०१<br>१५६००-३९१००<br>ग्रेड पे ७६०० | पदोन्नतीने १००% | १) शासनमान्य विद्यापीठाची यांत्रिकी/ विद्युत शाखेची पदवी अथवा पदविका उत्तीर्ण.<br>२) मनपाच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत गटनिदेशक पदावरील ०५ वर्षाचा अनुभव / १२ वर्षे अद्यापनाचा अनुभव व सेवाज्येष्ठते नुसार |
| | तांत्रिक सेवा | निदेशक (आट.टी.आय) | पदोन्नतीने २५%<br>अनुभव व | बदल नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | गट-क | ९३००-३४८००<br><br>ग्रेड पे ४३०० | सेवाज्येष्ठतेनुसार सरळसेवा ७५% | |

विषय क्र. १७८ निम वैद्यकीय सेवागट - क फार्माशिस्ट पदाची शैक्षणिक अर्हता बाबत.

सुचवलेली अर्हता

१) मान्यता प्राप्त विद्यापीठाकडील बी. फार्म पदवी.

२) इंडियन / महाराष्ट्र फार्मसी कौन्सिलकडील नोंदणी असणे आवश्यक

ऐवजी

१) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील डी. फार्म पदविका (D.Pharm) / बी.फार्म पदवी (B.Pharm)

२) इंडियन / महाराष्ट्र फार्मसी कौन्सिलकडील नोंदणी असणे आवश्यक.

प्रपत्र अ-नवीन निर्माण करावयाची पदे गट "ब" मध्ये खालील पदाचा समावेश करण्यास मान्यता देणेत यावी.

| पदनाम | नवीन आवश्यक पदसंख्या | वेतनश्रेणी | ग्रेड पे |
|---|---|---|---|
| भांडार अधिकारी | -------- | ९३००-३४८०० | ५४०० |

१. पद क्र. ८ प्रशासकीय सेवा ( गट-क) मुख्य लिपिक / कॉम्प्युटर ऑपरेटर महानगरपालिका प्रशासन विभागाने मा.विधी समितीसमोर सादर केलेल्या मसुद्याप्रमाणे ठेवण्यास मान्यता देणेत यावी. त्यामध्ये कोणत्याही प्रकराचे बदल करणेत येवू नये.

२. पद क्र. ११९ सुरक्षा सेवा (गट-अ) मुख्य सुरक्षा अधिकारी (पुरूष)
सदर पदामध्ये पुरूष व महिला हे दोन्ही ठेवण्यास मान्यता देणेत यावी. (पुरूष व महिला कर्मचाऱ्यांना समान संधी देण्यात यावी.) तसेच नामनिर्देशनामध्ये अट क्र. ४ वगळण्यात येवू नये.

३. पद क्र. १२० सुरक्षे सेवा (गट-ब) सुरक्षा अधिकारी (पुरूष)

सदर पदामध्ये पुरूष व महिला हे दोन्ही ठेवण्यास मान्यता देणेत यावी. (पुरूष व महिला कर्मचा-यांना समान संधी देण्यात यावी) तसेच नामनिर्देशनामधील अट क्र. ४ वगळू नये. तसेच पदोन्नतीमध्ये १०० टक्के मधील अट क्र. ३ वगळण्यास मान्यता देणेत यावी. जेणेकरून मनपातील सुरक्षा विभागातील कर्मचा-यांना सदर पदावर पदोन्नतीची समान संधी उपलब्ध होईल.महानगरपालिकेतील अधिकारी (कर्मचारी वर्गासाठी) अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेकडील एल.एस.जी.डी., एल.जी.एस व फायनान्स च्या परिक्षेस मान्यता देणेत यावी.

४. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे प्रस्तवित आकृती बंधातील “प्रपत्र अ ग्रेड पे” या मध्ये **“सिनिअर टेक्निकल असिस्टंट”** या पदासाठी खालील प्रमाणे ग्रेड पे रु. ४६०० चा समावेश करण्यास मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | ग्रेड पे | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | **सिनिअर टेक्निकल असिस्टंट** | ९३००-३४८०० | ४६०० | रिक्त झाल्यानंतर व्यापगत |

तरी वरील प्रमाणे “प्रपत्र अ ग्रेड पे” या मध्ये **“सिनिअर टेक्निकल असिस्टंट”** या पदासाठी ग्रेड पे रु. ४६०० चा समावेश करणेस मान्यता देणेत यावी.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे प्रस्तावित (सेवा, प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१६ प्रपत्र अ नवीन निर्माण करावयाची पदे, गट ब मध्ये खालील प्रमाणे मजकूर समाविष्ट करण्यास मान्यता देणेत यावी.

प्रपत्र “अ”

नवीन निर्माण करावयाची पदे

गट ब

| **अ. क्र.** | **संवर्ग** | **पदनाम/पदांची संख्या/वेतनश्रेणी** | **नेमणुकीची पध्दत व टक्केवारी** | **नेमणुकी करिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती** |
|---|---|---|---|---|
| १ | प्रशासकीय | ग्रंथालय | पदोन्नती | १)मान्यताप्राप्त |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | सेवा- गट ब | प्रमुख ९३००-३४८०० ग्रेड पे ५४०० | ने १००% | विदयापीठाकडील वाणिज्य शाखेची निष्णात पदवी (एम.कॉम.)<br>२)ग्रंथालय व माहिती शास्त्र शिक्षणक्रम निष्णात पदवी (एम.लिब अँड आय.एस्सी.)<br>३)महानगरपालिका आस्थापनेवरील ग्रंथालय कामकाजाचा २४ वर्षाचा अनुभव आवश्यक<br>४)महानगरपालिका आस्थापनेवरील ज्युनिअर टेक्निकल असिस्टंट या संवर्गातील कामकाजाचा १५ वर्षाचा अनुभव आवश्यक. |

चिंचवड महानगरपालिकेचे प्रस्तावित आकृती बंधातील “प्रपत्र अ ग्रेड पे” यामध्ये “**ग्रंथपाल**” या पदासाठी खालील प्रमाणे ग्रेड पे रु. ४६०० चा समावेश करण्यास मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | ग्रेड पे |
|---|---|---|---|
| १ | **ग्रंथपाल** | ९३००-३४८०० | ४६०० |

तरी वरील प्रमाणे “प्रपत्र अ ग्रेड पे” या मध्ये “**ग्रंथपाल**” या पदासाठी ग्रेड पे रु. ४६०० चा समावेश करण्यास मान्यता देणेत यावी.

जकात व एल.बी.टी. बंद झाल्यामुळे महापालिका महसुली उत्पन्न वाढीसाठी विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे. शहरातील ४,२५,००० पेक्षा जास्त मिळकतींना पाणी पुरवठा करणेसाठी १,४२,४१६ अधिकृत नळजोड आहेत. शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी वर्षाला अंदाजे रु. ११० कोटी पर्यंत खर्च येतो. मात्र पाणी बिलाची वार्षीक मागणी रु. ३०.०० कोटी आहे.

या सर्व बाबींचा विचार करुन पाणी बिलाची जास्तीत जास्त वसुली होण्यासाठी व पाणी पुरवठा विभागाचे प्रशासकीय कामासाठी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण ३ नुसार मा.विधी समिती ठराव क्रमांक २६ दि.२०/०८/२०१४ व महापालिका सभा ठराव क्रमांक ५७२ दि.१०/११/२०१४ अन्वये प्रशासन अधिकारी समकक्ष भांडार नियंत्रक, मुख्य आयातकर अधिक्षक व विशेष अधिकारी पदावर नियुक्ती देण्यास मान्यता देण्यात आली असल्याने प्रशासन विभागाचे (विषय क्र. ६) विषयपत्रातील प्रपत्र ब चे पान क्र. ७७ वर नमूद केलेली भांडार नियंत्रक, मुख्य आयातकर अधिक्षक व विशेष अधिकारी ही पदे रद्द न करता सदर पदांवर नियुक्ती देऊन पाणी बिल वसुलीचे व पाणीपुरवठा विभागाचे प्रशासकीय कामकाज सोपविण्यात येऊन नियुक्तीनंतर सदर पदांस प्रशासन अधिकारी, पाणीपुरवठा विभाग असे संबोधण्यास मान्यता देण्यात येत आहे.

खालीलप्रमाणे दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | संवर्ग | पदनाम | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी | नेमणुकी करिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती |
|---|---|---|---|---|
| १ | प्रशासकीय सेवा गट-क | मुख्यलिपिक/ स्विय सहाय्यक | पदोन्नती १००% | १)महानगरपालिका आस्थापनेवरील लिपीक संवर्गातील कामकाजाचा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | मा.महापौर/ स्विय सहाय्यक मा.उपमहापौर/ स्विय सहाय्यक मा.अध्यक्ष स्थायी समिती/स्विय सहाय्यक मा.अध्यक्ष विधी समिती स्विय सहाय्यक मा.सभागृह नेता स्विय सहाय्यक मा.विरोधी पक्षनेता | | ३ वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| नविन | प्रशासकीय सेवा गट-क | व्यवस्थापक प्रेक्षागृह | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १)मान्यताप्राप्त विदयापिठाकडील कोणत्याही शाखेची पदवी.<br>२) नाटयशास्त्र पदविका व व्यवस्थापन मॅनेजमेंट कोर्स आवश्यक.<br>३) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण किंवा D.O.E.A.C.C सोसायटीच्या अधिकृत C.C.C किंवा O किंवा A स्तर किंवा B स्तर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र. |
| | | | पदोन्नती १००% | १)महानगरपालिका आस्थापनेवरील लिपीक संवर्गातील कामकाजाचा ३ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>२) नाटयशास्त्र पदविका व व्यवस्थापन मॅनेजमेंट कोर्स आवश्यक. |

उपरोक्त प्रमाणे बदल करणेस तसेच आकृतीबंधात नगरसचिव विभागाकरिता (पदाधिकारी करिता) दोन कॉम्प्युटर ऑपरेटर वाढविण्यास मान्यता देणेत येत आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१६ मधील पर्यावरण अभियांत्रीकी विभागाकरीताचे अ.क्र. ५८) तांत्रीक सेवा गट अ कार्यकारी अभियंता (विदयुत) व अ.क्र.५९) तांत्रीक सेवा गट ब उप अभियंता (विदयुत) ही पदे भरतांना / नेमणुकी करीता अर्हता व नेमणुकीच्या पध्दतीमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पध्दत | नेमणुकी करीता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती |
|---|---|---|---|---|
| ५८ | तांत्रीक सेवा गट अ | कार्यकारी अभियंता (विदयुत) | पदोन्नती १००% | १) बदल नाही<br>२) पर्यावरण अभियांत्रीकी विभागाकरीता चे पदाकरीता पर्यावरण अभियांत्रीकी शाखेतील पदव्युत्तर पदवी असणे आवश्यक.<br>३) पदवीधारक व |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | पदविकाधारक यांचेमधुन 1:1 प्रमाणानुसार |
| 59 | तांत्रीक सेवा गट ब | उपअभियंता (विदयुत) | पदोन्नती १००% | १) बदल नाही.<br>२) पर्यावरण अभियांत्रीकी विभागाकरीता चे पदाकरीता पर्यावरण अभियांत्रीकी शाखेतील पदव्युत्तर पदवी असणे आवश्यक.<br>३) पदवीधारक व पदविकाधारक यांचेमधुन 1:1 प्रमाणानुसार |

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे प्रस्तावित आकृत्तीबंधातील “प्रपत्र अ ग्रेड पे” यामध्ये मुख्य समाज विकास अधिकारी पदासाठी ग्रेड पे ६६०० दिलेला असल्याने त्या लगतच्या पदांसाठी खालीलप्रमाणे ग्रेड पे चा समावेश करण्यास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | ग्रेड पे |
|---|---|---|---|
| १. | समाज विकास अधिकारी | ९३००-३४८०० | ५४०० |
| २. | महिला व बालविकास अधिकारी | ९३००-३४८०० | ५४०० |
| ३. | सहाय्यक समाज विकास अधिकारी | ९३००-३४८०० | ४८०० |

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे प्रस्तावित (सेवा, प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१६ परिशिष्ट-२ मध्ये संबंधित पदाचे अनुक्रमांकापुढे नमूद मुळ अर्हतेऐवजी खाली नमूद केल्याप्रमाणे सुधारित अर्हता व दुरूस्ती करण्यास मान्यता देणेत येत आहे

| अ.क्र. | संवर्ग | पदनाम | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी | नेमणूकीकरीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|---|
| १०४ | प्रशासकीय सेवा गट-अ | मुख्य समाज विकास अधिकारी | नामनिर्देशन (पदोन्नतीने उमेदवार उपलब्ध न झाल्यास) | १)बदल नाही<br>२)मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील समाजकार्य विषयातील पदव्युत्तर पदवी (एम.एस.डब्ल्यू.)<br>३)बदल नाही. |
| | | | पदोन्नतीने | बदल नाही |

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे प्रस्तावित आकृतीबंधातील प्रपत्र‘ब’ व्यपगत करावयाची पदे यामधील गट ‘क’ मध्ये खालीलप्रमाणे दुरूस्ती करण्यास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | शासन मंजूर | वेतनश्रेणी | ग्रेड पे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १) | सहाय्यक प्रकल्प अधिकारी | १ | ९३००-३४८०० | ४८०० | रिक्त झाल्यानंतर व्यपगत |

| अ.क्र | संवर्ग | पदनाम | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी | नेमणूकीकरीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| पर्यटन व सांस्कृतिक विभाग | | | | |
| | प्रशासकीय सेवा गट-अ | सांस्कृतिक अधिकारी १५६००-३९१०० ग्रेड पे-६६०० | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास सरळसेवेने) | १)मान्यताप्राप्त विद्यापीठातील कोणत्याही शाखेची पदव्युत्तर पदवी असणे आवश्यक.<br>२)कोणत्याही शाखेतील अध्यापनाचा किमान १५ वर्ष अनुभव आवश्यक<br>३)मान्यताप्राप्त विद्यापीठातील संगीत/शास्त्रीय नृत्य क्षेत्रातील किमान संगीत विशारद प्रथम: |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>४)कामाचा प्रदीर्घ अनुभव लक्षात घेता वयाची अट वय वर्षे-४५ पुर्ण पर्यंत शिथील करण्यात यावी. |
| | | | पदोन्नती १००% | महानगरपालिका आस्थापनेवरील नामनिर्देशन अर्हता प्राप्त असणा-या कर्मचा-यांमधून सेवा जेष्ठता व गुणवत्ता आधारे. |
| ३११ | प्रशासकीय सेवा गट-ब | पर्यटन तथा सांस्कृतिक अधिकारी पदनामात बदल करून पर्यटन अधिकारी | बदल नाही | बदल नाही |
| | | | बदल नाही | बदल नाही |

अ.क्र. ९२ व २८० मध्ये खालीलप्रमाणे दुरूस्ती करण्यास मान्यता देणेत येत आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९२ | शिक्षण सेवा गट-क | माध्य.शिक्षक (माध्य. शिक्षक/उच्च माध्य शिक्षक/चित्रकला शिक्षक/ अंध शिक्षक/पदवीधर शिक्षक/अपदवीधर शिक्षक) (शासनमान्य प्रचलित धोरणानुसार | नामनिर्देशनाने ७५% | शासनाचा शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या प्रचलित सेवाप्रवेश नियमानुसार |
| | | | पदोन्नती २५% (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास नामनिर्देशनाने) | १) नामनिर्देशनाची अर्हता धारण करणा-या महानगरपालिका आस्थापनेवरील ३ वर्षे सेवा पुर्ण झालेले वर्ग ३ व ४ मधील कर्मचा- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | यांमधून |
| २८० | क्रीडा सेवा गट-क | क्रिडा शिक्षक | नामनिर्देशन ७५% | १) शासनाचा शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या प्रचलित सेवाप्रवेश नियमानुसार |
| | | | पदोन्नती २५% (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास नामनिर्देशनाने) | १) नामनिर्देशनाची अर्हता धरण करणा-या महानगरपालिका आस्थापनेवरील ३ वर्षे सेवा पुर्ण झालेले वर्ग ३ व ४ मधील कर्मचा-यांमधुन. |

पिंपरी चिंचवड मनपाच्या वैद्यकीय विभागाचे असणारे ८ रुग्णालयामधून रुग्णसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. रुग्णालयामध्ये पर्यवेक्षकीय पद असणे आवश्यक आहे. सध्या व्यवस्थापक, मध्यवर्ती औषध भांडार हे १ पद मंजूर आहे. अशी मनपाच्या इतर ८ रूग्णालयामध्ये व्यवस्थापक रुग्णालय भांडार अशी ८ रूग्णालयामध्ये पर्यवेक्षकीय ८ पदे निर्माण करावीत व ही पदे फार्माशिष्ट कर्मचा-यांमधून भरणेस मान्यता देणेत येत आहे.

क वर्गामध्ये (वर्ग-३) जे कर्मचारी विविध दुर्धर आजाराने नोकरी करण्यास शारीरीक दृष्ट्या पुर्णःतहा असमर्थ आहे असे कर्मचारी स्वेच्छेने सेवानिवृत्ती घेत असल्यास त्यांचे वारसदारांना महापालिका सेवेमध्ये महापालिकेच्या आस्थापना नियमांनुसार सेवेमध्ये सामावून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण रूग्णालय येथील शव विच्छेदन (पोस्टमार्टेम) या विभागातील काम करणारे “मजूर” हे पद विपगत करून त्यांना “सफाई कामगार” असे संबोधले जावे. कारण मजूर या पदास सदरचे काम लागू होत नाही. सदरचे काम हे अतिशय घाणेरडे स्वरूपाचे आहे. तेथील कर्मचा-यास जळालेले शवाचे तुकडे गोळा करणे इ. कामे करावी लागतात. तरी मजूर या पदाचे “सफाई कामगार” असे संबोधून सफाई संवर्गात वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

मनपाच्या आकृतीबंधात बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग तसेच नगररचना व विकास या विभागासाठी 'अनुरेखक' एकुण पदे (५+६=११) दर्शविली आहे. सदरचे पद १००% नामनिर्देशनाने भरणेत येणार असल्याचे नमुद केले आहे. तथापि सदरची पदे ७५% नामनिर्देशनाने व २५% पदे महापालिका सेवेमध्ये अर्हता धारण करीत असलेल्या वर्ग 'ड' मधील कर्मचा-यांमधून सेवाजेष्ठतेनुसार भरणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८६७ विषय क्रमांक- १०

दिनांक - २०.५.२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/२७७/२०१६, दि.३०/०४/२०१६

२) मा. विधी समितीकडील ठराव क्र.७२ दि.६.५.२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर सहाय्यक आयुक्त अभिनामाची 11 पदे पे बॅन्ड र.रु. 15600-39100 ग्रेड वेतन र.रु. 6600 या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. दि. 04 मे 2006 चे शासन निर्णयानुसार महापालिका आस्थापनेवरील 50% पदे महापालिका संवर्गातून तर 50% पदे शासनाच्या अधिका-यांमधून भरण्याचे निर्देश आहेत. तथापि शासन पत्र क्र.एमसीओ-1211/ प्र.क्र.157/नवि-14, दि.22/09/2011 अन्वये या संवर्गात मंजूर 11 पदांपैकी 6 पदे मुख्याधिकारी संवर्गातून भरण्याबाबत कळविले आहे. सद्यस्थितीत या संवर्गात महापालिकेचे 3 तर प्रतिनियुक्तीवरील 8 अधिकारी कार्यरत आहेत. यास्तव महापालिका अधिका-यांकरीता रिक्त असलेल्या 2 पदांवर शासन प्रतिनियुक्तीवरील अधिकारी कार्यरत आहेत.

शासन प्रतिनियुक्तीवरील अधिका-यांपैकी श्री.खांडकेकर प्रशांत, सहा. आयुक्त यांचे शासन आदेश दि.16 डिसेंबर 2015 अन्वये शासन सेवेत प्रत्यावर्तन करण्यात आलेले आहे. श्री.खांडकेकर यांना कार्यमुक्त केल्यानंतर सहाय्यक आयुक्त या संवर्गात रिक्त होणारे खुल्या प्रवर्गाचे 01 पद पदोन्नतीने भरण्याकरीता दि.29/03/2016 रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आली होती.

प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने "सहाय्यक आयुक्त" पदावरील पदोन्नतीबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेतलेले आहेत.

1. दि.04/05/2006 रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील महापालिका सेवांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. त्यामध्ये नमूद तरतुदीनुसार कामगार कल्याण अधिकारी हे पद प्रशासकीय सेवामधील प्रशासन अधिकारी या पदाचे समकक्ष ग्राह्य धरण्याबाबत प्रस्तुतच्या समितीने शिफारस केलेली आहे.

2. शासन निर्णय क्र.एसआरव्ही-2014/प्र.क्र.354/14/का.12, दि.05/10/2015 मध्ये ज्या पदांच्या सेवाप्रवेश नियमामध्ये पदोन्नतीसाठी निम्न पदांवरील अनुभवाचा किमान कालावधी विवक्षित कारणात्सव 3 वर्षापेक्षा जास्त विहित केला असेल अशा प्रकरणी निम्न संवर्गात विहित सेवा कालावधी पूर्ण केलेले अधिकारी/कर्मचारी उपलब्ध नसल्यामुळे मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त राहत असतील तर निम्न संवर्गात आवश्यक किमान सेवेच्या 90 टक्के नियमित सेवा झाल्यानंतर व अनुभवाची अट शिथिल करण्यासाठी संबंधित प्रशासकीय विभागाकडे पुरेसे समर्थन असेल तर असा उर्वरित सेवा कालावधीची अट शिथिल करण्याबाबतचा प्रस्ताव दि.16/07/2015 रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आलेल्या अप्पर मुख्य सचिव (सेवा) यांच्या अध्यक्षतेखालील समितीसमोर निर्णयार्थ सादर करता येतील याप्रमाणे तरतूद करण्यात आलेली आहे. प्रस्तुतच्या तरतुदीनुसार सहाय्यक आयुक्त पदावरील पदोन्नतीकरीतापदोन्नतीपूर्व पदावर 5 वर्ष अनुभव कालावधी शिथिल करण्याबाबत प्रस्तुतच्यासमितीने शिफारस केली आहे.

3. श्री. प्रशांत खांडकेकर, मुख्याधिकारी यांचे शासन दि.16 डिसेंबर 2015 अन्वये शासन सेवेत प्रत्यावर्तन झाले असल्याने त्यांना महापालिका सेवेमधून कार्यमुक्त करण्यात आल्यावर महापालिका संवर्गातील अधिका-यांकरीता उपलब्ध असलेले सहाय्यक आयुक्त अभिनामाचे खुल्या प्रवर्गाकरीता येणारे रिक्त पद पदोन्नतीने भरण्याकरीता पदोन्नतीपूर्व प्रशासन अधिकारी पदावर अर्हताधारक उमेदवार उपलब्ध होत नसल्याने शासन निर्णय दि.04/05/2006 मधील तरतुदीनुसार तहसिलदार समकक्ष कामगार कल्याण अधिकारी पदावरील श्री. इंदलकर चंद्रकांत पोपट यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल व आरक्षण इत्यादि सेवाविषयक तपशिल विचारात घेऊन, शासन निर्णय दि.05/10/2015 मधील तरतुदीनुसार अनुभव कालावधी शिथिल करुन वेतनश्रेणी र.रु. 15600-39100 ग्रेड पे 6600 सहाय्यक आयुक्त या पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 45 (4) मधील तरतुदीनुसार शासन मान्यतेच्या अधिन मा.विधी/महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्याबाबत प्रस्तुतच्या समितीने शिफारस केलेली असल्याने शासन निर्णय दि.04/05/2006 नुसार कामगार कल्याण अधिकारी हे पद प्रशासकीय सेवेमधील प्रशासन अधिकारी या पदाचे समकक्ष ग्राह्य धरण्यास आणि शासन निर्णय दि.05/10/2015 नुसार पदोन्नतीपूर्व पदावरील 90% नियमित सेवा ग्राह्य धरुन श्री. इंदलकर चंद्रकांत पोपट, कामगार कल्याण अधिकारी यांना खुल्या प्रवर्गामधून र.रु.15600-39100 ग्रेड पे 6600 या वेतनश्रेणीमध्ये सहाय्यक आयुक्त या पदावर महाराष्ट्र

महानगरपालिका अधिनियम कलम 45 (4) मधील तरतुदीनुसार शासन मान्यतेच्या अधिन पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.अपर्णा डोके -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, मला विषय क्रमांक ९ वर बोलू दया, काय चालल आहे हे तुमचं, तुम्ही दादागीरी करता का.

**मा.महापौर-** आपण शांत बसा.

(सभागृहात गोंधळ)

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

(सभागृहात गोंधळ)

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, अन्याय करता तुम्ही, बोलू देत नाहीत, सगळयांची मुस्कटदाबी करता.

**मा.महापौर -** विषय क्रमांक ९ वर अभ्यास करण्यासाठी एक महीना दिलेला होता.

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, कोणाच्या सूचनेनुसार काम करता.

**मा.महापौर-** मला कोणाचा ईशारा लागत नाही मी स्वत: सक्षम आहे, शब्द व्यवस्थित वापरा, हे सभागृह आहे, शब्द नीट वापरा. तुम्हांला बोलायचतर हात वर करायचा. विषय मंजूर झाल्यानंतर तुम्ही बोलू दया म्हणता.

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, महीनाभर अभ्यासासाठी वेळ देता आणि येथे बोलू देत नाहीत. कोणाशी बोलायच, आम्ही कोणाच्या पुढे विषय मांडायचा. चर्चेविना विषय मंजूर आहे का. एवढा मोठा आकृतीबंध आहे.

**मा.महापौर-** तुम्ही बोला.

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. कोरम आहे का ते बघावे, मिटींग घेता येणार नाही, सभागृहामध्ये कोरम नाही. नियम सांगवा.

**मा.नगरसचिव -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. महाराष्ट्र महानगरपालिका अधियमाच्या अनुसूची प्रकरण २ नियम १ ब नुसार.......

(सभागृहात गोंधळ)

**मा.चंद्रकांता सोनकांबळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. माझी अशी विनंती आहे की पठाणताईने जे शब्द वापरले ते शब्द त्यांना माघारी घ्यायला सांगा आणि

नगरसचिव साहेब तुम्ही मघाशी आर्धच वाक्य बोललात पुर्ण वाक्य बोला आणि कोरम आहे का नाही ते सांगा, सभा तहकूब करा.

**मा.नगरसचिव -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. महाराष्ट्र महानगरपालिका अधियमाच्या .........

(सभागृहात गोंधळ)

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. कोरमची मागणी केली ठिक आहे. गोंधळ चालला आहे. विषय कुठपर्यंत मंजूर केले आणि कोरम कधी मागीतला हे सांगवे.

**मा.महापौर-** विषय क्रमांक १० पर्यंत मंजूर झालेले आहेत. बाकीचे विषय पुढील सभेत घेणेत येतील.

**मा.नंदा ताकवणे-** मा.महापौर साहेब, आजची सभा सोमवार दिनांक २०/६/२०१६ रोजी दु.१.०० पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडते.

**मा.भारती फरांदे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

**मा.महापौर-** सन्मा.सदस्यांचे आभार मानून आजची सभा सोमवार दिनांक २०/६/२०१६ रोजी दुपारी १.०० वा. पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

-------

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक - ५९**

**सभावृत्तांत**

**(दि.२०/५/२०१६ (दु.२.०० व २.२०) ची तहकूब सभा)**

दिनांक - २०.०६.२०१६ वेळ - दुपारी १.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२०.५.२०१६ (दु.२.२०) ची तहकूब मा. महापालिका सभा सोमवार दि.२०.०६.२०१६ रोजी दुपारी १.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.सायकर अजय शंकरराव
१०. मा.जाधव साधना रामदास
११. मा.जाधव राहुल गुलाब
१२. मा.आल्हाट मंदा उत्तम
१३. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१४. मा.काळजे नितीन प्रताप
१५. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१६. मा.पात्रे राम संभाजी
१७. मा.बाबर शारदा प्रकाश
१८. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव

१९. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम

२०. मा.उल्हास शेट्टी

२१. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

२२. मा.पवार संगीता शाम

२३. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२४. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२५. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२६. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२७. मा.भारती फरांदे

२८. मा.आर.एस.कुमार

२९. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

३०. मा.पांढरकर निलेश शंकरराव

३१. मा.राजू मिसाळ

३२. मा.नंदा विकास ताकवणे

३३. मा.नेटके सुमन राजेंद्र

३४. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३५. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३६. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३७. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३८. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

३९. मा. ॲड.संदीप गुलाब चिंचवडे

४०. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४१. मा.अपर्णा निलेश डोके

४२. मा.अनंत सुभाष को-हाळे

४३. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४४. मा.पवार मनीषा काळूराम

४५. मा.प्रसाद शेट्टी

४६. मा.श्रीमती टेकवडे सुजाता अविनाश

४७. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४८. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

४९. मा.शेख अस्लम शैकत

५०. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५१. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

५२. मा.वाबळे संजय मल्हारराव

५३. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५४. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५५. मा.सुपे आशा रविंद्र

५६. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५७. मा.मोहिनीताई विलास लांडे

५८. मा.गोफणे अनुराधा देविदास

५९. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

६०. मा.महेशदादा किसन लांडगे

६१. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

६२. मा. ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६३. मा.लोंढे शुभांगी संतोष

६४. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

६५. मा.ननवरे जितेंद्र बाबा

६६. मा.सावळे सिमा रविंद्र

६७. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

६८. मा.भोसले राहूल हनुमंतराव

६९. मा.पालांडे सुजाता सुनिल

७०. मा.बहल योगेश मंगलसेन

७१. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

७२. मा.कदम सदगुरु महादेव

७३. मा.गिता सुशील मंचरकर

७४. मा.कैलास महादेव कदम

७५. मा.छाया जगन्नाथ साबळे

७६. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

७७. मा.टाक अरुण मदन

७८. मा.आसवाणी सविता धनराज

७९. मा.वाघेरे सुनिता राजेश

८०. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

८१. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

८२. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

८३. मा.काळे विमल रमेश

८४. मा.पाडाळे निता विलास

८५. मा.विनोद जयवंत नढे

८६. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८७. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

८८. मा.विमलताई सुरेश जगताप

८९. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

९०. मा.बारणे निलेश हिरामण

९१. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

९२. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदू बारणे

९३. मा.बारणे माया संतोष

९४. मा.ओव्हाळ शेखर अशोक

९५. मा.यमुनाताई रमणनाना पवार

९६. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

९७. मा.कलाटे स्वाती मयुर

९८. मा.नांदगुडे विलास एकनाथ

९९. मा.चौंधे आरती सुरेश

१००. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१०१. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

१०२. मा.बोकड रामदास गेणभाऊ

१०३. मा.जवळकर वैशाली राहुल

१०४. मा.जगताप राजेंद्र गणपत

१०५. मा.शितोळे शैलजा बाबुराव

१०६. मा.जगताप नवनाथ दत्तु

१०७. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

१०८. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

१०९. मा.जम सोनाली पोपट

११०. मा.प्रशांत शितोळे

१११. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

११२. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

११३. मा.गायकवाड संध्या सुरदास

११४. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

११५. मा.शेंडगे आशा सुखदेव

११६. मा.मोटे किरण बाळासाहेब

११७. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

११८. मा.संजय केशवराव काटे

११९. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

१२०. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

१२१. मा.पाटील सुजित वसंत

१२२. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

१२३. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.तानाजी शिंदे - अतिरीक्त आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर -मुख्यलेखापरिक्षक, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.गायकवाड, मा.खोसे, मा.दुरगुडे, मा.आष्टीकर - सहा.आयुक्त, मा.पवार- कायदासल्लागार, मा.दुधेकर, मा.निकम, मा.सवणे, मा.लडकत - कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.गोरक्ष लोखंडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मणिपूरमधील दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेले जवान व पुलगाव येथील झालेल्या स्फोटात शहीद झालेले जवान, पांडूरंग महादेव गावडे - जम्मू काश्मीरमधील दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेले जवान, प्रभाकर गुप्ते -ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक, महंमद अली - महान मुष्टीयोध्दा, सुलभा देशपांडे - ज्येष्ठ अभिनेत्री, सूर्यकांत जोग - राज्य पोलिसदलाचे माजी पोलिस महासंचालक, रा.ग.जाधव - ज्येष्ठ समीक्षक, रझाक खान - ज्येष्ठ विनोदी अभिनेते, राजेंद्र दादा खंडाळे- पिंपरी चिंचवड मनपाचे कर्मचारी यांचे दुखद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करुन सभा सोमवार दि.२०/६/२०१६ दु. १.३५ पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.अश्विनी (चिखले) मराठे -** मा.महापौर साहब, सूचनेस अनुमोदन देते.

**मा.महापौर** - श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

**मा.महापौर -** सर्व सदस्यांच्या संमतीप्रमाणे आज दुपारी १.३५ पर्यंत सभा तहकूब करण्यात येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक - ५९

## सभावृत्तांत

**(दि.२०/५/२०१६ (दु.२.०० व २.२०) व दि.२०/६/२०१६ (दु.१.००) ची तहकूब सभा)**

दिनांक - २०.०६.२०१६ वेळ - दुपारी १.३५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२०.६.२०१६ (दु.१.००) ची तहकूब मा. महापालिका सभा सोमवार दि.२०.०६.२०१६ रोजी दुपारी १.३५ वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.सायकर अजय शंकरराव
१०. मा.जाधव साधना रामदास
११. मा.जाधव राहुल गुलाब
१२. मा.आल्हाट मंदा उत्तम
१३. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१४. मा.काळजे नितीन प्रताप
१५. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१६. मा.पात्रे राम संभाजी
१७. मा.बाबर शारदा प्रकाश
१८. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव

१९. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम

२०. मा.उल्हास शेट्टी

२१. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

२२. मा.पवार संगीता शाम

२३. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२४. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२५. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२६. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२७. मा.भारती फरांदे

२८. मा.आर.एस.कुमार

२९. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

३०. मा.पांढरकर निलेश शंकरराव

३१. मा.राजू मिसाळ

३२. मा.नंदा विकास ताकवणे

३३. मा.नेटके सुमन राजेंद्र

३४. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३५. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३६. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३७. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३८. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

३९. मा. ॲड.संदीप गुलाब चिंचवडे

४०. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४१. मा.अपर्णा निलेश डोके

४२. मा.अनंत सुभाष को-हाळे

४३. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४४. मा.पवार मनीषा काळूराम

४५. मा.प्रसाद शेट्टी

४६. मा.श्रीमती टेकवडे सुजाता अविनाश

४७. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४८. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

४९. मा.शेख अस्लम शैकत

५०. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५१. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

५२. मा.वाबळे संजय मल्हारराव

५३. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५४. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५५. मा.सुपे आशा रविंद्र

५६. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५७. मा.मोहिनीताई विलास लांडे

५८. मा.गोफणे अनुराधा देविदास

५९. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

६०. मा.महेशदादा किसन लांडगे

६१. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

६२. मा. ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६३. मा.लोंढे शुभांगी संतोष

६४. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

६५. मा.ननवरे जितेंद्र बाबा

६६. मा.सावळे सिमा रविंद्र

६७. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

६८. मा.भोसले राहूल हनुमंतराव

६९. मा.पालांडे सुजाता सुनिल

७०. मा.बहल योगेश मंगलसेन

७१. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

७२. मा.कदम सदगुरु महादेव

७३. मा.गिता सुशील मंचरकर

७४. मा.कैलास महादेव कदम

७५. मा.छाया जगन्नाथ साबळे

७६. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

७७. मा.टाक अरुण मदन

७८. मा.आसवाणी सविता धनराज

७९. मा.वाघेरे सुनिता राजेश

८०. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

८१. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
८२. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
८३. मा.काळे विमल रमेश
८४. मा.पाडाळे निता विलास
८५. मा.विनोद जयवंत नढे
८६. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
८७. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
८८. मा.विमलताई सुरेश जगताप
८९. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
९०. मा.बारणे निलेश हिरामण
९१. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
९२. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदू बारणे
९३. मा.बारणे माया संतोष
९४. मा.ओव्हाळ शेखर अशोक
९५. मा.यमुनाताई रमणनाना पवार
९६. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
९७. मा.कलाटे स्वाती मयुर
९८. मा.नांदगुडे विलास एकनाथ
९९. मा.चौंधे आरती सुरेश
१००. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
१०१. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
१०२. मा.बोकड रामदास गेणभाऊ
१०३. मा.जवळकर वैशाली राहु ल
१०४. मा.जगताप राजेंद्र गणपत
१०५. मा.शितोळे शैलजा बाबुराव
१०६. मा.जगताप नवनाथ दत्तु
१०७. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
१०८. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
१०९. मा.जम सोनाली पोपट
११०. मा.प्रशांत शितोळे
१११. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

११२. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

११३. मा.गायकवाड संध्या सुरदास

११४. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

११५. मा.शेंडगे आशा सुखदेव

११६. मा.मोटे किरण बाळासाहेब

११७. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

११८. मा.संजय केशवराव काटे

११९. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

१२०. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

१२१. मा.पाटील सुजित वसंत

१२२. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

१२३. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.तानाजी शिंदे - अतिरीक्त आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.ठाकुर-उपसंचालक नगररचना, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.गावडे - सह आयुक्त, मा.पाटील, मा.चव्हाण, मा.तुपे - सह शहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.गायकवाड, मा.माने, मा.खोसे, मा.दंडवते, मा.माछरे, मा.दुर्गूडे मा.आष्टीकर - सहा.आयुक्त, मा.पवार - कायदासल्लागार, मा.पाटील - प्राचार्य, औदयोगिक प्रशिक्षण केंद्र, मा.दुधेकर, मा.निकम, मा.सवणे, मा.पठाण, मा.लडकत, मा.पिरजादे, मा.बरशेट्टी, मा.ओंभासे, मा.शेख, मा.गायकवाड, मा.भोसले - कार्यकारी अभियंता, मा.बोदाडे - प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक-११

दिनांक- २०.६.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/९/१००८/२०१६, दि.२८/०३/२०१६

२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र. ६१ दि.२१/४/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील ड क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील मौजे वाकड येथील स.नं. २१० मध्ये पार्क स्ट्रीट हा गृहप्रकल्प आहे. सदर गृहप्रकल्पात औंध - रावेत हा पोहोच रस्ता आहे. सदर गृहप्रकल्पाचे पाठीमागील बाजूने नाशिक फाटा ते वाकड मुंबई बेंगलोर हायवे हा रस्ता आहे. सदरच्या रस्त्यापर्यंत पोहोच रस्ता आवश्यक आहे. सदरचा नाशिक फाटा ते वाकड मुंबई बेंगलोर हायवे रस्ता व पार्क स्ट्रीट या गृहप्रकल्पा दरम्यान पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे पिंपळे निलख सनं. २७ मधील आरक्षण क्र. ३८७ उद्यान आरक्षण आहे. सदरचे उद्यानचे आरक्षण भागश: विकसित झालेले आहे.

मा.ड प्रभाग समिती मध्ये ठराव क्र. ५६ दिनांक – १३/०३/२०१५ नुसार खालीलप्रमाणे ठराव मंजूर झालेला आहे.प्रभाग क्र. -५४ पिंपळे निलख प्रभागातील मौजे वाकड येथील स.नं २१० रहिवासी विभागातील मिळकतधारकांसाठी रस्त्याची आवश्यकता असल्याने महापालिकेच्या मंजूर आराखड्यातील ४५.०० मी डी.पी.रस्त्यापर्यंत मौजे पिंपळे निलख येथील स.नं. २७ मधून १८.०० मी रुंद रस्ता हा मौजे वाकड येथील स.नं. २१० मधून ४५ मी. रस्त्यापर्यंत मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये १८.०० मी नॉन डी.पी. रस्ता घोषित करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला आहे.”

मा. आयुक्तसो. यांचेकडील दि. ०९/०९/२००४ चे कार्यालयीन मंजूर टिपणी अन्वये कलम २०५ खालील सर्व कार्यवाही प्रभागामार्फत करण्यात येते. ही कार्यवाही म्हणजे नविन रस्ते करण्यासाठी ठराव मंजूर करणे. त्यानंतर नगररचना विभागाकडून नविन प्रस्तावित रस्त्याबाबत वर्तमानपत्रात जाहीरात देऊन लोकांकडून/सुचना/हरकत मागविण्यात येतात जर सुचना/हरकती आल्या तर त्यावर सुनावणी घेऊन मा. आयुक्तसो यांची अंतिम मंजुरी घेण्यात येते. त्यानुसार सदरचा ठराव मंजूर झालेला आहे.

सदर ठिकाणी या विभागाने साईट व्हीजीट केली असता, उपरोक्त मंजूर ठरावानुसार सदर ठिकाणी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये १८.०० मी नॉन डी.पी. रस्ता घोषित करावयाचा झाल्यास आरक्षण क्र. ३८७ च्या पश्चिम बाजूकडील ऐश्वर्यम या गृहप्रकल्पाच्या शेजारील व पिं.चिं.मनपाच्या आरक्षण क्र. ३८७ मधील अंदाजे २६०.९३ चौ.मी. जागा प्रस्तावित रस्त्याने बाधित होईल.त्याबदल्यात उद्यानास लागून अंदाजे २६१.०० चौ.मी. क्षेत्र रामा को-ऑफ हौ.सो.वाकड ही मनपास देणेस तयार आहे. (सोबत अवलोकनार्थ नकाशा जोडला आहे. कृपया अवलोकन व्हावे.) तसेच सदर ठिकाणी मनपाने सिमाभिंतीचे काम पुर्ण

केलेले आहे. मनपाचे ताब्यात द्यावयाचे क्षेत्र सिमाभिंतीच्या बाहेर असून सदरची वाढीव सिमाभिंतही बांधून देणेस रामा को-ऑफ हौ.सो.वाकड तयार असलेबाबत मनपास कळविले आहे.बांधकाम परवानगी विभागाकडील मंजूर आराखड्यातील २६१.०० चौ.मी. क्षेत्र अर्जदार मनपाचे ताब्यात देणार आहेत.तरी सदर क्षेत्राचा चटई क्षेत्र निर्देशांकातून वगळणेत यावेत.सदरबाबत अर्जदार यांनी दिनांक – २४/०९/२०१५ चे हमीपत्रान्वये एफएसआय/टीडीआर अथवा इतर कोणताही मोबदला पिं.चिं.मनपाकडे मागणार नाही असे हमीपत्र सादर केलेले आहे. तसेच सदर क्षेत्रास मनपाचे नांव ७/१२ उता-यावर लावण्यात यावे या अटीवर मान्यता देण्यास हरकत नाही.

सदरचा रस्त्याचा उपयोग पार्क स्ट्रीट या गृहप्रकल्पाबरोबर ऐश्वर्यम या गृहप्रकल्पाच्या पाठीमागील मिळकतधारकांसाठी सुध्दा होईल. तसेच सदरबाबत मा. ड प्रभाग समितीनेही १३/३/२०१५ रोजी ठराव मंजूर केलेला आहे.सदरचा प्रस्ताव मान्य झालेनंतर मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम २०५ अंतर्गत मनपा रस्ता घोषित करणेबाबतची पुढील कार्यवाही करीता हरकती/सुचना मागविणेत येतील.

अर्जदार यांचे निवासी भागातील २६१.०० चौ.मी. क्षेत्र मनपाचे ताब्यात घेऊन त्याचे १८.०० मी.रस्त्यासाठी मनपाकडून आरक्षण क्र. ३८७ मधील अंदाजे २६०.९३ चौ.मी. जागा अदलाबदल करणेसाठी धोरणात्मक निर्णय घेणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.स्वाती साने -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.आरती चौंधे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा माझ्या वॉर्डातील विषय आहे आणि नागरीकांच्या हितासाठी हा रस्ता केला पाहीजे. त्या मोबदल्यात दुसरी जागा देण्यास तयार आहेत. तरी हा विषय मंजूर करणेत यावा.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा.सुजाता टेकवडे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ८६८ विषय क्रमांक-११

दिनांक- २०.६.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/९/१००८/२०१६, दि.२८/०३/२०१६

२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र. ६१ दि.२१/४/२०१६

विषय क्रमांक ११ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

अनुकूल - ८१ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमे मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १२

दिनांक- २०.६.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.प्रशा/१/कावि/२२२/२०१६ दि.११/०४/२०१६

२) मा.महापालिका ठ.क्र.८५२ दि.२०/४/२०१६

**विषयाचा आशय :- आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर करावयाच्या नेमणूकीस शासन मान्यता मिळणेबाबतच्या शासनास सादर केलेल्या प्रस्तावाबाबत.**

**विषयाचे संदर्भात टिपण** :- पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर 'आरोग्य वैद्यकीय अधिकारी' या अभिनामाचे एकमेव पद पे बॅन्ड र.रु. १५६००-३९१०० ग्रेड वेतन ७६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्र गुरुवार दि. १७ ऑक्टोबर १९८५ भाग एक ए पुणे विभाग यांमध्ये आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदावर पदोन्नतीने नेमणूक करण्याकरीता पुढीलप्रमाणे अर्हता निश्चित करण्यात आलेली आहे.

<u>पदोन्नती</u> -

1. मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील एम.बी.बी.एस आणि सार्वजनिक आरोग्य विषयातील पदविका **(DPH)**
2. सहाय्यक आरोग्याधिकारी किंवा वैद्यकीय अधिकारी पदावरील सलग ५ वर्षापेक्षा जास्त कालावधीचा कामकाजाचा अनुभव.

डॉ. नागकुमार कुणचगी हे आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदावरुन दि.३०/०४/२०११ रोजी सेवानिवृत्त झाल्यापासून मा. शासनाकडे 'जॉईन्ट डायरेक्टर' दर्जाचा अनुभवी व कार्यक्षम अधिकारी प्रतिनियुक्तीवर उपलब्ध करुन देणेबाबत विनंती करुनही तो उपलब्ध न झाल्याने व आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे जबाबदारीचे पद असल्याने दि.३१/०५/२०१३ रोजीच्या 'कार्यालयीन अधिक्षक' पदाचे पदोन्नती समिती सभेपुढे आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे पद पदोन्नतीने भरण्यासाठी विचार करण्यात आला.

प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदाकरीता आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता, आरक्षण, गोपनीय अहवाल, सेवाज्येष्ठता क्रमांक व अनुभव कालावधी इत्यादि सेवाविषयक तपशील विचारात घेऊन दि.३१/१२/२०११ चे वैद्यकीय अधिकारी पदाचे अंतिम सेवाज्येष्ठता यादीमधील आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदासाठी आवश्यक असणारी अर्हता धारण करणारे अ.क्र. २० वैद्यकीय अधिकारी डॉ.के.अनिल रॉय हे एम.बी.बी.एस. असून त्यांनी डी.पी.एच. ही शैक्षणिक अर्हता दि.३०/०५/२०१३ रोजी धारण केली आहे. तसेच या सेवाज्येष्ठता यादीमधील अ.क्र. २४ वरील अधिकारी डॉ.पवन वसंत साळवे यांनी एम.बी.बी.एस. व पी.एस.एम. ही शैक्षणिक अर्हता धारण केली असून, या दोन अधिकाऱ्यांमध्ये डॉ. के. अनिल रॉय हे सेवाज्येष्ठ अधिकारी असल्याने त्यांना आरोग्य वैद्यकीय अधिकारी या रिक्त पदावर पे बॅन्ड १५६००-३९१०० ग्रेड पे ७६०० या वेतनश्रेणीमध्ये मा.विधी/महापालिका सभेच्या मान्यतेने नेमणूक देण्यास तसेच सदर नेमणूकीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५(४) मधील तरतुदीनुसार शासन मान्यतेच्या अधिन पदोन्नतीने नेमणूक देण्यास सर्वानुमते शिफारस केली आहे. मा.महापालिका सभेने ठराव क्र. ५०३ दि.०५/०७/२०१४ अन्वये डॉ. के. अनिल रॉय यांच्या आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावरील पदोन्नतीस मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार डॉ. अनिल के. रॉय यांना आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर पदोन्नतीने करावयाच्या नियुक्तीस मा.शासनाची पूर्वमान्यता/मार्गदर्शन मागणी केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने दि.१४/०१/२०१५ व दि.०७/०३/२०१५ च्या शासन पत्रान्वये सदर पदासाठी विहित केलेल्या सेवाप्रवेश नियमातील तरतूदी, तसेच पदोन्नती संदर्भात केलेले सर्वसाधारण निकषाच्या(ज्येष्ठता, गोपनीय अहवालाची सरासरी किमान प्रतवारी, निम्न पदावर किमान सेवा) आधारे महापालिकेने तपासणी करुन महाराष्ट्र महापालिका अधिनियमाच्या कलम ४५(१) अन्वये आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावरील नेमणुकीबाबत महापालिकेस प्रदान अधिकारात उचित निर्णय घेऊन कलम ४५(४) अनुसार योग्य तो प्रस्ताव शासनास सादर करण्याकामी निर्देश दिलेले होते.

शासन निर्देशाच्या अनुषंगाने दि.३१/०५/२०१३ रोजीच्या पदोन्नती समितीची शिफारस, मा.महापालिका सभेची मान्यता, शासन निर्देश आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी या बाबी विचारात घेऊन, आदेश क्र. प्रशा/१/कावि/३७७/१५, दि.२८/०४/२०१५ अन्वये डॉ. के. अनिल रॉय यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५(४) मधील तरतुदीनुसार शासन मान्यतेच्या अधिन पदोन्नती देण्यात आली आहे

प्रकरणी शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार डॉ. के. अनिल रॉय यांच्या आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावरील पदोन्नतीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ४५(४) नुसार

शासन मान्यता मिळण्याकामी इकडील पत्र दि.१५/०५/२०१५ अन्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. मूळ प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने मागणी केलेल्या माहितीच्या पूर्ततेनुसार प्रकरणी इकडील पत्र दि.२१/०९/२०१५ अन्वये अंतिम अहवाल मा. शासनास सादर करण्यात आलेला आहे.

त्यानुसार नगरविकास विभाग शासन पत्र क्र.पीसीसी-३०१५/प्र.क्र.३५०/नवि-२२, दि.१४/०३/२०१६ अन्वये प्रकरणी महापालिकेने शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदाचे सेवाप्रवेश नियम, पदोन्नतीसाठी विहित केलेली अर्हता, अनुभव व अन्य संबंधित बाबी विचारात घेऊन पदोन्नती समितीच्या निर्णयाचा फेरविचार करण्याबाबतची कार्यवाही करणेकामी कळविले आहे. त्यानुसार पदोन्नती समितीच्या निर्णयाचा फेरविचार करणे बाबत विचार करणे.

**मा.स्वाती साने -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.गोरक्ष लोखंडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा विषय या सभागृहात अनेकवेळेला चर्चीला गेलेला आहे आणि योग्य तो निर्णय घेण्यासाठी या सभागृहावर सोडलेला आहे. सभागृहाने निर्णय घ्यावा असे शासनाने पुन्हा दुबार कळवलेले आहे. त्याच्यानंतर डॉ.साळवे हे स्टेट कमीशन कडे गेले त्यानंतर सेंटर कमीशनकडे गेले आणि स्टेट कमीशनने योग्य तो निर्णय घ्यावा म्हणून पीसीएमसीला पत्र दिलेले आहे. त्या पत्रामध्ये एससी कमीशन क्लिअर सांगते. (इंग्रजी मधील माहीती वाचन केली) या एससी, एसटी कमीशनला न्यायालयाचा दर्जा असतो आणि या न्यायालयाने दिलेला निर्णय जर आपण पाळू शकत नसु तर कन्टेम्प्ट ऑफ कोर्ट त्यानंतर महाराष्ट्र शासनाने परत एक पत्र लिहीलय की या जनरल बॉडीने घेतलेला निर्णय, सर्वोच्चस्थानी ही आमसभा आहे. महाराष्ट्र सरकार पण या निर्णयाच्या बाबतीत म्हणतय की तुम्ही फेरविचार करावा. ज्यावेळेला कमीशन पण असं सांगतय आणि राज्य शासन पण असं सांगतय कशासाठी असंत हो हे कमीशन. सबसे ऊपर हैं हमारा संविधान. हा देश चालतो संविधानावर, संविधानाच्या ३९५ कलमावर अतीशय महत्वाचे कलम आहे. त्या संविधानाच्या कलम १७ वर (इंग्रजी मधील माहीती वाचन केली) आणि त्या १७ व्या कलमावर ॲट्रॉसिटी ॲक्ट आधारलेला आहे तो तयार झालेला आहे. त्या अर्टीकल १७ चे आपण कन्टेम्प्ट करत नाहीत का. याच्यावर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घटना लिहून ही महान कलम त्यामध्ये समाविष्ट केलेली आहेत. दबलेल्या लहान माणसाचा आवाज सर्वांच्या समोर यावा, त्याना न्याय मिळावा म्हणून ते अर्टीकल १७ आहे. काय सांगतो ॲट्रॉसिटी ॲक्ट १९५४ चा पीसीआर आहे तो. म्हणजे १९८९ ला अमेन्डमेंट झाली १९९४ साली रुल्स आले “पार्लमेंट ऑफ इंडीया” आणि “पार्लमेंट ऑफ इंडीयान” ते रुल्स बायंडीग केल्यानंतर २०१५ ला काही नव्या अमेन्डमेंट आल्या, आपण याचा विचार का करणार नाहीत. वस्तुस्थिती थोडीशी

लक्षात घ्यावी. डॉ.रॉय तर सेवेत पण होते ते सर्व्हिसमध्ये असताना त्यांनी हा डिप्लोमा केला कसा. त्यांना परमीशन कोणी दिली, असे होऊ शकते का. असे अनेक महापालिकेमध्ये अनेक निर्णय आमसभेनी घेतलेले, आमसभेने परत घेतलेले आहेत. मग जर एखादा माणुस मला पालिकेत न्याय मिळत नाही म्हणून शासनाकडे जातो आणि शासन तुम्हांला सांगतय याचा फेरविचार करावा. शासनाने पीसीएमसीला लिहीलेले आहे या निर्णयाचा फेरविचार करावा म्हणून. मा.महापौर साहेब, पिंपरी चिंचवड महापालिकेनी २८/४/२०१५ च्या आदेशान्वये डॉ.अनिल रॉय, वैदयकीय अधिकारी यांना प्रथम एक वर्षाच्या कालावधीसाठी शासन मान्यतेच्या अधिन आरोग्य वैदयकीय अधिकारी या पदावर पदोन्नती दिली. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५ (४) मधील तरतुदीनुसार सदर पदोन्नतीस शासनमान्यता मिळणेकामी १५/४/२०१५ अन्वये प्रस्ताव सादर केलेला असून तसे करताना सदर पदोन्नतीबाबत आलेल्या विवीध स्तरावरुन तक्रारीकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष करण्यात आलेले आहे. सदर प्रस्तावानुसार वैदयकीय अधिकारी, या पदाच्या अंतीम सेवाजेष्ठता यादीवरील आरोग्य वैदयकीय अधिकारी या पदासाठी आवश्यक असणारी अर्हता दि.३१/५/२०१३ रोजी धारण करणारे वरील डॉ.अनिल रॉय व डॉ.पवन साळवे जुलै ९४ मधील अर्हता धारण केलेले व अति.आरोग्य वैदयकीय अधिकारी पदावर कार्यरत असलेले सेवाज्येष्ठ असलेले चुकीचे व खोटे दाखवणेत आलेले आहे. वैदयकीय अधिकारी वेतनश्रेणी ३९१००- व ग्रेडवेतन ७६०० या रिक्त पदावर पदोन्नती समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने तसेच जुन्या व अपु-या चुकीच्या आधारे केलेल्या महापालिका सभा ठराव क्र. ५०३ दि.५/७/२०१४ अन्वये महापालिकेनी दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने डॉ. अनिल रॉय यांना वैदयकीय अधिकारी या पदावर चुकीची पदोन्नती देण्यात आलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ४५ अन्वये नियुक्त्या या राज्यशासनाच्या मान्यतेच्या अधिन करण्यात येतात व नगरपालिका, सचिवा व्यतिरीक्त केलेल्या नियुक्त्यांचा महाराष्ट्र महागरपालिका अधिनियम ४५ (४) मधील तरतुदी नुसार शासन मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर चुकीच्या पदोन्नती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ४५ (४) मधील तरतुदी नुसार मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाकडे खोटया माहीतीच्या आधारे सादर करण्यात आलेला आहे. आरोग्याधिकारी या पदावरील पदोन्नतीच्या संक्षिप्त पार्श्वभूमी आपल्याला सगळया सभागृहाल ज्ञात आहे. आणि ख-या अर्थाने या सगळया गोष्टीचा जर विचार केलातर आपण अशा पध्दतीने या सगळया गोष्टीला मान्यता का देतो. वैदयकीय अधिकारी हे पद रिक्त झाल्यानंतर दि.१/५/२०११ ला सदर पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार निवडसूची तयार करणे आवश्यक होती तथापि सन २०११ मध्ये निवडसूची न करता दि. ३१/५/२०१३ रोजी बैठक घेवून निवडसूची तयार करण्यात आल्याचे व सन २०११ मध्ये आवश्यक शैक्षणिक अर्हता अनुभव धारण असलेल्या डॉ. पवन साळवे यांना पदोन्नतीसाठीच्या

हेतूपुरस्सर केले नसल्याचे आढळून आलेले आहे. राष्ट्रीय अनुसूची जाती आयोगाने दि. २/१२/२०१३ च्या पत्रान्वये कळवूनही त्यानुसार कार्यवाही करण्याचे टाळण्यात आलेले आहे. पुढे असेही आढळून आले की, आरोग्य वैदयकीय अधिकारी हे पद पदोन्नतीसाठी उपलब्ध झाल्याचे दि.१/५/२०११ सेवाप्रवेश नियमानुसार आवश्यकतेची अर्हता, अनुभव व सेवाजेष्ठता विचारात घेवून निवडसूची न करता दि. ३१/५/२०१३ रोजीच्या तिथीस अनुसरुन निवडसूची तयार करुन डॉ.रॉय यांना पदोन्नती देण्यात आलेली आहे. सदरची बाब पदोन्नती नेमणुकी विषयीची शासनाचे धोरण व नियमबाहय असे उल्लंघन करणारे असून डॉ.साळवे यांच्यावर अन्याय करणारे आहे. तरी शासनाच्या पदोन्नती समितीच्या निर्णयाचा फेरविचार करण्यात यावा. या पत्रानुसार महानगरपालिका प्रशासनाने व पदोन्नती समितीने शासनाच्या पदोन्नती बाबत नियम व धोरणानुसार कारवाई करणे गरजेच आहे. मा.महापौर साहेब, शासन पण सांगतय याचा फेरविचार करावा, कमीशनने पण निर्णय केलेला आहे. ॲट्रॉसिटी ॲक्ट नुसार कुठेतरी विचार करावा लागेल. नियमबाहय आपल्याला करायच पण नाही आणि म्हणून कुठेतरी एका माणसावर अन्याय होतो आहे आणि त्या माणसाला आपण न्याय मिळवून देण्यासाठी ख-या अर्थाने शासनाने व कमिशनने जे निर्देश दिलेले आहेत, या सर्व गोष्टीचा अवलंब व्हावा ही विनंती.

**मा.धनंजय आल्हाट -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आजच्या विषया संदर्भात विवीध अस्थापनेवरील पदोन्नती आणि शासनाकडील नियुक्ती या संदर्भामध्ये आपल्या लेखा विभागात सन्मा. भोसले मुख्यलेखापाल म्हणून काम करत होते त्यांची बदली झालेली आहे. त्याच्यानंतर हे पद रिक्त स्वरुपात आहे. ब-याचशा वेळा आपण आपल्या कर्मचा-यामधुन महापालिकेच्या अस्थापनेवरुन पदोन्नती होते. जे वर्षानुवर्ष आपल्या महापालिकेची सेवा करतात चांगल काम करतात आणि त्यांना कुठतरी एक आशा असते की पदोन्नतीमध्ये सेवाजेष्ठतेनुसार आणि पात्रतेनुसार आपल्याला कुठेतरी न्याय मिळेल असा एक आशेचा किरण या सर्व कर्मचा-यांमध्ये असतो. ब-याचशावेळेला आपल्या काही पदावरती शासनाकडून नियुक्त्या पदाच्या होत असतात परंतु नवीन अकृतीबंध कायदयानुसार किंवा तरतुदीनुसार ज्या काही तरतूदी केलेल्या आहेत त्याच्यामध्ये स्पष्टपणे लिहीलेले आहे की या लेखा विभागामध्ये जे काही पद रिक्त आहेत, आपण शासनाची वाट पाहतो की शासन याच्यावरती नियुक्ति करेल म्हणून. मा.महापौर साहेब, आयुक्त साहेब या लेखा विभागात ज्यांनी अनेक वर्षे काम केलेले आहे आणि अकृतीबंधामध्ये सुध्दा अशाप्रकारच्या तरतूदी आहेत की जर याच विभागात पाच वर्षे सेवापुर्ती त्यांची झाली असेल आणि सेवाजेष्ठतेनुसार व पात्रतेनुसार त्यठिकाणी त्याची पदोन्नती होत असेलतर त्यठिकाणी महापालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचारी नियुक्त करण्यास काही हरकत नाही असे स्पष्टपणे त्या तरतूदीमध्ये

लिहीलेले असताना गेले पंधरा दिवस झाले सन्मा. भोसले यांची बदली झालेली आहे हे पदास अकृतीबंधामध्ये अशाप्रकारची तरतूद आहे. जर आपल्या महापालिकेमध्ये लेखापाल या पदावरुन जर सेवाजेष्ठतेनुसार, पात्रतेनुसार अशी नियुक्ती करता येत असेलतर मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, याचा विचार केला गेला पाहीजे. आपल्या कर्मचा-यांना त्याठिकाणी न्याय मिळेल आणि पदोन्नतीनुसार त्यांना त्या पदाचा लाभ होईल आणि महापालिकेची चांगल्या पध्दतीने आपले कर्मचारी सेवा करु शकतात त्यामुळे कुठल्याही प्रकारची वाट न पाहता शासनाचा अधिकारी त्याठिकाणी येईल, शासनाकडे आपण पत्राने विचारणा करु या कुठल्याही प्रकारची वाट न पाहता आपल्याच महापालिकेतील कर्मचा-यांना त्याठिकाणी नियुक्त करावे अशी सूचना मी करतो. कारण त्या कर्मचा-यांना न्याय मिळाला पाहीजे. त्या कर्मचा-यांना न्याय मिळाला नाहीतर ते कर्मचारी नाउमेद होतात त्यामुळे आपण कुठल्याही प्रकारचे नियमबाहय, चुकीचे असे काम केलेतर आताच लोखंडे साहेबांनी जो विषय मांडला, पदोन्नतीमध्ये जो काही वाद निर्माण झालेला आहे. कोर्टापर्यंत, शासनापर्यंत तो वाद गेला आहे त्यामुळे अशाप्रकारचा निर्णय घेताना नवीन अकृतीबंधाच्या तरतूदी नुसार आपण निर्णय घ्यावा आणि आपल्या कर्मचा-यांना आपण न्याय दयावा. त्यामुळे एक चांगल्याप्रकारची भावना निर्माण होईल आणि आपले लोक त्याठिकाणी असल्यामुळे चांगल्या प्रकारचे काम होईल. शेवटी महापालिकेच्या कामकाजात किंवा नगरसेवकांना ते कितपत महत्व देतात याचाही अनुभव आपण सर्वांनी याठिकाणी घेतलेला आहे. त्यामुळे आपल्या महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना ताबडतोब सेवाजेष्ठतेनुसार व पात्रतेनुसार नियुक्त करावे अशी सूचना करतो आणि थांबतो.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सर्वात प्रथम मी धनंजय आल्हाट यांच्या प्रस्तावाला अनुमोदन देतो. अनेक वर्षे रेंगाळत असलेला आपला आर आर जो होता त्याला आणि आता आकृतीबंध म्हणतात त्याला मागच्याच महीन्यामध्ये मान्यता दिलेली आहे. त्यामध्ये विधी समिती सर्व सन्मा. सदस्य, मा.महापौरांनी लक्ष घालून त्यामध्ये जास्तीत जास्त आपल्या कर्मचा-यांना कसा न्याय देता येईल याबाबतचा निर्णय सभागृहामध्ये पारीत केला. आताच आल्हाट यांनी सांगीतल्याप्रमाणे जे वर्षानुवर्ष सेवा या शहरामध्ये करतात आणि जे शिकलेले आहेत, त्या पदाला लायक आहेत त्यांना न्याय मिळाला पाहीजे या हेतूने आपण त्या अकृतीबंधाला मान्यता दिलेली आहे. दुर्दैवाने असे बघायला मिळतय की एकेकाळी या महापालिकेमध्ये शासनाकडून एक सहा.आयुक्त आणि आपले पाच ते दहा सहा.आयुक्त असायचे परंतु अलीकडच्या नवीन धोरणाच्या अनुषंगाने म्हणा नंतर मग शासनाने निम्मे निम्मे केले आणि आता माझ्या माहीतीप्रमाणे जे ११ पद मंजूर आहेत त्यामध्ये शासनाकडून ६ व महापालिकेचे ५ असावे अशा पध्दतीचे निर्देश असताना सुध्दा मला

खेदाने नमुद करावे लागते की आता महापालिकेचे २ सहा.आयुक्त व १ ला पदभार दिलेला आहे पण रेग्युलर प्रमोशन दिलेले नाही आणि नुकतेच आता एक सहा.आयुक्त शासनाकडून याठिकाणी नियुक्त झालेले आहेत. म्हणजे एका बाजुला आम्हां लोकांना बाजुला ठेवून आमच्यावर लादायच काम चाललेल आहे. म्हणजे आमची स्वायत्ता काढून घेवून हुकूमशाही चाललेली आहे की काय असे वाटू लागलेले आहे त्यामुळे आलेला अधिकारी चांगला नाही असे आमचे म्हणणे नाही आणि येणारा अधिकारी रेव्हेन्यू डिपार्टमेंटचा येवू नये असंही आमच म्हणण नाही परंतु शासनाच्या प्रमाणामध्ये आलेतर, नियमाप्रमाणे आलेतर आम्ही स्विकारायला तयार आहोत. परंतु नियमाच्या चौकटीच्या बाहेर जर आमच्यावर काही लादल जाणार आसेलतर आम्ही लादून घेणार नाहीत. आम्हांला दुर्दैवाने शासनाकडून आलेल्या अधिका-याला परत शासनाकडे पाठवा अशाप्रकारचा निर्णय घ्यायला लावू नका. आम्हांला आलेली व्यक्ति माहीत नसते, ती व्यक्ति कोणाकडून आलेली आहे, त्यांची काय अर्हता आहे याची काही माहीती नसते. अर्थात त्यांची अर्हता असल्या शिवाय ते येवूच शकत नाहीत. परंतु आमच्या कर्मचा-यांसाठी आमच्या नियमाप्रमाणे आरक्षीत असलेल्या जागेवर शासनाचे अधिकारी बळजबरीने नियुक्त करु नयेत आणि केलेतर आम्ही परत पाठवणार आहोत. आता आल्हाट यांनी येथे सांगीतल्याप्रमाणे पुर्वी नगरपालिका असताना कॅपो पद होतं परंतु चिफ अकौंटंट पद झाल्यानंतर प्रशासनान यावेळेला शासनाकडचा माणुस पाहीजे असं म्हणल्यावर याच्यावर अनेकवेळा सादकबाधक चर्चा झाली. त्या चर्चेमध्ये असं सुध्दा झाल की चिफ ऑडीटर हे पद शासनाकडून यावे कारण चिफ ऑडीटर हे पद महत्वाच असतं त्यांचा सर्व अकौंटसवर अंकुश असावा म्हणून बाहेरचा माणुस असावा परंतु चिफ अकौंटंट या पदावर आपल्या कर्मचा-यामधुन प्रमोशन मिळावे म्हणून आपण विधी समितीमार्फत आणि सभागृहाने जनरल बॉडी मार्फत सुध्दा आपल्या कर्मचा-यामधुन शंभर टक्के पदोन्नतीने हे पद असाव अशी मान्यता आपण दिलेली आहे. अर्थात आता हे शासनाकड जावुन शासन त्याला मंजुरी देईल अथवा न देईल हा नंतरचा भाग आहे. परंतु इतर महानगरपालिकेचा जर अभ्यास केलातर पुणे महापालिकेचा, नाशीक महापालिकेचा अभ्यास केलातर त्याठिकाणी हे पद पदोन्नतीने कर्मचा-यामधुन भरले जाते. त्यामुळे आमच्या अधिका-यांवर अन्याय होवू नये त्यामुळे जे कोणी अधिकारी याठिकाणी आलेले असतीलतर आमची विनंती आहे की तुम्ही शासनाला पत्र लिहावे अन्यत: जनरल बॉडीला हा विषय आल्यानंतर आम्हांला पुन्हा त्यांना शासनाकडे पाठवावे लागेल याची दखल आपण घ्यावी आणि मा.महापौर साहेब, त्याप्रमाणे सभागृहाच्या भावना लक्षात घेवून आपल्या कर्मचा-याना न्याय देता यावा. आमचे जे पद आरक्षीत आहेत आमच्या लोकांसाठीची ती पद आहेत त्या पदांना निश्चित न्याय मिळाला पाहीजे. आणि म्हणून ६ सहा.आयुक्त शासनाचे आहेत व ५ सहा.आयुक्त आमचे आहेत.

आमच्या लोकांना पाच जागा मिळाव्यात तोपर्यंत काही लोकांना पदभार दिलातरी चालेल. परंतु त्यावर इतरांचे अतिक्रमण होवू नये. आम्ही ही दडपशाही, हुकूमशाही सहन करणार नाहीत कृपया याची नोंद घ्यावी.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह विषय क्रमांक १२ आरोग्य वैदयकीय अधिकारी या अभिनामाच्या पदासाठी मागच्या वर्षी आपण डॉ.रॉय यांचा ठराव मंजूर केलेला होता, राज्यशासनाकडे पाठविल्यानंतर पुन्हा तो आपल्याकडे परत आलेला आहे. त्या ठरावाचा फेरविचार करावा असे शासनाने आपल्याला कळवलेले आहे. आपण जो ठराव मागच्या वर्षी केलेला होता तो ठराव जर बरोबर असतातर, तो ठराव जर नियमानुसार असतातर शासनाने हा ठराव परत आपल्याकडे पाठविला नसता. शासनाने आपल्याकडे ठराव पाठविलेला आहे याचा अर्थ या ठरावाचा आपला निर्णय चुकलेला आहे म्हणूनच शासनाने हा ठराव आपल्याकडे परत पाठविलेला आहे. शासन ही मोठी संस्था आहे, शेवटची स्टेप आहे, शासन विनाकारण हा ठराव परत पाठविणार नाही. आणि आज पुन्हा आपण तोच विषय त्याच पध्दतीने परत आज मंजुर करुन शासनाकडे पाठविणार असूतर आज आपण दुसऱ्यांदा परत तीच चुक करणार आहोत. ही चुक परत होऊ नये अशी माझी सभागृहाला विनंती आहे. माझ्या आदि गोरक्ष लोखंडे यांनी सांगीतले की अर्हता, अनुभव याची चर्चा मागच्या वर्षापासून चाललेली आहे. हा विषय सर्वांना माहिती आहे. मग ज्याचा त्याचा अधिकार ज्याला त्याला मिळाला पाहीजे. कोणीतरी अधिकारी आपल्याला योग्य वाटत नाही त्याची योग्यता आणि अयोग्यता आपण नेमक कशावरुन ठरवतो हा सुध्दा एक मोठा प्रश्न आहे. कोणालातरी आपण प्रमोशन देतो म्हणजे कोणावर तरी आपण उपकार करतो किंवा कोणालातरी आपण प्रमोशन देत नाही म्हणजे कोणालातरी शिक्षा करतो. हा कोणावर तरी उपकार करण्याचा, कोणालातरी शिक्षा देण्याचा अधिकार हा आपल्याला नाही. आपली सर्वोच्च बॉडी म्हणून आपल्याकडे जे विषय येत असतात योग्य न्याय, योग्य निर्णय घेण्यासाठी आपण याठिकाणी बसलेलो आहोत तेव्हा आपला निर्णय चुकलातर याचा सुध्दा फार मोठा अपमान, याची सुध्दा चर्चा होत असते. आमची विनंती आहे जरी हा ठराव आज जशाच्या तसा मंजूर झालातरी ती उदया चुकच ठरणार आहे. माझी विनंती आहे की चुकीचा निर्णय जीबी जरी घेत असलीतरी त्याची दुरुस्ती आपण केली पाहीजे. मा.महापौर साहेब, आपल्या अध्यक्षतेखाली चुकीचा निर्णय कुठल्याही पध्दतीने होवु नये. आज कुठला अधिकारी चांगला, कोण चांगला याच्याशी आम्हांला देणे घेणे नाही. डॉ.रॉय सरांच आणि आमचं काही वैयक्तिक भांडण नाही, त्यांच्याकडून आम्ही काम रोजच करुन घेत असतो. पण ज्याचा त्याचा अधिकार ज्याला त्याला मिळाला पाहीजे. तेव्हा चुकीचा ठराव होवू नये आणि या चुकीच्या ठरावाचे आम्ही भागीदार होणार नाहीत. हा ठराव जशाच्या तसा पुन्हा मंजूर करण्यास माझा विरोध

आहे. शासनाने पुन्हा ठराव करावा यासाठी हे पत्र पाठविलेले आहे. याच्यामध्ये डॉ.साळवे यांनी जी मागणी केलेली आहे अनुसूचीत जातीजमातीच्या आयोगाने जे पत्र दिलेले आहे त्या पध्दतीनेच हा ठराव व्हावा अशी मी विनंती करते, धन्यवाद.

**मा.भाऊसाहेब भोईर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह खरंतर आकृतीबंधचा विषय २५ वर्षानंतर विधी समिती समोर आलेला आहे. योगायोगाने मी विधी समितीमध्ये असल्या कारणाने ब-यापैकी प्रशासनाने त्याची वर्गवारी केलेली आहे. नियमाने काम करण्यासाठी अनेक संकेत आकृतीबंधामध्ये आम्हांला पाहीला मिळाले आणि त्यास सर्वानी एकमताने मंजूरी दिलेली आहे. खरेतर निवडणूकीचा कालखंड असल्या कारणाने प्रत्येक विकास कामासंदर्भात चर्चा किंवा फार मोठे संकट किंवा काहीतरी जबाबदारीने काम करण्याचा अधिकारी सध्या कुठेच नाही, कुणाला कुठे बसायचय, कोण कुठ सेटींग लावतय असे चाललेले आहे. त्यांना माहीती आहे की आता चार महीने पावसाळयाचे आहेत आता काम करायच नाही. नंतर आचारसंहीता लागते. या सगळया वादामध्ये आम्हांला कशाला घेता. सगळेच अधिकारी चांगले असतात त्यांच्या विषयी नाहक आम्हांला चर्चा करावी लागते. आम्ही वर्गवारी करु शकत नाहीत की हा अधिकारी चांगला आहे, तो अधिकारी वाईट आहे. आता योगेश बहल म्हणाल्याप्रमाणे ११ सहा.आयुक्त नियमाने ठरवलेले आहेत. कालच आम्ही ताकवलेताई यांच्या अध्यक्षतेखाली मिटींग घेवून रितसर ठराव केलेला आहे. सहा तुमचे व पाच आमचे केलेले आहे. खरंतर ते साडेपाच साडेपाच होऊ शकत नाही म्हणून सहा आणि पाच असे केलेले आहेत. त्यादृष्टिकोनातून सक्त आदेश पाळले जावेत याच्यावर कोणत्याही अधिका-यांचा अपमान करण्याचा आमचा हेतू नाही. जे नियमाप्रमाणे आहे त्याप्रमाणे होईल. राहीला प्रश्न तो त्या नियमामध्ये तो अधिकारी बसतो का. कोणत्या अटि शिथील करायच्या हे आम्हांला माहीती आहे आणि अनेक वर्षे त्या पध्दतीने चाललेले आहे. त्यामुळे याच्यावर आपण चर्चा करण्यात काय अर्थ आहे. कोणतेही डॉक्टर आलेतर ते दोन्ही डॉक्टर महापालिकेचेच आहेत. जो विषय होता तो विषय प्रशासन विभागाने मा.श्रीकर परदेशी असताना ठेवलेला होता. महापालिकेच्या नगरसेवकांनी त्याची नियमावली तयार केलेली नव्हती त्यामुळे प्रशासनाने ठेवलेला विषय फक्त आपण मंजूर केलेला आहे. त्यामुळे फार वादविवाद, फार कुणाच्यातरी प्रेमात वक्तव्य करायचं असं काहीच नाही. त्यांना जे करायच ते करतातच, अधिकारी ज्याच ऐकायच त्याच ऐकतातच, ज्याच ऐकायच नसलतरी त्यांने कितीही बोंबाबोंब केलीतरी त्याच ऐकणार नाहीत. एवढं त्यांच्या पण प्रेमात जायची काही गरज नाही. नियमाप्रमाणे करावे, नियमबाहय होवू नये, याची आपण दखल घेवून हा विषय करावा. योगेश बहल यांच्या सुचनेला अनुमोदन देतो.

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याठिकाणी आता जे भाऊसाहेब भोईर म्हणाले त्याला मी अनुमोदन देते. खरेतर हा जो विषय आहे त्याच्यावर फार वर्षापासून चर्चा चाललेली आहे असे म्हणलेतरी काही वावगे ठरणार नाही. अधिका-यांना महापालिकेच्या माध्यमातून अटी-शर्ती शिथील करत असताना किंवा उमेद मान्यता देत असताना नियमांचा विचार हा प्रशासकीय बाजू आहे, नगरसेवकांची बाजू नाही. त्यामुळे तुम्ही तो विषय परत परत आमच्या समोर आणून, तुम्ही याठिकाणी एकतर नगरसेवकांमध्ये फुट पाडताय किंवा अधिका-यांना कुणालातरी जवळ करण्याची संधी तुम्ही प्राप्त करुन देता. आपल्याला या पुर्वीही सांगीतल की डॉ. अय्यर, डॉ.नागकुमार यांच्यामध्ये अशाचप्रकारचा वाद गेले कित्येक वर्षे झाला त्याचा परिणाम कारभारावरती झाला, वायसीएमकड दुर्लक्ष झाल. महानगरपालिकेमध्ये नगरसेवकांसमोर ऑडीट झाल आणि प्रत्येक जण आपआपल्या व्यक्तींना पाठिंबा देण्यासाठी उत्सूक होताना तयार होवू लागला आता ती वेळ येवू नये. जो योग्य निर्णय आहे तो तुम्ही ताबडतोब घेतला पाहीजे. निर्णय घेत नसालतर दोन्ही व्यक्तींना ईक्वलन्ट पोस्ट जर तयार होत असतीलतर, आम्हांला कामाशी संबंध आहे. कुणाशीही आमचा वैयक्तिक संबंध नाही किंवा कोणा एकाला दया म्हणून आम्ही कधीच तुमच्याकडे शिफारस केलेली नाही. परंतु अशावेळेस जर आपले दोन सहकारी एका बाजूला बोलतात, सभागृह वेगळ बोलतय, काहीजण शांत बसून कुणाच्याच विरोधात न बोलण्याच प्रत्येकाला वाटतय. पण याचा फायदा प्रशासनाने घेतला नाही पाहीजे. त्यामुळे ताबडतोब तुम्ही आजच्या या मिटींगमध्ये त्या विषयातून मार्ग काढून कोणावरती अन्याय होणार नाही अशाप्रकारचा निर्णय आपण घ्यावा. त्याचप्रमाणे धनंजय आल्हाट आणि योगेश बहल यांनी जो विषय मांडला, मा.महापौर साहेब, आपल्याला डिसेंबर २०१५ ला ११ ते १२ लेखा विभागात काम करणारे कर्मचारी यांनी पत्र दिलेलं होतं आणि तशाप्रकारचा एक ठराव सुध्दा विधी समितीमध्ये झालेला होता आणि ज्या काही सेवा, अटि असतील त्या महापालिकेच्या डीपीसीमध्ये ठरलेल्या असतात, मलातर असे कळले की मुख्यलेखापाल जे कोणी आहेत ते आज चार्ज घेण्यासाठी आलेले आहेत. महानगरपालिकेमध्ये आलेल आहेत. भोसले साहेबांनी अजून चार्ज सोडलेला नाही. नवीन एक येवून थांबलेले आहेत. महानगरपालिकेच्या विषयामध्ये आम्ही सर्वजण अग्रेसर आहोत की आमच्या इकडच्याच अधिका-यांना मिळाले पाहीजे. मग असा हा घोळ कशासाठी, यातून काय साध्य होणार आहे. पुन्हा एकदा वादविवादाचा विषय आणि परत लॉबीचा विषय याठिकाणी तयार होईल. आमच्या सगळयाचा आग्रह आहे महानगरपालिकेचे जे अधिकारी आहेत त्यांना याठिकाणी संधी मिळाली पाहीजे. आकृतीबंधामध्ये तशी आपण तरतूद केलेली आहे व तो विषय मंजूर झालेला आहे. आता याठिकाणी आलेले अधिका-यांना तुम्ही रुजू करुन घेणार का असा माझा प्रश्न आहे. रुजू करुन

घेतल्यानंतर तो विषय पुन्हा जीबीला येणार आहे त्यावेळेस आता आम्ही जेवढे बोललो त्यापेक्षा जास्त त्यावेळेला बोलणार आहेत. त्यामुळे त्यांना आता रुजू करुन घेवू नये अशी आमची तुम्हांला विनंती आहे. आता तुम्ही याठिकाणी जाहीर करावे की आम्ही कोणालाही याठिकाणी रुजू करुन घेणार नाहीत आणि महानगरपालिकेच्या अधिका-यांना आम्ही प्रमोशनमध्ये पदभार देणार आहोत म्हणून. ही वस्तुस्थिती तुम्ही जाहीर केलीतर जास्त मार्ग मोकळा होईल नाहीतर परत महीनाभरात अजून काहीतरी शिजेल आणि लोकांना सगळयांचे उमरे झिजवण्याची वेळ याठिकाणी येईल त्यामुळे मा.महापौर साहेब, खुलासा करावा की जे नवीन अधिकारी आलेले आहेत त्यांना तुम्ही रुजू करुन घेणार का कसे हे सांगावे, धन्यवाद !

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मगाशी विषय अर्धवट राहीला आहे. याठिकाणी मुख्य आरोग्य वैदयकीय अधिकारी या विषयावर बोलायचे होते. मा.महापौर साहेब, मागच्या सहा महीन्यापुर्वी सादकबादक चर्चा झाल्यानंतर आपण निर्णय घेतलेला आहे. मा.श्रीकर परदेशी साहेबां सारखे कार्यक्षम अधिकारी आणि त्यावेळेला झालेली डीपीसी आणि त्या डीपीसीने घेतलेला निर्णय आहे. आमचे सहकारी मित्र लोखंडे साहेब असतील, सोनकांबळेताई असतील, भाऊसाहेब भोईर यांनी सांगीतल्याप्रमाणे या सभागृहामध्ये आजपर्यंत आणि आजपर्यंतच्या इतिहासामध्ये कधीही भेदभाव किंवा जातवर्ण अशावरुन कधी या सभागृहामध्ये दुमत झालेले नाही आणि होणार नाही. त्यामुळे अधिका-यांचा असा विषय असलातर आमच्या समोर एक वेगळा पेच निर्माण होतो आणि विनाकारण एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप अशातली परिस्थिती येते. परंतु प्रशासनाने जो निर्णय घेतला आहे, म्हणजे मा.श्रीकर परदेशी सारखे आयुक्त आणि त्यावेळेला झालेल्या डीपीसी आणि त्या डीपीसीमध्ये झालेला निर्णय आणि त्याच निर्णयाला या सभागृहाने मान्यता दिलेली आहे. याठिकाणी आपण काही सदस्यांनी वेगळ काही केलेल नाही आणि आपण घेतलेला निर्णय त्यावर शासनाने फेरविचार करावा असे म्हणलेले आहे. परंतु आता जर निर्णय चुकीचा असेलतर शासन विखंडीत करु शकते. परंतु आम्ही पुर्वी घेतलेल्या निर्णयाला सभागृहाला आपमान करुन घ्यायचा नाही. आम्ही पुर्वीच्याच निर्णयाला ठाम आहोत. कारण हे एकाकी पद आहे आणि या एकाकी पदाला कुठल्याही प्रकारच आरक्षण नसते अशी माझी स्वतःची माहीती आहे. परंतु या गोष्टीवर वाद न करता, विवाद न करता आम्ही मागे जो निर्णय घेतलेला आहे त्याच निर्णयाशी आम्ही ठाम आहोत, तो जो निर्णय आहे तो आहे असा मंजूर करावा अशी विनंती आपल्याला सभागृहाच्या वतीने करतो.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे -** मा.महापौर साहेब, आमचा विरोध नोंदवावा.

**मा.महापौर -** मा.सोनकांबळेताई यांचा विरोध नोंदवून विषय क्रमांक ११ पुर्वीप्रमाणेच करणेत येत आहे....

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. भोसले साहेब जर अजून येथे बसलेले आहेत तर भोसले साहेब यांनी अजूनही चार्ज सोडलेला नाही. मध्यंतरी कोणत्यातरी अधिका-यांची बदली झाली होती ते अधिकारी महानगरपालिकेमध्ये चार दिवस अगोदर येऊन महानगरपालिका बघत होते परंतु त्यांनी चार्ज घेतला नव्हता. ज्या दिवशी चार्ज घेतील त्या दिवशी आपण बघु यात. ते आले किंवा नाही किंवा वर कुठे बसलेत का पण ज्या अर्थी भोसले साहेब याठिकाणी आहेत त्या अर्थी भोसले साहेबांनी अजून चार्ज सोडलेला नाही. आपल्या सगळयांच्या म्हणण्यानुसार आपण कशाला एखादया व्यक्तिच नाव घेवून त्या व्यक्तिला दुखवायच. मा.महापौर आपल्या समोर आज भोसले साहेब आहेत, भोसले साहेबांनी अजून चार्ज सोडलेला नाही. उदा. इतक चांगले काम केलेले गायकवाड साहेबांची सुध्दा बदली झालेली आहे परंतु त्यांचा चार्ज घेणारे कोणी अजून येथे आलेले नाहीत, ज्या अर्थी गायकवाड साहेब समोर दिसतात त्या अर्थी फक्त येथे गायकवाड साहेबच आज आहेत आणि त्यामुळे जर आता धनंजय आल्हाट यांनी विषय मांडलेला आहे की आपण आपल्या लोकांना दयायचे आहे, आपल्या लोकांना आपण सहकार्य करायचे आहे. अजून चार्ज सोडलेला नसल्यामुळे भोसले साहेब याठिकाणी आहेत. भोसले साहेबांच्या बाबतीत बोलले, सिटी इंजिनीअरच्या बाबतीत आपण बोलू शकतो. मागच्या वेळेस सिटी इंजिनीअर एम.टी.कांबळे रिटायर्ड झाले त्यावेळेला आपण आयुक्त साहेबांना विनंती केलेली होती की तुम्ही त्यांची डीपीसी घ्या आणि रितसर विषय आणावा. चार्ज देवू नका तरी सुध्दा तसे झालेले नाही अर्धवट काम दरवेळेस करायचे, शासनाचा माणूस येण्याची वाट बघायची आणि मग आम्ही म्हणायच यांना चार्ज दया, यांना चार-चार वर्षे चार्ज देवून ठेवलेला आहे. आयुक्तांनी व्यवस्थीत योग्य रितीने निर्णय घ्यावा व हा विषय मंजूर करावा.

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. "ताकाला जायच आणि गाडग लपवायचं" हा मुळात आपला स्वभाव नसाव याठिकाणी स्पष्ट तुमच्याकडून एक खुलासा आम्हांला अपेक्षीत आहे, सर्व सभागृहाला तो हवा आहे की आज भोसले साहेबांची बदली झालेली आहे ते चार्ज आज किंवा उदया सोडणार का नाहीत आणि ते चार्ज सोडणार असतीलतर ती खुर्ची तुम्हांला रिकामी ठेवता येत नाही. ती खुर्ची रिकामी ठेवली जात नाहीतर आज याठिकाणी आलेले जे मुख्यलेखापाल जे लांडे म्हणून आलेले आहेत, ते कशाला आलेले आहेत, बोलवल नसेलतर ते स्वत:हून आलेत का येथे काही कुठला कार्यक्रम नाही. आज झगडे मॅडम सहा.आयुक्त म्हणून आलेल्या आहेत त्या रुजू झाल्या आहेत त्यांचा ठराव उदया येणार आहे त्यांची सहा.आयुक्तांची पोस्ट आहे. ती पोस्ट शासनाचीच आहे रितसर आहे. परंतु आपल्या आकृतीबंधाप्रमाणे आजची ही पोस्ट आपली असावी असा आपला आग्रह आहे. ते रुजु झाल्यानंतर पुन्हा शासनाकड पाठवायचे का. आपला जो ठराव आहे त्याचा खुलासा तरी

करावा. हा खुलासा झाला नाहीतर हा प्रश्न इथेच रेंगाळत राहणार आहे. तरी आपण संबंधीतांना खुलासा करायला सांगावे.

**मा.डोईफोडे (सहा.आयुक्त) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता ज्या पध्दतीने चर्चा झालेली आहे आणि प्रश्न उपस्थित झालेले आहेत त्यामध्ये आपले मुख्यलेखापाल भोसले यांची शासनाने बदली केलेली आहे त्यांच्या ठिकाणी नवीन अधिकारी नियुक्त केलेले आहेत. ते अधिकारी यांनी शासनाच्या आदेशाप्रमाणे जॉईन करुन घेण्यासाठी मा.अतिरीक्त आयुक्तांकडे अर्ज केलेला आहे. परंतु कार्यमुक्ततेचा आदेश मा.आयुक्त साहेबांकडून झालेला नाही त्यामुळे आज रोजी भोसले साहेबच कार्यरत आहेत. जे नवीन अधिकारी आलेले आहेत त्यांना मा.आयुक्त साहेबांकडून जर जॉईनींग आदेश काढले तरच ते जॉईनींग होवून आपल्या येथे कामकाज पाहतील. त्यांनी फक्त अर्ज केलेला आहे. सहा.आयुक्त झगडे मॅडम आलेल्या आहेत त्यांनीही फक्त याठिकाणी रुजू करुन घेण्यासाठी अर्ज केलेला आहे. त्यांनाही खात्यामार्फत रुजू करुन घेतलेले नाही. आयुक्त साहेबांनी त्यांना जॉईनींगचा आदेश दिलेला नाही.

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. झगडे मॅडमला रुजू करुन घेतलेले नाही तर मग सभागृहात त्या मॅडम कशा काय बसल्या मुळात त्यांच्यावरती आमच ऑब्जेक्शन नाही. आता हे उत्तर देतात, भोसले साहेब यांची बदली झालेली आहे, आयुक्त साहेब ठरवणार का यांना पाठवायच, त्यांना रुजु करुन घ्यायच, हे सभागृह कशाला आहे. पीएमसीने किती तरी अधिकारी परत पाठविलेले आहेत, रुजू करुन घेतलेले नाहीत. ही जबरदस्ती आमच्यावरतीच का कायम. हा चुकीचा खुलासा झालेला आहे, त्यांनी समाधानकारक उत्तर दिलेल नाही. ते आलेले आहेत, त्यांनी पत्र दिलेल आहे मा.आयुक्त साहेब मुंबईला गेलेले आहेत त्याच्यामुळे निर्णय होऊ शकलेला नसेल कदाचित, परंतु आमचा निर्णय असा आहे की आम्हांला आमचे महापालिकेचेच अधिकारी पाहीजेत. तरी तुम्ही याठिकाणी सांगावे की याठिकाणी महापालिकेचे अधिकारी असतील आणि शासनाचे अधिका-यांना आम्ही रुजू करुन घेणार नाहीत. हा तुमचा अधिकार आहे.

**मा.महापौर -** महापालिकेच्या अधिका-यांची ती जागा असेलतर महापालिकेचे अधिकारी येतील व शासनाची असेलतर शासनाचे येतील.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याठिकाणी रुजू होणारे आतापर्यंत शासनाचे हे कितवे अधिकारी आहेत. ५० टक्के कोठा हा शासनाच्या अधिका-यांसाठी आहे आणि ५० टक्के कोठा हा आपल्या अधिका-यांसाठी. तरी सुध्दा एक जागा आम्ही शासनाच्या अधिका-यासाठी जास्त येथे देतो. साडेपाच साडेपाच आल्यामुळे सहा अधिकारी शासनाचे घेतलेले आहेत परंतु आज दोन अधिकारी येथे रुजू होण्यासाठी आलेले

आहेत. परवाच्या पेपरला बातमी आली होती की भानूदास गायकवाड साहेब, माने साहेब, भोसले साहेब यांची बदली झाली. भोसले साहेबांचा चार्ज घेण्यासाठी अधिकारी आले आहेत. आमच्या सभागृहाचे मत आहे की महापालिकेचा कर्मचारी त्या योग्यतेचा, पात्रतेचा असेलतर त्याला ती वरिष्ठ जागा मिळाली पाहीजे. तुम्ही दरवेळेस शासनाचे अधिकारी थांबविणार आणि याठिकाणी रुजू करुन घ्यावे म्हणून सांगणार हे सभागृह कदापि सहन करणार नाही. हे सगळया पक्षाच्या लोकांनी येथे सांगीतलेल आहे. आतापर्यंत हे कितवे अधिकारी आहेत व आपला जो रेशो ५०-५० टक्केचा आहे तो आम्हांला बघु दया.

**मा.डोईफोडे (सहा.आयुक्त) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सहा.आयुक्तांचे मंजूर पदे ११ आहेत त्यापैकी ६ पदे प्रतिनियुक्तीचे आणि ५ पदे महापालिकेचे शासनाने निश्चित करुन दिलेले आहेत. त्यापैकी आज रोजी ७ शासनाचे आहेत आणि २ महापालिकेचे अधिकारी आहेत. एका सहा.आयुक्त पदाला मंजूरी दिलेली आहे त्यांच्या पदोन्नतीचा आदेश ठेवलेला आहे व एका अधिका-याकडे अतिरीक्त पदभार आहे.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याचा अर्थ आता ज्या झगडे मॅडम आलेल्या आहेत त्या अजून ८ व्या आलेल्या आहेत. याचा अर्थ काय आहे शासन आपल्यावरती बळजबरी करु पाहतय ते आम्ही नाही सहन करणार. त्या अधिका-यांना परत पाठवा. आमच्या महापालिकेच्या अधिका-याना तो चार्ज दयावा. उदया ११ च्या ११ पदावर शासन अधिकारी पाठवल. मुळात शासनाने ठरवून दिलेले असेलतर ६ अधिकारी त्यांचे आणि ५ अधिकारी महापालिकेचे आहेत मग शासनाचे सध्या ८ अधिकारी होतात, हे कसे काय? शासनाने यापुर्वी जो आदेश दिलेला आहे त्या नियमाच पालन झाले पाहीजे. मा.महापौर साहेब, आयुक्तांना आदेश दया की कुठल्याही परिस्थितीत ६ सहा.आयुक्तांच्या व्यतिरीक्त कुठल्याही अधिका-यांना याठिकाणी रुजू करता कामा नये. आम्हांला अधिका-यांच्या कार्यकुशलते बद्दल शंका नाही परंतु आपल्या महानगरपालिकेच्या कर्मचा-यांवर आपण अन्याय का करायचा हा एक प्रश्न आहे, हे संपुर्ण सभागृहाच मत आहे त्यामुळे आयुक्तांना आपण असे आदेश दयावेत की आज रुजू झालेल्या अधिका-यामध्ये जे अतिरीक्त अधिकारी असतील त्या अधिका-यांना या महानगरपालिकेमध्ये रुजू करुन घेवू नये, धन्यवाद !

**मा.रामदास बोकड -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सर्वांनी या विषयावर चर्चा केलेली आहे. याठिकाणी मला सूचना करावयाची आहे की सभागृहाच्या वतीने सूचना करतो की प्रशांत शितोळे जे बोलले त्याच्याशी मी सहमत आहे. मला एकच सांगायच आहे की, शासन या सभागृहावर अन्याय करतय, नगरसेवक, नगरसेवीकांवरती अन्याय करतय. शासनाचे अधिकारी येतात रुजू होतात. मी देखील केंद्रशासनाचा तीस वर्षे कर्मचारी होतो. मी सिनॅरीटीने दोन प्रमोशन घेतलेले आहेत आणि याठिकाणी आमच्या महापालिकेच्या

अधिका-यावरती अन्याय होतो हे आजच्या सभागृहातील चर्चेने सिध्द झालेले आहे. माझी सूचना आहे की ६-५ चा रेशो ठरलेला आहे त्यामध्ये महापालिकेचे जे आता पदोन्नतीने सिनीअर अधिकारी आहेत त्यांना आपण बढती दयावी आणि नंतर शासनाचे ६ अधिकारी घ्यावेत अशी सूचना आहे, धन्यवाद !

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा विषय खुप गंभीर आहे आणि याच्यावरती चर्चा होऊन निर्णय होणे अपेक्षीत आहे. आता डोईफोडे साहेबांकडे आम्ही या सहा.आयुक्त पदासंदर्भात चौकशी केली होती तेव्हा त्यांनी सांगीतल होत की आपल्याकड प्रमोशनमधुन हे अधिकारी उपलब्ध नाहीत. म्हणजे प्रशासन अधिका-यामधुन सहा.आयुक्त हे पद भरल जातं. इंदलकराना आताच चार्ज दिलेला आहे, आपल्याकडे जंपींग प्रमोशन होण्याची जास्त शक्यता आहे म्हणून शासनाकडन हे आणतात. परंतु आपल्या शेजारी बसलेले नगरसचिव हे सुध्दा सहा.आयुक्त केडरमधले आहेत. ते परिक्षा पास होवून नगरसचिव झालेले आहेत. म्हणजे पेपरला जाहीरात आल्यानंतर ते नगरसचिव झालेले आहेत. तुम्ही त्यांना सुध्दा ॲडीशनल चार्ज सहा.आयुक्तांचा देवू शकता. त्यांना नगरसचिवाच काम काही पुर्ण दिवसभर नाही. आपल्याकडे प्रशासन अधिकारीमधुन लोक नाहीत. डोईफोडे साहेब आपण खुलासा करावा, तुम्ही सभागृहाची दिशाभूल करताय, बी.एन.कांबळे आणि आर.डी.गायकवाड. यांना आपल्याकडे दहावी पासवर सहा.आयुक्त आपण केलेले आहेत. जे लोक प्रमोशनचे आहेत त्यांना तुम्ही ताबडतोब रुजू करुन घ्या. एखाद पद राहीलचतर जगताप साहेबांना तुम्ही सहा.आयुक्त म्हणून ॲडीशनल चार्ज दिलातरी काही फरक पडणार नाही. त्यांना दोन्ही कामाचा अनुभव आहे. महीला व बालकल्याण मध्ये जगताप साहेबांचा जास्त अभ्यास आहे. महीला व बालकल्याण विभाग त्यांना दिलातर ते सुध्दा आपले काम होईल. परंतु मुख्य विषय आहे तो मुख्यलेखापाल यांच्यावरती चर्चा सुरु झाली. भोसले साहेबांना रिलीव्ह करा. त्यांना जायच आहे त्यांना घाई झालेली आहे, त्यांचे म्हणणे आहे की मला आयुक्त साहेब सोडत नाहीत. आमचे जे अधिकारी बसतात त्यांना ताबडतोब मंजूरी दयावी. डिप्लोमा आणि डेप्युटी ईंजिनीअरचा विषय तसाच आहे आठ ते नऊ जागा महानगरपालिकेच्या रिक्त आहेत त्याठिकाणी सुध्दा त्यांना चार्ज दिला गेला नाही. आंबादास चव्हाण यांना सुध्दा प्रभारी चार्ज दिलेला आहे, एम.टी.कांबळे साहेब प्रभारीच होवुन गेले. आंबादास चव्हाण यांना जर आपण कन्फर्म केले नाहीतर शासनाचा माणूस कधीही येण्याची शक्यता आहे. त्यामुळे आमच्या सगळया अधिका-यांनी एकजूट करुन त्याठिकाणी हे पद कन्फर्म करुन घ्यावं व डीपीसी लवकरात लवकर घेवून याचा निर्णय व्हावा.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याठिकाणी सभागृहाच्या वतीने आयुक्तांना आदेश काढावेत, डीपीसी गेले अनेक वर्षे झालेली नाही. आम्ही

जाधव साहेबांच्या प्रचंड मागे लागलेलो होतो की तुम्ही डीपीसी घ्या. डीपीसी घेतल्या शिवाय अधिका-यांना न्याय मिळणार नाही. ते म्हणाले की ताई आपण डीपीसी घ्यायला गेलोतर प्रत्येकजण आपआपली शिफारस घेवून येतो. आम्ही सांगीतल तुमची जी नियमावली असेल, तुमची मानीव तारीख असेल त्या मानीव तारखेनंतर आपण प्रमोशन देतो त्या तारखा तुम्ही लक्षात घ्या आणि त्याठिकाणी डीपीसी घेवून त्या त्या अधिका-यांना आपण प्रमोशन दिले पाहीजेत. परंतु सन्मा.तत्कालीन आयुक्त जाधव साहेबांनी ते केलेले नाही. नवीन आलेल्या आयुक्तांची सुध्दा इच्छा दिसत नाही. आज जवळपास १२-१३ डेप्युटी ईंजिनीअर त्यांना आपण पदभार देतो पण पद देत नाहीत. त्याचा सुध्दा विचार करण्याची आज वेळ आलेली आहे. आज याठिकाणी एकाच आठवडयात दोन-दोन अधिकारी नवीन अधिकारी जर रुजू होत असतीलतर त्याला कडाडून आपण विरोध केला पाहीजे. कारण की म्हणतातनां दत्तक घेतलेल्या पोराला सांभाळता सांभाळता स्वत:च्या पोरांना रस्त्यावर भीक मागायची वेळ आलेली आहे. तरी यांना ताबडतोब शासनाकडे पाठवावे अशी सभागृहाच्या वतीने मी विनंती करते. तसेच सहा.आयुक्त पदामध्ये आरक्षण आहे. त्यामध्ये बी.एन.कांबळे एस.सी. कॅटेगरीचे होते ते ज्यावेळेस रिटायर्ड झालेले आहेत त्यावेळेसपासून त्याठिकाणी एससी. कॅटेगरीचा एकही अधिकारी आपण भरलेला नाही आणि म्हणून याठिकाणी बाहेरुन जे अधिकारी येतात ते आले की त्यांना एकदम टॉपमोस्ट पोस्ट पाहीजे असते. त्यांना पाणीपुरवठा नको, त्यांना ड्रेनेजलाईनचा सुध्दा पदभार नको. त्यांना केबीन एसी पाहीजे, गाडी दिमतीला माणसं व अधिकारी खाली यायच्या अगोदर त्यांची गाडी दहा मिनीटे पोर्चमध्ये पाहीजे. यांनाही पळवानां जरा. किती महापालिकेचे अधिकारी पळणार आहेत. मा.महापौर साहेब, जेवढे डेप्युटेशनवर आलेले शासनाचे अधिकारी असतील यांना सगळयांना ड्रेनेज विभागामध्ये, पाणीपुरवठा विभागामध्ये दयावे, आपले जे अधिकारी आहेत ते अनेक वर्षे कष्ट करतात तुमच्या शिव्या खातात, त्यांनाही कुठेतरी सन्मानाची वागणूक देण्याची वेळ या निमीत्ताने आलेली आहे एवढच याठिकाणी सांगते. एस.सी. कॅटेगरीचे सहा.आयुक्त हे पद रिक्त आहे ते ताबडतोब आपण भराव एवढी मी विनंती करते आणि थांबते जयहिन्द जय महाराष्ट्र !

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. भोसले साहेबांची ट्रान्सफर झाली त्याठिकाणी आपले अधिकारी दयायला पाहीजे होते. आम्ही विधी समितीमध्ये ठराव पास केलेला होता की चिफ अकौंटंट आपले कर्मचारी पाहीजे आणि जे सिनीअर असेलतर त्यांना दयावे. भोसले साहेबानी आपल्या अधिका-यांना पॉवर दिलेल्या नाहीत. अनेकवेळा आम्ही डोईफोडे साहेब आणि राजीव जाधव साहेबांना सांगीतले होते. श्री.गवळी यांना एक वर्षे अगोदर उपमुख्यलेखापाल म्हणून नवीन पद निर्माण करुन शासनाने मान्य केले आहे आणि त्यानंतर त्यांना आपण उपमुख्यलेखापाल म्हणून अपॉईंटमेंट केलं. शासनाने

त्या जीआरमध्ये उपमुख्यलेखापाल पद मंजूर केलं त्यामध्ये त्या पदाची असलेली डयुटी गवळी यांच्याकडे दिलेली नाही. जीआरमध्ये स्पष्ट सांगतात, अनेकवेळा मी यासंदर्भात तानाजी शिंदे साहेब, आयुक्त साहेबांना भेटलो होतो परंतु आपल्या अधिका-यावर नेहमीच अन्याय होतो. शासनाने जीआर मध्ये सांगीतल्यानंतर सुध्दा त्या गोष्टी त्यांना दिलेल्या नाहीत. का दिलेल नाही पैशाचे वाटप कमी होणार म्हणून दिलेले नाही. प्रत्येक चेकचे मागे प्रत्येक ऑडीटरला पैसे दयावे लागतात. अशा परिस्थितीमध्ये वरुन येणारा माणुस सगळया पॉवर्स आपल्याकडे ठेवतो. डेप्युटेशनवर जो शासनाकडून येतो तो सगळया पॉवर आपल्याकडे ठेवतो. आम्ही सांगीतले हा जीआर आहे या जीआरप्रमाणे तुम्ही यांना पॉवर दया परंतु शेवटपर्यंत भोसले साहेबांनी जे अधिकार आपल्या अधिका-यांना दयायला पाहीजे ते दिलेले नाहीत. राजीव जाधव साहेबांनी सॅण्डपच्या दिवशी सिट्रस हॉटेलमध्ये भोसले साहेबांना बोलवून सांगीतल होतं की तुम्ही या पॉवर्स गवळी साहेबांना दयायला पाहीजेत त्या दया. तरीही भोसले यांनी काही केलेल नाही. या पदावर असलेल्यांना वर्षाला अंदाजे एक कोटी वसुल होतात म्हणून त्याच्यामध्ये यांच आकर्षण आहे. डेप्युटेशनवर असलेल्या अधिका-यांनी येथे असलेल्या अधिका-यांना पॉवर्स दयायला पाहीजे. माझी विनंती आहे आम्हांला शासनाकडून अधिकारी नको. यापुर्वी सुध्दा या पदावर श्री.व्हि.टी. भोसले होते. अनेक महापालिकेच्या अधिका-यांनी काम केलेले आहे. आता जे अधिकारी आलेले आहेत त्यांना परत पाठवा आणि आपल्या अधिका-यांना जे सिनीअर आहेत त्यांना मुख्यलेखापाल म्हणून प्रमोशन दयावे. उपमुख्यलेखापालला जीआर प्रमाणे पॉवर दयाव्यात अशी विनंती करतो.

**मा.आशा शेंडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. डोईफोडे साहेबांनी सांगावे की आपल्याकडे एकूण किती पद रिक्त आहेत. सगळयाच विभागातील सांगावे म्हणजे आपल्या लक्षात येईल. एखादा सहा.आयुक्त गेला की त्यांच्याकडून ते पद भरती करण्याचे लगेच नियोजन सुरु होते परंतु आपल्याकडे प्रशासनामध्ये अनेक पदे रिक्त असताना सुध्दा शासनाचे माणस आले की त्यांना लगेचच रुजु करुन घेतो. परंतु आपल्या येथे वर्षानुवर्ष काम करणारे अधिकारी जे आहेत त्यांचे प्रमोशन, त्यांची डीपीसी आपण कोणत्याही प्रकारे का करत नाहीत. हे मा.महापौर साहेब, आपण डोईफोडे साहेबांना विचारल पाहीजे की आज आपल्याकडे १२ डेप्युटी ईंजिनीअरचे स्थापत्या मध्ये पद रिक्त आहेत. एस.आय.चे पद रिक्त आहेत, सीएसचे पद रिक्त आहेत की जे आपल्या शहराच नाक आहे. आरोग्य विभागान चांगल काम केलंतरच आपल हे शहर स्वच्छ दिसणार आहे आणि शहर स्वच्छ असेलतर आपल्या शहराला, आपल्या महानगरपालिकेला वेगळया प्रकारचा सन्मान असणार आहे. मागच्यावेळेस मा.राजीव जाधव साहेब याठिकाणी आयुक्त म्हणून होते त्यांनी तोंडी आदेश दिलेले होते की एस.आय.चे पद जे आहेत ते भरण्यात यावीत आणि चतुर्थश्रेणी कर्मचा-यांना पदभार देण्यात यावा. परंतु

तेथे लेखी आदेश कोणताही नसल्या कारणाने झाले नाही. मागे कित्येक महीने झाले की आपल्याकडे एक एस.आय. चार-चार प्रभागाचे काम करतो त्यामुळे जी स्वच्छता आपल्या प्रभागाची असली पाहीजे, आपल्या शहराची असली पाहीजे ती आपल्याला मिळत नाही. परंतु शासनाचा माणुस आणला आणि आपल्याकडचा माणुस गेलातर की लगेचच आपण सातवा, आठवा माणूस भरण्याची मानसीकता किंवा प्रशासन म्हणून ते दाखवतात. मा.महापौर साहेब, त्याठिकाणी सांगीतल पाहीजे की आमच्याकडची सहा पद शासनाची भरुन झालेली आहेत यापुढे शासनाचा अधिकारी आमच्या महापालिकेत आम्ही सामावुन घेणार नाहीत. अशाप्रकारच पत्र आपण दिलंतर निश्चितपणे हे होईल आणि येथून पुढे महापालिकेचे खालचे जे कर्मचारी आहेत त्या कर्मचा-यांना प्रमोशन दयावे. अशी मी आपल्याला विनंती करते आणि थांबते.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सगळयाच्या चर्चेनुसार जसे आहे तसे ६ सहा.आयुक्त शासनाचे आहेत त्याच्यानंतर एकही सहा.आयुक्त आलेले असतीलतरी, आम्हांला कोणाचाही अपमान करायचा नाही ६ सहा.आयुक्तांच्या नंतर एकालाही नाही. चिफ अकौंटंट ही पोस्ट महापालिकेच्या कर्मचा-याना देण्यात यावी. सिटी ईंजिनीअरची पोस्ट सुध्दा आमच्या सभागृहाच्या वतीने सांगतोत की अंबादास चव्हाण यांना संपुर्ण चार्ज देण्यात यावा. शासनाचे सहा.आयुक्त ६ आणि महापालिकेचे ५ आहेत आणि जे आता सिमाताई यांनी सांगीतले की एस.सी.ची जी पोस्ट आहे ती सुध्दा आपल्याकडे काही लोक आहेत त्यांना सहा महीने आठ महीन्याची जी काही अट शिथील करायची असेल ती करुन ती सुध्दा आमची उपसूचना ग्राहय धरुन ते चार्ज देण्यात यावेत असे सांगते आणि हा विषय मंजूर करण्यात यावा.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पक्षनेत्यांनी आणि सिमाताईनी सूचना केली त्याला अनुमोदन देतो. फक्त त्यांनी सांगीतले चार्ज, तर चार्ज नसुन डीपीसी घ्यावी व आंबादास चव्हाण यांना सरळ प्रमोशन दया. शासनाचा माणुस यायचा असेलतर तो चिफ ईंजिनीअर म्हणून येईल. सिटी ईंजिनीअर म्हणून आमच्या कर्मचा-यांना न्याय दया. सहा.आयुक्त ६ आणि ५ या रेशोप्रमाणे रुजू करुन घ्यावे आणि एस.सी.चा जो कोणी असेल त्यांना पाहीजेतर प्रमोट करता येईल. आपण इंदलकराना चार्ज दिलेला आहे त्यांना रेग्युलर प्रमोशन दयावे. तरी मा.महापौर साहेब, आपण ताबडतोब सभागृहाच्या वतीने अशाप्रकारचे आदेश दयावेत अशाप्रकारची विनंती करतो आणि हा विषय आपण मंजूर करावा.

मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- मा.महापालिका सभेने यापुर्वी घेतलेला निर्णय कायम ठेवणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.शत्रुघ्न काटे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर -** सर्व नगरसेवकांनी सांगीतल्याप्रमाणे ज्यांना चार्ज दिलेला आहे त्यांची डीपीसी करुन त्यांना पद दयावे आणि मनपाच्या अधिका-यांनी सेवा केलेली आहे त्यांची पहीली दखल घ्यावी. कारण सरळसेवेने तुम्ही घेतल्यास आमच्या या अधिका-यांचे जुने शिक्षण आहे आणि नवीन आले की त्यांची कॅटेगरी, त्यांचे शिक्षण ते नकोय आमच्या महापालिकेच्या अधिका-यांना न्याय मिळावा आणि आजच्या आज भोसले साहेबांना कार्यमुक्त करावे. त्यांचा पदभार महापालिकेच्या अधिका-यांना दयावा अशी मी याठिकाणी सूचना करते आणि जे शासनाचे सहा.आयुक्त ६ आहेत त्याच्या व्यतिरीक्त शासनाचा एकही अधिकारी याठिकाणी घेतल्या जाणार नाही अशी सूचना आहे. हा विषय पुर्वीप्रमाणेच मंजुर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ८६९ विषय क्रमांक - १२

दिनांक- २०.६.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.प्रशा/१/कावि/२२२/२०१६ दि.११/०४/२०१६

२) मा.महापालिका ठ.क्र.८५२ दि.२०/४/२०१६

**विषयाचा आशय :- आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर करावयाच्या नेमणूकीस शासन मान्यता मिळणेबाबतच्या शासनास सादर केलेल्या प्रस्तावाबाबत.**

**विषयाचे संदर्भात टिपण** :- पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर 'आरोग्य वैद्यकीय अधिकारी' या अभिनामाचे एकमेव पद पे बॅन्ड र.रु. १५६००-३९१०० ग्रेड वेतन ७६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्र गुरुवार दि. १७ ऑक्टोबर १९८५ भाग एक ए पुणे विभाग यांमध्ये आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदावर पदोन्नतीने नेमणूक करण्याकरीता पुढीलप्रमाणे अर्हता निश्चित करण्यात आलेली आहे.

**<u>पदोन्नती</u>** -

१. मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील एम.बी.बी.एस आणि सार्वजनिक आरोग्य विषयातील पदविका **(DPH)**

२. सहाय्यक आरोग्याधिकारी किंवा वैद्यकीय अधिकारी पदावरील सलग ५ वर्षापेक्षा जास्त कालावधीचा कामकाजाचा अनुभव.

डॉ. नागकुमार कुणचगी हे आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदावरुन दि.३०/०४/२०११ रोजी सेवानिवृत्त झाल्यापासून मा. शासनाकडे 'जॉईन्ट डायरेक्टर' दर्जाचा अनुभवी व कार्यक्षम अधिकारी प्रतिनियुक्तीवर उपलब्ध करुन देणेबाबत विनंती करुनही तो उपलब्ध न झाल्याने व आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे जबाबदारीचे पद असल्याने दि.३१/०५/२०१३ रोजीच्या 'कार्यालयीन अधिक्षक' पदाचे पदोन्नती समिती सभेपुढे आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे पद पदोन्नतीने भरण्यासाठी विचार करण्यात आला.

प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदाकरीता आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता, आरक्षण, गोपनीय अहवाल, सेवाज्येष्ठता क्रमांक व अनुभव कालावधी इत्यादि सेवाविषयक तपशील विचारात घेऊन दि.३१/१२/२०११ चे वैद्यकीय अधिकारी पदाचे अंतिम सेवाज्येष्ठता यादीमधील आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदासाठी आवश्यक असणारी अर्हता धारण करणारे अ.क्र. २० वैद्यकीय अधिकारी डॉ.के.अनिल रॉय हे एम.बी.बी.एस. असून त्यांनी डी.पी.एच. ही शैक्षणिक अर्हता दि.३०/०५/२०१३ रोजी धारण केली आहे. तसेच या सेवाज्येष्ठता यादीमधील अ.क्र. २४ वरील अधिकारी डॉ.पवन वसंत साळवे यांनी एम.बी.बी.एस. व पी.एस.एम. ही शैक्षणिक अर्हता धारण केली असून, या दोन अधिकाऱ्यांमध्ये डॉ. के. अनिल रॉय हे सेवाज्येष्ठ अधिकारी असल्याने त्यांना आरोग्य वैद्यकीय अधिकारी या रिक्त पदावर पे बॅन्ड १५६००-३९१०० ग्रेड पे ७६०० या वेतनश्रेणीमध्ये मा.विधी/महापालिका सभेच्या मान्यतेने नेमणूक देण्यास तसेच सदर नेमणूकीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५(४) मधील तरतुदीनुसार शासन मान्यतेच्या अधिन पदोन्नतीने नेमणूक देण्यास सर्वानुमते शिफारस केली आहे मा.महापालिका सभेने ठराव क्र. ५०३ दि.०५/०७/२०१४ अन्वये डॉ. के. अनिल रॉय यांच्या आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावरील पदोन्नतीस मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार डॉ. अनिल के. रॉय यांना आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर पदोन्नतीने करावयाच्या नियुक्तीस मा.शासनाची पूर्वमान्यता/मार्गदर्शन मागणी केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने दि.१४/०१/२०१५ व दि.०७/०३/२०१५ च्या शासन पत्रान्वये सदर पदासाठी विहित केलेल्या सेवाप्रवेश नियमातील तरतूदी, तसेच पदोन्नती संदर्भात केलेले सर्वसाधारण निकषाच्या(ज्येष्ठता, गोपनीय अहवालाची सरासरी किमान प्रतवारी, निम्न पदावर किमान सेवा) आधारे महापालिकेने तपासणी करुन महाराष्ट्र महापालिका अधिनियमाच्या कलम ४५(१) अन्वये आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावरील नेमणुकीबाबत महापालिकेस प्रदान अधिकारात उचित निर्णय घेऊन कलम ४५(४) अनुसार योग्य तो प्रस्ताव शासनास सादर करण्याकामी निर्देश दिलेले होते.

शासन निर्देशाच्या अनुषंगाने दि.३१/०५/२०१३ रोजीच्या पदोन्नती समितीची शिफारस, मा.महापालिका सभेची मान्यता, शासन निर्देश आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी या बाबी विचारात घेऊन, आदेश क्र. प्रशा/१/कावि/३७७/१५, दि.२८/०४/२०१५ अन्वये डॉ. के. अनिल रॉय यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५(४) मधील तरतुदीनुसार शासन मान्यतेच्या अधिन पदोन्नती देण्यात आली आहे.

प्रकरणी शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार डॉ. के. अनिल रॉय यांच्या आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावरील पदोन्नतीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ४५(४) नुसार शासन मान्यता मिळण्याकामी इकडील पत्र दि.१५/०५/२०१५ अन्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. मूळ प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने मागणी केलेल्या माहितीच्या पूर्ततेनुसार प्रकरणी इकडील पत्र दि२१/०९/२०१५ अन्वये अंतिम अहवाल मा. शासनास सादर करण्यात आलेला आहे.

त्यानुसार नगरविकास विभाग शासन पत्र क्र.पीसीसी-३०१५/प्र.क्र.३५०/नवि-२२, दि.१४/०३/२०१६ अन्वये प्रकरणी महापालिकेने शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदाचे सेवाप्रवेश नियम, पदोन्नतीसाठी विहित केलेली अर्हता, अनुभव व अन्य संबंधित बाबी विचारात घेऊन पदोन्नती समितीच्या निर्णयाचा फेरविचार करण्याबाबतची कार्यवाही करणेकामी कळविले आहे. त्यानुसार पदोन्नती समितीच्या निर्णयाचा फेरविचार करणे बाबत विचार करणेची मा.आयुक्त यांची मागणी असलीतरी मा.महापालिका सभेने यापुर्वी घेतलेला निर्णय कायम ठेवणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- १

अशी मते पडली व सदर ठराव बहुमताने मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १३

दिनांक- २०.६.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/१०/आकुर्डी/३८/२०१६ दि.११/०४/२०१६

विषय - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ ना विकास विभागात पेट्रोलपंप/गॅसफिलींग स्टेशन अनुज्ञेय करणेबाबतची तरतुद विकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ट करणेबाबत कलम-३७ (१) अन्वये निदेश

संदर्भ- १. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे क्र. टिपीएस-३००५/९८७/प्र.क्र.१९४/२००५/नवि-३० दि.१५/०५/२००६ चे निदेश

उपरोक्त संदर्भिय शासन निदेशाव्दारे शासनाने राज्यातील महापालिकांना ना विकास विभागात पेट्रोलपंप /गॅस फिंलिग स्टेशन अनुज्ञेय करणेबाबतची तरतुद विकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ट करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६, कलम-३७(१) अन्वये खालील प्रमाणे निदेश दिलेले आहे.

निदेश

"राज्यातील महानगरपालिकेच्या विकास योजनेतील ना विकास विभागात पेट्रोलपंप /गॅस फिलिंग स्टेशन खालील अटींवर अनुज्ञेय करण्याची तरतुद संबंधित महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ट करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

अट क्र. १. प्रस्तावित भुखंडाचे क्षेत्रफळ किमान २००० चौ. मी. असावे.

२. या भूखंडावर कमाल ०.२ चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय राहील.

३. या भूखंडावर फक्त तळमजल्याचे बांधकाम अनुज्ञेय राहील.

४. प्रस्तावित भूखंड राष्ट्रीय महामार्ग, राज्य मार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग व किमान १८.०० मी. रूंद रस्त्यावर असावा.

५. केंद्र शासनाच्या पेट्रोलियम विभागाचे तसेच चीफ कंट्रोलर ऑफ एक्स्प्लोझिव्ह यांचे संमतीपत्र आवश्यक राहील.

६. प्रचलित नियमानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच अन्य संबंधित विभागाकडील ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक राहील. तसेच सेवा रस्ता /इमारत रेषा, नियंत्रण रेषा इत्यादी बाबतीत शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. आरबीडी-१०८१।८७१। रस्ते-७, दि. ९ मार्च २००१ व त्यांनतरची व संदर्भातील वेळोवेळी निर्गमित केलेली परीपत्रके बंधनकारक राहतील.

७. केंद्र शासनाच्या मिनिस्ट्री ऑफ रोड ट्रान्सपोर्ट अँण्ड हायवेज कडील दि. २५ सप्टेंबर,

२००३। दि. १७ ऑक्टोबर, २००३ चे पत्र व त्यासोबतच्या सहपत्रातील सूचनांचे पालन करणे आवश्यक राहील.

८. संबंधित महानगरपालिकेच्या प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीतील पेट्रोलपंप /गॅस फिंलिग स्टेशनकरीताचे नियम लागू राहील.”

वरील निदेशा नुसारच्या संपुर्ण तरतुदी ज्या महानगरपालिकांच्या संबंधित विकासनियंत्रण नियमावलीत समाविष्ट असतील त्या महानगरपालिका वगळता राज्यातील सर्व महानगरपालिकांनी त्यांच्या संबंधित विकास नियंत्रण नियमावलीत वरील प्रमाणे बदल करण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम -३७ च्या तरतुंदीचे पालन करून फेरबदलाचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेस्तव सादर करावा असे निदेश दिले आहेत.उपरोक्त संदर्भिय शासन निदेशांची छायांकित प्रत मा. महानगरपालिका सभेच्या अवलोकनार्थ व निर्णयार्थ सोबत जोडली आहे.

सदर शासन निदेशा नुसार पिंपरी चिंचवड महापालिक्केच्या ना विकास विभागात पेट्रोलपंप /गॅस फिंलिग स्टेशन अनुज्ञेय करणेबाबतची तरतुद विकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ट करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६, कलम-३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्यास, तदनंतर फेरबदलाची सूचना प्रसिध्द करून हरकती व सुचना मागविणे, संबंधितांना सुनावणी देऊन हरकत व सूचना अर्जावर अंतिम निर्णय घेऊन फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव सादर करण्यास आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.स्वाती साने -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.ठाकूर (उपसंचालक नगररचना)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. विषय क्रमांक १३ संदर्भात माहीती दयायला सांगीतलेली आहे. राज्यातील ज्या महानगरपालिका आहेत त्या महापालिकांमधील ना विकास विभागात पेट्रोलपंप आणि गॅस फिंलिग स्टेशन त्याचा वापर अनुज्ञेय करता यावा या अनुषंगाने निदेश शासनाने दिलेले आहेत आणि त्याप्रमाणे नियमावली तयार करुन त्या नियमांचा समावेश करावा या अनुषंगाने कलम ३७ ची कार्यवाही करण्यासाठी हा विषय आपल्यापुढे मंजूरीसाठी ठेवण्यात आलेला आहे. आपली मंजुरी झाल्यानंतर कलम ३७ मध्ये जे नियम आहेत त्या प्रमाणे त्याला प्रसिध्दीकरण देवून नागरीकांच्या सुचना/हरकती मागवून त्याप्रमाणे तो प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी सादर करण्यात येईल.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. या विषयाच्या निमित्ताने लोकमत पेपरमध्ये नगररचना विभागाची जी बातमी आलेली आहे त्याकडे मी आपल लक्ष वेधु इच्छिते. मा.महापौर साहेब, सांयकाळी ६ च्या नंतर टाईमींगसह लोकमतने फोटो काढलेले आहेत. सांयकाळी ६ च्या नंतर बांधकाम परवानगी व नगररचना विभागामध्ये अनेक बिल्डर, अनेक एजंट यांची गर्दी होत असते. नागरीकांना भेटण्याचा वेळ दुपारी ३ ते ५ आहे. त्याच्यानंतर ऑफीस चालू होते की काय संध्याकाळी ५.४५ च्या नंतर अशी अवस्था आज आपल्या महानगरपालिकेची आहे. तत्कालीन आयुक्त मा.श्रीकर परदेशी असताना दिवाळीच्या वेळेस अशीच ओरड सभागृहामध्ये झाली होती, कार्यालयीन वेळेनंतर मिठाईचे डब्बे लोक आणतात आणि त्याची लगभग प्रचंड असते असे अनेक आरोप त्यावेळेस सुध्दा झालेले होते. परंतु आज लोकमतने छापलेल्या वृत्ताची आपण कुठेतरी दखल घेतली पाहीजे. मा.आयुक्त साहेब, सायंकाळी ६ च्या नंतर हे काय काम करतात याचा सुध्दा आपण मागोवा घेतला पाहीजे. त्याठिकाणी एजंट असतील किंवा कोणी असेल मी म्हणणार नाही येवू नये ज्याच काम असेल त्यांनी आलं पाहीजे परंतु त्यांनी ऑफीस टाईमींगमध्ये आले पाहीजे. आणि ऑफिस टाईमींगमध्ये येत नसतीलतर निश्चितपणे त्याठिकाणी गैरकारभार चालतो असा माझा आरोप आहे. आयुक्त म्हणुन आपली सुध्दा जबाबदारी आहे की एखादया ऑफीस वर्कचा संपायचा टाईमींग आहे. तुम्ही थम्ब इम्प्रेशनची मशीन लावलेली आहे. सकाळी किती वाजता यायचे आणि संध्याकाळी किती वाजता जायचे. आम्ही जर का पाणीपुरवठा विभागामध्ये गेलो, ड्रेनेज विभागामध्ये गेलो, आरोग्य विभागामध्ये गेलो हे सगळे विभाग टाईमींगनुसार बंद होतात. नगररचना आणि बांधकाम परवानगी विभाग हे दोनच विभाग रात्रीचे चालू असतात. आज बघानां “रात्रीस खेळ चाले” किती बदनामी आहे या महानगरपालिकेची. मा.महापौर साहेब, माझी आपणास याठिकाणी विनंती अशी असेल की आपण नगररचना आणि बांधकाम विभागाना आदेश दयावेत. ज्यांचे कोणाचे काम असेलतर त्यांनी त्यांचे काम वेळेत करुन सहाच्या नंतर कोणालाही बोलवू नये जेणेकरुन महापालिकेची बदनामी होईल असे होता कामा नये. आयुक्त साहेब आपण याठिकाणी आपल्या विभागाला तसे आदेश दयावेत. नाहीतर आपण या दोन विभागाची वेळोवेळी पाहणी करावी. पाहणी करताना जर कोणी आढळलतर, त्यांच ऑफीसिएल वर्क असेलतर विषय नि-हाळा आहे परंतु त्याठिकाणी जर का एजंट लोकांची गर्दी असेलतर अत्यंत गंभीर विषय आहे. संध्याकाळी सहाच्या नंतर विभाग कसे लवकर बंद होतील याकडे आपण लक्ष दिले पाहीजे, एवढच याठिकाणी सांगते.

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. “रात्रीस खेळ चाले” असे त्याच्यामध्ये हेडींग आहे. नगररचना व बांधकाम विभागात कामकाज संपल्यानंतरही सुरु असते कामाची घाई. बिल्डरच्या पिट्टूंची लगबग, पार्किंगमध्ये स्कोडा, फायलीची शोधाशोध,

अधिका-याची तत्परता, चहा नाश्त्याची बडदास्त आणि आर्किटेक्टही गायब. ही बातमी वाचल्यानंतर पिंपरी चिंचवड शहरामध्ये जे नागरीक राहतात त्यांच्या मनामध्ये किती प्रश्न उभे राहीले असतील याची कल्पना मा.महापौर साहेब, आपल्याला आहे. आपण सुध्दा लोकप्रतिनीधी म्हणून वॉर्डमध्ये काम करता. आज आपण त्या एक गुंठयाच बांधकाम करत असताना आमच्या लोकांना त्याठिकाणी माराव्या लागणा-या खेटा, मुळ शेतक-यांना टिडीआरसाठी त्याठिकाणी कराव्या लागणा-या गोष्टी, या सगळया गोष्टी बद्दल तुम्हांला त्याचा संदर्भ येईल. अशाप्रकारच जर कामकाज चालु असेलतर, तुम्ही मा.आयुक्तांना फक्त आदेश दया, तुमचा आजचा दिवस फक्त आदेश देण्यापुरताच आहे. आपल्याकडे सीसीटीव्ही कॅमेरे आहेत. याठिकाणी कर्मचा-यांचे आणि जे कोणी ईंजिनीअर आहेत त्यांचे फोटो आलेले आहेत. या कर्मचा-यांना तुम्ही जाब विचारला पाहीजे. ऑफिस टाईम नंतर तुम्ही काय करत होता. नगररचना विभागाचे मुख्य अधिकारी त्याठिकाणी तेथे केबीनमध्ये नसल्यानंतर त्या केबीनमध्ये आत प्रवेश करुन तिथल्या फाईली चाळण्याच्या मागचा उद्देश काय ? म्हणजे सरळ सरळ याच्यातले उद्देश न लपण्यासारखे आहेत. बहुतांशी पदाधिकारी हे बिल्डर्स आहेत त्यांचा स्वत:चा व्यावसाय आहे. त्याबद्दल आमच्या मनामध्ये कोणतीही शंका नाही परंतु सर्वसामान्य नागरीकांना एक न्याय आणि आपण नगरसेवक असुतर आपल्याला वेगळा न्याय अशाप्रकारच कामकाज अपेक्षीत नाही. मा.महापौर साहेब, यामध्ये नागरीकांना जी वेळ भेटण्यासाठी दिलेली आहे त्याच वेळेमध्ये नागरीकांनी यावं. ज्यावेळेमध्ये आर्किटेक्ट यांनी भेटण्याची वेळ आहे त्यांच्या वेळेमध्ये त्यांनी भेटाव. खुशी खुशी ते लोक दुसया मजल्यावरती येतात, नगररचना विभाग खाली आहे. म्हणजे दुसरा मजला पण त्याच्यामध्ये येतो. मा.महापौर साहेब, या सगळया विषयाची चौकशी करावी. महानगरपालिकेची प्रतिमा डागळतेय. नदीच्या अल्याड, पल्याड जी काही दोन्ही लोक याच्यामध्ये आहेत सगळयाची चौकशी झाली पाहीजे. कारण ख-या अर्थान आपण पारदर्शक कामकाज करतो, शासन बदलले आहे किंवा या सर्व गोष्टी झाल्यात परंतु याचा काही येथे परिणाम दिसत नाही. उलट सुसाट वेगान या गोष्टी वाढायला लागलेल्या आहेत. तुम्ही बघाव हे जे नगररचना विभाग जे काही सैराट झालेल आहे त्याला तुम्ही थांबवा आणि ताबडतोब या सर्व गोष्टीची तुम्ही चौकशी करावी अशी मी विनंती करते.

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. लोकमत मध्ये जी न्युज आली त्यासंदर्भात प्रथमत: सिमाताईनी जी सुचना केली त्याला मी अनुमोदन देतो. मी वारंवार टाऊनप्लॅनिंगच्या संदर्भात जीबी मध्ये वारंवार बोलत असतो आणि गेल्या पाच वर्षे मी या विषयावर बोलतो. कुठलाही विषय गांभीर्याने घेतला जात नाही. पेपरमध्ये आलेल एकदम सत्य आहे. त्याठिकाणी संध्याकाळचीच गर्दी जास्त असते. असं काय काम असत संध्याकाळी सहा नंतर एवढे कार्यक्षम अधिकारी आपल्या महानगरपालिकेमध्ये आहेत. त्यांचा

सत्कार केला पाहीजे. आम्ही एखादे संबंधित नगरसेवकांनी वॉर्डामधले फाईलीच्या संदर्भात छोटे मोठे काम सांगीतलेल असेलतर त्याठिकाणी असलेला सर्व्हेअर महीना महीना लावतो पण वॉर्डामध्ये चक्कर मारायला पण येत नाही. कितीतरी वेळा मी या गोष्टीच्या तक्रारी केलेल्या आहेत. नगरसेवकांच्या वॉर्डातील डेव्हलपमेंट संदर्भातील काही गोष्टी असतीलतर त्या त्वरीत का होत नाहीत. आपल्या टाऊन प्लॅनिंगमध्ये प्रायोरीटी कुठल्या कामाला आहेतर अभिप्राय देणे, युटीलायझेशन, टिडीआर बनविणे अशा काही गोष्टीमध्ये एवढे आपले अधिकारी मग्न आहेत. हा विषय नेहमीच जनरल बॉडीमध्ये चर्चेला येतो आणि बदनामीला नगरसेवकांना सामोरे जाव लागतं. त्याठिकाणी माझा सरळसरळ आरोप आहे स्क्वेअर फुटावर काही काही अधिका-यांचे टाऊन प्लॅनिंगमध्ये रेट आहेत. प्रत्येक गोष्टीला, अभिप्रायला, युटीलायझेशनला, मोजणीला या प्रत्येक ठिकाणी रेट आहेत. युटीलायझेशनला टिडीआर झाल्यानंतर एखादा बिल्डर आपल्याकडे आल्यानंतर ते युटीलायझेशन करायला तुम्हांला पैसे कशासाठी लागतात आयुक्तांकडे फाईल जातेतर त्या बिल्डरला एवढे खडतर परिस्थितीमध्ये जाव लागतं मग त्या बिल्डरने काय करायचं. बिल्डर डेव्हलपमेंट करत असताना डेव्हलपमेंट चार्जेस भरतो, बाकीचे व्हॅट भरतो, गव्हर्मेंटचा टॅक्सेस देतो. त्याठिकाणी आपला परिसर, त्या वॉर्डाचा ऐरीया डेव्हलपमेंट होतो. ती बिल्डींग आल्यानंतर शेजारी रस्ता होणार, गार्डन होणार मग आपले डिपार्टमेंट याचा छळ का बरं करतात. मी काही बिल्डरची साईड घेत नाही. माझ सरळ सरळ म्हणण आहे की झोन दाखला असु दयात, युटीलायझेशन असु दयात या सगळया गोष्टीला यांना पैसे का दयावे लागतात हा माझा आपल्याला आरोप आहे. ही चिरीमीरी नाही तर हे डायरेक्टली किती स्क्वेअर फुटाचा प्लॉट आहे, किती एक्करचा प्लॉट आहे याचे कॅलक्यूलेशन असतात. आता जो या अगोदरचा विषय झाला शासनाकडून आलेल्या लोकांना या कामासाठी इकडे पाठवितात का. आपण एक खिडकी योजना सुरु केली, कशासाठी केली, लोकांचा छळ कमी व्हावा. त्याठिकाणी असलेल्या तक्त्यामध्ये अमुक अमुक पेपर तुम्ही सबमीट करा तो पेपर तुम्हांला अमुक अमुक दिवशी हातात मिळाला पाहीजे. कधी महासेवामध्ये कागद वेळेवर मिळाला. ड्रेनेजची एनओसी असु दयात किंवा फायरची एनओसी असु दयात बिल्डींग परमीशन असु दयात. एखादी बिल्डींग बनवायची म्हणजे ते सामान्य माणसाच कामच नाही. टेक्निकली कुठलातरी मुद्दा काढायचा की हे पेपर पाहीजे, अमुक अमुक नाही असे वाक्य फिक्स यांच ठरलेल आहे. टाऊन प्लॅनिंगमध्ये एखादा काही प्रॉब्लेम आलातर तीन ते चार दिवसानी तो कसा काय विदाऊट पेपर ऍटोमॅटीकली सुटतो. याठिकाणी काहीही होणार नाही मला माहिती आहे. आता कितीतरी लोक बोलले आणखीन बोलतील. लोकांमध्ये खरोखरच या टाऊन प्लॅनिंग बद्दल आणि बिल्डींग परमीशन बद्दल मनामध्ये राग आहे तो आपण कसा क्लेअर करणार. आपण म्हणतो की सर्व देशामध्ये चालले आहे करप्शन कमी झाल पाहीजे. कस होणार, कां बर नगरसेवकांना या

विषयावर बदनाम करतात. फक्त नगरसेवकच बदनाम होतात, अधिका-यांवर वॉच ठेवा, याच्यावर ऍण्टी करप्शनच्या लोकांनी वॉच ठेवावा सगळे वटणीवर येतील. त्याठिकाणी सामान्य नागरीकांच काम होत नाही. नगरसेवकांच काम होत नाही. एखादा सामान्य माणुस त्याठिकाणी आला मला अमुक अमुक टिडीआर बनवायचा आहे तर तेथील कर्मचारी काय म्हणतो तुझ्याकडून हे होणार नाही. एक्सवायझेड कडे जा व त्याला ती फाईल दे असे आपले लोक गाईड करतात. म्हणजे एखादा शेतकरी आल्यानंतर त्याला असं प्रॉपर गाईड केल जात त्याला मोबदला मिळेल पण असा छळ करतात, अशी अडवणूक करतात. व प्रॉपर चॉनलने त्या माणसाकड परस्पर पाठवितात. सगळेच असे नसतात काही गरीब लोक असतात त्यांची प्रॉपर्टी रस्त्यामध्ये, गार्डनमध्ये राहीलेली असते. एकतर पहीलेच ते परेशान असतात, जॉईंट फॅमिली असते काहीतरी वाटयाला तुकडा आलेला असतो त्यासाठी पण ही लोक कवडीमोलान ती प्रॉपर्टी एखादया एक्सवायझेडला विकायला लावतात. त्याच्यानंतर परत आपल्या लोकांची चांदीच आहे. यात चेन आहे चेन. या सर्व्हेअर पासून ज्युनिअर पासुन सिनिअर पर्यंत साहेबांपर्यंत आणि वर कमीशनर पर्यंत फाईल जाईपर्यंत एवढी दमछाक होते. तो सामान्य माणूस तर टिडीआर आयुष्यात करु शकत नाही. त्या डिपार्टमेंटमधुन एकाही सामान्य माणसाचा टिडीआर झालातर तुम्ही बघाव, होऊच शकत नाही मग अस का बरं. एखाद शहर डेव्हलप होताना ब-याचशा गोष्टी कराव्या लागतात त्या ठिकाणी बिल्डर लोक सुध्दा चांगले चांगले प्रकल्प राबवून आपल्या शहराची शोभा वाढवितात. त्याच बरोबर रस्ते, लाईट, पाणी या सगळया गोष्टी त्याच्या बरोबर येतात. एक चांगली सोसायटी आल्यामुळे आम्हांलाही बरं वाटत. तुम्ही बघाना आता एफएसआयच्या भानगडीत कोणी पुढ यायला तयार नाही. रिझर्व्हेशनचा ताबा तुम्ही घेत नाहीत. रिझर्व्हेशनच्या माग मी पाच वर्षे झाल २० गुंठयाचा रिझर्व्हेशनसाठी पाठपुरावा करतो ताबा घेवू शकले  नाहीत. कारण त्यांच्याकडे वेळच नाही. आमच्या भागामध्ये गावठाण भाग आहे त्याठिकाणी डेव्हलपमेंटच नाही. एक अर्धा एक्करचा प्लॉट मला गार्डनसाठी डेव्हलप करता आला  नाही माझ किती दुर्दैव आहे. माझ नशिब किती खराब आहे. २५ वर्षे झाल्यानंतर पण ताबा देवू शकत नाहीत ते लोक. भाजीमंडईसाठी मी गेल्या महीनाभर पाठपुरावा करतो फक्त पाहणी करायची आहे तेही दुरसंचार विभागाच त्याठिकाणी एक ऑफीस आहे त्याठिकाणी पाहणी करायला पण वेळ नाही. आमच्या गावामध्ये आता २८ तारखेला पालखी येणार आहे मी म्हणालो त्याच्या अगोदर ते करावे.  त्या सर्व्हेअरला मी पंधरा फोन केले, शिंपी साहेबाला मी फोन केले तरी येऊ शकत नाहीत. मग आम्ही काही बोललोतर आमच्या अधिका-यांना तुम्ही अरेरावीची भाषा केली. मग काळया फिती लावणार, मोर्चा काढणार. अशावेळेस का बर तुमची संघटना काम करत नाही. आम्ही काय करायच सांगा. आम्हांला वेगळया  भाषेत बोलता येत नाही. मी माझ्या कामासाठी गेल्या पाच वर्षात दहा वेळा टिडीआर संदर्भात बोललो. माझे

कोणाशीही लागेबांधे नाहीत. हे लोक आडवणूक करतात, पिळवणूक करतात. कुठ फेडणार आहेत ते परमेश्वरालाच माहीती आहे, परमेश्वर वर बघणारा आहे. किती कमवायच त्याला पण लिमीट असतो. गरीबांचा तळतळाट घेऊ नका तुम्हांला ते पचणार नाही, धन्यवाद !

**मा.बाबासाहेब धुमाळ -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा विषय ना विकास विभागात पेट्रोलपंप/गॅस फिलींग स्टेशन यासाठीचा आहे त्यासाठी काही जागा सोडणार आहात या प्रस्तावाचे मी स्वागत करतो. कारण पिंपरी चिंचवड शहरात लोकवस्ती वाढलेली आहे, अनेक भागामध्ये त्याची आवश्यकता आहे आणि म्हणून हा ठराव आपण याठिकाणी घेतलेला आहे. याठिकाणी २० चौ.मी. जागा असावी अस आपण सूचीत केलेलं आहे. याच्यामध्ये २ हजार चौ.मी. ती जागा सुध्दा कमी पडणार आहे. कारण आता नवीन पंप ऍटोमॅटीक पंप आहेत. पहीले जे पंप आहेत त्याच्यामध्ये दहा हजार स्क्वे.मी. पंधरा हजार स्क्वे.मी.पहील्या पंपापेक्षा या पंपाला जागा जास्त असणे गरजेच आहे. कारण ही जागा कमी पडणार आहे. ज्या ठिकाणी पेट्रोलपंप असेल त्याठिकाणी सीएनजी किंवा एलपीजी गॅस सुध्दा असु शकतो. तरी आपण जागा जास्त ठेवलीतर अशा ठिकाणी अदयावत पंप असू शकतात. याच कारण इंडीयन ऑईल, भारत पेट्रोलपंप, एच.पी. पंप, रिलायन्स पेट्रोल पंप आहेत, रिलायन्स पेट्रोल पंप पाहीलेतर आंतरराष्ट्रीय पंप आहेत. त्या पंपामध्ये केवळ डिझेल, पेट्रोल, गॅस असे असून सुध्दा त्याठिकाणी ड्रायव्हरसाठी कॅण्टीन व्यवस्था, राहण्याची व्यवस्था अशी व्यवस्था केलेली असते. त्यामुळे त्या ड्रायव्हरला तेथे आल्यानंतर राहण्याची व्यवस्था असलीतर तो त्याठिकाणी चांगल्या प्रकारे पंप चालवू शकतो. कारण मी ट्रान्सपोर्टचा व्हाईस प्रेसिडेंट आहे. संपुर्ण भारतभर, संपुर्ण स्टेटमध्ये मी फिरत असतो. कुठल्याही ठिकाणी गेलेतर त्याठिकाणी एक एक, दोन-दोन एक्करामध्ये पंप आहेत. सिटीमध्ये आपण फक्त २० हजार स्क्वे.मी.ठेवतो. पण ग्रामीणमध्ये १ एक्करापासून ५ एक्करापर्यंत पंप झालेले आहेत. आपण तसा विचार केलातर ही जागा याठिकाणी कमी पडणार आहे. तरी आपण जास्त जागा ठेवलीतर अत्याधुनीक पेट्रोलपंपाची व्यवस्था होईल, ज्यासाठी आपण हे पंप ठेवणार आहेत त्या सोई नागरीकांना चांगल्या उपयोगी होतील, ट्रान्सपोर्टला, ड्रायव्हरला उपयोगी होतील असं याठिकाणी मी सांगतो. २ चटई क्षेत्र ठेवलेले आहे म्हणजे ४ हजार स्क्वे.मी.बांधकाम, ते सुध्दा बांधकाम कमी पडणार आहे. पुण्यामध्ये अनेक पंप आहेत. ज्यावेळेला बांधकाम करतो त्यावेळेला कंपनीचे ऑफीस, इलेक्ट्रीक ऑफीस त्यानंतर इतर शेडयुल्स असतात परंतु अकौंटसाठी ऑफीस राहत नाही. अकौंटसाठी आम्हांला दुसरे ऑफीस दयाव लागतं. एवढ मोठ ऑनलाईन अकौंट असतं, औनलाईन असंत. तिथं तुम्ही त्या टाकीत किती पेट्रोल, डिझेल टाकीमध्ये सोडलं. त्याच ऑनलाईन तीकड कळतं. तिथ तुम्ही पेट्रोल, डिझेल दिलंतर त्या टाकीमध्ये किती शिल्लक आहे हे कळण्यासाठी वेगळ एक १०x१५ च ऑफीस असाव लागतं. म्हणून हे क्षेत्र

वाढविलेतर बरे होईल. दुसरी गोष्ट म्हणजे रुंदी तुम्ही दिलेली नाही. रुंदी १२० ते १५० फुट असावी लागते. आपण  कित्येक ठिकाणी बघतो  त्यांचे पॅरामीटर असते ते वेगळया प्रकारचे नॉर्म्स असतात. या पंपामध्ये नवीन सेंटर गव्हर्मेंटसचे नॉर्म्स आलेले आहेत.  त्याच्यामध्ये पंप जर दिलेतर २० फुट जागेच आपल क्षेत्र धरलतर आता नियमाप्रमाणे कंपनीन संपुर्ण डिलरशिप दयायला बंद केलेल आहे. पण नंतर ज्यावेळेला पेट्रोल मिनीस्टर बरोबर मिटींग झाली त्यावेळेला त्यांनी सांगीतले याठिकाणी नवीन नवीन जागा झाल्यात, नवीन इन्डस्ट्रीज झालेल्या आहेत, लोकसंख्या वाढलेली आहे त्यावेळेला बरोबर गव्हर्मेंटन केल की २५ लाख रुपये पहील्यांदा देत नव्हते. २५ लाख फिक्स आणि २५ लाख गव्हर्मेंटला असे ५० लाख त्या जागेसाठी भरावे लागत. नंतर त्याठिकाणी संपुर्ण बांधकाम डिलरला करावे लागते. पहील कंपनीच खर्च करायची. संपुर्ण पेट्रोल पंपाचा खर्च कंपनी करायची फक्त आपल्याला चार भिंती करायला लागायच पण आता तसं केलेल नाही. संपुर्ण जबाबदारी पेट्रोल डिलरवर ठेवलेली आहे. ते फक्त लायसेन्स देणार आणि पेट्रोल व डिझेल पाठविणार. यासाठी जवळ जवळ दिड ते दोन कोटी खर्च येतो आणि प्लस जागेच भाड म्हणजे ३ कोटी. ३ कोटी खर्च केलातर त्याच्या एक परसेन्ट धरलतर तेवढा खर्च कधीच निघणार नाही. त्यासाठी ती जागा वाढलीतर इतर कॅण्टीन दुसरे सामान काहीतरी ठेवता येते त्याचा खर्च त्यात निघु शकतो म्हणून त्यांना जागा जास्त देण गरजेच आहे. बांधकामाला परवानगी जास्त असावी. त्याला बांधकाम जास्त दिल्यानंतर त्याच रिकव्हरी जे दिलेलं आहे ते फंडीग त्याला परत मिळू शकते. हा ठराव चांगला आहे. याला मी मान्यता देतो, जयहिंद जय, महाराष्ट्र !

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. या विषयाला अनुसरुन आपल्या नगरसेवकांनी बांधकाम आणि नगररचना बद्दल जो उल्लेख केला तो तंतोतंत खरा आहे. नगररचना आणि बांधकाम या दोन विभागामध्ये संध्याकाळी ६ च्यानंतर अधिकारी आणि एजंट दिसतात. बाकी सर्व विभाग सहा नंतर बंद होतात. पुर्वी सव्वासहा, साडेसहा नंतर सिक्युरीटी सोडून सर्व बंद करुन टाकायचे. आता सुध्दा तसे बंद करुन टाकावे. नगररचना आणि बांधकाम या विभागामध्ये किती अधिकारी आता आहेत की पुर्वी त्या विभागात होते ते परत त्याठिकाणी आलेले आहेत नगररचना विभागामध्ये एक अधिकारी असे आहेत की त्यांच्या सतरा ते आठरा वर्षाच्या सर्व्हिसमध्ये त्यांनी चौदा वर्षे नगररचना आणि बिल्डींग परमीशन विभागामध्ये काढले आहेत. एखादया अधिका-याला ते डिपार्टमेंट दिल्यानंतर परत परत त्याच ठिकाणी कसे काय येतात. माझ्या माहीतीप्रमाणे या दोन विभागाला पोस्टींग मिळण्यासाठी काही काही अधिकारी आडीच ते पाच लाख रुपये खर्च करतात. म्हणजे किती कमवलं त्यांनी. त्यामुळे आता सांगीतलेल तंतोतंत खरं आहे याच्यामध्ये काहीही चुकीच नाही. असे आपल्या महापालिकेमध्ये घडते. ज्युनिअर ईंजिनीअर पोस्टींगसाठी सुध्दा आडीच ते पाच

लाख खर्च करतात. हे येणा-या आयुक्तांना किंवा बाकी लोकांना माहीती नाही का. नगररचनेमध्ये एक अधिकारी आहेत. मी नाव नाही सांगत. सतरा वर्षामध्ये ते पंधरा वर्षे नगररचना आणि बांधकाम परवानगी मध्ये काम करतात. त्यांना का पाणीपुरवठयामध्ये टाकत नाहीत. ज्यांचा वशिला नाही आणि पैसे देवू शकत नाहीत ते पाणीपुरवठयामध्ये, ड्रेनेज विभागा मध्ये असतात. दुधेकर यांनी ज्यु.ईंजिनीअर म्हणून पाणीपुरवठा विभागामध्ये काम केले, डेप्युटी ईंजिनीअर म्हणून काम केले, एक्झिक्यूटीव्ही ईंजिनीअर म्हणून काम केले, ते आता ॲडीशनल सिटी इंजिअर म्हणून त्याठिकाणीच दिलेले आहे. जे पैसे देत नाहीत त्यांना पाणीपुरवठा आणि ड्रेनज विभाग देतात. हे लोक काम कसे करतात हे बघावे. रावेत आणि किंवळेमध्ये रस्ते ताब्यात नसताना, रस्ते तयार झालेले नाहीत मग हजारो कोटीचे बांधकाम परवानगी दिलेली आहे. बांधकाम चालू आहेत. हे कसे काय. जे चाललेले आहे नगररचना विभागामध्ये, बांधकाम विभागामध्ये हे बेकार चाललेले आहे, हे बंद करायला पाहीजे. एकदा त्या डिपार्टमेंटला काम केल्यानंतर परत तो रोटेशनमध्ये यायला पाहीजे. स्थापत्यामध्ये जायला पाहीजे, ड्रेनेजमध्ये जायला पाहीजे, पाणीपुरवठयामध्ये जायला पाहीजे. परत परत त्या डिपार्टमेंटला यायला नाही पाहीजे. सगळयांना चान्स मिळू दयावा.

**मा.भाऊसाहेब भोईर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याठिकाणी लोकमतच्या बातमीवरुन सुलभाताईनी, सावळेताईनी हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. खरंतर हा विषय नेहमीच चर्चेचा राहीलेला आहे. नगररचना विभाग आणि बांधकाम विभाग हा म्हणजे महापालिकेचा आत्मा आहे. परंतु त्यातून दोन गोष्टीचा अर्थ काढला जाईल. रात्रीच्या अतिरीक्त वेळेमध्ये देखील काम करतात म्हणजे खरंतर हे गुणवत्तेस पात्र आहेत त्यांना ओव्हरटाईम दिला पाहीजे. दोन माणस असे असतात त्यांचा आपण अपमान का करतो हेच कळत नाही. किती त्याग त्यांचा आहे त्यांचा सत्कार करा तुम्ही त्यांना असं बोलून नाउमेद करु नका एवढया गरीब माणसाना तुम्ही नाउमेद करु नका कारण आता गरीब नगरसेवक झालेले आहेत. उल्हास शेट्टी सारख्या सिनीअर नगरसेवक व्यथा जाहीरपणे मांडत असताना त्याला बोलण्याची संधी प्राप्त झाली, त्याच बोलून झाल, विषय संपला ते जर आपण नगरसेवकांच गांभीर्याने घेत नसूतर आपण कशासाठी आलो हा देखील आत्मचिंतनाचा विषय आहे. एकादया दिवशी या सगळयांना धडा शिकविण्यासाठी कोणी जर माजुरडापणा करत असेलतर सभागृह बंद करुन निषेध करुन आपण गेले पाहीजे. मी स्वत: बांधकाम व्यावसायीक आहे, दुधेकर साहेब, एम.टी. कांबळे साहेब होते असाच मला अनुभव आला, मनाचेच कायदे करतात. “मला हे असं वाटत”, इतक मी सटकलो होतो. मी नंतर सांगीतल ते दुधेकर साहेबांना सुध्दा समजलं, म्हणजे एकाच खुर्चीवर अनेक वर्ष बसल्यानंतर स्वत:चीच संहीता तयार करतात. मग ते कायदयामध्ये दाखविणार नाहीत, मला असे वाटते की हे चुकीच आहे. तुम्हांला वाटत म्हणजे तुम्ही कोण

बीपीएमसी ॲक्ट आहेत का. का राज्यपाल किंवा राष्ट्रपतीची ऑर्डर आहे. पक्षनेत्यांना विनंती करतो की असे मस्तीखोर अधिकारी असतीलतर त्यांना जागा दाखविल्या पाहीजेत. आपण टेम्परररी माणस आहोत हे अधिकारी परमनन्ट आहेत. टेम्परररी माणसाचे एवढे हाल करु नका, आम्ही खुप गरीब माणस आहोत. आम्ही कधी कोणाला अपशब्द बोललो का. मी या गोष्टीचा निषेध करतो. उल्हास शेट्टीचा जर कोणी अपमान केला असेलतर पुढच्या जीबीमध्ये नावासहीत त्याचा जाहीर निषेध करुन ही सभा बंद करु. मा.महापौर साहेब, हे गांभीर्याने घ्या. पुन्हा एकदा मागणी करतो की जे नगररचना विभागामध्ये अतिरीक्त काम करतात त्यांना ओव्हरटाईम दयावा आणि पुढच्या जीबी मध्ये त्यांचा सत्कार करावा.

**मा.संजय काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा जो विषय सभागृहासमोर आलेला आहे त्यामध्ये ना विकास झोनमध्ये मान्यतेसाठी विषय आलेला आहे. हे सर्व्हिस इन्डस्ट्रीजमध्ये येणारे उदयोग आहेत.

मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- उपरोक्त विषयास अनुसरुन ना विकास विभागात गार्डन हॉटेल व गार्डन मंगल कार्यालय सुरु करण्यास मान्यता देण्यात यावी. हॉटेलसाठी १००० स्क्वे.मी. (एक हजार)व गार्डन मंगल कार्यालयासाठी २००० स्क्वे.मी.(दोन हजार) कमीत कमी क्षेत्राची मर्यादा ठेवून मान्यता दयावी.

**मा.शत्रुघ्न काटे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

**मा.धनंजय आल्हाट -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. जो विषय आता छेडला आहे तो अत्यंत महत्वाचा आहे. सन्मा.आयुक्त साहेब आपण आज या खुर्चीवर बसलेला आहात म्हणजे आपण आयुक्त पदाचा पदभार स्विकारलेला आहे. एवढया पोटतीडकीने कोणी वेदना व्यक्त केल्यातर, कोणी संताप व्यक्त केला. नगररचना विभागाची परिस्थिती गंभीर आहे. भाऊसाहेबांनी सांगीतल्याप्रमाणे नगररचना विभाग हा आत्मा आहे. मी तर म्हणतो हे अतीशय हेड डिपार्टमेंट आहे याची सगळी शहराच्या विकासाची पाळेमुळे या विभागावर अवलंबून आहेत. हा विभाग जर सुस्त झाला, हा विभाग जर निष्कामपणे वागू लागला तर शहराचे सर्व डेव्हलपमेंट रद्द होणार. वर्तमानपत्रामधली बातमी प्रसिध्द झाली ती सन्मा. आयुक्त साहेब आपण गांभीर्याने घ्यावी. मा.महापौर साहेब आपण आदेश दयावेत. तुमच्या आदेशा शिवाय काहीही होणार नाही. आम्ही किती बोलतो याला महत्व नाही ते तुम्ही किती आत्मसात करुन आदेश देता याला महत्व आहे. त्यामुळे सन्मा.तानाजी शिंदे साहेब, आयुक्त हे पद आज आपण स्विकारलेल आहे. आपण प्रत्येक वेळेस अनुभवल की सभासद बोलल्या नंतर तुम्ही फक्त काय एखादा बॉल प्लेड करावा तसा प्लेड करता. परंतु आमची अपेक्षा आहे किमान चार बॉलमध्ये एखादा बॉलतरी तुम्ही मारत जा. म्हणजे आम्हांलाही बरं वाटेल, प्रत्येक बॉल तुम्ही प्लेड करता. कुठलीही प्रतिक्रीया देत नाहीत आणि पुढे फॉरवर्ड सुध्दा करत नाहीत,

त्यामुळे एखादा बॉल मारत जा. सर्वांनी या गलथान कारभारावर टिका केलेली आहे. खरंतर आपण सिस्टीम राबविली पाहीजे. सन्मा.महापौर साहेब, आपण यासंदर्भात आदेश काढा, मिटींग घ्या. सिस्टीम मध्ये ही काम झाली पाहीजेत. थोडक्यात सांगतो पुण्यामध्ये जे काही डेव्हलपमेंट व्हिजन राबवलेले आहे. आता सांगीतल की टिडीआरला एक एक वर्षे लागतो असे सांगीतले. टिडीआर म्हणजे काय. ती जागा तो मालक, शेतकरी असेल किंवा अन्य कोणी असेल तो हस्तांतरीत करुन त्याचा त्याला त्या पध्दतीने लाभ देतो किंवा एफएसआय देतो. त्याच्यामध्ये काही महापालिकेचा तोटा नाही. ते आरक्षण ताब्यात आणुन त्याठिकाणच्या प्राथमीक सुविधा आपण करु शकतो. म्हणजेच शहराचा विकास होऊ शकतो. परंतु यामध्ये दिरंगाई आहे. शेतक-यांना टिडीआर करणे अवघड आहे हे त्याठिकाणी गेल्यानंतर समजते. परंतु अशाप्रकारचा महोत्सव शासन आपल्या दारी, रेशनकार्ड असेल, अनेकप्रकारचे कागदपत्र लोकांना मिळत नाहीत, हेलपाटे मारावे लागतात. लोकांना त्यठिकाणी अतीशय कष्ट निर्माण होतात. म्हणून शासनाने एक कार्यक्रम काढला की शासनच तुमच्या दारी येते आणि या सगळया सुविधा एकाच दिवसात नागरीकांना मिळतात. तस या नगररचना विभागा मार्फत आपण केलतर, आपण पाहतो की आंबा महोत्सव जसा असतो जर आपण तशा पध्दतीने महापालिका आपल्या दारी त्याठिकाणी सगळी कागदपत्र उपलब्ध असतीलतर त्याना एकाच दिवशी टिडीआर देवून टाकायचा. जर त्यांने त्या सगळया कागदपत्रासहीत ते प्रकरण जर सादर केलंतर इतक्या दिवस कशाला लागणार. एक-एक, दोन-दोन वर्ष त्याठिकाणी टिडीआरला लागतात अगदी ती फाईल फिरुन फिरुन आयुक्तांकडे जाते परत खाली येते परत वर जाते. त्या माणसा पेक्षा फाईलीचे वजन वाढत जात आणि माणसाचे कमी होते म्हणून आपण अशी योजना राबवा की डेव्हलपमेंट व्हिजन पंधरा दिवसामध्ये टिडीआर, तुमचे सर्व पेपर आल्यानंतर पंधरा दिवसामध्ये टिडीआर मिळणार. दोन दिवसामध्ये झोन दाखला किंवा अन्य प्रकारचे कागदपत्र मिळतील. या सगळया विषयाचा जागीच बंदोबस्त केला जाईल व भ्रष्टाचार थांबला जाईल. सहा नंतर ही दोन्ही कार्यालय उघडी असतात त्याचा अर्थ हा सगळयांना माहीती आहे. त्याठिकाणी काही ते नागरीकांची सेवा करायला बसत नाहीत हे सगळयांना माहीती आहे. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब आपण याच्यावर निर्णय घेतला पाहीजे. आम्ही कित्येक वेळा सभागृहामध्ये विषय मांडतो आपण गांभीर्याने घेत नाहीत. आपला आदेश या सभागृहामध्ये सर्वोच्च आहे तो प्रशासनाला याठिकाणी मानावाच लागतो त्यामुळे तुम्ही बोललेला प्रत्येक शब्द हा प्रशासनाला एकप्रकारचा आदेश आहे. त्यामुळे तुम्ही या उरलेल्या वेळामध्ये काहीतरी निर्णय घ्या की आपण या जनतेची सेवा करु शकू. विशेषत: नगररचना विभागामध्ये हा चाललेला कारभार आहे तो थांबविण्यासाठी थेट नागरीकांपर्यंत आपल्याला कसं जाता येईल महापालिका आपल्या दारी अशा पध्दतीचा कार्यक्रम आपण राबवावा. कमीत कमी

दिवसामध्ये त्याठिकाणी बसल्या जागी त्यांना ते देता येईल अशाप्रकारचा कार्यक्रम आपण हाती घ्या. केवळ ही सूचना करण्याकरिता मी याठिकाणी उपस्थित आहे आणि जर आपण असे केलंतर अशाप्रकारच्या बातम्या आहेत “रात्रीस खेळ चाले” अशाप्रकारचे जे काही लेख आपल्या महापालिकेच्या संदर्भात होतात आणि आपल्या महापालिकेची मानहानी होते ती होणार नाही. लोकमतने अशाप्रकारचा विषय आणला मी त्यांना धन्यवाद देतो. आभार व्यक्त करतो आणि हा विषय मा.महापौरांनी गांभीर्याने घ्यावा.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा विषय ज्या विषयाला अनुसरुन बाबासाहेब धुमाळ यांनी सांगीतले, संजय काटे यांचे असेच म्हणणे आहे. संजय काटे यांनी सांगीतले, याच्यात गार्डन, रेस्टॉरंट आणखीन काही करता येईल का. तरी याच्या अभ्यासासाठी हा विषय तहकूब ठेवायचा आहे. तत्पुर्वी लोकमतचे कटींग, नगररचना आणि बांधकाम विभागामधील आयुक्तांनी लक्षात घ्याव. तीन वर्षे झाल्यानंतर सगळीकडच्या बदल्या व्हायला पाहीजे. या गोष्टी लक्षात घ्याव्यात. आर.एस.कुमार यांनी सांगीतले ज्या माणसाची १८ वर्षे सेवा असेलतर १४ वर्षे नगररचनामध्ये तो काम करतो व फिरुन फिरुन तो त्या विभागामध्ये येतो. काही लोक बिल्डींग व्यावसाय करतात ते लोकच जर स्वत: असं सांगत असतील की येथे आता भयंकर त्रास आहे मग यातून काय प्रश्न निर्माण होतात. तीन वर्षानंतर नगररचना, बांधकाम विभागामध्ये बदल व्हावेत. परत तो माणूस त्याठिकाणी येवू नये अशी मी विनंती करते. विषय क्रमांक १३ तहकूब करावा.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, सूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.महापौर -** सदस्यांच्या ज्या सूचना आलेल्या आहेत त्याप्रमाणे अशा अधिका-यांच्या बदल्या झाल्या पाहीजेत असे आदेश देणेत येत आहेत आणि अभ्यासासाठी विषय क्रमांक १३ तहकूब करणेत येत आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ८७० विषय क्रमांक - १३
दिनांक- २०.६.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे
जा.क्र.नरवि/कावि/१०/आकुर्डी/३८/२०१६ दि.११/०४/२०१६

विषय क्रमांक १३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.शुभांगी बो-हाडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८७१ विषय क्रमांक - १४

दिनांक- २०.६.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे

जा.क्र.स्था/नि/३क/कावि/४७२/२०१६ दि.११/०४/२०१६

स्थापत्य मुख्य कार्यालयाकडील निविदा नोटीस क्र.25/10/2014-15 (कामाचे नांव - प्रभाग क्र.58 ई. ठिकाणी अनधिकृत बांधकामावर हायराईज मशिनरीने कारवाई करणे) निविदा र.रु.37,46,750/- याकामा संदर्भात स्थापत्य क मुख्यालयाच्या प्रस्तावास दि.17/2/2015 रोजी मान्यता देऊन प्रस्तावानुसार वरील कामासाठी प्राप्त झालेली मे.संकल्प कन्स्ट्रक्शन या ठेकेदाराची सर्वात कमी दराची 5.01% कमी दराची निविदा स्विकारुन त्यांचेसोबत करारनामा करण्यास मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेण्यासाठी दि.20/2/2015 रोजीचे विषयपत्र मा.स्थायी समितीपुढे सादर करण्यात आले होते.

उपरोक्त विषय मा.स्थायी समितीच्या कार्यपत्रीकेवर विषय क्र.62 दि.27/2/2015 रोजी मान्यतेसाठी घेण्यात आला होता मात्र विषय क्र.62 चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा असा ठराव क्र.10890 दि.27/2/2015 रोजी मा.स्थायी समिती सभेने पारीत केला होता व त्यानंतर वेळोवेळी सदरचा विषय आठ महीन्यांपेक्षा जास्त काळ तहकुब करण्यात आलेला होता.

अनधिकृत बांधकामाबाबत मा. उच्च न्यायालयात दाखल असलेल्या दाव्याचा विचार करुन उपरोक्त विषय मंजूर होत नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुद [महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण 2 मधील 3 (के) – जेथे आयुक्तांच्या कोणत्याही प्रस्तावास, या अधिनियमाच्या तरतुदीन्वये घटीत करण्यात आलेल्या कोणत्याही समितीच्या मंजूरीची किंवा मान्यतेची आवश्यकता असेल त्याबाबतीत, समिती, नगरपालिका सचिवांकडे तो प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर समितीच्या लगतच घेण्यात आलेल्या सभेच्या दिनांकापासुन पंचेचाळीस दिवसाच्या आत असा कोणताही प्रस्ताव विचारात घेईल आणि तो प्रस्ताव निकालात काढील मग अशा प्रस्तावाशी निगडीत बाब अशा सभेच्या कार्यसूचीवर घेतलेली असो किंवा नसो तसे न केल्यास अशा प्रस्तावाला समितीने मंजूरी किंवा मान्यता दिली असल्याचे मानण्यात येईल. आणि तशा आशयाचा अहवाल आयुक्तांकडून

महापालिकेला पाठविण्यात येईल] नुसार आयुक्त यांना प्राप्त अधिकरात निविदा नोटीस क्र.25/10/2014-15 (कामाचे नांव - प्रभाग क्र.58 ई. ठिकाणी अनधिकृत बांधकामावर हायराईज मशिनरीने कारवाई करणे. निविदा र.रु.37,46,750/-) च्या मंजूरीबाबत मा.स्थायी समितीपुढे सादर असलेल्या विषयपत्र क्र.स्था/3क/441/15 दि.20/2/2015 मंजूर असल्याचे समजण्यास व त्यानुसार ठेकेदारासोबत करारनामा करून घेऊन कामाचा आदेश देण्यास मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. व त्यानुसार ठेकेदारासोबत करारनामा करुन कामाचा आदेश देण्यात आलेला असल्याने अधिनियमातील तरतुदीनुसार सदर कार्यवाहीचा अहवाल अवलोकन करणेत आला.

**मा.पौर्णिमा सोनवणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.स्वाती साने -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८७२ विषय क्रमांक - १५

दिनांक- २०.६.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे
जा.क्र.स्था/१अ/कावि/१/२०१६ दि.१२/०४/२०१६

स्थापत्य अ मुख्यालयाकडील निविदा क्र. २३/२/२०१३-१४ अन्वये अ प्रभागातील अतिक्रमण कारवाईसाठी लागणा-या उंच इमारती पाडणेकामी यंत्रसामग्री पुरविणे. निविदा र.रु. ७०,०१,२७१/- (अक्षरी र.रु. सत्तर लाख एक हजार दोनशे एक्काहत्तर फक्त) या कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम अनुसूची ड प्रकरण २ मधील ३(के) नुसार मा. स्थायी समिती सभेची मान्यता मिळालेचे मानण्यात आलेची बाब मा. महानगरपालिका सभेपुढे अवलोकनार्थ सादर करणे.

स्थापत्य अ मुख्यालयाकडील निविदा क्र. २३/२/२०१३-१४

कामाचे नाव:- अ प्रभागातील अतिक्रमण कारवाईसाठी लागणा-या उंच इमारती पाडणेकामी यंत्रसामग्री पुरविणे.(निविदा र.रु. ७०,०१,२७१/-)

उपरोक्त निविदेसाठी मे. एडीफिस इंजिनियर या ठेकेदाराची निविदा रकमेपेक्षा ०.५० %कमी दराची निविदा प्राप्त झालेली आहे. सदरची निविदा स्विकारणेबाबत स्थापत्य विभागाकडील प्रस्तावास दिनांक१७/५/२०१४ रोजी मान्यता देण्यात आलेली आहे, व ठेकेदारासोबत करारनामा करुन घेणेस मा. स्थायी समिती सभेची मान्यता घेणेकामी दि. २०/५/२०१४ चे

विषयपत्र नगरसचिव विभागाकडे पाठविण्यात आले होते. विषयपत्रानुसार सदरचा विषय मा. स्थायी समिती सभेच्या विषयपत्रिकेवर विषय क्र. ४८ दि. २७/५/२०१४ रोजी मान्यतेसाठी घेण्यात आला होता. मात्र विषय क्र. ४८ चा विचार पुढिल सभेच्या वेळी घेण्यात यावा असा ठराव क्र. ६९२७ दि. २७/५/२०१४ रोजी मा. स्थायी समिती सभेने पारीत केला आहे. व त्यानंतर वेळोवेळी सदरचा विषय तहकुब करण्यात आलेला आहे.

अनधिकृत बांधकामाबाबत मा. उच्च न्यायालयाचे आदेशाचा विचार करता विषय मंजुर होणे आवश्यक होते, परंतु विषय मंजुर होत नसल्याने, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम अनुसूची ड प्रकरण २ मधील ३(के) नुसार निविदा क्र. २३/२/२०१३-१४ (अ प्रभागातील अतिक्रमण कारवाईसाठी लागणा-या उंच इमारती पाडणेकामी यंत्रसामग्री पुरविणे.) निविदा र.रु. ७००१२७१/- च्या मंजुरीबाबत मा. आयुक्त यांचे विषयपत्र क्र. स्था/१अ/२५१/१४ दि. २०/५/२०१४ अन्वये मा. स्थायी समिती सभेपुढे सादर केलेला विषय मंजुरअसल्याचे मानण्यात आले आहे.

वरील विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम अनुसूची ड प्रकरण २ मधील ३(के) नुसार मंजुर असल्याचे मानण्यात आल्याने ठेकेदारासोबत करारनामा करुन घेऊन कामाचे आदेश देण्याची कार्यवाही करण्यात आली असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम अनुसूची ड प्रकरण २ मधील ३(के) नुसार सदर अहवालाचे अवलोकन करणेत आले.

**मा.अनुराधा गोफणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मामहापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.स्वाती साने -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८७३ विषय क्रमांक - १६

दिनांक- २०.६.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे
जा.क्र.स्था/४ड/कावि/२४२/२०१६ दि.२०/०४/२०१६

स्थापत्य ड मुख्यालयाकडील निविदा क्र. ३२/१७/२०१३-१४ कामाचे नाव:- ड प्रभागाअंतर्गत प्र.क्र. ५३, ५९, व ६० मधिल अनधिकृत बांधकामावर कारवाई करणेकामी हायराईज बुम पोकलेन व यंत्रसामग्री भाडेतत्वावर पुरविणे. निविदा र.रु. ३५,००,९३९/- (अक्षरी र.रु. पस्तीस लाख नऊशे एकोणचाळीस फक्त) या कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम अनुसूची ड प्रकरण २ मधील ३(के) नुसार मा. स्थायी समिती सभेची

मान्यता मिळालेचे मानण्यात आलेची बाब मा. महानगरपालिका सभेपुढे अवलोकनार्थ सादर करणे.

स्थापत्य अ मुख्यालयाकडील निविदा क्र. ३२/१७/२०१३-१४ अन्वये

ड प्रभागाअंतर्गत प्र.क्र. ५३, ५९, व ६० मधिल अनधिकृत बांधकामावर कारवाई करणेकामी हायराईज बुम पोकलेन व यंत्रसामग्री भाडेतत्वावर पुरविणे. (निविदा र.रु. ३५००९३९/-)

उपरोक्त निविदेसाठी मे. संकल्प कन्स्ट्रक्शन या ठेकेदाराची निविदा रकमेपेक्षा ७.०१ %कमी दराची निविदा प्राप्त झालेली आहे. सदरची निविदा स्विकारणेबाबत स्थापत्य विभागाकडील प्रस्तावास दिनांक ०६/१२/२०१४ रोजी मान्यता देण्यात आलेली आहे, व ठेकेदारासोबत करारनामा करुन घेणेस मा. स्थायी समिती सभेची मान्यता घेणेकामी दि. ०९/१२/२०१४ चे विषयपत्र नगरसचिव विभागाकडे पाठविण्यात आले होते. विषयपत्रानुसार सदरचा विषय मा. स्थायी समिती सभेच्या विषयपत्रिकेवर विषय क्र. ११३ दि. १२/१२/२०१४ रोजी मान्यतेसाठी घेण्यात आला होता. मात्र "विषय क्र. ११३ चा विचार पुढिल सभेच्या वेळी घेण्यात यावा"असा ठराव क्र. ९९३६ दि. २३/१२/२०१४ रोजी मा. स्थायी समिती सभेने पारीत केला आहे. व त्यानंतर वेळोवेळी सदरचा विषय तहकुब करण्यात आलेला आहे.

अनधिकृत बांधकामाबाबत मा. उच्च न्यायालयाचे आदेशाचा विचार करता विषय मंजुर होणे आवश्यक होते, परंतु विषय मंजुर होत नसल्याने, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम अनुसूची ड प्रकरण २ मधील ३(के) नुसार निविदा क्र. ३२/१७/२०१३-१४ (ड प्रभागाअंतर्गत प्र.क्र. ५३, ५९, व ६० मधिल अनधिकृत बांधकामावर कारवाई करणेकामी हायराईज बुम पोकलेन व यंत्रसामग्री भाडेतत्वावर पुरविणे.) निविदा र.रु. ३५००९३९/- च्या मंजुरीबाबत मा. आयुक्त यांचे विषयपत्र क्र. स्था/४ड/५६५/१४ दि. ९/१२/२०१४ अन्वये मा. स्थायी समिती सभेपुढे सादर केलेला विषय मंजुर असल्याचेमानण्यात आले आहे.

वरील विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम अनुसूची ड प्रकरण २ मधील ३(के) नुसार मंजुर असल्याचे मानण्यात आल्याने, ठेकेदारासोबत करारनामा करुन घेऊन कामाचे आदेश देण्याची कार्यवाही करण्यात आली असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम अनुसूची ड प्रकरण २ मधील ३(के) नुसार अहवालाचे अवलोकन करणेत आले.

**मा.अनुराधा गोफणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.शुभांगी बो-हाडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १७

दिनांक- २०.६.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/१०/आकुर्डी/५०/२०१६ दि.२८/०४/२०१६

विषय - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ १५४ सह कलम ३७ (१) अन्वये निदेश विकास नियंत्रण नियमावलीत, सांडपाणी प्रक्रिया व पुनर्वापर करणेबाबत तरतूद समाविष्ट करणेबाबत.

संदर्भ- १. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग आदेश क्र. टिपीएस-२४१३/नाशिक-१९/प्र.क्र.२४५/२०१३/नवि-९ दि.१५.०१.२०१६

उपरोक्त संदर्भिय आदेशान्वये शासनाने राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका व नागपूर महानगरपालिका वगळता उर्वरित सर्व महानगरपालिकांना विकास नियंत्रण नियमावलीत, सांडपाणी प्रक्रिया व पुनर्वापर करणेबाबत तरतुद समाविष्ट करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ सह कलम ३७ (१) अन्वये खालील प्रमाणे निदेश दिले आहेत.

**<u>निदेश-</u>**

राज्यातील, बृहन्मुंबई महानगरपालिका व नागपूर महानगरपालिका वगळता, उर्वरित सर्व महानगरपालिकांना, त्यांच्या प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीत, सांडपाणी प्रक्रिया व पुनर्वापरासंबंधीची, सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद केल्यानुसारची तरतुद समाविष्ट करणेबाबत, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करून यथायोग्य प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव सादर करावा. सदर आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून कलम १५४ च्या तरतुदी लागू होतील.

सोबत संदर्भिय शासन आदेश व त्या सोबतच्या परिशिष्टाची छायाप्रत मा. महापालिका सभेच्या अवलोकनार्थ व निर्णयार्थ जोडली आहे. सदर आदेश सोबतच्या परिशिष्टात विषयांकित बाबत खालील प्रमाणे तरतूद नमूद आहे.

Regulations for Waste Water Treatment & Recycling :

**A. TYPES OF WASTE WATER**

1) **Black Water**: It means waste water from W.C. urinals and M.S.W.

2) **Grey Water:**It means waste water from bathrooms, sinks and wash areas

3) Apart from residential waste water, waste water generated from industrial, medical. commercial usage shall also be treated as per guidelines given by the Pollution Control Board.

**B. APPLICABILITY**

These regulations shall be applicable to all developments/ redevelopments, part developments on plots having an area of 4,000 sq. m. or more as well those mentioned under (C-2) to (C-6) shall have the provision for treatment, recycling and reuse of waste water. The applicant shall along with his application for obtaining necessary layout approval/building permission shall submit a plan showing the location of waste water treatment plant, furnishing details of calculations, references, implementation. etc. This plan shall accompany with the applicant's commitment to monitor the system periodically from the date of occupation of the respective building.

**C. REGULATIONS**

**(C-1) For Layout approval / building permission**

I. In case of residential layouts, area admeasuring 4000 sq. m. (1 acre) or more, in addition to the open space prescribed in the bye-laws, a separate space for waste water treatment & recycling plant should be earmarked in the layout.

II. The recycled water shall be used for gardening, car washing, toilet flushing, irrigation, etc and in no case for drinking, bathing, washing utensils, clothes, etc

III. On the layout plan, all chambers, plumbing lines which are a part of waste water treatment should be marked in different colour while submitting the layout for approval to the concerned Municipal Corporation/ Council/ Approving authority.

IV. Only provision for basic civil work and required machinery will be proposed by the concerned Municipal Corporaion/Council. Other than this provision for additional machinery, pipes, tanks, landscape should be provided by owner developer at his own cost.

V. A clause must be included by the owner/developer in the purchase agreement that the purchaser, owner of the premises /organization or society of the

purchasers shall ensure that.

a. The recycled water is tested every six months either in Municipal Laboratory or in the laboratory approved by Municipal Corporation or by State Government and the result of which shall be made accessible to the competent. Authority/ EHO of the respective Ward Office.

b. Any recommendation from testing laboratory for any form of corrective measures that are needed to be adopted shall be compiled Copy of any suchrecommendation and necessary action taken shall also be sent by the testing laboratories to the Competent Authority / EHO of respective wards

**(C-2) Group Housing / Apartment Building**

I. In case of group housing if the built-up area is 2000 sq. m. or above or if consumption of water is 20,000 lit/day or more, or if a multi-storied building which has 50 tenements or more, then waste water treatment and recycling plant as mentioned in (C-1) should be constructed.

**(C-3) Educational, Industrial, Commercial. Government, Semi-government organization hotels, lodging, etc.**

For all buildings in this category havinga build-up area of 1500 sq. m. or More and if water consumption is 20,000 lit/day or more, then provision for wastewater treatment and recycling plant as mentioned in (C-1) is mandatory.

**(C-4) Hospitals**

All hospitals having 40 or more beds must provide a waste water treatment and recycling plant as mentioned in (C-1).

**(C-5) Vehicle Servicing Garages**

All vehicle servicing garages shall ensure that the waste water generated through washing of vehicles is treated and recycled back for the same use as mentioned in (C-1)

**(C-6) Other hazardous uses**

All other establishments / buildings where chances of waste water generated containing harmful chemicals, toxins are likely and where such water cannot be directly led into municipal sewers, the concerned competent authority may direct the owners, users of such establishments, buildings to treat their waste water as per the directions laid in (C-1)

**D. PENALTY**

i Any owner/developer/organization /society violating the provisions of these-bye-laws, shall be fined Rs. 2500 on the day of detection and if the violation continues, than shall be fined Rs.100 for every day as concrete action after written notice from the concerned competent authority.

ii. If the results of test as mentioned in (C-1 i. a. b.) are not satisfactory, then the concerned owner/developer/organization/society shall be charged a penalty of Rs. 300/- per day till the necessary preventive action is taken and disconnection of water connection also.

उपरोक्त शासन निदेशा नुसार पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मंजूर विकासनियंत्रण नियमावलीत सांडपाणी प्रक्रिया व पुनर्वापर तरतुद समाविष्ट करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्यास तदनंतर फेरबदलाची सूचना प्रसिध्द करून हरकती व सुचना मागविणे, संबंधितांना सुनावणी देऊन हरकत व सूचना अर्जावर अंतिम निर्णय घेऊन फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव सादर करण्यास आयुक्त, पिंपरी चिंचवड म्हानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.अनुराधा गोफणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.आशा सुपे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा.पौर्णिमा सोनवणे -** मा. महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देते.

यानंतर सुचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ८७४ विषय क्रमांक - १७

दिनांक- २०.६.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/१०/आकुर्डी/५०/२०१६ दि.२८/०४/२०१६

विषय क्रमांक १७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले

------

**मा.स्वाती साने -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १८ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८७५ विषय क्रमांक - १८

दिनांक- २०.६.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.आरोग्य/२/कावि/२७८ /२०१६ दि. ९/०५/२०१६

देशातील सर्व शहरां मधील नागरिकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे या करीता शहरांना स्वच्छतेची आणि या शहरातील व सर्व नागरिकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्याचे ध्येय गाठण्यासाठी केंद्रशासनाने स्वच्छ भारत अभियान संपूर्ण देशामध्ये राबविण्याची घोषणा दि.२/१०/२०१४ पासून केलेली आहे. महाराष्ट्र शासनाने देखील केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान” च्या धर्तीवर राज्यामध्ये “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” राबविणेबाबत नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. स्वभाअ/२०१५/ प्र.क्र.२३/नवि/३४, दि.१५/५/२०१५ अन्वये कळविणेत आलेले आहे. तसेच या अभियानाचे अनुषंगाने केंद्र व राज्य शासनाचे हिस्स्याची रक्कम (अनुदान) क्र.स्वमअ-२०१५/प्र.क्र.४०/नवि-३४ दि.१४/८/२०१ अन्वये निर्गत करणेत आलेली आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वतःचे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारीमुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई -३२ यांचे कडील प्राप्त पत्र क्र.स्वमअ-२०१५/प्र.क्र.४०/नवि-३४, नगर विकास विभाग दि.१७/८/२०१५ अन्वये सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून खालील प्रमाणे अनुदान प्राप्त झाले आहे.

**स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) केंद्रशासनव राज्य शासन हिस्सा वाटप तक्ता**

| क्र | तपशील | केंद्र शासन अनुदान | राज्य शासन अनुदान |
|---|---|---|---|
| १ | वैयक्तिक घरगुती शौचालय | ८४,९६,०००/- | १,६९,८८,०००/- |
| २ | सामुदायिक शौचालय | ३४,६७,०००/- | ११,५६,०००/- |
| ३ | स्वच्छ महाराष्ट्रअभियानाचे ब्रँडिंग (माहिती, शिक्षण व प्रसार आणि जन जागृती) | ५,९०,०००/- | १,९७,०००/- |
| ४ | क्षमताबांधणी | १,५०,०००/- | ५०,०००/- |
| ५ | **एकूण** | **१,२७,०३,०००/-** | **१,८३,९१,००० /-** |
| | | **केंद्रशासन व राज्य शासन एकूणअनुदान** | **३,१०,९४,०००/-** |

वरील प्रमाणे प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/-, राज्य शासनाचे र.रु. ८०००/- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/- याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येईल.

त्यानुसार सदर अभियान सुरु झालेपासून दिनांक ३०/४/२०१६ अखेर प्रपत्र "अ" प्रमाणे कामकाज झालेले आहे.शासन निर्णय क्र. स्वभाअ/२०१५/प्र.क्र.२४९/नवि-३४, दिनांक १९/११/२०१५ अन्वये "नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेण्याची बाब संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रत्येक महिन्याच्या सर्व साधारण सभेच्या विषय सूचीवर कायम स्वरूपी समावेश करून या विषयाचा सविस्तर आढावा सर्व साधारण सभेमध्ये घेण्यात यावा" असे कळविलेले आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३०/४/२०१६ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

**प्रपत्र “अ”**

सबब,महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा मा. महापालिका सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

| **महानगरपालिकेचे नाव** | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|
| जिल्हा | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची | ४६८५ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | ४२०२ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | ३२७० | |

| | | | |
|---|---|---|---|
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | १४१३ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | ८५० | |
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ७६२ सिटस | |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | ३२४८ लाभार्थी | GOI+GOM= १९४.८८ लाख | GOI = २०००/- व GOM = ४०००/- हिस्सा |
| | | ULB = ६४.९६ लाख | ULB=२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **२५९.८४ लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | ३९३ लाभार्थी | GOI+ GOM=२३.५८ लाख | GOI = २०००/- व GOM= ४०००/- हिस्सा |
| | | ULB = ७.८६ लाख | ULB= २०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **३१.४४ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत आला.

**मा.अनुराधा गोफणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----------

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, ठराव क्रमांक १९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ८७६ विषय क्रमांक- १९

दिनांक - २०.६.२०१६ विभाग - मा.नगरसचिव

**<u>मा. विधी समिती</u>**

अ) दि.१८/३/२०१६ व दि.१.४.२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.१६/४/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, ठराव क्रमांक २० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ८७७ विषय क्रमांक- २०

दिनांक - २०.६.२०१६ विभाग - मा.नगरसचिव

**मा.महिला व बालकल्याण समिती**

अ) दि.२३/३/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.१३/४/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मामहापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, ठराव क्रमांक २१ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ८७८ विषय क्रमांक- २१

दिनांक - २०.६.२०१६ विभाग - मा.नगरसचिव

**मा.शहर सुधारणा समिती**

अ) दि.५/४/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.२१/४/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मामहापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, ठराव क्रमांक २२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ८७९ विषय क्रमांक- २२

दिनांक - २०.६.२०१६ विभाग - मा.नगरसचिव

**मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

अ) दि.१६/३/२०१६, दि.६/४/२०१६ व दि.११/४/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.२०/४/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.स्वाती साने -** मा.महापौर साहेब, ठराव क्रमांक २३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८८० विषय क्रमांक- २३

दिनांक - २०.६.२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पापु/मुख्य/७४/२०१६ दि.१९/०५/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा दैनंदीन पाणीपुरवठा पवना धरणातील साठयावर अवलंबून आहे. यावर्षी पाऊस कमी आल्याने महाराष्ट्रात सर्वत्र पाण्याचे दुर्भिक्ष्य निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर पवना धरणात गेली ४० वर्षे साठलेला गाळ काढून पाणी साठयात वाढ होणार आहे. त्यामुळे पाण्याच्या उपलब्धतेमध्ये वाढ होणार आहे. तसेच धरण क्षेत्रातील जमीनीची धुप होऊन माती पावसाच्या पाण्यासोबत जलसाठयामध्ये गाळ स्वरुपात साठते. जमीनीची धुप कमी होण्यासाठी धरण क्षेत्रामध्ये स्थानिक प्रजातीचे वृक्षारोपण, वनीकरण, लूज बोल्डर बंधारे, गॅबियन बंधारे इ. यासारखी मृदसंधारणाची कामे करणे आवश्यक आहे.

पवना धरण आपल्या महानगरपालिकेच्या दैनंदिन पाणीपुरवठयाचा मुख्य उद्भ्व असल्याने पवना धरणातील गाळ काढण्याची तसेच धरण क्षेत्रात मृदसंधारणाची कामे करण्याची नैतिक जबाबदारी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची असल्याने सदरची महापालिका क्षेत्राबाहेरील कामे करण्यास मान्यता मिळणेकामी तसेच सदर कामास रक्कम रु. ५ कोटीची प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेच्या मंजूरीची आवश्यकता आहे. तसेच

महापालिकेच्या सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकामध्ये रक्कम रु. ५० लाखाची विशेष तरतूद होणे आवश्यक आहे.

विषयांकित हद्दीबाहेरील कामे करण्यास मान्यता मिळणेकामी तसेच सदर कामापोटीच्या खर्चास रक्कम. रु. ५ कोटीची प्रशासकीय मान्यता मिळणेकामी तसेच या कामासाठी सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकामध्ये रक्कम रु. ५० लाखाची विशेष तरतूद करणेकामीचा प्रस्ताव हा तातडीचा असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.नंदा ताकवणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.महापौर -** सर्वांचे आभार मानुन आजची सभा संपली असे जाहीर करणेत येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)

**महापौर**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

नगरसचिव कार्यालय

क्रमांक - नस/९/कावि/३१९/१६

दिनांक - ६/०८/२०१६



**नगरसचिव**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(विषय क्रमांक १२ चे लगत )

**(**मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.प्रशा/१/कावि/२२२/२०१६ दि.११/०४/२०१६)

**महाराष्ट्र शासन**

तात्काळ

क्र. पीसीसी-३०१५/प्र.क्र.३५०/नवि-२२
**नगर विकास विभाग,**
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- १४.३.२०१६

**प्रति,**

**आयुक्त,**
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी.

**विषय : आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदावर करावयाच्या नेमणूकीस <u>शासन मान्यता मिळणेबाबत.</u>**

**संदर्भ** :- १) आपले पत्र क्र. प्रशा/१/कावि/४३२/२०१५,दिनांक १५.५.२०१५
२) आपले पत्र क्र. प्रशा/१/कावि/७२५/२०१५,दिनांक २७.८.२०१५
३) आपले पत्र क्र. प्रशा/१/कावि/७३०/२०१५,दिनांक २७.८.२०१५
४) आपले पत्र क्र. प्रशा/१/कावि/७७९/२०१५,दिनांक २१.९.२०१५

**महोदय,**

उपरोक्त विषयावरील संदर्भ क्र. १ येथील दिनांक १५.५.२०१५ च्या पत्रान्वये पाठविलेला प्रस्ताव व त्याअनुषंगाने संदर्भ क्र. २ ते ४ येथील पत्रान्वये सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने प्रकरण शासनास सादर केले असता, **महानगरपालिकेने पदोन्नती समितीच्या निर्णयाचा फेरविचार करावा,** असे निर्देश शासनाने दिले आहेत. तरी, शासनाचे सदर निर्देश व आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदाचे सेवाप्रवेश नियम, पदोन्नतीसाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव व अन्य संबंधित बाबी विचारात घेवून, पदोन्नती समितीच्या निर्णयाचा फेरविचार करण्याबाबतची कार्यवाही करावी, ही विनंती.

आपला,

( ए. कि. सहाणे )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**आयुक्त कार्यालय**
आवक क्र.- २२१४
दिनांक- १४/३/१६
विभाग- प्रशासन
स्वीय सहा.-
मा. आयुक्त-